

# पुण्यप्रभाव

(सहा अंकी नाटक)

**एकूण पृष्ठे -१४३**


- अंक पहिला ........................................ पृष्ठे २ ते ४२
- अंक दुसरा ........................................ पृष्ठे ४३ ते ६६
- अंक तिसरा ........................................ पृष्ठे ६७ ते ८४
- अंक चवथा ........................................ पृष्ठे ८५ ते १००
- अंक पाचवा ........................................ पृष्ठे १०१ ते १२०
- अकं सहावा ........................................ पृष्ठे १२१ ते १४३



समग्र गडकरी वाङ्मय.
सीडी प्रकल्पास
हार्दिक शुभेच्छा !

दि.सी.के.पी.
को-ऑप. बँक लि.

**मंगलाचरण**

(सरस सीस मुगुट मार.)

प्रभुपदास नमित दास मंगलमात्रास्पदा वरदा सदवनिं लव
यदवलंब विलंब न करि हरि दुरिता सौख्य वितरि ।।धृ. ।।
सारस्वतचरणकमल- । दलिं विरहत कविमंडल दुर्लभ
ते दिव्य स्थल। पंकनिरत। राम रमत। धन्य तरी।। १ ।।

## अंक पहिला

# प्रवेश पहिला

(स्थळ: अरुंधतीनगरातील शिवालय. ईश्वर प्रवेश करितो.)

**ईश्वर** : (स्वगत) माझ्या प्रेमसंन्यासाने मला हा पुण्यप्रभावाचा मार्ग अचूक दाखविला नसता, तर अजूनही मन त्या वेड्यांच्या बाजारातच रमत राहिले असते. परमेश्वरा, या हाताने स्वीकारलेले हे सत्कृत्य नीटपणे घडवून आण. माझ्या क्षणोक्षणी बदलत्या बुद्धीला तुझ्या थोरथोर भक्तांच्या एकनिष्ठेचे, तन्मयतेचे आणि स्वयंपूर्णतेचे सामर्थ्य देऊन आखलेल्या मार्गापासून तिला केसभरही चळू देऊ नकोस. भाग्यशाली भूपाल, वसुंधरेच्या प्राप्तीमुळे तुला मिळणाऱ्या तुझ्या संसारसुखाची हा संन्यासी ईश्वर स्वप्नातही अपेक्षा करणार नाही. पण या हृदयाची गडबड अजून शांत होत नाही. या शिवालयाच्या दरवाज्याबाहेर वसुंधरेच्या येण्याची वाट पाहत मी उभा राहिलो खरा, पण वाऱ्याच्या नुसत्या झुळकीमुळे उद्‌भवलेल्या झाडपानांच्या तरळत्या हालचालीसरशी, वाटेल त्या बाजूने वसुंधरा आल्याचा भास होऊन मी वेड्यासारखा स्वत:भोवती गिरक्या खात आहे तो कशाने? माझे मन इतके चंचल झाले आहे ते आज इतक्या वर्षांनी वसुंधरा पुन: भेटणार म्हणून उत्सुकतेमुळे, की तिच्याविषयीच्या ज्या माझ्या मनोवृत्ति पार मावळून गेल्या म्हणून मी अभिमान वाहत आहे त्यांच्याच खळबळाटामुळे? अजून या बाबतीबद्दल माझ्या मनाने एक उत्तर मिळत नाही. दुसऱ्याला फसविताना मनुष्याचे मन जी सावधगिरी वापरीत असते तीपेक्षा स्वत:चीच फसवणूक करण्यासाठी केलेले मनाचे डावपेच कितीतरी खोल असतात! पण या विचारांना आता आवरून धरिले पाहिजे; ही पाहा वसुंधरा देवळातून बाहेर येत आहे. अहाहा, हिच्याकडे पाहताच सारी चेतनाशक्ति डोळ्यात एकवटून मनातले विचारसुद्धा जागच्या जागी थबकून राहतात.

(वसुंधरा व मागाहून मुलाला कडेवर घेऊन दामिनी येतात.)

**वसुंधरा** : दामिनी, दीनाराला घेऊन येताना त्या पायऱ्यांवरून अशी घाईने उतरत जाऊ नकोस म्हणून तुला हजारदा सांगितले असेल, पण तुला काही राहवत नाही. तुझ्या चंचलपणाबद्दल सुदाम इतकं बोलतात ते एका परीने खरेच म्हणायचे!

**दामिनी** : बाईसाहेब, तुमचा स्वभावच भारी भित्रा! तुम्ही अगदी काळजी करीत जाऊ नका. तुमचा दीनार तुम्हाला नुसता दीनारच आहे, पण आम्हा साऱ्या चाकरमाणसांच्या हृदयाचा हा हिरा आहे, समजला!

**वसुंधरा** : आणखी ती पाहा, सरकविलीस त्याची झूल एकीकडे! कातरवेळेला एखाद्याची नजर गेली तर माझ्या सोनुल्याला तेव्हाच दृष्ट लागायची ! साऱ्यांच्याच नजरा काही सारख्या नसतात हो !

**दामिनी** : अष्टौप्रहर माझ्या जिवाभावाचे निंबलोण उतरून मी त्यांची दृष्ट काढीत असल्यावर कशी कोणाची दृष्ट लागणार? आणखी, असल्या भित्र्या गोष्टींचा आमच्या धाकट्या धनीसाहेबांना मोठा राग आहे हो! बाईसाहेब, तुम्ही दृष्टीचे नांव काढताच, पाहा, आमच्या खांद्यावरच्या खाशांनी एकेक डोळा केवढाला केला आहे तो! अगंबाई, आम्हा बायाबापड्यांकडे बाळंत्यातल्या बहाद्दरांनी असे रागावून पाहू नये गडे! मला कसे कापरे भरले आहे सारखे, नी बाईसाहेब म्हणतात स्वारीला दृष्ट लागेल म्हणून! आणि दृष्ट लागेल म्हणून असले रत्न झाकून का ठेवावयाचे? या साऱ्या योगायोगाच्या गोष्टी! सुंदर नक्षत्रांचा एवढा पसारा देवाने आभाळात उघड्यावरच नाही का टाकिला आहे तो!

**वसुंधरा** : अगं, नक्षत्रांवरसुद्धा दृष्ट पडत नाही का? चांगल्या चमकत्या चांदण्या देखतादेखत आभाळातून निखळून पडतात त्या का कोणाची पापी नजर फिरल्यावाचून पडतात? होत्यावेळी नाही ते होते.

(नजरा नहि आंदावे.)

नच संभव ज्या काही। होत अकारण तेहीं। कालहि त्या
नाही ।।धृ.।। कलिका नाही खुलली, करपत तो अकालीं ।।
हरपत मोहर कां वनी बाई ।।१।।

**दामिनी** : अगंबाई, तो कोण मेला एका नजरेने-

**वसुंधरा** : दामिनी, वेड्यावाकड्या शब्दांखेरीज तुला बोलताच येत नाही वाटते?

**दामिनी** : असे बोलायचे नाही तर काय करायचे? अजून सारख्या नजरेने पाहत आहे पाहा कसा! या मेल्या घटिंगणांना दोन्ही डोळ्यांची मुरवत कशी ती मुळीच नसते. चला, बाईसाहेब, नका पाहू तिकडे!

(वसुंधरा ईश्वराकडे वळून पहाते.)

**दामिनी** : ए मेल्या,असा नजरेला नजर देऊन मोठ्या दिमाखाने-

**वसुंधरा** : दामिनी, ऐक पाहू तू जरा. कोण, ईश्वर?

**ईश्वर** : होय, तोच मी एकवेळचा तुझा भक्त ईश्वर.

**वसुंधरा** : तुम्हाला एकदम ओळखिले नाही त्याची क्षमा करा. पण तुमच्यात बदलच तसा झालेला आहे.

**ईश्वर** : तू म्हणतेस ते अगदी खरे आहे. पण हा फरक केवळ बाह्यांगापुरताच झालेला नाही, वसुंधरे, मी आता अंतर्बाह्य सारखा बदलून गेलो आहे.

**वसुंधरा** : तुमच्यात असा बदल होण्याचे कारण विचारिले तर उगीच देखल्या देवा दंडवत केल्यासारखे काहीतरी विचारले, असे नाही ना तुम्ही म्हणणार?

**ईश्वर** : बरळणाऱ्या मत्सराला ज्याचा संशयसुद्धा येणार नाही ते प्रेमाला-क्षमा कर- मृतप्रेमाला कसे म्हणता येईल? पण एका शून्यजीवन कर्महताची कहाणी ऐकून तुझ्या आनंदी मनाला कदाचित् त्रास होईल अशी-

**वसुंधरा** : ईश्वर, ज्या स्थितीचा तुम्ही सारखा अनुभव घेत आहा, तिची नुसती हकिकत ऐकून मनाला वाईट वाटेल म्हणून माणुसकीला दूर लोटण्याइतकी का मी निर्दय आहे? यापूर्वीच तुमच्याबद्दल विचारपूस करण्याचे माझ्या मनात आले होते, पण आम्हाला सांगोवांगी कळले, की नांव मिळविण्यासाठी ईश्वर दूरदेशी निघून गेले म्हणून.

**ईश्वर** : वेडी लोकवार्ता! संसाराच्या सामान्य राहणीला सोडून एखाद्याने जरा निराळ्या मार्गाने जाण्याचा विचार केला म्हणजे लोकवार्ता आपल्या दृष्टीने त्याच्याबद्दल बऱ्यावाईट कल्पना काढीत असते. मात्र, अशा वेळी श्रीमंतांच्या स्वैरवृत्तीला नांवलौकिकाचा आधार मिळतो आणि गांजलेल्या गरिबांकडे वाइटाचा वाटा येतो. बाकी माझ्या बाबतीत एका अर्थी नांव मिळविण्याबद्दलची लोककल्पना खरीच आहे म्हणावयाची; कारण नांव बदलून हिंडण्यासाठी मला आधी खरोखरीच दुसरे नांव मिळवावे लागले. फरक इतकाच, की मला नांव मिळविण्यासाठी प्रवास करावा लागला नसून, प्रवास करणयासाठी मात्र नांव मिळवावे लागले!

**वसुंधरा** : तुमच्या करुण कथेची भावी कल्पना मनाभोवती सारखी तरंगत असल्यामुळे माझ्याने तुमच्या या मौजेच्या बोलण्याचे सुद्धा कौतुक करवत नाही. बरे, तुमचे बोलणे मध्यंतरीच थांबले?

**ईश्वर** : अतिपरिचयामुळे मला माझ्या दु:स्थितीचे आता काहीच वाटेनासे झाले आहे. ऐक माझी हकिकत; पण मला ती नीट जुळून मात्र सांगता येणार नाही. आज इतकी वर्षे दुसऱ्याशी बोलण्याची माझी सवय इतकी मावळून गेली आहे, की एखाद्याशी बोलताना आवाज किती लहानमोठा करावा लागतो याचासुद्धा मला अंदाज राहिलेला नाही. मग संगतवार एखादी गोष्ट सांगण्याची गोष्टच सांगावयाला नको. तुझा लग्नदिवस तुझ्या लक्षात असेलच?

**वसुंधरा** : लग्नदिवसाचा कोणाला कधी विसर पडेल काय?

**ईश्वर** : खरेच; आयुष्यातल्या आदिमध्याताच्या तीन अत्यंत महत्त्वाच्या दिवसांपैकी, जन्ममरणाच्या टोकावरच्या दिवसांची कमकुवत मनुष्यबुद्धीला आठवण नसते; पहिल्या वेळी आठवणीचा जन्म झालेला नसतो आणि मरणकाळापूर्वीच आठवणीचे मरण घडून येते; आणि म्हणून, लग्नदिवसाची आठवण मात्र तिप्पट ताकदीने जीव धरून राहते. वसुंधरे, तुझ्या लग्नदिवसाने माझ्या जन्मदिवसाला निष्फळ ठरवून मला मरणदिवसाची अपेक्षा करावयाला लाविले. त्या दिवशी तुझ्या खऱ्याखुऱ्या सुखाचा जन्म झाला आणि माझे जन्माचे सुख नाहीसे झाले; ज्या मुहूर्तावर तू आपल्या घरात पहिले पाऊल टाकिलेस त्याच मुहूर्तावर मी माझ्या घरातून शेवटचे पाऊल बाहेर टाकिले.

**वसुंधरा** : बाबासाहेबांनी तुम्हा दोघांच्या मागण्या नाकारून मला या स्थळी दिली; वृंदावनांना कमी दर्जाच्या कुळातले म्हणून नाही म्हटले आणि तुम्हाला-

**ईश्वर** : आणि मला योग्यतेमुळे तुझ्या अयोग्य ठरविले; आता त्याबद्दल बोलताना वाईट वाटू देण्याचे काही कारण नाही. माझ्या नशिबाचा जोरच तितका!

**वसुंधरा** : ईश्वर, त्याबद्दल तुम्ही मला दोष देत नाही ना?

**ईश्वर** : भलतेच! बाबासाहेबांच्या दृष्टीने त्यांचे म्हणणे खोटे नव्हतेच! आणि कदाचित् असले तरी त्याबद्दल मी तुला काय म्हणून दोष देऊ? विश्ववैभवाची वैजयंती लक्ष्मीवल्लभासारख्या लोकैकपुरुषाच्या कंठी पडली तर तिच्याकडे आशेने पाहणाऱ्या भणंगाने आपल्या भिकारी भाग्यदेवतेला बोल लावावा; यात वैजयंतीचा काय दोष? आकाशातून उतरलेल्या हिमवंतीने फुलत्या फुलाच्या हृदयात ठाव घेतल्याबद्दल, जमिनीशी जखडलेल्या दगडाने दुर्दैवाला दोष देत बसावे! तिच्याकडे पाहत राहिल्याने तिच्यावर हक्क कसा पोहोचणार? केवळ तिच्या वाढत्या वैभवाकडे पाहण्यात त्याच्या सुदैवाची सीमा संपते.

**वसुंधरा** : ईश्वर, क्षमा करा, पण आता तरी तुमच्या मनात -

**ईश्वर** : तुझ्याबद्दल भलत्या कल्पनेची छायाही सापडणार नाही. त्या क्षणीच मी आपले

हृदय दगडाप्रमाणे घट्ट आणि निर्विकार करून टाकण्याचा निश्चय केला ! माझ्या हृदयाच्या दगडफुलाने तुझ्या नाजूक प्रतिमेची पूजा करीत बसण्याइतका अविचारी मी खास नाही. तुझ्या लग्नातल्या मंत्रांनीच माझ्या आशेच्या उत्तरक्रिया उरकून घेऊन आणि विवाहहोमात माझे हृदय होमून, आता मी संसाराच्या सुतकातून सर्वस्वी सुटलो आहे.

**वसुंधरा** : तुमच्या तीव्र उदासीनतेमुळे माझ्या मनाला किती वाईट वाटते म्हणून सांगू?

(नृपकुलीं जनन चिर.)

शिशुपणाहूनि परिचित जनांसि बघुनि दु:खिं हो स्वसुख

असुखमय कटुतर वाटे। मोदहि विषसम ॥ ध्रु. ॥ मंद सदा

आनंद विषादे। हृदयि विरती खर बसवि निजधाम॥ १ ॥

ईश्वर, यापेक्षा तुम्ही अजून मनासारखी एखादी स्त्री पाहून विवाहसुखात संसारी आयुष्य घालविण्याचा विचार का करीत नाही?

**ईश्वर** : ज्या सुखाची लहानपणापासून आशा केली ते मिळण्याची आता आशा नाही म्हणून. वसुंधरे, यापेक्षा स्पष्ट बोललो तर त्याची पापात जमा होईल.

**वसुंधरा** : समजले! पण आपल्या साऱ्या कल्पना खऱ्या होतात असे थोडेच आहे! जितके सुख मिळेल ते आपले समजून समाधानाने राहण्यातच देवाच्या मर्जीला मान दिल्यासारखे होते.

**ईश्वर** : खऱ्या सुखाच्या निराशेनंतर हे कशाचे सुख आणि कशाचे समाधान! गजान्तलक्ष्मीच्या राजवैभवात मिरवणूक काढण्यासाठी आणलेल्या हत्तीच्या मढ्यावर हस्तिदंती सामानाचे दुकान काढण्याचा प्रसंग आला तर त्यात समाधान कोण मानील? पिकास आलेल्या क्षेत्रभागावर तरंगणाऱ्या मेघापासून कृषीवलाने जीवनाची आशा करावी आणि शेवटी वृष्टी केल्यावाचून मेघ निघून गेल्यावर, निदान त्याच्यापासून क्षणभर छाया मिळाली म्हणून समाधान मानावे तशातलाच हा प्रकार नाही का? वसू, तुझ्यासारख्या त्रिभुवनदेवतेला सावधिक संसाराच्या साम्राज्यात राणी केल्यानंतर, या उपमर्दाबद्दल तिच्या दिव्यपदाची भरपाई करून देण्यासाठी उत्साहाने लहानपणापासून कमावीत आणलेली बुद्धिमत्ता, मानसशक्ति आणि बाहूबल आता एखाद्या सजीव बाहुलीला सजविण्यासाठी खर्च करीत बसू आणि त्यात सर्वस्वाचे सार्थक मानू? वसुंधरे, अमर्याद इच्छा करणाऱ्या निराश मनाला मर्यादित सुखप्राप्तीपेक्षा सर्वस्वाच्या सत्यानाशानेच अधिक समाधान वाटते!

**वसुंधरा** : लहानपणी आपण एका जागी वाढलो, खेळलो, म्हणून बोलावेसे वाटते. ईश्वर, रागावू नका; पण अमर्याद सुखाची आशा धरून बसणे आणि ते मिळाले नाही म्हणजे डोक्यात अशी राख घालणे हे जरासे गैरच नाही का?

**ईश्वर** : वसुंधरे, माझी आशा असंभवाच्या कोटीतली मुळीच नव्हती. वस्तुस्थितीचा पुरता विचार करूनच मी तिची जोपासना करीत आलो होतो. माझीच काय, पण आपणा सर्वांच्याच पहिल्या आशा शक्यतेला फारशा सोडून नसतात. आपली बाळपणची आशेची कल्पनाचित्रे जरा भडक रंगात रंगविलेली मात्र असतात; ती व्यवहारात वठावयाला ज्या मानाने कमी-जास्त वेळ लागतो त्या मानाने त्यांच्यावरचे रंग उडून जाऊन ती थोडीबहुत फिकट होतात एवढेच! बाकी बहुतेकांची इच्छाचित्रे बहुतांशी वस्तुस्थितीत उतरलेली दिसतात. असे होत नसते तर संसाराचा विस्तार इतका न पसरता, जग म्हणजे वैतागलेल्या बैराग्यांची एक मोठी थोरली धर्मशाळाच झाली असती, किंबहुना मानवतेची वाढ खुंटून सारी पृथ्वी पशुपक्ष्यांच्या ताब्यात गेली असती. माझ्यासारखी जी काही उलट बाजूची उदाहरणे सापडतात त्यांचे कारण, मानवी इच्छेशी कधी कधी ईश्वरी इच्छेचा विरोध होतो हेच! परिस्थितीच्या पटांगणात मानवी मनोरथांना कल्पनेच्या वेगाने फिरविताना आम्ही विश्वाचे नियमन करणाऱ्या अदृश्य शक्तीला जमेस धरीत नाही म्हणूनच आमच्या स्वैरसंचाराला वेळोवेळी आघातांचे अडथळे होतात. या शक्तीचा वेग आम्हाला विरोधी झाला म्हणजे आमचे मनोरथ कधी तात्पुरते अगतिक होतात आणि कधी आडमार्गी उलथून कायमचे मोडून जातात. या दैवी इच्छेनेच माझ्या दुर्दैवाच्या रेषांना अशा वाकड्या वळणावर ओढून नेले आहे! जाऊ देत, वसुंधरे, या गोष्टीचा विचार करण्यात अर्थ नाही. कर्तृत्वाच्या अभावी आजपर्यंत सारे आयुष्य विचार करण्यात घालविल्यामुळे, कोणत्याही विषयासंबंधी माझे बोलणे इतके पाल्हाळाचे होऊन बसले आहे, की ऐकणाराला त्याचा कंटाळा आल्यावाचून राहत नाही. बहुभाषित्वाला मूर्खपणाइतकेच दुर्दैवाचेही निदर्शक म्हणता येईल! माझ्या दुर्दैवाचा परिणाम तुला याहून अधिक जाणविण्याची माझी इच्छा नाही! त्याची ओरड तुझ्या कानीकपाळी कशाला?

**वसुंधरा** : तुमच्या अशा बोलण्याने मन कसे दुभांगून जाते अगदी! ईश्वर, तुम्हाला पुन्हा सांगते-नीट विचार करा-आपले वृंदावन-तुमच्याप्रमाणेच बाबांनी त्यांचीही मागणी नाकारिली, त्यांनाही काही दिवस वाईट वाटले; पण पुढे त्यांनी लग्न केले-

**ईश्वर** : काय, वृंदावनाने लग्न केले? मग तो तुला खरोखरीच योग्य नव्हता! वृंदावनाने लग्न केले आणि योग्य स्त्री मिळून आता तो सुखात आहे हेच तू मला सांगणार ना?

**वसुंधरा** : कालिंदीबाईंच्या माहेरची-आणि सासरचीही, तशी मला फारशी माहिती नाही; पण वृंदावन हल्ली पूर्ण सुखात असलेले दिसतात एवढे मात्र खास! ते आज इतकी वर्षे आमच्या अरुंधतीतच राहत आहेत. आमच्या मंडळींचा आणि त्यांचा मोठा जिवाभावाचा घरोबा आहे. त्यांचे पथक आमच्याच तैनातीला असते. आज अरुंधतीच्या चांगल्या नावाजलेल्या सरदारांत त्यांची जमा होते, झाले म्हटले तर, त्यांना माझ्या दीनाराच्या बरोबरीचा मुलगाही आहे. दामिनी, दीनार आणि केतन सारख्याच दिवसांचे असतील नाही?

**दामिनी** : होय, बाईसाहेब; अगदी एकाच शीणेचे. दोघांनाही अजून पुरते वर्ष काही उलटले नाही.

**ईश्वर** : हा तुझा चिमुरडा वाटते? काय याचे नांव, दीनार नाही का? गुलाम अगदी मातृमुखी आहे! आणि वृत्तीही तुझीच! तोंडाकडे पाहण्याची खोटी, लागला गुलाम हसायला. दीनारा, लबाडा, ही कुठल्या जन्मीची ओळख रे? गालांना या नखाएवढाल्या खळ्या! वसू, तुझे वडील आज जिवंत असते तर तुम्हा दोघांच्या तोंडाकडे एकदम पाहून, त्यांना तेव्हाच्या आणि आताच्या, दोन्ही काळच्या जीवनसुखांचा एका काळी उपभोग घेण्याचा लाभ झाला असता. किती तुम्हा दोघांचे साम्य हे! तुझे मूल पाहण्याची त्यांची मोठी इच्छा!

**वसुंधरा** : झाल्यागेल्या गोष्टी! बाबासाहेबांचा तुमच्यावरसुद्धा मोठा जीव होता. तुम्हाला त्यांनी असेच कटिखांदा खेळविले आहे. आज दीनाराला असा पाहून त्यांना जितका आनंद झाला असता तितकाच तुम्हाला असे पाहून त्यांना खेदही झाला असता.

**ईश्वर** : (स्वगत) या मुलाकडे पाहताच माझ्या मनात विलक्षण असंबद्ध कल्पनांचे काहूर उद्‌भवल्यामुळे मी इतका भांबावून गेलो आहे, की त्याला जवळ घेतला तर हा हातातून खाली पडेल. (उघड) वृंदावनाबद्दल तुझे बोलणे पुढे तितकेच राहिले.

**वसुंधरा** : मला बोलावयाचेही तितकेच होते. बरे, पुढे तुम्ही काय करावयाचे योजिले आहे ?

**ईश्वर** : ठीक विचारिलेस. या प्रश्नाच्या उत्तरातच तुझ्या भेटीचे कारणही तुला कळणार आहे. वसुंधरे, चालू प्रवासाच्या प्रारंभी, काही दिवस जगातल्या नव्याच्या नवाईचे नवल वाटून मन निरनिराळे प्रदेश पाहण्यात रमून जात असे; परंतु अलीकडे अतिशयामुळे सृष्टिसौंदर्यात माझ्या मनाचे आकर्षण करण्याची शक्ती राहिनाशी झाली आहे. गगनाशी गोष्टी सांगणारे पर्वत माझ्या घराच्या उंबरठ्याप्रमाणे मला दुर्लघ्य झाले; मोठाली रमणीय अरण्ये घरापेक्षाही शून्य

वाटू लागली; स्मशानातही आमच्या दिवाणखान्यातलीच भीषणता दिसू लागली. विषण्ण अर्थाचा एकान्तातला कलकलाट नुसत्या नादाने भरलेल्या गर्दीतल्या गडबडीपेक्षा हजारपटीच्या कडवटपणाने कानठळ्या बसवू लागतो. हेतूशून्य मनाच्या एकवृत्तीच्या यातना चुकविण्यासाठी थारेपालट हा एकच उपाय असतो; आणि म्हणून मी या स्थळी आलो आहे.

**वसुंधरा** : बायकांनी असे बोलू नये खरे-पण तुम्ही माझे लहानपणचे सोबती, म्हणून जरा मोकळ्या मनाने विचारिले-अशी थारेपालट करण्यासाठी आमच्या गावीच येण्यात तुमची थोडीशी चूक झाली नाही का? माझ्यामुळे उत्पन्न झालेली तुमची विषण्ण वृत्ती माझ्यासमोर राहून उणी होणार की दुणावणार? तुमच्या हृद्रोगाला माझी तर आठवणसुद्धा अगदी कुपथ्यातले कुपथ्य!

**ईश्वर** : मी या गोष्टीकडे तिऱ्हाईत नजरेने नुसते वरवर पहिले नसून स्वार्थाच्या कळकळीने तिचा विचार केलेला आहे. वसुंधरे, आपल्या दुसऱ्याविषयींच्या भावना स्थल, काल आणि दशा यांनीच बहुतांशी आखलेल्या असतात. आजपर्यंतच्या माझ्या मनातल्या विचारात वावरणारी तुझी मूर्ती एका कुमारिकेची होती आणि कुमारिकेबद्दलच्या निर्दोष अभिलाषदृष्टीनेच मी तिच्याकडे पाहत आलो. तिच्या हानीबद्दलचे माझे निःश्वासही याच कारणामुळे क्षम्य होते; आज इथे आल्याबरोबर तुझ्या ठिकाणी नाममात्रानेही अचिंत्य अशी परस्त्री दिसत आहे. तुझ्या बदललेल्या स्थितीची कल्पना एकदा नीट ठसली म्हणजे कुमारिकेबद्दलच्या शुद्ध प्रीतीचे पत्नीपदारूढ झालेल्या पतिव्रतेविषयीच्या उज्ज्वल भक्तीत संक्रमण होईल. ही निर्लोभ दृष्टी एकदा झाली म्हणजे झाले! उच्चपदी विराजणाऱ्या सौंदर्याबद्दल दुर्लभतेमुळे अभिलाषबुद्धीऐवजी आदरभाव उत्पन्न होतो; हातालगतची फुललेली फुले खुडून घेण्याची इच्छा होते, पण आकाशात बसून हसणाऱ्या तेजस्वी फुलांकडे आपण विस्मयपूर्ण आदरदृष्टीने पाहत असतो. त्यातून, तुझ्या अलौकिक गुणांचा, अढळ व्रताचा, तेजस्वी सौंदर्याचा आणि देदीप्यमान दृष्टीचा सारखा साक्षात्कार होत राहिल्यावर भलत्या भावनांचे नाव सुद्धा काढावयाला नको! दिव्य सौंदर्याच्या सान्निध्याने मनोवृती निवळतील की गढूळ होतील? आणखी एका क्षणाने मी तुझ्याजवळ एक मागणे मागणार आहे म्हणून आधी तुझी स्तुती करितो आहे असे नाही. वसुंधरे, पापदृष्टीला दर्शनमात्राने पुण्यवृत्ती करणारे तुझे पवित्र सौंदर्य, पुरुषांनासुद्धा अलंकृत करणारी तुझी विद्याप्राप्ती, पंडितांनाही लाजविणारी तुझी प्रगल्भ बुद्धी, कसलेल्या सेनापतीनेही सादर आशेने पाहण्याजोगे तुझे मनोधैर्य-जाऊ देत; आत्मस्तुती ऐकण्याचा प्रसंग आल्यामुळे ओशाळू नकोस; मीच हा विषय सोडून माझ्या मागण्याबद्दल गोष्ट काढितो.

**वसुंधरा** : तुमची इच्छा अशीच स्वच्छ असणार, की ती ऐकण्यापूर्वीच मी ती पुरी करण्याचे तुम्हाला मोठ्या आनंदाने अभिवचन देते.

**ईश्वर** : माझे म्हणणे इतकेच, की कधीमधी मला तुझे दर्शन घेण्याला प्रत्यवाय नसावा. माझ्या दुर्दैवी दर्शनाने मी तुला वारंवार विषाद देणार नाही हे मी आधीच सांगून ठेवितो. तुझ्या आयुष्याच्या नाटकातल्या पहिल्या प्रवेशात मला जितके काम मिळाले तितके पुढे कधीच मिळावयाचे नाही हे मी पुरतेपणी जाणून आहे. माझ्या भेटण्याने तुला किंवा तुझ्या पतीला-

**वसुंधरा** : भलतेच! माझी पातिव्रत्याबद्दलची कल्पना इतकी हास्यास्पद नाही. परपुरुषाकडे पाहण्याने किंवा प्रसंगी त्याच्याशी बोलण्याने चूर होऊन जाण्याइतका नकली नाजूकपणा माझ्या पातिव्रत्यात मुळीच नाही. माझ्या पतीखेरीज पुरुषमात्राला मी बंधूसमान मानिते; आणि माझ्या कोणत्याही बंधूंचे मोकळ्या मनाने प्रेमाचे स्वागत करण्यात मला तिळमात्र संकोच वाटावयाचा नाही. माझे पतीही असे अनुदार मनाचे नाहीत. त्यांची उदारता तर इतकी विशाल आहे की ते तुम्हाला आमच्याच इथे राहण्याचा आग्रह करतील.

**ईश्वर** : माझी विनंती मान्य केलीस हेच तुझे मोठे उपकार झाले; तुझ्या घरी राहण्याची माझी इच्छा नाही. होता होईल तो जिवंतपणीच अगदी नामशेष-नाही, नांवासकट नाहीसे होण्याचा माझा संकल्प आहे. तुम्हा थोरामोठ्यांच्या घरात अशा विचित्र वेषाने राहिले तर कारणावाचून प्रसिद्धी वाढत जावयाची. तुझ्या पतीचा इथे फारच मानाचा अधिकार आहे ना ?

**वसुंधरा** : तुम्हाला माहीत असेलच-आमच्या मृत्युंजयमहाराजांना पहिल्याने पुत्र नसल्यामुळे, अरुंधतीच्या राज्याचा वारसा इंद्रनाथ आणि आम्ही, असा दोन घरी जाणार होता. माझे पती महाराजांचे सर्वांत निकटचे आप्त; पुढे वृद्धपणी महाराजांना पुत्ररत्नाची प्राप्ती झाली आणि म्हणून-खरे म्हटले तर काहीच कारण नव्हते-महाराजांनी मुद्दाम, सर्व मांडलिकांवर अधिकार चालविण्याची मंडलेश्वर ही पदवी आम्हाला दिली. महाराजांचा आमच्यावर अत्यंत लोभ-राणीसाहेबांच्या पश्चात् बालयुवराजांचे संगोपन करण्याची कामगिरी महाराजांनी मोठ्या विश्वासाने आमच्यावर टाकिली !

(राजपुत्र इंद्रायुध व कंकण येतात.)

**कंकण** : धाकटे सरकार दर्शनाला येताहेत.

**वसुंधरा** : युवराज, तुम्हाला शंभर वर्षांचे दीर्घायुष्य आहे; आताच तुमची आठवण केली.

**युवराज** : वहिनीसाहेब, आठवण केली हे माझे सद्भाग्य! (वसुंधरेला प्रणाम करतो.)

**वसुंधरा** : देव तुम्हाला शतायुषी करो !

**ईश्वर** : व: ! बालवय असून किती प्रौढ बुद्धी ही! यांच्या चेहेऱ्याकडे पाहताच यांची विशाल बुद्धी अगदी निर्बुद्ध आंधळ्यासही दिसून येईल! बोलणे किती चाणाक्षपणाचे!

**वसुंधरा** : ते काही विचारू नका! आमच्या अरुंधतीची पुण्याई मोठी म्हणून आम्हाला या कौस्तुभरत्नाचा लाभ झाला आहे. वय इतके लहान पण पोरपणाचे नाव नाही. बोलणेचालणे, आचारविचार, मोठे प्रौढ; मन प्रेमळ आणि निर्मळ.

**युवराज** : मंडलेश्वर दरबारात मुख्य सचिवाचा अधिकार बजावीत आहेत आणि वहिनीसाहेब आमच्या नर्मसचिवाची उणीव भरून काढीत आहेत; मी तर स्तुतिपाठक बंदिजनच म्हणणार होतो पण-

**वसुंधरा** : मग थांबलात का? तुम्ही आपल्या गुणबंधाने आम्हाला बांधूनच ठेविले आहे. (इंद्रायुध ईश्वराला प्रणाम करतो.)

**ईश्वर** : आयुष्यमान् व्हा. महाराज, माझ्या वेषावरून माझा पेशा ओळखू येण्यासारखा नाही; माझ्या आशीर्वादात दुसऱ्याच्या सुदैवाची घटना करण्याचे सामर्थ्य नसून मी स्वत:च दुर्दैवाने अगतिक झालो आहे. आपण मला प्रणाम करण्याइतकी माझी योग्यता नाही.

**युवराज** : या वेषात असलेल्या प्रत्येकाला मी ईश्वर समजून प्रणाम करितो.

**ईश्वर** : मग मी नांवापुरता तरी या प्रणामाचा अधिकारी आहे खरा !

**युवराज** : तुमचे नांव ईश्वर तर? वहिनीसाहेबांना तुमच्याबद्दल बोलताना मी पुष्कळदा ऐकिले आहे. बरे, वहिनीसाहेबांनी आताच सांगितले, की माझ्यात पोरपण नाही म्हणून; पण अगदी लहान मुलाच्या चंचलपणाने मी आपला निरोप घेतो. पुढे केव्हाही आपल्या दर्शनाला मी कृपाप्रसाद समजेन. वहिनीसाहेब, राजदर्शनाला जाण्यासाठी मंडलेश्वर आपली वाट पाहात आहेत.

**वसुंधरा** : आणि हे सांगण्यासाठी स्वत: तुम्ही आलात?

**युवराज** : केवळ आपल्या आशीर्वादाच्या आशेने! या पुण्यपदांचे दर्शन दिवसातून कितीही वेळा घेतले तरी समाधान होत नाही. आपले माझ्यावरचे प्रेम मातृप्रेमापेक्षाही अधिक आहे. आपल्या दीनारालासुद्धा ते आपल्याकडे वळवून घेता आले नाही. या लबाडाला झोप लागली आहे वाटते? स्वारीचे देवदर्शन डोळे मिटूनच झाले म्हणायचे! (त्याच्याकडे पाहतो.)

**कंकण** : (स्वगत) धन्य आहे या कंकणाची! बायकांना बेहोष करण्याकरिताच या

कंकणाचा अवतार आहे असे मी नेहमी म्हणतो ते काही खोटे नाही. बिचाऱ्या दामिनीचे डोळे माझ्याकडे सारखे लागावेत यात काय नवल? वसुंधराबाई पतिव्रता म्हणून गाजलेल्या ना! पण इतक्यात तीन चार वेळा तरी त्यांनी माझ्याकडे पाहिले असेल! पण मी काही नजरेला नजर भिडू दिली नाही अजून! हो, इतक्या स्वस्त्या भावाने विकून घेतल्यावर मग खरा रंगेलपणा कुठे राहिला! आपल्याकडे पाहणाऱ्या बायकांकडे पाठ फिरवून पळत्या सावजाच्या पाठीस लागले तरच इष्काची खरी शिकार! बाकी या बायकांची तरी काय कसूर? तसा जवान समोर दिसला, की नजर फिरावयाचीच !

(इकडे तिकडे पाहून उगाच हातवारे करतो.)

**वसुंधरा** : कंकणा, रथ सिद्धनाथ मंदिरासमोर घेऊन यायला सांग.

**कंकण** : जशी आज्ञा! (स्वगत) मला वाटलेच होते, की काही तरी निमित्त काढून बाईसाहेब माझ्याशी बोलणार म्हणून! नाहीतर इकडची गाडी तिकडे कशाला न्यायला हवी होती ?

**वसुंधरा** : ईश्वर मी जाते आता! तुम्हाला वाटेल त्या वेळी मला भेटत जा! युवराज, सिद्धनाथ मंदिराचे दर्शन घ्यायचे राहिले आहे! दामिनी, हो पाहू पुढे! (जरा पुढे जाऊन व मागे वळून) कंकणा, तू अजून इथेच? मोठा गैदी माणूस आहेस !

**कंकण** : चुकीची माफी असावी, बाईसाहेब ! (जाता जाता स्वगत) पुन्हा तर्क बरोबर! जाताना मुद्दाम वळून पाहिलेच! आणि हे रागाचे अवसान तर नुसते जाळीदार ! पलीकडचा चोरटा रंग छटा न् छटा निरखून बघून घ्यावा.

(ईश्वरखेरीज सर्व जातात. ईश्वर वसुंधरेकडे पाहत राहतो. एकीकडून नूपुर येतो.)

**नूपुर** : (स्वगत) कुठल्याशा भाषापंडिताला म्हणे आपल्या सूत्रातली एक मात्रा कमी करता आली म्हणजे एक पुत्र झाल्याचा आनंद होत असे; पण माझ्यासारख्या व्यवहारपंडिताला लोकांच्या सुताड्यागोताड्याबद्दल आपल्या माहितीत एक अक्षराची भर पडली म्हणजे एक पितर स्वर्गास गेल्यासारखे वाटते! निदान दुसऱ्याचा एखादा पितर नरकात पडल्याबद्दल तरी खातरजमा होते ! त्यातल्या त्यात चोरट्या रागरंगाचे रहस्य कळले म्हणजे तर बोलावयालाच नको-किंवा त्याबद्दल सारखेच बोलत राहावयाला पाहिजे! आजचा हा रागरंग असाच अंधेरातला आहेसा दिसतो! आडून बोलणे जरा ऐकायला यायला हवे होते! (ईश्वराच्या खांद्यावर हात मारून, उघड) काय अवधूतमहाराज! आता ही समाधी कधी उतरणार? कोणत्या निर्गुण मूर्तीचे हे ध्यान चालले आहे? ते मोठ्या घरचे जडावाचे जोखीम, की तो गरिबीतला मुलाम्याचा डाग?

**ईश्वर** : (चपापून) कोण तुम्ही? धाडसी बेशरमपणाची कमाल झाली!

**नूपुर** : होय! मग ब्रह्मर्षिमहाराज, देवाच्या साक्षीने या गार्गीमैत्रेयींबरोबर काही वेदान्ताची वाटाघाट करीत होता वाटते?

**ईश्वर** : अशा अनोळखी आचरटपणाने आता एक शब्द अधिक बोलाल तर मला तुमची फाजील जीभ कापून बेताची करावी लागेल !

**नूपुर** : (हसून) अखेर बरेच रागावला की बैरागीबुवा! मला वाटलेच होते, की एक-दोन फुंकरा मारल्याबरोबर तुमच्या अंगावरून ही वरवरची राख उडून जाईल आणि आतला अंगार भडकून निघेल म्हणून! तुम्हाला राग येतो खरा, पण मग, या वेषाने त्या बायकांशी कशाला बोलत राहिला? अहो, असा चोरटा संबंध एकदा उघडकीस आला म्हणजे सारा गाव त्यासंबंधी काय कसे करावयाला लागतो.

**ईश्वर** : तुम्ही बोलता याला काही प्रमाण आहे का ?

**नूपुर** : त्याला कशाला पाहिजे आहे प्रमाण? लग्नाच्या जोडप्याखेरीज कोणतीही स्त्रीपुरुषे कुठेही आणि काहीही बोलताना आढळली तर तेथे काही तरी दगलबाजी असावयाचीच हे लोकशास्त्रातले महावाक्य !

**ईश्वर** : कोण पाजीपणाची कल्पना ही! हे पाहा, ज्या स्त्रीशी आता मी बोलत होतो ती मला माझ्या सख्ख्या बहिणीप्रमाणे आहे, समजलात?

**नूपुर** : या बंधुप्रेमाची सारी भिस्त, आपण सर्व एकाच ईश्वराची लेकरे आहो, या ऐसपैस नात्याच्या जोरावरच असेल ना? ठीक आहे, असा त्रागा केल्याने जर लबाड्या लपत्या तर आणखी काय हवे होते! हा हा म्हणता, तुमची सारी कुलंगडी हुडकून काढून चवाठ्यावर आणतो. (स्वगत) आधी तिकडे, त्या बायका कोणीकडे जातात त्याचा तल्लास काढावा आणि मग या गोसावड्याच्या मठीचा मार्ग काढावा! हा काही वेळ इथेच घोटाळत राहणारसे दिसते. (जातो.)

**ईश्वर** : काय मनाचा नमुना आहे पाहा! (त्याच्याकडे पाहात राहतो. इकडे घाटाच्या कठड्यामागून सुदाम उठून उभा राहतो व पुढे येतो.)

**सुदाम** : (स्वगत) स्त्रीजात तेवढी निमकहराम! ज्योतिषी लोकांना अनंत योजनांवर रात्रीच्या काळोखातून भटकणाऱ्या, आकाशातल्या चांदण्यांच्या गती इथूनच बिनचूक ठरवून टाकिता आल्या; पण दिवसाढवळ्या, इथल्याइथेच उडणाऱ्या चटकचांदण्यांच्या हालचाली त्रिकालज्ञ ऋषींनाही समजण्यासारख्या नाहीत. थोड्याशा आकडेमोडीने तारांचे वेध चटकन् घेता येतात, पण याचे कोणाला, आणि यांना कोणाचे वेध लागतील हे कालत्रयीही कळावयाचे नाही. स्त्रियांचा

भरवसा धरणारा अगदी मूर्खातला मूर्ख! दामिनीला काय हसायचे, ती माझ्यासारख्या सामान्य माणसाची बायको ! पण ही वसुंधरा, एवढी थोरामोठ्याची स्त्री, पण बेमुर्वत या गोसावड्याशी चकाट्या पिटीत बसली. ते काही नाही; हा खेळ आणखी काही वेळ असाच चालू राहिला तर बघता बघता, सुदाम आणि दामिनी हे जोडपे म्हणजे लोकांना हसवायाचे साधन होऊन बसेल. हा राखेतला रंगेला घटकाभर निरूपण कथीत बसलाच होता! तो गावगुंड तर पाळतीवरच असल्यासारखा दिसतो! आता आधी या कानफाट्याचे चांगले कान उपटतो आणि मग त्या उठवळ बिजलीला नीट बांधून टाकितो. (उघड) अहो परमहंस, तुमचे उनाड पाखरूमघाच उडून गेले; आता कशासाठी देवाच्या दारी धरणे धरिले आहे हे!

**ईश्वर** : (स्वगत) हा तिसरा इब्लिस दिसतो; आणि याची ही वेडाची लहर अगदी भडकलेली आहेशी वाटते. (त्याच्याकडे पाहतो.)

**सुदाम** : असा पाहतोस काय माझ्याकडे सुंभासारखा ! काही लाजलज्जा आहे का शिल्लक? का संसाराबरोबर तिचीही राखरांगोळी केली आहेस? हे बघ रे, ए गोसावड्या, तुम्ही बैरागी लोक मोठे बदमाष असता! स्वत:चे घर एकदा सोडले म्हणजे दुनियाची घरे तुम्हाला आपलीशी होतात; आपल्या नुसत्या अंगाला भस्म चोपडता पण दुसऱ्याचा सारा संसार भस्म करून टाकिता; आपल्या नावावर पाणी सोडताच लोकांची नावे बुडवायला मोकळे! इकडे हातातल्या चिमट्याने चिलमीवर निखारे ठेवण्याचा जरा सराव होतो न होतो तोच दुरून दुसऱ्याच्या अंत:करणाला चिमटे घेऊन त्यावर अंगार ठेवण्याची तयारी! बैराग्याच्या एकेक माळेगणिक लग्नाची किमानपक्षी हजार हजार माळ तरी तुटत असेल! वाल्या कोळ्याने खड्यांनी रांजण भरून आपण उडविलेली शिरगणती ठेवली होती, तशी मला वाटते, बैराग्याची स्मरणी म्हणजे त्याच्या बदफैलीची मोजदादच असावी. ए राखुंडीतल्या रामोशा! पाहा, मी इतकं बोलतो आहे, पण बेरड एक शब्द तरी बोलतो आहे का? नुसता तोंडाकडे पाहत सुद्धा नाही. (ईश्वर हसतो.) तुझे हसणे रास्त आहे; जाऊ दे, तुझ्यासारख्या तिऱ्हाइताला बोलण्यात काय अर्थ! आपलाच दाम खोटा! छे: छे:, याचा बंदोबस्त केलाच पाहिजे. (स्वगत) या जगात एखादे खरे तत्त्व असेल तर ते हेच, की स्त्रीजात तेवढी निमकहराम! विधात्या, कशाला या सुंदर जगात ही हरामखोर जात पैदा केलीस ?

**ईश्वर** : (स्वगत) आता आणखी काही वेळ या जागीच थांबलो तर मला खात्रीने वेड लागेल. कुठल्याशा देवस्थानाभोवती भुताखेतांनी पछाडलेल्या झाडांचे जंगलच्या जंगल जमत असते अशी त्याची ख्याती आहे; त्याचप्रमाणे,

बायकांच्या बाबतीत बहकलेल्या बेवकुफांची यात्रा जमण्याचे हे ठिकाण आहेसे दिसते. काय एकेकाच्या स्त्रियांविषयी भावना आहेत! एकाने आल्यागेल्या बाईकडे पाहून माकडासारखे चाळे करावे; दुसऱ्याने त्या माकडचेष्टांवरच रामावाचून रामायण रचून काढावे आणि तिसऱ्याने त्या तसल्या रामायणाबरहुकूम, आपल्या सीतेसारख्या साध्वीला घरातल्या घरात वनवास भोगायला लावावा! पण यांच्याकडे तरी काय दोष? चांगल्या चांगल्या प्रतिष्ठितांना सुद्धा असल्या कुटाळक्या करण्यात आणि बायकांबद्दलच्या वाटेल त्या गोष्टीवर बिनदिक्कत भरवसा ठेवण्यात जिथे लाज वाटत नाही तिथे हलक्या मनाच्या लोकांच्या कल्पना अशा असावयाच्याच! सगुणमूर्तीची कल्पना करण्यासाठी पशुपक्ष्यात-अगदी पाषाणातसुद्धा प्रत्यक्ष परमेश्वराची प्राणप्रतिष्ठा करण्याइतकी उदार अशी आमची आर्यदृष्टी, आमच्या मुलींकडे भागिनींकडे अर्धांगींकडे आणि मातांकडे वळताच अनुदारवृत्तीने संकोच पावते आणि स्त्रियांमध्ये तिला साधी माणुसकीसुद्धा दिसेनाशी होते! या असल्या पतितांचे विचार, नागर मनाला त्रासदायक तर खरेच; पण एकेकदा मनःक्षोभ इतका आवेगाचा होतो, की अशा विचारांपैकी साधारण प्रकारचे नमुने तरी लोकांसमोर मांडावेत आणि चारचौघांकडून या चारगटांचा उपहास करवावा ! पण जाऊ द्या हा विचार ! या दुःखदायक विचाराची लांबण तितक्याच प्रमाणाने मनाला संताप मात्र देईल. आपल्या साऱ्या सोयी अजून जमावयाच्या आहेत. (जातो.)

**सुदाम** : (स्वगत) मूर्खा सुदामा, भोग आपल्या लग्नाची फळे! (पाहून) हा तो गावगुंड आला वाटते? याच्या थोडे पोटात शिरले पाहिजे. (नूपुर येतो.)

**नूपुर** : (स्वगत) हा कोण घुटमळतो आहे इथे? स्वारीला घेरले पाहिजे !

**सुदाम** : काय हो, आपले नाव सांगाल का ?

**नूपुर** : माझ्या बारशाच्या पूर्वीच माझे आईबाप मेले, तेव्हा मला नाव ठेवण्याचे तसेच राहिले आहे. बरे, आपले नाव?

**सुदाम** : (स्वगत) अरे चोरा, मी तुझे बारसे जेवून बसलो आहे म्हणावे. (उघड) माझाही जरा असाच घोटाळा झालेला आहे. मला लोक रोजच्या रोज इतकी नावे ठेवितात, की त्यातून वेळेवर कोणते सांगावे हेच कळत नाही.

**नूपुर** : हरकत नाही, फिटंफाट झाली. आता आपण एकमेकांना तात्पुरती नांवे ठेवू या म्हणजे बोलायला चालायला सोयीचे पडेल. चला, आम्ही ठेवले तुमचे नाव सुदाम!

**सुदाम** : (दचकून) सुदाम!

**नूपुर** : काय चपापला हो? तुमचे खरे नाव एखाद्या अनोळखी माणसाने नेमके सांगितले असते तरीसुद्धा तुम्ही इतके दचकला नसता!

**सुदाम** : तुम्ही पाहताच आहा, की मी आहे जरा फाटक्या अंगाचा आणि तुम्ही म्हणाला मला सुदाम; तेव्हा सहजच वाटले, की मला हिणविण्यासाठी तुम्ही असे नाव काढले मुद्दाम.

**नूपुर** : अंः, तसे काही नाही; त्याचे कारण वेगळेच आहे. सांगू तुम्हाला तसा मोका जुळून आला म्हणजे.

**सुदाम** : बरे, ते राहू द्या; तुम्ही आता बराच वेळ एवढ्यातच फिरत होता; एखादे रंगीबेरंगी पाखरू जाताना दिसले का इथून ?

**नूपुर** : छट्, चिटपाखरू सुद्धा नाही.

**सुदाम** : काय बेगुमान थापा मारता हो ! मी चांगला पाहतो आहे, तब्बल अर्धा घंटा तुम्ही इथून टेहळणी ठेवून होता त्या-

**नूपुर** : असे असे! आताच्या गंमतीबद्दल बोलता होय तुम्ही? आता तुमच्या जवळ म्हणून बोलायला हरकत नाही, पण ते पाखरू म्हणजे एक अजब चीज आहे.

**सुदाम** : (स्वगत) अजब चीज! स्त्रीजात तेवढी निमकहराम! (उघड) दोघींतले कोणते पण ते? वसुंधरा की तिची ती दासी?

**नूपुर** : भले! तुम्हाला तर नावेही पाठ आहेत; उगीच नाही लोक तुम्हाला नावे ठेवीत! अहो, वसुंधरेबद्दल बोलायला कशाला पाहिजे? मोठ्या नदीत बारमहा पाणी असायचेच ! मी त्या गावगंगेबद्दल म्हणत होतो. पोरसवदाच आहे, पण अशी बाजिंदी बायको आहे! छटेल तर इतकी आहे म्हणता, गहिरी नजर आशाळभूतपणाने नुसती हरिणासारखी कावरीबावरी फिरकत होती इकडून तिकडे!

**सुदाम** : (स्वगत) बाजिंदी! छटेल! आमच्या पतिव्रतेने कमाई तर खूप करून ठेविली आहे!

**नूपुर** : का हो, अगदी विचारातसे पडला? कोणाला वाटेल, की तुमच्या बायकोचीच तुमच्यापुढे नालस्ती चाललेली आहे !

**सुदाम** : (स्वगत) हा हरामखोर अगदी वर्मी डाग देत आहे. (उघड) भलतेच, तसा तिचा माझा काही संबंध नाही; मी सहज विचारितो आहे. हो, आपले माहीत असावे!

**नूपुर** : एवढेच असेल तर फिकीर नाही; नाहीतर आमची मासलेवाईक मजा व्हायची!

बाकी मीसुद्धा तुमच्यासारखा नुसतीच माहिती मिळवीत आहे हो ! बोलण्यासारखी गोष्ट नाही, पण तुमच्याजवळ म्हणून सांगायला हरकत नाही. कान करा इकडे-बोलू नका कुठे- हे पाहा, बायकांच्या फंदात कधी पडू नये; बायकांची जात बडी हरामखोर!

**सुदाम** : (स्वगत) स्त्रीजात तेवढी निमकहराम! (उघड) तुमचे म्हणणे खरे आहे अगदी अक्षरश:!

**नूपुर** : आता हेच पाहा की चित्र ! गरिबीतल्या गरिबीत जिवाला हौस केवढी आहे! तेवढ्यातच लुगडे गंगाजमनी होते! दरिद्री छानछोक गरिबीबरोबरच मनाचा उथळपणाही दाखविते! कण्हेरीच्या कंगाल वासाकडे तिच्या रंगाच्या भिकारड्या भपक्यानेच लक्ष जाते.

**सुदाम** : हा, कपड्यालत्त्यात असा रंगेलपणा उपयोगाचा नाही हे खरेच !

**नूपुर** : मुळीच उपयोगाचा नाही. तुमच्याजवळ म्हणून सांगून ठेवितो, नीट लक्षात ठेवा-कपड्यालत्त्यात छानछोकी, बोलण्यात एवढासा मोकळेपणा, नजरेत एवढीशी लोभी फिरकी-जराशी हसऱ्या डोळ्यांची आणि दाबलेल्या ओठांची, निलाजरा लाजाळूपणा ही दिसली, की हजार हिश्शांनी तिथे लगीनगाठ सैल आहे अशी खूणगाठ बांधून ठेवा !

**सुदाम** : इतक्या खाणाखुणा तरी कशाला हव्या? नुसते चालणे एकदा पाहिले, की बाकी चाल चटकन् लक्षात येते. ते शब्दांनी सांगता येत नाही नीटसे, पण एका पावलावरून परीक्षेला पटते!

**नूपुर** : बस्, अगदी अनुभवाचे बोलला; पटले!

**सुदाम** : (स्वगत) हा बिलंदर मुद्दाम वेचक बोलतो आहे की काय! (उघड) नशीब त्या बिचाऱ्या नवऱ्याचे!

**नूपुर** : तो अगदीच गलथान आहे म्हणतात. तुमच्यासारखाच फाटक्या अंगाचा आहे. मघाशी मी तुम्हाला सुदाम म्हणून नाव दिले तेच त्याचे नाव ! मला ते आताच समजले, तेव्हा डोक्यात ठसण्यासाठी तुमच्या माथी मारले. या बाईचा नवरा सुदाम. हिच्या जपणीस बसण्यासाठी स्वारी घरीच बेकार बसून असते; आणि तरी हिची गावात देवदर्शने चाललीच आहेत. तेव्हा आता तो बेवकूब म्हणावयाचा की हिची शहामत म्हणायची? आता तुम्ही-आम्ही जुटीने या भानगडीच्या खनपटीस बसू या! अगदी बित्तंबातमी लागेपर्यंत थांबायचे म्हणून नाही.

**सुदाम** : पसंत आहे. एवढेसे काही समजले, की एकमेकांना खबर द्यायची. आहे कबूल?

**नूपुर** : कबूल ! तो नवरा हाती सापडायला पाहिजे होता हो! म्हणजे खूप रंग आला असता. तुम्हीही त्या बैलोबाच्या तपासात असाच. चला. (दोघेही जातात.)

(पडदा पडतो.)

## प्रवेश दुसरा

(**स्थळ :** वृंदावनाचा दिवाणखाना. कालिंदी केतनला पाळण्यात निजवीत आहे.)

**कालिंदी** : वाजिवरे बाळा । वेल्हाळा । रुमझुम् घुंगुरवाळा ॥
अस्फुट विश्वाचे । प्रेमाचें । गाणे आनंदाचे ॥
वदलो जे नादीं । संवादीं । तुझिया जन्माआधी॥
पहिल्या प्रीतीचे । गमतीचे । काहीसे भीतीचे ॥
बाळा ते बोल । तू बोल । आज मनी जे खोल ॥
रात्रीच्या काळीं । जो बसली । ब्रह्मानंदीं टाळी ॥
मनिं तेव्हा बाणे । जे गाणे । अस्फुट मंजुळवाणे ॥
धीर न परि हृदया । उघडाया । उघडपणे ते गाया ॥
हृदयीं खळबळले । दरवळले । विना ऐकिल्या कळले ॥
गाणे मंजुळ ते । झुळझुळते । तुझिया वाळ्याभंवते ॥
वाळा हालूं दे । बोलूं दे । आनंदें डोलूं दे ॥
एकच पायाचा । वाळ्याचा । नाच गोड बाळाचा ॥
ऐकुनि आनंदे । त्या छंदे । घर सगळे नाचूं दे ॥

(स्वगत) वेडी तर नाही मी ! केतनला निजविण्यासाठी म्हणून गाणे म्हणते आणि त्यात त्याला घुंगरवाळा वाजविण्याचा आग्रह करिते! त्याने आता करावे तरी काय? बाकी अशा अचपळपणात माझा केतन माझ्या इतक्या अर्ध्या वचनात असावयाचा, की मी घरात एकाच पायाचा नाच करायला सांगितले तर लबाडाला दोन्ही पायांनी घुंगुरवाळा वाजविताना ब्रह्मांड अपुरे होईल. झाली, चांगले डोळे उघडून, माझ्याकडे पाहून हसायला सुद्धा सुरुवात झाली! बाळ, पुरे झाला हा डोळ्यांचा नाच बरे! निजा आता! व:, लगेच घेतले डोळे मिटून! जसे काही समजले अगदी बोललेले! गुणी बाळ, असे गुण केल्यामुळे माझ्या बाळबृहस्पतीला एखाद्याची दृष्ट लागली तर कसे बरे होईल? हं:, याने डोळे मिटून घेताच माझ्या डोळ्यांपुढे वेड्यावाकड्या हजार गोष्टी उभ्या राहतात; या कोवळ्या देहाकडे पाहताना उगीच कठोर विचार मनात येतात; याला झोप

लागताच माझी कल्पना जागी होते. का बरे मला नेहमी असे व्हावे?

(गोकुलमां लइ चालो.)

व्याकुल हे मन होई कां । सतत कां त्यास छळ हा ।।धृ. ।।
जगतिं न रंगे । विचारी परी तरंगे । नच त्या काही
विसावा हा ! ।।१ ।। अनलज्वाला । जाळिते अशी जिवाला ।
पसरी अंतरिं या दाहा ।।२ ।।

इतक्या सुखाच्या सागरात पडले आहे तरी पण काही तरी चुकल्यासारखे वाटते! जगाच्या खरेपणाबद्दल काहीच खात्री वाटत नाही. माझ्याभोवती हे सुखस्वप्न पसरले असून दैवाच्या कसल्या तरी अकल्पित आघाताने मी एकदम जागी होईन आणि या सुखाला अंतरेन अशी अंत:करणात सारखी हुरहूर वाटते! या सुखाच्या स्वप्नापेक्षा अगदी स्वप्नाचे सुखसुद्धा किती तरी खरेपणाचे भासते! अतिसुखामुळे तर असे होत नसेल? बाळा केतना, इतकी का मी पूर्वजन्मीची पापीण आहे, की तुझ्यासारखे रत्न मला-अगंबाई, भलतेच काहीतरी मनात यायला लागले! आज अजून का बरे येणे झाले नाही? समाधान तेवढे काय ते त्या मूर्तीच्या दर्शनाने! पण त्यांच्याकडे पाहताना तरी डोळ्यांची भीती कुठे मोडते आहे? आता डोळ्यांसमोर ती मूर्ती उभी करून वाटेल तितका वेळ पाहत बसेन; पण जर खरोखरीच येणे झाले तर-अगंबाई, खरोखरीच येणे झाले! (उठून उभी राहते; वृंदावन येतो.)

**वृंदावन** : (स्वगत) हिच्याकडे पाहिले म्हणजे पूर्वजन्मावर विश्वास ठेवावासा वाटू लागतो; एरवी या जन्मी या दुर्दैवी जिवाने असे कोणते पाप केले आहे, की त्याबद्दल अष्टौप्रहर असा मनाचा मुका मार सहन करावा लागावा! वृंदावन आणि कालिंदी! लग्नाचे सोंग करून मी हिला उगाच दु:खात पाडिली आहे. मी हिच्याशी मोकळेपणाने वागत नाही हे हिच्या पुरतेपणी लक्षात आले आहेसे दिसते; आणि मी तरी हे सोंग यथासांग किती दिवस करीत बसू? या नाटकाचा मला आता इतका वीट आला आहे, की-पण आता कुरकूर करून काय उपयोग? माझ्या लौकिकासाठी मला हे सारे केलेच पाहिजे.(उघड) प्रखर सूर्याच्या प्रकाशात कोमेजणारी नाजूक कुमुदिनी चंद्राच्या कोवळ्या किरणांनी तरी खुलते; आठ महिने गप्प बसलेल्या कोकिळेला वसंतऋतूत तरी कंठ फुटतो; पण इथे तर कधी कळी उमलायची नाही आणि तोंडातून शब्द निघायचा नाही. कालिंदी, सुंदर स्त्रियांना खुलविणारा एखादा दिव्य मंत्र पुरुषांना जर सापडला तर त्याचा विधी समाधीपेक्षाही अवघड असला तरी पुरुष त्याचा अष्टौप्रहर जप करीत बसतील.

**कालिंदी** : मग तसे नाही कुठे! पुरुषांनी नुसता कानमंत्र सांगतानासुद्धा जरी इकडे तिकडे केले तरी बायकांच्या गालावरच्या गुलाबाची तेव्हाच खुलावट होते ना? विधी नको आणि मंत्राचा जप नको! अगदी मुक्यानेच एवढेच होते.

**वृंदावन** : हं, बोल, बोल, स्पष्ट भ्याल्यावाचून बोल पाहू! कालिंदी, काय तुझे मन हे? एवढे शब्द बोलताना तुला दम लागला; ओठ सुकून गेले; कावरीबावरी नजर छपविण्यासाठी डोळे खाली वळले ! वेडे, तुझी छातीसुद्धा धडधड करायला लागली आहे! बोलू लागलीस म्हणजे इतके चांगले बोलतेस, की मनाचे कान आणि जिवाचे भान करून ते ऐकत रहावे! पण मोकळ्या मनाची मौजेची भाषणे बोलताना तू नवशिक्या गुन्हेगारापेक्षाही जास्त भेदरून जातेस! आणखी किती दिवस तू मला भिणार? आरंभीच्या अनोळखी अल्लडपणाला भीती साजून गेली! पण आता-मूल झाल्यावरसुद्धा- आता आपला केतन चांगला आठदहा महिन्यांचा झाला असेल-अजून भित्रेपणाच! नवाईच्या नव्हाळीची ही मनाची मुकी माया मनोहर तर खरीच; पण मुका मुलगा कधीतरी चालत्या बोलत्या रंगरूपाला आल्यावाचून स्त्रीत्वाचे सार्थक होत नाही! कालिंदी, आता तू आपण होऊन बोलली नाहीस तर यापुढे मी एक अक्षरही बोलणार नाही! (काही वेळ थांबून) या केतनशी चार चार घटका सारखी बोलत असतेस आणि मी एका शब्दालाही महाग झालो? ते काही नाही! कालिंदी, तुला माझी शपथ आहे, माझ्या प्रश्नाचे अगदी मोकळ्या मनाने उत्तर दे पाहू! तुझे आयुष्य अगदी सुखात जात आहे का? (कालिंदी वृंदावनाकडे पाहते.) हे पाहा; माझ्या मनाचा कल ओळखण्यासाठी तू अनिश्चयाच्या शोधक दृष्टीने माझ्याकडे पाहू लागलीस! कालिंदी, मी अनुकूल उत्तराच्या अपेक्षेने हा प्रश्न टाकला नाही! आपल्या संसारात तू पूर्ण सुखी आहेस का?

**कालिंदी** : सर्वेश्वरा, आपण सुखी आहात का ?

**वृंदावन** : मी अगदी पूर्ण सुखात आहे.

**कालिंदी** : मग मीही पूर्ण सुखातच आहे! जीवितेश्वरा, मला आपल्याहून निराळं जीवित आहे का? या देहाची मी छाया; छायेची हालचाल देहाच्या जीवनशक्तीने होते! तिला भिन्न इच्छा, भिन्न जीवन कुठून असणार? आपल्या श्वासोच्छ्वासानेच माझा जीवनप्रवाह चालत असतो. कालिंदीच्या हृदयाचे व्यापार तिथे विराजणारी वृंदावनांची मूर्तीच करिते!

**वृंदावन** : कालिंदी! माझी शपथ घातली तरी सुद्धा तू खोटे सांगितलेस ! तुझी जीवनवृत्ती खरोखरीच छायेप्रमाणे निर्जीव आहे! तुझे समाधान हताश हृदयापेक्षाही शून्यवृत्तीचे वाटते! अल्लड वयातल्या विविध विकारांचे ठाणे उठल्यामुळे तुझ्या

चेहेऱ्यावर उजाड वस्तीच्या गावठणाचा ओसाडपणा परसलेला दिसतो ! (तिचे हात आपल्या हातात घेतो.) कालिंदी, माझ्याजवळ खोटे का बरे बोलतेस? तू दु:खीकष्टी आहेस याचा मला मुळीच संशय नाही; मग त्याच्या कारणाविषयीच मला संशयात का ठेवितेस ?

**कालिंदी** : (त्याच्या गळ्याला मिठी मारून) असे आपल्याला कशावरून वाटते?

**वृंदावन** : पुष्कळ दिवसांच्या सूक्ष्म अनुभवाने मी हे ओळखले आहे. तुझी आणि माझी अजून पुरती दिलजमाई झाली नाही! तू आपण होऊन मला कधी अलिंगन दिले नाहीस! पण मी तुझे हात माझ्या मानेजवळ आणताच त्यांचा विळखा इतका जोराचा बसतो, की प्रीतीच्या भरतीची उसळणारी उत्कंठा थोपवून ठेविल्याचे ताबडतोब लक्षात येते. माझी नजर चुकवून माझ्याकडे पाहताना, माझ्या चेहेऱ्यावरून काहीतरी हुडकून काढण्याचा तुझा प्रयत्न चाललेला असतो! हातात हात घालून माझी बोटे दाबताना सभय उत्सुकता दिसून येते! विनोदप्रसंगी माझ्या हसण्याबरोबर ताबडतोब आपले हसूही थांबविण्यासाठी, हसण्याच्या उत्कट भरातसुद्धा माझ्याकडे पाहण्याच्या सावधगिरीचा तुला विसर पडत नाही. बोलताना शेवटी एक शब्द ओठांवरच घुटमळून पुन्हा हृदयात जाऊन दडून बसतो ! कालिंदी, तो शब्द आपल्या दिललगीचा आडपडदा आहे! कुठल्या तरी दु:खी संशयाचा कृष्णमेघ तुझ्या हृदयात सारखा घुटमळत राहिलेला असतो. हे पाहा, तुझ्या डोळ्यात पाणी तरंगू लागले, की त्याच मेघाची वृष्टी! हां; ते अश्रू पुसू नकोस, तुझ्या हृदयाला, त्यातल्या दु:खदायक रहस्याला बाहेर येऊ दे. कालिंदी, माझ्यापासून आपले दु:ख लपवू नकोस !

**कालिंदी** : हृदयसंपुटात साठवून ठेविलेल्या या प्राणजीवनापासून मी काय लपवून ठेवणार? प्राणेश्वरा, क्षमा करा; मी आपल्याला फसविले खरे! पण ते केवळ आपल्या मनाला त्रास होऊनये म्हणून!

**वृंदावन** : वेडी! वेडी आणखी हट्टी! चटदिशी आपले मनोगत मला सांगून दु:खमुक्त हो ! अशी रडू नकोस. इतक्यात हसत होतीस, आता रडू लागलीस! मुलाच्या मनाप्रमाणे तुझे मन सुखदु:खांच्या ऊन-सावलीत माझ्याशी लपंडाव खेळत आहे. मला वाटते, पोर झाले म्हणजे त्याच्या सहवासाने बायकांचे मनसुद्धा पोरकट होत जाते! हं, सांगतेस ना तुझ्या दु:खाचे कारण ?

**कालिंदी** : माझे दु:ख मी आपल्याला सांगितले तर आपण माझ्याबद्दल म्हटले तेच मी आपणाबद्दल म्हणते असे नाही ना आपण म्हणणार? माझे रहस्य सांगणे म्हणजे मी आपले रहस्य ऐकणे असे आपल्याला वाटले तर आपण माझ्यावर रागावणार नाही ना? आपल्या प्रश्नाचे उत्तर माझ्या प्रश्नाने दिले तर चालेल का?

**वृंदावन** : तुझा प्रश्न? माझे रहस्य? कालिंदी, तू काय म्हणतेस हेच मला कळत नाही. कोणते माझे रहस्य?

**कालिंदी** : (एकदम हुंदका देऊन व त्याला मिठी मारून) आपल्याला राग आला? मला आपल्या या मुद्रेचे भय-प्राणेश्वरा, मी नावडती आहे म्हणून का हा राग? जीवितेश्वरा, मला संभाळा, मी आपल्यालाच भ्याले आहे, मला सांभाळणारही आपणच!

**वृंदावन** : (स्वगत) हिला धीर दिला नाही तर हिचे भीतीने प्राण जातील! (उघड) कालिंदी ! काय हे? वर पाहा ! (ती वर पाहते. स्वगत) काय हे हिचे डोळे! शिकारी कुत्र्यांच्या भेसूर हाकाटीने भेदरून एखाद्या झुडपाखाली दबा धरून बसलेल्या भेकड सशाचे डोळेसुद्धा इतक्या शून्य वृत्तीने, इतक्या साशंक भीतीने आणि इतक्या तीव्र शोधकतेने स्थिरावत नसतील. (उघड) कालिंदी, भिऊ नकोस; तू मला नावडती आहेस असे तुला का वाटते?

**कालिंदी** : आपल्या उग्र मुद्रेची मला अजून भीती वाटते! प्राणापलीकडे लपविलेल्या शंकेचे शब्द बाहेर काढिताना प्राणही कंठाशी येऊन अगदी कोंडल्यासारखे झाले आहे.

**वृंदावन** : माझी मुद्रा तुला उग्र वाटते? वेडे, अशी भलतीच जन्माची समजूत करून घेतलीस तर मला कायमची भीत राहशील. कदाचित् माझा तिटकाराही करू लागशील !

**कालिंदी** : नाही, नाही; आपली मुद्रा जात्या उग्र नाही; मूळचा चेहेरा इतका सोज्वळ आहे, की स्त्रीदृष्टीला त्याचा मोह सोडावासा वाटणार नाही; आपले विशाल अंत:करण पुरतेपणी दाखविण्याजोग्या या डोळ्यात प्रतिबिंबरूपाने शिरून, त्या अंत:करणात प्रीतिभावाने स्थिर होण्यासाठी कोणती स्त्री झटणार नाही? आपल्या मांसल आणि मृदू कराचा आधार मिळताच संसारयात्रेतून स्वर्गापर्यंत निभावून जाण्याची कोणत्या स्त्रीला खात्री पटणार नाही? (पाहून) नका, नका, असे नि:श्वास टाकूनका! आपल्या वर्णनात स्तुतीचा संशय येऊन तिला आपण अपात्र आहा अशी मनोमन साक्ष पटल्यामुळे आपण ओशाळलेल्या नजरेने माझ्याकडे पाहू लागला म्हणजे माझा धीर तुटून मी भांबावल्यासारखी होते! आपल्या हृदयाबद्दल मी माझ्या मनाची ग्वाही देते! हे काय? आपण जास्तच खिन्न होत आहा! आपल्याला आत्मविश्वासाने ही स्तुती खरी का बरे वाटत नाही? कोणत्या गोष्टीच्या आठवणीने आपण-पण वेडीवाकडी कल्पना आपल्या मनात कशी येणार? मग माझ्याशी अशी प्रतारणा- (रडत) याच गोष्टीमुळे, मी आपल्याला आवडत नाही असे मला वाटू लागते.

**वृंदावन** : पण न आवडण्याचे काही कारण आहे का?

**कालिंदी** : आपल्या उदार दृष्टीला कदाचित् दिसली नाहीत म्हणून माझी मला सुद्धा ती कारणे दिसल्यावाचून कशी राहतील? आपल्या-माझ्यातले अंतर थोडे का आहे? आपल्यासारख्या बावन्न बिरुदांच्या धन्याला शिलेदारी शिरपेचांची शोभाच साजून दिसायची! माझी आपली सावळ्या तुळशीची साधीभोळी मंजुळा ! प्रीतीची पूजा बांधायला नुसती तुळशीपत्रे कशी पुरणार? पुरुष आधी रूपाकडे पाहतात; आणि तसेच सौंदर्य माझ्या कपाळी मुळी नाही! माझे कपाळ अगदीच बारीक नाही का?

**वृंदावन** : सुखाप्रमाणेच सौंदर्यालाही रहावयाला फार जागा लागत नाही! तुझ्या लहान कपाळावर माझ्या जीविताच्या आणि तुझ्या सौभाग्याच्या या कुंकुमाकृति राजमुद्रेला अक्षय राहण्याइतकी जागा मिळाली म्हणजे आपल्या सुखाप्रमाणेच आपण दोघेही चिरंजीव होऊ!

**कालिंदी** : अगंबाई, आपल्या आशीर्वादातून आपल्या केतनला का बरे वगळायचे झाले?

**वृंदावन** : लाडके, त्याची आपल्या सुखातच जमा झाली! केतन आपल्या सुखाचा भागीदार नसून भाग मात्र आहे! पण तुझी कारणे तशीच राहिली?

**कालिंदी** : आपण थट्टेवारी नेत आहा; मी आपली खऱ्या भावाने सांगून टाकते.

**वृंदावन** : काय ही कल्पना! माझ्या वर्तनात तुला कधी संशयाला जागा मिळाली आहे का?

**कालिंदी** : आतापर्यंतच्या आपल्या बोलण्याने मला इतका धीर आलेला आहे की आपल्याजवळ सारे बोलून टाकायचा मी आज निधडा निश्चय केला आहे. मी वेडी आहे, भाबडी आहे पण आपली आहे! मी माझ्या सुखासाठी बोलत नाही; माझ्यामुळे आपल्याला त्रास होतो अशी माझी खात्री झाली तर आपल्या पुण्यमय सुखाच्या मार्गातून मी क्षणमात्रात दूर होईन. मला राहून राहून असे वाटण्याचे कारण सांगितले तर आपण माझ्यावर रागावू मात्र नका. कधी कधी आपण सुखाच्या पूर्ण भरात असताना मध्येच विमनस्क होता; बोलण्याच्या ओघात क्षणभर-अगदी अर्धा क्षणच पण-एकदम थांबता: वस्तुमात्राकडे नेहमी शोधक वृत्तीने पाहणारी आपली दृष्टी एकाएकीच शून्यवृत्ति होते; चालत्या विषयाच्या भर मध्यात प्रारंभीच्या सामान्य संबंधाने सुरवात करिता; सवाल समजून घेतल्यावाचून जबाब देता; डोळ्यांनी जगाला पाहत नाही आणि दिसत नाही! त्यावेळी आपल्या डोळ्यात एकलेपणाने माझी बाहुली बसविण्याची मला भीती वाटते; आपल्या जीवनक्रमाच्या सर्व प्रयत्नांत अतृप्त इच्छेची आतुर तीव्रता दिसून येते! नाथ, अशा वेळी माझ्या मनात कालवाकालव उत्पन्न होते.

नाथ, क्षमा करा. आपल्या ठिकाणी वाइटाची कल्पनासुद्धा करण्याची माझी योग्यता नाही. पण भांबावलेल्या बुद्धीला दारुण शंका-प्राणेश्वरा, या चुकलेल्या दासीला सांभाळून घ्या- आपल्या ठिकाणी भलती भावना संभवत नाही अशा कल्पनेने मी विचार करू लागले म्हणजे मी आपल्याला नावडती आहे, माझ्यामुळे आपण असंतुष्ट आहात असेच मला वाटावयाला लागते; मला याच दृष्टीने पहावेसे वाटते! सर्वेश्वरा, मी आणखी बोलणार आहे. माझा हा अपराध शेवटचा आहे. मी बोलू का? माझ्या जिवाच्या परमेश्वरा, रात्री बोलता बोलता अखेर आपण शांत होतो त्यावेळी आपल्या रहस्याच्या विचाराने आपल्याला झोप येत नाही. आपण जागे असल्यामुळे मला झोप येत नाही. त्या निश्चेष्ट स्थितीत आपण आपल्या रहस्याचा शेवट शोधून काढण्यासाठी झटत असता; मी त्या रहस्याचा आरंभ हुडकून काढण्याचा यत्न करीत असते! नाइलाजाने पिळलेल्या आपल्या जिवाचे जड नि:श्वास वाऱ्यावर तरंगू लागले म्हणजे त्या काळोखाच्या पडद्यावर मी कल्पनेने आपल्या रहस्यातल्या स्त्रीची प्रतिमा रेखाटण्यासाठी-नाथ, आपण केवढ्याने दचकलात?

(उठून दूर उभी राहते; वृंदावन तिजकडे पाहतो.)

**वृंदावन** : माझ्या रहस्यातली स्त्री? कशावरून? स्त्रीचा त्यात काय संबंध?

**कालिंदी** : माझी पुरी खात्री आहे, की आपले रहस्य स्त्रीविषयक आहे! हे मी कसे ओळखले हे सांगणे फारसे कठीण नाही! पण आताच्या आपल्या दचकण्याने मला पुन्हा भीती वाटते! आपल्याला नकोशी असलेली गोष्ट माझ्याकडून बोलण्यात निघाली का?

**वृंदावन** : माझे रहस्य स्त्रीविषयक आहे हे कशावरून ओळखलेस सांग पाहू?

**कालिंदी** : हे ओळखण्यात अवघड ते काय असायचे आहे! तरुण अंगांना परस्परांचा स्पर्शसहवास होताच बुद्धीला बधिरता येते, कापणाऱ्या अंगाबरोबर विचार तरळू लागतात; पुरूषाला त्या स्थितीत स्त्रीखेरीज दुसऱ्या गोष्टीबद्दल विचार करिता येत नाही; पण आपण अशा स्थितीतही कशाचे तरी एकाग्रतेने चिंतन करिता; त्या वेळी स्त्रीखेरीज दुसरा विषय असायचा नाही आणि ती स्त्री मी तर खास नाही! म्हणून आपल्या रहस्यात, माझ्याखेरीज दुसऱ्या कुठल्या तरी स्त्रीशी संबंध असावा असा मी सरळ सरळ तर्क केला !

**वृंदावन** : कालिंदी, तुझ्या चातुर्याची, बुद्धिमत्तेची आणि अवलोकनशक्तीची कशी स्तुती करावी हेच कळत नाही! तुझी अलौकिक बुद्धिमत्ता पाहून मी आज चकित झालो आहे!

**कालिंदी** : ही बुद्धिमत्ता नाही; स्वहिताच्या कळकळीने आणि दक्षतेने एकाच गोष्टीकडे

सारखे लक्ष देत बसले म्हणजे सामान्य बुद्धीलासुद्धा तितक्यापुरती लोकोत्तर बुद्धिमत्तेची कार्ये करिता येतात. ज्या रहस्याशी माझ्या जीवनाचा सर्वस्वी संबंध, त्याबद्दल इतकीशी कल्पना अधिक का होते? आपले रहस्य मला मुळीच कळले नाही म्हणून तर मी अशी दु:खात आहे! प्राणेश्वरा, ते रहस्य मला सांगायला काही हरकत आहे का ?

**वृंदावन** : ते समजून घेऊन तुला काय करायचे आहे? यद्यपि त्यात एका स्त्रीचा खरोखरीच संबंध असला तरी तो तुझ्या सुखाच्या आड येत नाही! माझ्यावर तुझा भरवसा आहे ना ?

**कालिंदी** : माझ्या प्राणांवर माझा भरवसा कसा नसेल ! आपल्या त्या कार्यात आपल्याला यश येण्यासाठी देवाजवळ प्रसाद मागता यावा म्हणूनच ते जाणण्याची माझी इच्छा आहे. प्रियजनांच्या प्रेमळ आशीर्वादाने आपल्या प्रयत्नाला परमेश्वराचे बळ येते. मग माझ्याजवळून ते रहस्य का बरे आड ठेवायचे? माझा आपल्यावर पूर्ण विश्वास; आणि आपल्या मात्र माझ्यावर का बरे नसावा ?

**वृंदावन** : (स्वगत) ही नसती पीडा गळ्यात बांधून मी निष्कारण फसल्यासारखा झालो आहे! माझ्या मनातून आपल्याबद्दलच्या कल्पना पार निघून गेल्या असे वसुंधरेला भासविण्यासाठी बाह्यत्कारी हे बायकोचे बाव्हले पुढे ठेवण्याच्या धांदलीत, ही हत्या मी आपल्यामागे लावून घेतली! इतक्या विश्वासपूर्ण, निष्कपट आणि सरळ हृदयाजवळ खोटे तरी काय बोलायचे? (उघड) कालिंदी, क्षमा कर; एवढ्या एका रहस्याखेरीज आपल्या दोघांत कसलाही आडपडदा नाही; नाइलाजामुळे ते मात्र मला आज सांगता येत नाही हं, अशी निराश होऊ नकोस, खिन्न होऊ नकोस; त्याचा तुझ्या सुखाशी काहीएक संबंध नाही. तुझ्या संसाराच्या सीमेच्या ते सर्वस्वी बाहेर आहे! माझ्या मानहानीची भारपाई करून घेण्यासाठीच माझा हा सारा खटाटोप आहे. त्याचा संबंध माझ्या परक्रमाशी- (स्वगत) सत्याच्या आणखी जवळ गेले पाहिजे- (उघड) माझ्या पुरुषार्थाशी आहे !

**कालिंदी** : मग त्या भावी पराक्रमाची, पुरुषार्थाची कथा मला ऐकायला काय बरे आडकाठी आहे?

**वृंदावन** : विचारी पुरुषाने आपल्या भावी पराक्रमाची कल्पना कोणालाच होऊ देऊ नये! त्यातून नवऱ्याने बायकोजवळ तर आपल्या पुरुषार्थाच्या कर्तबगारीच्या रहस्याचा उल्लेख फारच जपून करायला पाहिजे. नवऱ्याच्या नावाचा मोठेपणा चारचौघांत केव्हा गाजवीन असे तिला होऊन जाते. पतीच्या पुरुषार्थासंबंधाने रहस्यातले रहस्यसुद्धा स्त्रीजवळ ठरावीक मुदतीबाहेर ठरत नाही! या गोष्टीची केतनसारखी पाळण्यातली पोरेसुद्धा साक्ष देतील!

**कालिंदी** : मला नाही, पण आपल्या चिमुकल्या केतनला तरी आपल्या पराक्रमी पुण्याईचे पोवाडे ऐकवायचे होते! भगवंताच्या तोडून चक्रव्यूहभेदाचे वर्णन गर्भातच ऐकल्यामुळे अभिमन्युकुमारांनी केवढा पराक्रम केला बरे?

**वृंदावन** : लोकोत्तर पुरुषांच्या जीवनातल्या सुखशांतीच्या प्रसंगांकडेच आपली आशाळभूत दृष्टी नेहमी पाहत असते; तुझा केतन अभिमन्यूसारखा पराक्रमी व्हायला पाहिजे ना? पण सौभद्राप्रमाणे सोळाव्या वर्षीच समरभूमीवर त्याला मरण- (कालिंदी वृंदावनाच्या तोंडावर हात ठेविते.)

**कालिंदी** : अगंबाई, हे काय भलतेच बोलणे! काळवेळेची शकुनवंती मोठी वाईट असते हो. वेळ काही सांगून येत नाही.

**वृंदावन** : माझ्या तोंडावर हात ठेवलास, पण सर्वभक्षी काळाच्या तोंडाला हात देता येणार आहे का?

**कालिंदी** : माझ्या गळ्याची शपथ आहे! असले भलते बोलू नये. या निर्दय विनोदाने माझे हृदय दुभंगून जाईलसे वाटते! आपले रहस्य मला समजू नये अशीच आपली इच्छा दिसते; मी तरी ती मोडण्याचा हेका कशाला धरू! आपण सांगितले तेवढ्यानेच माझे समाधान होईल! एकदा शेवटचे शब्द सांगून माझे हेतू पुरविणार ना? आपल्या मनात माझ्याबद्दल विकल्प नाही ना?

**वृंदावन** : प्रेमळ, विश्रब्ध जीवा! नाही, नाही, नाही ! माझे तुझ्यावर पूर्ण प्रेम आहे! वृंदावन सर्वस्वी तुझाच आहे. या रहस्यापुरता एक कोपरा सोडून माझे सारे हृदय तुझेच आहे! या हृदयावर विश्वासाने मस्तक ठेवून अशीच कल्पांतापर्यंत विसावा घे ! (कालिंदी त्याच्या हृदयावर मस्तक ठेविते.) हा, आधी एवढे कबूल कर, की आजपासून आपण होऊन तू मला अलिंगन देशील आणि आपल्या प्रेमसंवादात पहिला शब्द तुझा असेल! दे पाहू मला असे वचन!

**कालिंदी** : आज नवीन वचनच कशाला हवे? देवांच्या, जीवाजीवांच्या साक्षीने हातात हात दिला त्याच वेळी मी माझ्या सर्वस्वाचे वचन दिलेले आहे! या आनंदाश्रूंनी आज त्याच्यावर उदक मात्र सोडते!

**वृंदावन** : (स्वगत) या नाजूक नादात बहकून मी काहीच्या काहीच बरळत चाललो आहे! वसुंधरेला भ्रष्ट करण्याचा माझा निश्चय हृदयाचे धागे तुटून सारखा ढळत चालला आहे! सत्य, सौंदर्य आणि बुद्धिमत्ता यांच्या त्रिवेणी संगमात न्हाणाऱ्या माझ्या हृदयातून क्रूर कल्पनासुद्धा धवळून निघत आहेत ! एकदा वाटते, सुडाच्या कल्पना सोडून, मनाची अढी मोडून, मनमोकळेपणाने हिला सर्व सांगून टाकावे; त्या उत्कटतेच्या भरात हिचे डोळे पाण्याने भरून आले म्हणजे त्या प्रेमाश्रूंच्या पुष्करणीत प्रतिबिंबरूपाने मंगलस्नान करून पावन व्हावे! हे कोमल मना, तसे

करायला कोणती हरकत आहे? की सुखाची सृष्टी सोडून सुडाच्या वणव्यात होरपळत पडण्यात काय अर्थ आहे? जे मन वसुंधरेच्या प्रखर गुणांनी दीपले नाही, भूपालाच्या शुद्ध स्नेहरसात विरले नाही, ते मन या प्रेमकरुण मुखाच्या स्पर्शाने निवळून जाऊ देणार नाही हा अभिमान कशाला हवा? (तिच्या तोंडावरून हात फिरवितो.)

**कालिंदी** : अहाहा ! नाथ, जे पाहिजे होते ते मिळाले! मला हा आपल्या खऱ्याखुऱ्या प्रेमाचा हात आज लाभत आहे! प्रीतीने प्रीतीला ओळखले! हृदयाला हृदयाची साक्ष पटली! प्राणेश्वरा, आता मात्र मी धन्य, धन्य, त्रिवार धन्य झाले! माझ्या जीविताची इच्छा तृप्त झाली! मला अक्षय समाधानाची जोड मिळाली! हे प्रेम, हे हृदय आता मात्र या भाग्यशाली कालिंदीला कायमचे लाभले! हे प्रेमस्वरूप परमेश्वरा, तुझ्या लपत्या स्वरूपाची ही पहिली भेट आयुष्याच्या अखेरीपर्यंत या मिटलेल्या डोळ्यांसमोर अशीच अखंड ठेव ! (त्याच्या हृदयावर डोळे मिटून मस्तक ठेवते.)

**वृंदावन** : (स्वगत) हिने आपले डोळे मिटून घेताच माझे डोळे खाडकन उघडले ! घटकेच्या गोड बोलण्याने माझे मन नादान होऊन मी उभ्या आयुष्याच्या एकाच इच्छेला झुगारून देत होतो! हा प्रसंग आवरता घेतला पाहिजे! आणि पुन्हा कधीही न घडू दिला पाहिजे. कोमल चंद्रिकेने कठीण चंद्रकांत पाझरतो; झुळझुळत्या झऱ्याच्या नाजूक झरणीने काळ्याकभिन्न कड्यालाही कंगोरा पडतो ! त्याप्रमाणे हिच्या अश्रूंच्या झिरपणीने माझ्या हृदयाचेही पाणी होऊन जाईल. हिच्या प्रेमळ जीवाच्या हलक्या हातांनी सुडाची दोरखंडे तुटून बांधलेला जीव मोकळा होईल खरा; पण मग त्याला माझ्या हृदयाच्या बाहेरच हिंडावे लागेल! मेलेल्या सुडाच्या प्रेतविचाराची हृदयात त्याला भीती वाटेल! वस्तुलाभ आणि सुख यांच्यात जमीनअस्मानाचे अंतर आहे! हे वाटेवरचे प्रेम मिळवून मी काय करू? मला जे पाहिजे तेच मी मिळवीन! स्पर्धेत पायदळी पडलेली माझी प्रतिष्ठा भूपालाला मस्तकी धारण करावयाला लावीन. नाहीतर दुर्लभतेच्या विजयोत्साहाने वसुंधरेच्या डोळ्यांनी माझ्याकडे पाहिल्यानंतर कालिंदीच्या प्रेमांध डोळ्यात मला काय दिसणार आहे? हे प्रेमाचे सोंग पुरे झाले! वसुंधरेचा हार स्वीकारण्यासाठी ही गळ्यातली घोरपड हळूहळू दूर केलीच पाहिजे! (उघड) लाडके, तू बोलत का नाहीस ?

**कालिंदी** : प्रणयचंद्रा, तृप्ती बोलत नाही! इच्छा प्रयत्नांनी धडपडत असते. आशा डोळ्यात एकवटून पाहत असते; पण तृप्ती समाधानाच्या समाधीत डोळे मिटून बसते आणि मुकी असते! अंग अंगाशी, हृदय हृदयाशी, जीव जीवाशी मुक्या बोलांनी बोलत असता नादब्रह्माचा विलय होतो!

**वृंदावन** : (स्वगत) ही प्रेमाच्या कल्पनेत पार गुंगून गेली आहे! याच स्थितीत मान दाबून हिला मारून टाकूका? म्हणजे कायमचा मोकळा झालो!

**कालिंदी** : प्राणेश्वरा, माणसाला मागितले मरण का बरे मिळू नये? अगंबाई, आपण पुन्हा चपापला? आणि ते सुद्धा केवढ्याने!

**वृंदावन** : तू मरणाची गोष्ट काढण्यापूर्वी माझ्याही मनात मरणाबद्दलचाच विचार आला होता! आपल्या विचारांचा विलक्षण योग पाहून मी एकदम चकित झालो!

**कालिंदी** : हृदयाशी हृदय समरस झाल्यावर एकच विचार दोन्ही ठिकाणी वावरत असल्यास नवल नाही! हृदयाची एकाच शब्दाची धडधडणारी भाषा अनेक शब्दांच्या कल्लोळात आपण विसरल्यामुळे आपल्याला हृदयाचे खेळ कळत नाहीत! आकाशात गडगडणारा देवाचा एकाच शब्दाचा संदेश आपल्याला कळत नसल्यामुळे देवाची सहजलीला आपणाला गूढ स्वरूपाची वाटू लागते! पण नाथ, मरणाच्या विचारात असे दचकण्यासारखे काय आहे ते?

**वृंदावन** : प्रेमामृताचे पान करीत असताना मरणाची कल्पना विसंगत वाटत नाही का? सुखसागरात पोहत असताना चिरजीवनाची इच्छा कोण करणार नाही!

**कालिंदी** : छे: छे: नाथ, चिरजीवनात सुख नाही; मृत्यूनेच जगाला मनोहर केले आहे ! मरणामुळेच माणसाला मोल येते. प्रेमाला मरणाचे भय नसेल तर त्याबद्दल सभय उत्कंठा कधीच वाटणार नाही! नाशाच्या भीतीमुळे सुखाबद्दल सारखी गोड हुरहुर वाटत असते; संसाराची सारी गोडी नश्वरतेत-अगदी अविश्वासी क्षणभंगुरतेतच आहे! प्रेमात अमृतासारखे नीरस, एकरूप चिरजीवन असेल तर त्याच्या स्पर्शाने हृदयाची भित्री धडधड एकदम बंद पडेल; दृष्टींतून करुण मुद्रेची आशा नाहीशी होईल! प्रेम अमृतमय नाही! मदिरेच्या बेफाम धुंदीत अफूची गुंगी आणि भांगेची थरारणारी तल्लीनता मिसळून परमेश्वराने प्रेमाचा प्याला निर्माण केला आहे! प्रेमाच्या निशेत गुंगलेल्या जीवाला सुखाच्या सागरात पोहण्याइतकी जाणीव नसते! सुखसागरात बुडून जीव कोंडून मरण्यातच प्रेमाचा शेवट व्हायला पाहिजे! प्रेमाच्या जहरी निशेने बेभान, बेहोष होऊन, चढत्या लहरीनी सर्वांग थरारून निघत असताना डोळ्यांवर धुंदीची झापड पडली असताना, अगदी श्वासोच्छ्वास करण्याचाही विसर पडून हा जीव ठायीच्या ठायी विरून गेला तर आणखी काय पाहिजे? या प्रेमसौभाग्याच्या भर बहारीत आपल्या वक्ष:स्थलावर असे मंगल मरण आले तर माझ्या भाग्याची उजरी होईल. अशी भाग्याची मरणे मिळू लागली तर जीविताचे कष्ट जन्मोजन्मी वहावयाला कोण तयार होणार नाही! प्राणवल्लभा या वेळी, या स्थितीत ते मोलाचे मरण मला तुमच्याच हातांनी द्या! नाथ, प्रेमाच्या भरात मी वाटेल ते

बरळू लागले आहे! प्रेमाच्या धुंदीत माझा तोल सांभाळून मला सावरून धरा! (त्याच्या खांद्यावर मान टाकून पडते.)

**वृंदावन** : (स्वगत) या निर्जीव पुतळीला मारून टाकण्यात तरी काय पुरुषार्थ आहे? हा नाटकी देखावा आता बस्स झाला! (उघड) कालिंदी, किती वेळ अशी वेड्यासारखी उभी रहाणार? या कोमल तनूला बांधल्यासारखे होणार नाही का?

**कालिंदी** : जीवींच्या जिवलगा, आपण प्रेमाच्या जिवंत जादूने जिवाला भारून टाकिल्यामुळे शरीराला अवघडल्यासारखे मुळीच वाटत नाही! जगदीश्वरा, माझ्या प्रेमसमाधीतच माझा लय करून टाक.

**वृंदावन** : (स्वगत) आता या पिंजऱ्यातून माझी सुटका होणार तरी कशी? कंकणाला बाहेर थांबावयाला सांगितले आहे, तो तरी आडदांडपणाने आत येईल तर काय बहार होईल! माझ्या शहाणपणापेक्षा त्याच्या मूर्खपणाचाच तूर्त मला जास्त उपयोग होण्यासारखा आहे !

**कालिंदी** : अगंबाई, केतन जागा झाला वाटते! आता घुंगुरवाळा वाजला, का झोपेत सुद्धा माझा चिमुकला माझी आज्ञा पाळीत आहे! किंकिणी, जरा इकडे ये पाहू! (किंकिणी येते.) केतनला आत नेऊन निजीव बरे! वाऱ्याच्या झोताने त्याची झोपमोड होतेशी दिसते.

**वृंदावन** : आणखी हे पाहा, किंकिणी, बाहेर कंकण आला असेल त्याला आत पाठवून दे ! कालिंदी-लाडके, मला कंकणाशी दोन शब्द बोलायचे आहेत! (किंकिणी केतनाला घेऊन जाते.) म्हणून तू सुद्धा जरा आतल्या दिवाणखान्यात जातेस का? (कंकण येतो.)

**कालिंदी** : आता मी इथे राहिले तर काय हरकत आहे. बरे! त्या एका रहस्याखेरीज-

**वृंदावन** : त्याच रहस्याबद्दल मला कंकणाशी बोलावयाचे आहे.

**कालिंदी** : एकजीव झालेल्या जिवात बिघाड करणारी की रहस्ये कशाला हवीत कुणाला ठाऊक? जगात गुप्त रहस्ये मुळीच नसली तर चालणार नाही का ?

**वृंदावन** : रहस्यावाचून जग कसे चालेल? आपला आताचाच प्रणयसंवाद लोकांनी ऐकिलेला तुला आवडेल का ?

**कालिंदी** : घरोघरी त्याचीच पारायणे होत असल्यामुळे तो ऐकण्याची सवड कोणाला मिळणार? या रहस्याच्या नादात आज आपण केतनचा मुका सुद्धा घेतला नाही.

**वृंदावन** : हं, रागावू नकोस; हा घे आणि त्याला नेऊन दे !

**कालिंदी** : भलतेच ! प्रेमाच्या बाजारातली देवघेव दलालामार्फत होत नाही.

**वृंदावन** : प्रेमाच्या व्यवहारशून्य जगात तर दोन जीवांचा एकजीव झाल्यावरच चुंबनाची देवघेव दलालामार्फत करावी लागते ! बरे, माझी विनंती मान्य करणार ना ? (कालिंदी जाते. तिच्याकडे पहात स्वगत) हिच्या बोलण्याचा कोवळा परिणाम दूर करावयाला कंकणाची कर्कश भाषाच आता हवी आहे!

**कंकण** : (स्वगत) धनीसाहेब बोलण्यात पटाईत असतील कदाचित्; पण इष्काच्या बाबतीतले पांचपेच त्यांना बिलकुल समजत नाहीत; कालिंदीबाईसाहेब आपले रहस्य ऐकण्यासाठी उभ्या राहताहेत असे धनीसाहेबांना वाटत आहे; पण बाईसाहेबांचे रहस्य काय आहे हे त्याचे त्यांना ठाऊक की एक मला ठाऊक! खास त्या माझ्यावर खूष असल्या पाहिजेत! आजचा मिशांचा हा रुबाब अगदीच फुकट गेला नाही म्हणायचा!

**वृंदावन** : कंकणा, आज मी तुला फारच महत्त्वाचे काम सांगणार आहे! तू आपल्या स्थितीचा नीट विचार केला आहेस का ?

**कंकण** : काय संबंध विचाराचा! एकदा ठरवून टाकिलेल्या गोष्टींखेरीज मी कसलाच विचार करीत नाही ! वरिष्ठांचे पाय धरावेत, कनिष्ठांना पायाखाली तुडवावे; लढाईत शत्रूच्या मानेवर हात, एरवी सुंदर स्त्रियांच्या गळ्यात हात! शत्रूंचे तलवारीने आणि मित्रांचे केसाने गळे कापायचे! खऱ्याखोट्याची शहानिशा करायची फक्त तनख्याचे दाम मोजून घेताना! तलवारीने होण्यासारखे काम असेल तिथे उगीच वटवट करायची नाही! कामगिरी असली तर कसूरीचे नाव नाही; रिकामा वेळ बायकांची चौकशी करण्यात घालवितो! असा सीधा रस्ता आहे माझा! मनुष्याला उभ्या जन्मात विचार करण्याचा प्रसंगच येतो कुठे मुळी!

**वृंदावन** : शाबास ! या तुझ्या सरळपणामुळेच माझा तुझ्यावर मोठा विश्वास बसला आहे! तुझ्या स्थितीबद्दल विचार करायचा म्हणजे असा, की तुला मोठ्या अधिकाराची इच्छा आहे का? तुला द्रव्याची अडचण आहे का?

**कंकण** : असे म्हणता होय? लढाईतल्या लुटालुटीवर द्रव्याची अडचण निभावून नेतो कशीबशी! पण अधिकाराचा कमीपणा आहे तो कबूल केलाच पाहिजे!

**वृंदावन** : आता मी तुला जे काम सांगणार आहे ते चोख बजाविलेस तर तुला कल्पनेबाहेर मोठा अधिकार मिळवून देण्याचे मी वचन देतो. मात्र या गोष्टींतील एक अक्षरही कोणाला समजता कामा नये!

**कंकण** : मी कोणत्या रीतीने आपली खात्री करून देऊ? एखादा लफंगा माझ्याजागी असता तर त्याने ताडदिशी शपथ वाहिली असती आणि आपल्या शब्दाची

आपल्याला प्राणांपेक्षाही जास्त चाड आहे अशी थाप मारून तो मोकळा झाला असता! मी आहे सच्चा माणूस! मला स्वत:च्या शब्दाची दुसऱ्याच्या प्राणांइतकीच किंमत वाटते !

**वृंदावन** : ठीक आहे; तुला माझा स्वभाव माहीत आहेच; माझ्या सांगण्यातले एक अक्षर बाहेर फुटले तर तुला आपल्या प्राणाला मुकावे लागेल !

**कंकण** : आपण मला आज इतकी वर्षे पोटच्या मुलाप्रमाणे पाळिले त्याचा मोबदला मी अशा रीतीने देईन काय ?

**वृंदावन** : बरे, या कामात पापपुण्याचा प्रश्न आला तर ?

**कंकण** : त्याबद्दल आपण बेफिकीर असा ! पापपुण्यात मुळीच तफावत नाही अशी माझी समजूत आहे ! सत्यासाठी हरिश्चंद्राने तारामतीलासुद्धा विकले; पण तेवढ्यामुळे त्याच्या गळ्याभोवती गावच्या बायकांचा गराडा पडला असे काही झाले नाही! धर्माच्या नादाने पांडवांनी सत्याखातर रानावनात दिवस काढले, त्यांनासद्धा काही नगास एकेक द्रौपदी लाभली नाही! बरे, उलट सोळा हजार एकशे आठ नारींपैकी-गोपी नकाच धरू जमेला- एकीनेसुद्धा कृष्णाने चोऱ्यामाऱ्या केल्याबद्दल नाखुषी दाखविली नाही! तेव्हा पुण्याईने कुणी काय मिळविले आहे सांगा! आपण पापपुण्याची बिलकुल जिकीर करीत नाही! आपला जो हुकूम असेल तो खुशाल सांगा!

**वृंदावन** : इकडे कर कान तुझा! (कंकणाच्या कानात काही सांगतो.) समजलास नीट?

**कंकण** : बस? हेच काय ते काम? नुसते मारेकऱ्याचे सोंग आणायचे; थोडेसे खोटे बोलायचे; शेवटी महाराजांचे पाय धरायचे आणि भरपूर रडायचे! आणि एवढ्याबद्दल आपण मला अधिकाराची जागा देणार?

**वृंदावन** : हो; शिवाय, अधिकारसुद्धा लहानसहान नाही, माझीच जागा तुला देणार आहे! अगदी जन्माची नेमणूक!

**कंकण** : काय म्हणता! मी तर एका दिवसापुरता आपला अधिकार मिळविण्यासाठी जन्मभर अशी कामे करीत रहावयालासुद्धा तयार होईन! धनीसाहेब, केवढा उदारपणा आपला हा! अरेरे, असल्या उदार पुरुषाच्या ठिकाणीसुद्धा त्याच्या बायकोची निष्ठा अढळ राहू नये ही केवढी नामुष्कीची गोष्ट आहे !

**वृंदावन** : काय म्हणालास, कंकणा? कालिंदीची निष्ठा अढळ नाही?

**कंकण** : कसूर माफ करा धनीसाहेब! त्यांची निष्ठा आपल्या या एकनिष्ठ सेवकाच्या ठिकाणी जरा चळली आहे खरी!

**वृंदावन** : काय मूर्ख आहे! तुझ्या ठिकाणी?

**कंकण** : धनीसाहेब, ह्यात हसण्यासारखे काहीच नाही! चाकरांच्या वाट्याला धन्याची जुनीपानी वस्त्रे, अंगवस्त्रे, अर्धा-

**वृंदावन** : बेवकुफ! तुझी जीभ फारच लांब व्हायला लागली!

**कंकण** : धनीसाहेब, माफ करा, पण धनीनोकरांमध्ये बोलण्याची फाजील लगट जिथे होते तिथे नोकराची जीभ लांबत नसून, बहुतकरून धन्याचे कानच लांब झालेले असतात, असे मी ऐकले आहे!

**वृंदावन** : (स्वगत) माझ्यापेक्षा उंच दर्जाच्या भूपालाला याच्या हाताने खाली लोटण्यासाठी थोडावेळ तरी याला असे डोक्यावर बसवून घेणे भाग आहे.

**कंकण** : धनीसाहेब, माझ्या बोलण्याचा राग येऊन आपण आपला बेत बदलीत तर नाहीना ?

**वृंदावन** : एक वेळ तुला क्षमा करतो! हं, एवढे लक्षात मात्र ठेव, की तुला तुझे बक्षीस मात्र ताबडतोब देता येणार नाही! काही दिवस थांबावे लागेल!

**कंकण** : मोठ्या आनंदाने थांबेन! खरे म्हटले तर आपल्या हाताखालच्या अधिकाऱ्याला सुद्धा ह्या जागेसाठी आपल्या मरणापर्यंतच थांबायला हवे; मग मी तर किती कमी दर्जाचा मनुष्य! मला थोडेसे थांबायला काय हरकत आहे? बरे हा घाट कधी घडवून आणायचा हे नाही सांगितले अजून?

**वृंदावन** : ते अजून ठरलेले नाही. आयत्या वेळी सांगेन तुला!

**कंकण** : जरा आधी कळले तर थोडे बरे होईल म्हणतो!

**वृंदावन** : का?

**कंकण** : म्हणजे आम्हा मर्दांची लढाईतली कापाकापीची करामत बायकांना डोळ्यांनी पहावयाला काही कधी सापडत नाही; त्यामुळे त्यांच्याजवळ आमचा असावा तसा बोज असत नाही; आता ही घरबैठी संधी आली आहे; तेव्हा म्हटले, युवराजांना मारतेवेळी माझ्या ओळखीच्या चार दोन बायकांना-नको, दोन चार नकोत-निदान आपल्या किंकिणीला तरी पहावयाला बोलवावी !

**वृंदावन** : अगदी मूर्ख आहेस ! इतक्यात दोन चुक्या केल्यास! एक तिथे कोणाला मारावयाचे नाही हे विसरलास आणि तसेच, ही गोष्ट अगदी गुप्त ठेवायची आहे हेही लक्ष्यात ठेवले नाहीस! विचार केल्यावाचून बरळलास खरा!

**कंकण** : मी आधीच सांगितले आहे, की मी भलत्या बाबतीचा कधी विचारच करीत नाही म्हणून !

**वृंदावन** : बरे, सध्या तू जा; संध्याकाळी तुला पुन्हा नीट समजावून सांगेन. मात्र एखाद्या दोस्ताजवळ हे बडबडू नकोस!

**कंकण** : आधी मला फारसे दोस्त नाहीत; एक तेवढा सुदाम काय तो माझा मित्र ! पण आम्ही बायकांखेरीज दुसऱ्या बाबतीत बोलतच नाही कधी ! मी परक्यांच्या बायकांकडे नेहमी वाईट नजरेने पाहणारा! शिवाय, तोसुद्धा मोठा इमानी मनुष्य आहे.

**वृंदावन** : असे का? थांब मग! सुदाम हा दामिनीचा नवरा, नव्हे का ? आपले काम तडीस गेले तर त्याचीही आपल्याला जरूर लागेल. भूपालाच्या वाड्यावर पहारा करायला तो कबूल झाला तर पाहा; शिवाय तळघरात वसुंधरेच्या दिमतीसाठी दामिनीची जरूर आहेच! त्याला नीट सावधगिरीने सांगून पाहा!

**कंकण** : ठीक आहे.

**वृंदावन** : पण त्याच्याजवळसुद्धा उगीच फाजील बोलू नकोस ! जा तू आता (कंकण जातो.)

**वृंदावन** : (स्वगत) कालिंदीबद्दल भलतेच शब्द ऐकल्याबरोबर माझ्या मनाला इतका धक्का का बरे बसावा ? जे मनापासून नको त्याच्या शुभाशुभाने मत्सर वाटणे हा मनुष्याचा मनोधर्मच नाही! खास, तिच्याविषयी माझ्या मनात काहीतरी भावना नि:संशय उत्पन्न झाली असलीच पाहिजे! ती भावना आपलेपणाची-सहवासपरिचयाची-प्रेमाची तर नसेलना? कदाचित् मृदु हृदयाची निंदा-सौंदर्याची हेटाळणी-असल्या पातकी तोंडातून ऐकल्यामुळे रसिक मनाचा हा स्वाभाविक रागही असेल! स्त्रियांबद्दल पाजीपणाच्या कल्पना बाळगणाऱ्या या पापी कंकणाचे-कंकण पापी-नुसत्या मूर्ख कल्पनांमुळे तो पापी, आणि मग मी कोण? सुडाच्या समाधानासाठी-करारी मनाची राक्षसी वासना पुरविण्याकरिता, निर्दोष मित्राला-निस्सीम पतिव्रतेला-छे:! हा विचारच काढून टाकिला पाहिजे! ठरवून टाकिलेल्या गोष्टींखेरीज इतरांचा विचार कसा तो करावयाचा नाही, हा कंकणाचा गुरुमंत्रच मला घेतला पाहिजे! ज्याला दुष्ट व्हायचे असेल, कल्पनातीत पातकं करावयाची असतील त्याने विचाराला थारा देऊन चालायचे नाही! निर्ढावलेल्या पातक्यांना विसाव्याच्या वेळी मादक व्यसनांची जरूरी वाटते ती एवढ्याचमुळे असावी! कालिंदीच्या कोमल सहवासाने हृदयाला तद्रूप करण्यापेक्षा त्याला कंकणासारख्याच्या फरसबंदी दिलाचीच सोबत दिली पाहिजे! भूपालाचा कपाळमोक्ष करायला कंकणासारखा शुद्ध फत्तर हाती आला हाच या कार्याला शुभ शकुन! ठरले, कायमचे ठरले, की इत:पर कोणत्याही गोष्टीचा विचार म्हणून करायचा नाही!

## प्रवेश तिसरा

(किंकिणी प्रविष्ट)

**किंकिणी** : (स्वगत) कालिंदीबाईसाहेबांप्रमाणे वागायचे, व्हायचे-मेला शंभर वेळा मनाचा निर्धार केला असेल तरी अजून काही साधत नाही! चार चौघी बायकांत त्यांचे आपले नेहमी चांगले नाव निघते ! हे मेले माझ्या लग्नाचे अजून जमत नाही, त्यामुळे मला जिथे तिथे खाली मान घालावी लागते! चांगलेसे स्थळच मिळत नाही एखादे! कुठे काही, कुठे काही, आपला काही तरी उणा पक्ष निघतोच! काय करावे, काही सुचेनासे झाले आहे!

(पिया सोते अटारिया.)

दशा आता अशापरी अजूनि जाईना (उपाय काही ना ।
मना ते साहिना ॥ध्रु.॥ प्रयास हा करि महा । योग तरी
न पहा । तिळभरि मान कसा तो राहिना ॥१॥

(नूपुर प्रवेश करतो.)

**किंकिणी** : अगंबाई, नूपुर, वर्दीवाचून असे येऊ नये आत तडक. कालिंदीबाईना भेटाल का असे एकदम?

**नूपुर** : किंकिणी, कालिंदीबाईंचे अनुकरण करण्याचे हे वेड सोडून दे आता एकदा!

**किंकिणी** : अनुकरण म्हणजे वेडच वाटते ?

(उपचार मुजे.)

अनुकार जना ने हा कालांतरी थोर पदा । छळि विहास
हा असला आधी त्या सदा ॥ध्रु.॥ हा निश्चय कधी
न ढळे । प्राणान्तहि आला जरि । न मन तिळमात्र चळे ।
ये त्याप्रति यश तोवरि । करीन यत्ना परि । कल्पांत घडला तरी
ही तापवीन तनु ॥

**नूपुर** : असे कोणते यश मिळवावयाचे राहिले आहे ते ?

**किंकिणी** : कोणते म्हणून नव्यानेच विचारता अगदी ! अहो, कालिंदीबाईंनी सांगितल्याप्रमाणे अगदी निर्दोष नवरा मिळवायचा हे! त्यांच्यासारखेच माझेही नशीब पटदिशी उघडायचे आहे! कुठे लग्नाचे कुणाशी जमत नाही म्हणून तर सारी आपदा ही!

**नूपुर** : ती आपदा टाळण्यासाठी तर मी असा फेऱ्या मारतो आहे तुझ्या घरी! माझ्याशीं लग्न करण्याबद्दल काय ठरविले आहेस तू अखेर?

**किंकिणी** : तुमच्याशी?तुमच्याशी माझे तर मुळीच पटायचे नाही!

**नूपुर** : अगं, आता नाही पटणार कदाचित्; चार दिवसांनी आपोआप पटत जाईल! तरुणपणी ज्यांचे पटत नाही तीच माणसे पोक्तवयात चांगल्या सलोख्याने वागतात; तीन आणि सहांचे निर्जीव आकडेसुद्धा ऐन छत्तिशीच्या भरात एकमेकांची तोंडे पहात नाहीत, पण तेच साठी उलटून गेल्यावर परस्परांचे पक्के स्नेही झालेले दृष्टीस पडतात. माझ्यात असा कोणता दुर्गुण दिसला तुला, सांग पाहू ?

**किंकिणी** : बरे, तसा म्हणण्यासारखा सद्‌गुण तरी कोणता आहे तुमच्यात? तुमच्यापेक्षा आता कंकण येणार आहेत त्यांच्याशीच-

**नूपुर** : कंकणाचे तरी असे कोणते गुण वाया चालले आहेत कळू देत ?

**किंकिणी** : त्यांचा मुख्य गुण म्हणजे त्यांचे शौर्य ! त्यांच्यासारखा तलवारबहाद्दर पाहू जाता सापडावयाचा नाही!

**नूपुर** : कसले आले आहे शौर्य ? आमच्या घराण्यात सुद्धा शौर्य काही कमी नाही! मी अजून एखाद्या लढाईवर गेलो नाही म्हणून! ही बघितलीस तलवार? दाखवू दोन पट्ट्याचे हात करून?

**किंकिणी** : तलवारीचे हात शत्रूला करून दाखवायचे असतात; बायकांना नाही! आता कंकण आले म्हणजे त्यांनाच दाखवा बघू तलवार तुमची!

**नूपुर** : येऊ देत, कंकणाला येऊ देत! या तलवारीने त्याला उभा चिरून त्याच्या अगडबंब देहाचे शतखंड तुकडे करून टाकतो! जमीनदोस्त करितो! स्वर्गात रवानगी करितो! या वेळी कंकण यायला मात्र पाहिजे; तलवार कशी तळपते आहे! कंकणा, कंकणा, खरा मर्द असशील तर ये पुढे!

(कंकण एकदम पुढे येतो.)

**कंकण** : हा पहा कंकण पुढे उभा आहे!

**नूपुर** : अरे बापरे! (किंकिणीच्या मागे जाऊन उभा राहतो.)

**कंकण** : जमीनदोस्त! स्वर्गात रवानगी! शतखंड तुकडे! किंकिणी, या भेकड चोराची यांपैकी कोणती दशा करू सांग. हा वीर तुझ्या नुसत्या हुकमाची वाट पाहत आहे !

**नूपुर** : तू वीर ! तुला धर्मयुद्धाचे ढोबळ नियमसुद्धा माहीत नाहीत. तू शास्त्रसिद्ध मार्गाने जाणारा धर्मयोद्धा नसून माजलेला गळेकापू आहेत ! बायकांच्या पाठीमागे दडलेल्या वीरावर हत्यार चालवितोस ? धिक्कार असो तुला ! राणीवशांत लपलेल्या दशरथावर भार्गवरामाने परशु चालविला नाही; अरे, श्रीखंडीच्यासुद्धा आड झालेल्या अर्जुनाला भीष्माचे बाण शिवले नाहीत, आणि तू माझ्यावर तलवार उपसतोस?

**कंकण** : मग असा पुढे ये; मी तयार आहे!

**नूपुर** : प्रेमासाठी प्रतिस्पर्धा म्हणजे तुझ्यासारख्या रेड्याबरोबर साठमारी नव्हे. नाहीतर तुझ्या या दाढीमिशीच्या जंगलाला तेव्हाच वणवा लावून दिला असता! पण मी भिऊन पळालेला वीर आहे! माझ्यावर शस्त्र चालविण्याचा तुला काय अधिकार आहे?

**कंकण** : किंकिणीवर माझे प्रेम आहे; तिच्याजवळ लगट करणारावर मी अलबत् तलवार चालविणार?

**नूपुर** : माझंही तिच्यावर प्रेम आहे! तिचे तुझ्याशी काही लग्न नाही लागलेले अजून! माळावरची माती कोणीही उपसावी! हा प्रेमाचा सामना आहे! चल, आपापले गुणावगुण किंकिणीला सांगू; तिच्या पसंतीवर ही गोष्ट आहे. प्रेमात आणि युद्धात सर्व काही क्षम्य आहे; किंकिणी, या नंदीबैलाला नीट थोपवून धर!

**किंकिणी** : कंकण, हे नूपुर म्हणतात ते खरे आहे! कालिंदीबाईसाहेबसुद्धा नेहमी असंच म्हणतात. तुम्ही यांच्यावर तलवार चालवून भागायचे नाही.

**कंकण** : पण हा जर -

**नूपुर** : मूर्खा, अजून पणच! सुंदर स्त्रियांची आज्ञा त्यांच्या वल्लभांनी मानिलीच पाहिजे, हा प्रेमशास्त्रातला पहिला सिद्धांत आहे.

**कंकण** : किंकिणी, तुझी आज्ञा मला प्रमाण आहे! ही मी माझी तलवार ठेवून देतो. (नूपुर पूढे येतो.)

**नूपुर** : (स्वगत) दैवाने खैर केली! त्या सैतनाला समोर पाहताच पुरी त्रेधा उडाली होती माझी ! सर्वांगाला दरदरून घाम सुटून तोंडाचे पाणी पळाले आणि जीभ कोरडी पडली! शरीर खिळल्यासारखे होऊन डोकं फिरावयाला लागले! (उघड) आता ये असा मैदानात आणि कर आपल्या गुणांचे आणि प्रेमाचे वर्णन पाहू!

**कंकण** : किंकिणी, मी पिढीजाद लढवय्या आहे ! माझ्या एकाही पूर्वजाने लढाईत प्राण देताना मागेपुढे पाहिले नाही हे तुला लक्षात ठेविले पाहिजे !

**नूपुर** : तुझ्या एकाही पूर्वजाशी आपल्याला लग्न लावायेचे नाही हेही तिने लक्षात ठेविले पाहिजे. पूर्वजांच्या लौकिकाप्रमाणे मुलगा निपजतोच असे काही नाही. दरोबस्त बापासारखा बेटा निपजू लागला तर जगाच्या इतिहासात नावे बदलण्यापलीकडे काहीच फेरफार करण्याची जरूर राहणार नाही!

**कंकण** : मीसुद्धा त्यांना शोभण्यासारखाच आहे! लाथ मारीन तिथे पाणी काढीन अशी धमक आहे माझ्या अंगात!

**नूपुर** : पुढे पुढे या प्रतिज्ञेचा शेवट, घरातल्या घरात बायकोला लाथ मारून तिच्या डोळ्यांतून पाणी काढण्यातच होत जातो.

**कंकण** : असे का म्हणतोस? माझी कर्तबगारी जगात महशूर आहे! किंकिणीने डोळ्यांनी पाहिली नसतील इतकी डोकी रणांगणांवर मी उडविलेली आहेत !

**नूपुर** : ही केवळ कसाबकरणी आहे; लग्नप्रसंगी त्या मुंडक्यांची मुंडावळ बांधून तिला कालिकेची कळा आणावयाची आहे वाटते? एरवी तुझ्यासारख्या भेसूर काळभैरवाला कशी शोभून दिसणार ती?

**कंकण** : मी भेसूर काळभैरव! मग मी जाताना मागे बेहोष बायकांचे मुडदे पडतात ते उगाच वाटते! ही किंकिणीच काय ती अशी भेटली, आणि म्हणून तर तिला खूष करून घेण्याचा मी अट्टाहास करितो आहे इतका!

**नूपुर** : ते बायकांचे मुडदे भेदरल्यामुळे पडले असतील! असा काळारोम झोटिंग पाहून कोण भिणार नाही!

**कंकण** : नखरेबाज नाजूकपणाला पुरुषाचे सौंदर्य समजत नाही; मी तर सौंदर्यालासुद्धा पुरुषाचा गुण म्हणत नाही. मर्दाचा चेहेरा रुबाबदार पाहिजे; त्याला दाढीमिशीची वेलबुट्टी पाहिजे!

**नूपुर** : तुझ्या तोंडातून निघणाऱ्या उडाणटप्पू शब्दांना कोंडून ठेवण्यासाठी हे केसांचे काटेरी कुंपण देवाने केलेले आहे तोंडाभोवती! काय केसाळ तोंड हे! किंकिणी, चुंबनासाठी या बोकडासारख्या दाढीमिशांच्या जंगलात तोंड घालणे म्हणजे पुरा वनवासच म्हणायचा!

**कंकण** : हे बोकडाचे दाढीमिशीचे जंगल नसून, ही नरसिंहाची आयाळ आहे, समजलास? ही पुरुषाला फार शोभा देते!

**नूपुर** : हो, तोंडाच्या विद्रूपपणावर हे केसांचे पांघरूण पडल्यामुळे एका अर्थी ते शोभादायक तर खरेच! गढूळ पाण्याच्या डबक्यासारखे ते मोठाले तांबूस डोळे झाकून टाकल्यामुळे या लांबत्या भुवयांनी खरोखरीच तुझ्यावर उपकार केलेला

आहे! बाबरओठांना पोटाशी धरणाऱ्या या मिश्या आपल्या उठावाने, नाकपुड्यांवरही झाकण टाकून दुहेरी हित साधीत आहेत! नाहीतर त्या मोठाल्या नाकपुड्यांतून, तुझ्या डोक्यात काही नाही हे लांबून पाहणाऱ्याच्या सुद्धा लक्षात आले असते!

**किंकिणी** : हे पाहा, नूपुर, तुम्ही असे यांचेच दुर्गुण सांगत सुटाल तर मला काही खपायचे नाही! दुसऱ्याचे दुर्गुण सांगून तुमचे गुण काही वाढत नाहीत.

**नूपुर** : ठीक आहे; आम्ही दोघेही आपापले प्रेम तुझ्यावर किती आहे हे सांगू! कंकणा, आहेस तयार तू? सर्व काही प्रेमशास्त्रोक्त झाले पाहिजे!

**कंकण** : नाही बुवा; ते प्रेमशास्त्र आपल्याला मुळीच कळत नाही !

**नूपुर** : मग काय उपयोग? किंकिणी, कुलकन्यकेप्रमाणे प्रेमाची आराधना कशी करून घेणार तू? तुझ्या मोठेपणाला याच्या गावठी वागण्याने जरूर बाध येणार.

**किंकिणी** : खरेच, कंकण, हे म्हणतात तसे तर झालेच पाहिजे! हे प्रेमशास्त्र तुम्हाला शिकायला हवे.

**कंकण** : काय करावे, मोठी आफत येऊन पडली! बरे, मला दोन दिवसांची सवड तरी दे म्हणजे करितो काही तजवीज!

**किंकिणी** : ठीक आहे ! परवादिवशी तुम्ही दोघेही या म्हणजे झाले!

**कंकण** : पण दरम्यान या नूपुराने तुझ्याजवळ माझी नालस्ती करिता कामा नये!

**किंकिणी** : बरे; तुम्हीही मध्यंतरी माझी भेट घेऊ नका!

**कंकण** : जातो तर मी आता.

**नूपुर** : याच्या बोलण्यात बायकांबद्दल काय आले ते ध्यानात आहे ना? या बाबतीत हा तुझी आज्ञा खास मोडणार! तू याच्याजवळून कबूल करूनच घ्यायला हवे होते, की प्रत्येक गोष्टीत तुझे म्हणणे ऐकेन म्हणून! नाहीतर हा राकट राक्षस तुझ्या कोवळ्या मनाला तेव्हाच दुखवील.

**किंकिणी** : काही म्हणा; पण तुमचे मघाचे भेदरणे बायकीच! मी होते म्हणून तुम्ही सुटला!

**नूपुर** : पण युक्ती कोणी काढिली? प्रत्येकाचे बळ निराळ्या प्रकारचे असते. सापाच्या डोक्यात विष असते, तर विंचवाच्या शेपटाला नांगी असते! ह्याला लढवय्याचा हात आहे; मला मुत्सद्दीगिरीचे डोके आहे! कसा एका शब्दासरशी तुझ्या त्या जंगली जिवलगाला, त्या केसाळ जनावराला- (कंकण येतो.)

**कंकण** : अरेच्या, पुन्हा माझी बदनामी? (तलवार उपसतो.)

**नूपुर** : (कंकणासमोर गुडघे टेकून) शरणागताला अभय असो! कंकण, हा वीर आता धर्मयुद्धाच्या दुसऱ्या नियमाबरहुकूम तुझ्याशी लढत आहे ! नामर्द, शरण आलेल्याला मरण देतोस? घाल ती तलवार म्यानात !

**कंकण** : (तलवार म्यानात घालून) या धर्मयुद्धाने सतावून सोडले बुवा अगदी! हे बघ, वारा वाहील तशी पाठ देणे हे काही वीराचे लक्षण नाही.

**नूपुर** : पण वाऱ्याशी भांडत सुटणे हे शहाणपणाचे लक्षण नाही.

**किंकिणी** : तुम्ही परतला का, सांगा पाहू?

**कंकण** : (स्वगत) हिला आपल्या वाढणाऱ्या वैभवाची नुसती वरवर खबर द्यावी! (उघड) मला तुझ्याजवळ एकांतात काही सांगावयाचे आहे.

**नूपुर** : हा! प्रेमाच्या धर्मयुद्धाला हा एकांत मंजूर नाही!

**किंकिणी** : प्रेमात आणि युद्धात सर्व काही क्षम्य असते! कंकण, चला तुम्ही, नूपुर, तुम्ही असे वाईट वाटू देऊ नका. प्रीति ही अशीच आहे.

(हम वारिया.)

बहु तापना । वाटे जरी प्रीति रम्य ही मना ।
नवतरंगी विविध रंगी दे यातना ।।
भ्रांतिप्रदा होती भावना । शांतिस्थिरा वृत्ती होत ना ।।धृ. ।।
संशयविवशा । हृदयी दुराशा ।
शंकास्पदा सर्व कामना। फिरवितसे जनिं ।
अंधचि करुनि । अंती हरी तेविं जीवना ।।१ ।।

(कंकण व किंकिणी जातात)

**नूपुर** : (स्वगत) हा हिच्याजवळ काय बोलणार आहे ते कळण्यासाठी मी हिच्या प्रेमावरही पाणी सोडायला तयार आहे! काय करावे? यांच्या मागोमाग जावे म्हटले तर हा काळ एकदम स्वर्गाच्या वाटेलाच लावायचा! असो; आता त्या दामिनीकडे जाऊन त्या बैराग्याबद्दल बोलणे काढावे! बळेच गळ्यात पडले म्हणजे खरे असेल तर चटकन कळून येईल. (जातो.)

# प्रवेश चवथा

(राजा, भूपाल, वृंदावन प्रवेश करतात.)

**राजा** : भूपाल, तुमच्यासारख्या लोकोत्तर पुरुषाची माझ्या राज्याला जोड लाभल्यामुळेच आजच्या महत्त्वाच्या बाबतीचासुद्धा भर रस्त्यावर मोठ्याने खल करायला मी तयार झालो आहे. कोणत्याही गोष्टीचा तुम्ही वृद्धाच्या नीरस पोक्तपणाने विचार करिता, तरुणाच्या उसळत्या रक्ताने ती घडवून आणिता आणि बालकाच्या चंचलवृत्तीने तिच्या फलद्रूप धन्यवादाबद्दल बेफिकीर होता!

**भूपाल** : महाराज, आपल्या प्रेमाला माझ्या ठिकाणी कोणते गुण दिसत नाहीत? आपणच घडलेल्या दगडाच्या मूर्तीत भाविक दृष्टीला देवपणा दिसतो; तशातला हा प्रकार आहे!

**राजा** : केवळ असे का म्हणता? भूपाल, युवराजाच्या जन्मामुळे तुमचा राज्यावरचा वारसा उडाल्यानंतरही वाढत्या उत्साहानेच दिसून येणारी तुमची आमच्याबद्दलची निष्ठा डोळ्यांपुढून कधीही हलत नाही; आणि आपल्या आठवणीने कृतज्ञतेचा आनंदाश्रूत शेवट करिते. एवढ्या राज्यहानीबद्दल तुम्ही क्षणभरही विषाद मानिला नाही आणि उलट युवराजांवर पुत्रप्रेमच करीत आला, हे तुमचे अलौकिक औदार्य नेहमी प्रसंगावाचूनही बोलून दाखवावेसे वाटते! त्यातून आज ज्या महत्त्वाच्या कामासाठी तुम्हाला बोलावून आणिले त्याच्यामुळे तर तुमच्या उदारवृत्तीचे द्विगुणित ऋण वाटत आहे! भूपाल, सरहद्दीवरच्या भागात इंद्रनाथाने पुन्हा बंडाळी सुरू केली आहे आणि या खेपेला त्याचा युवराजांच्या प्राणावर घाला घालण्याचा विचार आहे, अशी आताच बातमी आली आहे. युवराजांना तुमच्यासारखे संरक्षक नसते तर ही बातमी मनाला हालवून सोडण्याजोगी होती नाही? काय चमत्कार आहे; एकाच घराण्यात तुम्हा दोघांचा जन्म; दोघांचाही राज्यावर सारखा हक्क आणि दोघांचीही युवराजांच्या जन्माने राज्यप्राप्तीविषयी सारखीच निराशा झालेली! पण भूपाल, इंद्रनाथाने युवराजांचे प्राण हरण करण्यासाठी झटावे आणि तुम्ही त्यांच्या रक्षणाकरिता आपले प्राण धोक्यात घालावयास नेहमी तयार असावे हा किती विलक्षण विरोध आहे!

**वृंदावन** : ईश्वराची लीला अत्यंत गूढ स्वरूपाची असते तिचे हे प्रत्यंतर!

**राजा** : भूपाल, इंद्रनाथाच्या या बंडाळीचा बंदोबस्त करण्यासाठी उद्या तुम्हाला मोहिमेवर जावे लागणार आहे! दुसऱ्या कोणाला पाठविले तरी चालण्यासारखे आहे; परंतु तुम्हालाच पाठवून इंद्रनाथाचा कायमचा बंदोबस्त करून टाकण्याचा माझा बेत आहे. तुम्हाला कसा काय वाटतो हा विचार ?

**भूपाल** : आपल्याला अतिशय आश्चर्य वाटेल, कदाचित् रागही येईल; परंतु सध्या मोहिमेवर जाण्याची माझ्या मनाची तयारी नाही!

**राजा** : तुम्ही अपुर्त्या विचाराने बोलल्याचे किंवा योग्य कारणाशिवाय माझ्या मर्जीविरुद्ध गेल्याचे पूर्वी एखादे उदाहरण जरी घडलेले असते तरीसुद्धा मला आश्चर्य वाटले नसते, राग तर खात्रीने आला नसता!

**भूपाल** : माझी मनोवृत्ति अशा प्रकारची होण्याचे काही विशेषसे कारण आहे असे नाही! तितका उत्साह वाटत नाही एवढेच! निदान मनाची तयारी करण्यासाठी महाराजांनी मला थोडासा अवधी तरी द्यावा एवढी विनंती आहे !

**राजा** : तसा अवधी देण्याला काहीच प्रत्यवाय नाही.

**भूपाल** : मग मी आज्ञा घेऊ तर? युवराज माझी वाट पाहत उभे आहेत.

**राजा** : ठीक आहे! (भूपाल राजाला प्रणाम करून जातो.) वृंदावन, मंडलेश्वर एक दोन दिवसांत मोहिमेवर जावयाला तयार झाले नाहीत तर तुम्हाला जावे लागेल!

**वृंदावन** : मंडलेश्वर इथे राहिले तर, महाराज, मलाही निकडीने इथेच रहावे लागेल!

**राजा** : म्हणजे, हा अवज्ञेचा काळ सुरू झाला की काय?

(वृंदावन एकदम राजाचे पाय धरतो.)

**वृंदावन** : क्षमा करा, महाराज, मी विचाराने आपला अतिशय अपराधी आहे.

**राजा** : विचाराने अपराधी? वृंदावन, हा काय प्रकार आहे ?

**वृंदावन** : माझ्या अपराधाबद्दल मला पूर्ण अभयवचन मिळाल्याखेरीज त्याचा उच्चार करण्याचा मला धीर होणार नाही.

**राजा** : तुमचा अपराध नुसत्या विचाराचाच आहे त्यामुळे क्षमा करणे फारसे अवघड होणार नाही!

**वृंदावन** : महाराज, मला ही न्यायनिष्ठुरता नको; मी आपल्या चरणांजवळ केवळ दयेची याचना करीत आहे! इतकेच नाही तर या अपराधात मजहून अधिक अपराधी मनुष्यालाही देहान्त शासन न करण्याचे महाराजांनी मला आधी वचन दिले पाहिजे!

**राजा** : हं, हे घ्या वचन! सांगा पाहू तुमचा अपराध कोणता तो?

**वृंदावन** : आमचा अपराध इतका भयंकर आणि गुप्त आहे, की तो महाराजांच्या कानातच सांगण्याची परवानगी असावी.

**राजा** : तुमच्या वर्तनाने मला आश्चर्याचे वेड लागेल असे वाटू लागले आहे! सांगा लौकर काय असेल ते! (वृंदावन राजाच्या कानात सांगतो.) काय सागता तुम्ही हे?

**वृंदावन** : आपल्या चरणांपाशी असत्य किंवा गैरमाहितीने बोलण्याचे धाडस कोण करील? माझ्या सांगण्यातले एक अक्षर खोटे ठरेल तर मी देहान्तशिक्षा भोगीन!

**राजा** : तुमचे म्हणणे कदाचित् खरेही असेल! लोभ पापाचा परमेश्वर आहे! राजपुत्र इंद्रायुधाचा असा गुप्त वध केला तर भूपालाला पुन्हा राजपदाचा हक्क मिळेल; तेव्हा भूपालाला असे नीच कर्म करण्याची बुद्धी होणे स्वाभाविक आहे! वृंदावन, मी जातो आता; प्रत्यक्ष पाहिल्याखेरीज अशा गोष्टीबद्दल विचार करता येत नाही! योग्य वेळी मला सूचना देण्याकरिता या. (राजा जातो.)

**वृंदावन** : (स्वगत) आजच्या माझ्या चरित्राचे सिंहावलोकन करू लागलो, तर सिंहाच्या नजरेतला रानटी क्रूरपणाच माझ्या नजरेत दिसून येईल! पण ही नजर उपयोगी नाही; रात्री ऐन वेळी युवराजाच्या शयनमंदिराकडे फसवून नेण्यासाठी भूपालाला हाक मारतेवेळी हे डोळे त्याला दिसले, तर ते भेकड सावज नुसत्या नजरेच्या निखाऱ्यानेच होरपळून निघायचे ! (जातो.)

**अंक पहिला समाप्त**

## अंक दुसरा
# प्रवेश पहिला

(स्थळ : सुदामांचे घर. दामिनी प्रविष्ट.)

**दामिनी** : (स्वगत) या मेल्या जोगड्यांना किमया करिता येत नाही, मग हे घरेदारे सोडतात तरी कशाच्या जिवावर? आजवर खंडीभर सोळभोक भेटले, पण सारे फुकट! कुणी देवाचे नाव आळवतो तर कुणी समाधीतच डोलत बसतो. उगीच मेल्यांच्या खस्ता खाल्ल्या, अंगारेधुतारे केले, आवशीपहाटे वडापिंपळाभोवती घिरट्या घातल्या; तिकडच्या मनात वेडेवाकडे आले तरी तशीच आपली निगरगट्टपणाने नेमधर्म करीत राहिले; जवळचे किडूकमिडूकसुद्धा मेल्यांच्या भरीला घातले. सारे सारे व्यर्थ गेले! म्हटले एखाद्या तरी ठिकाणी मनमागते मिळाले तर अंगाखांद्यावर एकदा सगळा साज-अगदी बावनकशी सोन्याचा आणि करवंदांएवढाल्या मोत्यांचा सगळा साज घालून चारचौघींना दाखवून येईन! खोटे दागदागिने केले तर वेळेवर भलतेच हंसे व्हायचे! वसुंधराबाईंजवळ मागेन म्हटले तर पोरीबाळीसुद्धा हिणवून पुरेसे करतील, की या गावगौरीला हे भिकेचे वाण कुणी वाहिले म्हणून! बरे, तिकडून मिळविण्याचे तर नावच नको! चाकरीसाठी सुद्धा घराबाहेर पडायचे होत नाही संशयी स्वभावामुळे! कालचे ते ईश्वर मोठे साधू असावेत; नाही तर बाईसाहेब कुठल्या आल्यागेल्याशी बोलत बसायला? त्यांचे पाय धरावेत झाले! म्हणेन, सारी पुण्याई खर्च करा, पण मला एकदाचा सगळा साज मिळवून द्या! दार वाजले आणि कडीही वाजली. स्वारी आली वाटते? (नुपूर येतो.) आत जाऊन बसावे-नाहीतर आपले-अगंबाई, तुम्ही कोण?

**नूपुर** : दामिनीबाई, भिऊ नका ! मी तुमच्याकडेएक निरोप घेऊन आलो आहे!

**दामिनी** : आमच्या घरातला निरोप वाटते?

**नूपुर** : तुमच्या घरातला निरोप पुन्हा घरातच कशाला घेऊन येऊ मी? या निरोपाच्या धन्याला घरदार काहीच नाही!

**दामिनी** : अगंबाई, म्हणजे? मला नाही कुणाचा निरोपबिरोप यायचा! तुम्ही घर चुकला; नाहीतर आला असाल-हो! निघा, व्हा पाहू घराबाहेर आधी! आमच्या घरात असे मुळीच खपायचे नाही! हे बघितले तर सारा गाव जमवावयाचे होईल! निघा तुम्ही!

**नूपुर** : पाहा बरे, गेलो असाच बाहेर तर मात्र जन्मभर ओरडत बसाल ! एका महासाधूचा

निरोप आहे हा.

**दामिनी** : साधू? कुठले साधू? त्यांची एखादी खूण सांगा बघू!

**नूपुर** : काल जाता जाता ज्यांनी तुम्हाला खूण केली ते! पटली नीट खूण?

**दामिनी** : पटली बरे! आता बऱ्या बोलाने तोंड काळे करता की नाही?

**नूपुर** : माझे बोलणे ऐकून तर घ्या आधी! ते साधू अंतर्ज्ञानी असून त्यांनी तुमचे मनोगत ओखळले आहे! ते म्हणाले मजजवळ-मी त्यांचा पट्टशिष्या आहे, पुढे त्यांची गादी माझ्याकडे येणार आहे-ते म्हणाले, बाई मोठी भाविक आहे, हिच्या देहाचे सार्थक व्हावे अशी-(दरवाजावर थाप ऐकूयेते.)

**दामिनी** : अगंबाई, तिकडून येणे झाले वाटते? आता तुमच्या देहाचे मात्र सार्थक होईल चांगले! (दरवाजावर थाप)

**नूपुर** : तुमचा नवरा आला वाटते? अरे बापरे!

**दामिनी** : केलात शेवटी माझा घात? आता त्यांनी तुम्हाला पाहिले इथे म्हणजे घर घेतील डोक्यावर आणि डोके उडवितील एकेकाचे!

**नूपुर** : मग आता करायचे काय ?

(दरवाजावर थाप)

**दामिनी** : आता मला विचारता? चोरासारखे आला कसे अगोदर घरात?

**नूपुर** : घरात आलो कसा हा प्रश्न नाही आता! घरातून बाहेर जाऊ कसा ते सांगा!

(दरवाजावर थाप)

**दामिनी** : दम खा आता! असे करा, त्या मोठ्या पेटाऱ्यात बसा दडून! मी त्यांना कडी उघडून पलीकडच्या खोलीतून तशीच स्वयंपाकघरात जाते. ते माझ्या मागोमागच येतील; आणि तुम्ही चोरट्या पावली तडक निघून जा! (दरवाजावर थाप; नूपुर पेटारा उघडून आत बसतो.)

**दामिनी** : (स्वगत) देहाचे सार्थक म्हणजे आले लक्षात माझ्या! दागिन्यांचा साज मिळाला म्हणजे शरीराला शोभा येणारच! तेच देहाचे सार्थक! साधुमहाराज अंतर्ज्ञानी तर खरे! उद्या जाऊन त्यांचे पाय धरते. हं, बसली ही स्वारी पेटाऱ्यात! आता जाऊन दार उघडावे! (जाते. काही वेळानंतर पेटाऱ्याचे झाकण उघडते व त्यातून नूपुर आणि सुदाम उठून उभे राहतात. काही वेळ तसेच राहून शेवटी बाहेर येतात.)

**सुदाम** : बदमाष! हरामखोर! बेरड! रामोशी!

**नूपुर** : याचको याचकं दृष्टा श्वानवद् गुर्गुरायते!

**सुदाम** : निर्लज्ज, पाजी! कसा आलास या घरात?

**नूपुर** : तुमच्यासारखाच! नुसत्या घरातच नाही, पण पेटाऱ्यातसुद्धा तुमच्याप्रमाणेच आलो! आमची चाहूल ऐकून तुम्ही पेटी गाठली आणि त्या नवऱ्याच्या आरोळीने आम्ही तुमच्या मागोमाग आलो! आपल्या ठरलेल्या संकेताप्रमाणे तुम्ही आघाडी मारिली खरी !

**सुदाम** : बेशरम! बदमाष!

**नूपुर** : तुमचा मत्सर विलक्षण आहे बुवा! अर्ध्या घटकेची वडीलकी इतकी गाजवू देणार नाही मी! शिवाय तो तिचा नवरा आला आहे. तेव्हा मुकाट्याने बाहेर चला आधी !

**सुदाम** : पाजी मनुष्या, मीच हिचा नवरा आहे समजलास!

**नूपुर** : अस्से! मग पती हा स्त्रीचा अलंकार म्हणतात म्हणून तिने तुम्हाला पेटीत जपून ठेविले होते वाटते? मी अशा नकली मालाने फसणारा इसम नाही! व:! काल संध्याकाळी तिची तुमची पुरती ओळखदेखही नव्हती आणि आज अगदी नवराबायकोचे नाते जोडून पार!

**सुदाम** : (स्वगत) या चोराला फसविले पाहिजे ! रागाच्या भरात मी खरे उघडकीस आणीत होतो ते ठीक नव्हते. याचा उपयोग करून घेण्यासाठी याचा पहिला समजच कायम ठेविला पाहिजे. (हसून उघड) पाहिले, म्हटले फसता की काय? बरे, सध्या तुम्ही बाहेर चला; अगदी अवेळी आलात हो!

**नूपुर** : तुम्ही तशी सूचना द्यायची होती आधी मला!

**सुदाम** : अहो, अजून तरी चला! तुम्ही काढता पाय घ्या आणि मला जरा संधी द्या! पहिल्या जागी भेटतोच तुम्हाला. मात्र यापैकी कशाचाही हिला थांग लागू देऊ नका!

**नूपुर** : ती धास्तीच सोडा; मी मुळीच ताकास तूर लागू देत नाही. भाग्यशाली आहात बुवा! बरे, मी जातो आता! वेळेवर वाट पहात बसतो. (जातो).

**सुदाम** : (स्वगत) भाग्यशाली! भाग्यशाली अं? स्त्रीजात तेवढी निमकहराम-

(पसुपत गिरिजा.)

फसवित पुरुषाप्रति स्त्री खनि कपटाची ॥धृ.॥ दोषमात्र-

पूर्णगात्र । विश्वासा कधी न पात्र । मोहपाश वागुराचि ॥१॥

दामिनीला झाल्या गोष्टीची ओळख देऊन सावध करण्यात हशील नाही. तिच्याकडे पाहिल्यामुळेच लोकांना अशा बुद्ध्या सुचतात. बस; अबघडी दामिनीला बुरखा घ्यायला लावतो. (उघड) दामिनी! दामिनी, इकडे ये पाहू.

(दामिनी येते.)

**दामिनी** : हं, ही आले. कशाला हाक मारायचे झाले?

**सुदाम** : आजपासून डोक्यापासून पायापर्यंत चांगला जाडाभरडा बुरखा पांघरून वावरावे लागेल! घरी, दारी, देवळी, चारचौघांत, एकांतात, केव्हाही, कुठेही, तीन्ही त्रिकाळ, अष्टौप्रहर अगदी सांगोपांग, नखशिखांत बुरखा हा अंगावर असलाच पाहिजे!

**दामिनी** : अगंबाई, हे काय सोंग घेतले आज?

**सुदाम** : हे तुझे सोंग बाहेर पडू नये म्हणून! उगीच वायफळ वाच्यता व्हायला नको आहे या गोष्टीची! बुरखा घे म्हटले, बुरखा घेतला !

**दामिनी** : असे झाले काय भूत भरायला अंगांत ?

**सुदाम** : दामिनी, हा पतिव्रताधर्म नाही; सीतेने रामाला असे म्हटले नाही; अहिल्या गौतमाच्या विद्रूप दाढ्यामिश्या आणि जटा पाहूनही असे बडबडली नाही; सुग्रीवासारख्या माकडाचीसुद्धा तारेने अशी हेटाळणी केली नाही; रावणाची दहा तोंडांची प्रभावळ पाहूनसुद्धा मंदोदरीला काही भुताटकीची शंका आली नाही; पाच पांडवांच्या पंचकडीत पडूनसुद्धा द्रौपदीने भुताखेताबद्दल अवाक्षर काढिले नाही; तुम्हा आजकालच्या हुच्च बायकांपेक्षा त्या बिचारीवर तर पातिव्रत्याची पाचपट जबाबदारी होती. पण ती माउली तसल्या जोखमीच्या अडचणींतून सहीसलामत बाहेर पडली आणि तुला एक नवऱ्याबद्दल पातिव्रत्य सांभाळायचे तर लागलीच तीन तेरा करते आहेस!

**दामिनी** : त्या मेल्या बोलण्याला काही धरबंद तरी असायचा होता!

**सुदाम** : (स्वगत) खरेच; द्रौपदीचा दृष्टांत जरा चुकला खरा. सीता सहा महिने परघरी राहिलेली, तारेला दोन नवरे, अहिल्येच्या बाबतीत इंद्राचा पाजीपणा! छे:, ही पतिव्रतांची यादी एखाद्या बदफैली राणीने कुणा पंडिताला पैसे चारून करून घेतल्यासारखी वाटते! पुन्हा करायची म्हटले तर वसुंधरा-छट्-नाहीच ते! स्त्रीजात तेवढी निमकहराम! (उघड) ते काही असो; तुला बुरखा हा घेतलाच पाहिजे!

**दामिनी** : पण झाले काय पाप असे माझ्या हातून?

**सुदाम** : काय झाले न् काय नाही त्याची कशाला हवी उजळणी पुन्हा?

**दामिनी** : मेला स्वभावच भारी संशयी ! आव्याचा रावा करायची खोड आहे म्हणून तर नाही नाही ते मनात येते तुमच्या! परवा असेच; माझ्या माहेरचा तो हा भेटला, त्याच्याशीच लागलीच हुमरीतुमरीवर आला; त्याने आपला माझ्याकडे पाहून कानाडोळा केला एवढे बरे झाले, नाहीतर-

**सुदाम** : एवढे बरे झाले नाही, पण एवढेच वाईट झाले; जो तो तुझ्याकडे पाहून असा कानाडोळा करितो म्हणून तर ही आटाआट एवढी! तू कशाला बोलत बसली होतीस त्याच्याशी? चांगली भरचवाठ्यावर त्याच्या नावाने हाका मारीत सुटलीस ती!

**दामिनी** : बाई, बाई, बाई! आता माहेरच्या माणसाचे नाव काढायचीसुद्धा चोरीच वाटते?

**सुदाम** : अलबत! धर्मशास्त्रच तसे आहे मुळी. माहेरचा माणूस नाही आणि सासरचा नाही; कुठल्याही परपुरुषाचे तर काय, पण प्रत्यक्ष नवऱ्याचे सुद्धा नाव स्त्रीने घ्यायला धर्माची आडकाठी आहे! बायकांना देवाचे नाव सुद्धा वर्ज्य आहे.

(सुखकर दुखहर.)

प्रभुसम पतिपद अबलांना । देव न दैवत लोकी तयांना ।
शुभगति पति प्राणा ॥धृ.॥ निजपतिवाचुनि इतर जनांशी
दर्शनभाषण सुकृतासि नाशी । ईशपदी रतिहि पापचि त्यांसी ।
भयदखरविषसमाना ॥१॥

कुणाशी बोलणे, कुणाकडे पाहणे, चट्सारे विषासमान आहे स्त्रीला!

**दामिनी** : पुरे पापच उभे राहिले बायकांचे! देवदर्शनसुद्धा बंदच व्हायचे अशा अकरताळ्या स्वभावामुळे!

**सुदाम** : देवदर्शन तर अजिबात बंद झाले पाहिजे! हे देवदर्शन करणारे लोक पुण्यसंपादनाऐवजी पापाचा मात्र वाढावा करून ठेवितात. उभ्या दिवसांत घडले नसेल त्याच्या दसपट पाप अर्ध्या घटकेत पदरी पाडून घेतात! देवळांच्या पटांगणात बायका देवाभोवती आणि हे पाजी लोक बायकांभोवती घिरट्या घालतात. देवदर्शनाच्या वेळाच पहा मुळी कशा निवडल्या आहेत त्या! पहाटेची काकडआरती तर मध्यान्हीस शेजारती! कथाकीर्तनेसुद्धा रात्री! छट्, नकोच ते! तुला रात्रीसारखाच काळाभोर बुरखा पाहिजे; कुणाला तुझ्याकडे पाहताच येऊ नये मुळी!

**दामिनी** : माझ्यासारख्या लंकेच्या पार्वतीकडे पहात बसले आहे कोण एवढे? अंगावर

ना गुंजभर सोने ना फुटका मणि! अशी बरी तरी दिसते का मी?

**सुदाम** : बरी असतेस तेव्हा बरी दिसतेस, पण बरी दिसतेस तेव्हा बरी असतेस असे मात्र म्हणता यायचे नाही! दागिन्यांचे बायकांना-निदान तुला तरी काही प्रयोजन नाही. येऊन जाऊन बरे दिसायचे काय ते नवऱ्याला! त्या मला तर दागिन्यावाचूनच बरी दिसतेस तू! झाले, संपला कारभार! या मिरवणुकी हव्याच कशाला मुळी! तेवढ्यासाठी तर हा बुरख्याचा बंदोबस्त करायचा! कळेल कसे कुणाला की बुरख्यात ही सोन्याची सीता सजली आहे का लंकेची पार्वती वणवणते आहे ते!

**दामिनी** : बायकांना वागवायची मुलखावेगळीच तऱ्हा ही! अशाने नाही बायकोचे मन रिझायचे! सव्वाशेर सोन्याने मढवून काढली की बायको सोन्यासारखी! बायकोच्या तोंडावर घोसदार मोत्यांची नथ टाकली, की तिच्या तोंडाची मुक्ताफळे पडायची बंद झालीच! रेशमी लुगडी नेसायला मिळाली म्हणजे बायको रेशमासारखी मऊ आलीच म्हणून समजावे; अशा भरड सुताड्यांनी बायकोशी सूत जमेल ही आशा द्या सोडून! बुरखे न फिरखे हवेत कशाला हे?

**सुदाम** : दामिनी, पातिव्रत्याचा भंग होतो आहे या बडबडण्याने! सीतेने नुसत्या वल्कलांवर दिवस काढले; फक्त नेसत्या लुगड्यानिशीच द्रौपदी पांडवांच्यामागे रानावनात रखडली; दमयंतीने तर अर्धे लुगडेसुद्धा फाडून नळाला नेसायला दिले--

**दामिनी** : तुम्ही तेवढी माझी लुगडी नेसायचेच ठेवले आहे बाकी! या घरबशा कर्तबगारीला आणि तिस्मारखानी बकव्याला चांगली शोभतील माझी लुगडी!

**सुदाम** : तुझ्या या पातिव्रत्यभंगाने आज माझ्या बेचाळीस पिढ्या रौरवात पडणार अशी मला भीती वाटते! एकदम तोंड बंद कर आणि हा बुरखा घे. कालच करवूनसुद्धा आणिला आहे. (बुरखा देतो; कंकण येतो.) हं, घे अंगावर. हा कंकण आला! घे अंगावर बुरखा, नाहीतर नरडे दाबून जीव घेतो एकदम! मेलीस तरी बेहेत्तर पण ही बेअब्रू नको! घे बुरखा. (ती बुरखा घेते.)

**कंकण** : सुदामा, आहे काय गडबड ही? माझ्यासारख्या दोस्ताच्या देखत कशाला हवा बुरखा?

**सुदाम** : दोस्त कसला या बाबतीत!

**दामिनी** : हे बघितलेत कंकणभावोजी-

**सुदाम** : मसणात गेला तुझा कंकणभावोजी!

**कंकण** : हं; सुदामा!

**सुदाम** : दम खा; रागावू नकोस! दामिनी, तू आत जा पाहू! (दामिनी जाते.)

**कंकण** : काय दंगा मांडला आहेस हा कळत नाही! केले काय यांनी असे?

**सुदाम** : स्त्रीजात तेवढी निमकहराम! हा दंगा नाही; ही आर्यांची संस्कृती आहे; ही आम्हा आर्यांची सात्त्विक मनोवृत्ति आहे! स्त्रियांचा मुळीच भरवसा देववत नाही. 'न स्त्री स्वातंत्र्यमर्हति' हे नीट ध्यानात ठेव!

**कंकण** : अरे, चांगली नक्षत्रासारखी बायको मिळाली आहे तरी-

**सुदाम** : तिच्या पायावर नक्षत्र पडले आहे खरे! वेदान्त बायकांबद्दल काय म्हणतो ऐक!- 'स्त्रीणां द्विगुण आहारो लज्जा चापि चतुर्गुणा । साहसं षड्गुणं चैव कामश्चाष्टगुणः स्मृतः ॥' स्त्री म्हटली, की ती खराब चालीची असावयाचीच!

**कंकण** : सरसकट वाटेल त्यावर बायका भाळतील असे नाही मला वाटत; चांगल्या गलमुच्छावाल्या रुबाबदार चेहेऱ्याबद्दल म्हण वाटेल तर!

**सुदाम** : अरे बाबा, स्त्रियांना भेदाभेद पाहण्याची दृष्टीच नाही; त्या जात्याच बदफैली असतात ! 'विरूपं रूपवन्तं वा पुमानित्येव भुञ्जते ।'

**कंकण** : मग तुझ्या हिशेबी साऱ्याच बायका सारख्या म्हणायच्या! पतिव्रता कुणी नाहीच?

**सुदाम** : अगदी ! 'स्थानं नास्ति क्षणं नास्ति नास्ति प्रार्थयिता नरः । तेन नारद नारीणां सतीत्वमुपजायते ।' आणि म्हणूनच बायकांना सारखे जपले पाहिजे! परपुरुषाचे वारेसुद्धा लागू देता कामा नये! माझी बायको आरशातल्या माझ्या प्रतिबिंबाशेजारी फाजील सलगीने उभी राहिली तरीसुद्धा मला दुजाभाव वाटतोच. अरे बाबा, देवादिकांनीसुद्धा ही खबरदारी वापरलेली आहे! सप्तर्षींच्या तांड्यामध्ये उघड्या आकाशात वयोवृद्ध वसिष्ठाने आपल्या बुढ्ढक सोबतिणीला दाटीवाटीने जवळ बसवून घेण्याचे दुसरे काय कारण असणार? नलराजाने वनवासात दमयंतीची वरात कशाला काढिली असावी? वृद्ध कुंतीला विदुराच्या घरीच ठेवून तरण्याताठ्या द्रौपदीला मात्र बरोबर वागविण्यात पांडवांचा हाच हेतू होता! श्रीरामाने सीतेला रानावनात नेली, आणखी तिथेसुद्धा अशा जरबेत ठेविली, की लक्ष्मणासारख्या सख्ख्या भावाला तिच्या नुसत्या दागिन्यांचीही ओळख नीटशी असू नये! थांब, नीट ऐकून घे! पुढेमागे संसारात पडलास तर हे दाखले तुला उपयोगी पडतील! विष्णूने लक्ष्मीसारख्या चंचल बायकोला अष्टौप्रहर पाय चेपीत बसवून ठेविली आहे; बिछाइतीच्या निमित्ताने शेषासारख्या जातिवंत नागाचा पहारा ठेविला आहे आणि भवताली लांब

शेंडीचा नारद, चार तोंडाचा ब्रह्मदेव, अणकुचीदार चोचीचा गरुड किंवा घोडमुखाचा तुंबर यांसारख्या विद्रूप सोंगांचाच गराडा घातलेला आहे. अरे, भोळा शंकर तर शेजार टाळण्यासाठी मसणातच जाऊन बसला ! तसबिरीतून देवादिकांची बायकांना वामांकी खिळवून बसविण्याची हौससुद्धा शृंगारवृत्तीची नसून सावधपणाचीच असावी! आपल्या आर्यपूर्वजांना सौंदर्याची मुळीच चाड नव्हती!

**कंकण** : या तर्कटाने तुझे डोके फिरले आहे असेच वाटायला लागले आहे मला आता! अरे, चांगली सुंदर बायको कोणाला नकोशी वाटणार?

**सुदाम** : 'भार्या रूपवती शत्रू:!' बायको सुंदर असली, की तिच्याकडे लोकांची नजर वळलीच म्हणून समजावे!

**कंकण** : आणि वेडीबिद्री असली तर आपल्यालाच बघवायचे नाही तिच्याकडे! त्यापेक्षा सुंदर बायको मिळून सारा गाव तिच्याकडे पाहत राहिला तरी चालेल!

**सुदाम** : बाबा रे, कनक आणि कांता, या संसारातल्या दोन अंगांपैकी पहिल्याचे चारचौघांत प्रदर्शन करून दुसरे नेहमी लोकांच्या नजरेआड ठेवण्याचीच शहाण्या लोकांची इच्छा असते? कृपण लोकांनी द्रव्य जमिनीत पुरण्याऐवजी बायकांनाच जिवंतपणी सुरक्षित गाडून ठेवण्याची एखादी युक्ती शोधून काढिली असती तर साऱ्या जगाने त्यांना धन्यवाद दिला असता!

**कंकण** : मग तुझी बायको चांगलीच देखणी असल्यामुळे तू स्वत:ला अगदी फुटक्या नशिबाचा समजत असशील?

**सुदाम** : (नि:श्वास टाकून) ती नुसती रूपवतीच नाही, पण तिच्यात नटवेपणासुद्धा हवा तितका आहे! साडीचोळी नेहमी नीटनेटकी, जरा दागिन्यांची आवड, ही पतिव्रतेची लक्षणेच नव्हेत!

**कंकण** : एवढ्यानेसुद्धा चांगुलपणाला धोका पोचतो का?

**सुदाम** : जरूर; नटवेपणा तर नकोच पण नुसत्या नीटनेटकेपणाने, एवढ्याशा व्यवस्थितपणानेसुद्धा पातिव्रत्याचा नाश होतो. व्यवस्थित पोषाख केलेल्या सुंदर स्त्रीला पाहून ज्याला एकदम पातिव्रत्यभंगाचा संशय येत नाही तो अस्सल आर्यच नव्हे; त्याला आर्यांची संस्कृतीच उमजली नाही! मग नखरेबाजपणाबद्दल बोलायचे तर कारणच नाही!

**कंकण** : हो, नखरा तर केव्हाही वाईटच!

**सुदाम** : वाईट म्हणून काय म्हणतोस! बायकोने केसाला जरा सुवासिक तेल लावले,

की नवऱ्याने डोळ्यात तेल घालून जपणीस बसलेच पाहिजे! कुंकवाचे क्षेत्रफळ कोरून कमी करण्याबरोबर नवऱ्याच्या राज्याचा विस्तारही आटोपशीर होत जातो. कंजुषपणाने रेखून काजळ लावण्यामुळे शिलकीत पडलेली बचत नवऱ्याच्या तोंडाला फासलीच म्हणून समजावे! वाकडा भांग म्हणजे वाकड्या मार्गाच्या अंदाजाची आखणीच! बायकोच्या नजरेत जराशी चलबिचल दिसली, की तिच्याकडे नवऱ्याने सारखी नजर ठेवायलाच हवी! दामिनीच्या ठिकाणी या साऱ्या गोष्टी मूर्तिमंत हजर आहेत असा माझा पूर्ण तर्क आहे.

**कंकण** : असे असेल तर त्यांच्या भोळेपणाबद्दलचा माझा तर्क चुकला म्हणायचा! मला वाटले की तुझी बायको तुझ्या अगदी मुठीत आहे म्हणून!

**सुदाम** : अरे बाबा, झाकली मूठ सव्वा लाखाची ! एवढ्यानेच माझे दुर्दैव कुठे संपले आहे? तिला चांगले गाताही येते या अवलक्षणांच्या भरतीला! आणि गोड गळा म्हणजे पातिव्रत्याची गळचेपीच. 'क्वचित् गाली पतिव्रता!' पाखरातसुद्धा गोड आवाजाची कोकिळा आपली पिले दुसऱ्याच्या घरट्यात निरवून सुरेल उनाडक्या करीत फिरते!

**कंकण** : अरे, अरे, अरे, मग तू अशा बायकोशी एकदम काडी का मोडून देत नाहीस?

**सुदाम** : आपल्या धर्माप्रमाणे संसाराच्या समुद्रात बुडत्याला काडीचासुद्धा आधार मिळण्याची आशा नाही! म्हणूनच तर हा एवढा कडेकोट बंदोबस्त करीत बसलो आहे! पहात आहेसच तू, मी काय काय खटाटोप केला आहे तो! घर मुद्दाम शहराच्या अगदी एका बाजूला घेतले आहे; त्याच्या सभोवार छोटासा खंदक खणून, आतून दगडाचा भुईकोट उभारून दिला आहे. त्यावर काट्याकुट्यांच्या शिबंदीची रचई! आणि भुताखेतांच्या बातम्या पसरून मेलेल्या माणसांचा जागता पहारा खडा केला आहे!

**कंकण** : इतका आटोकाट विभु केल्यावर मग ही बुरख्याची बंदिस्ती आणखी कशाला हवी आहे?

**सुदाम** : असावी; घराचा कोटकिल्ला झुंजता झुंजता पडला तर बुरख्याचा बालेकिल्ला लढवायला हरकत नाही! शिवाय, मी तर घराला एक भुयार आणखी छपरावरून एक चोरदारही पाडून ठेवणार आहे; भुयार तर होतसुद्धा आले!

**कंकण** : मला राहून राहून तुझे सारे बोलणे आठवते आहे. इतके कसे कळते तुला?

**सुदाम** : अरे, या एकाच विषयाची मी इतकी छाननी केली आहे, की पुसायची सोय नाही. रात्रंदिवस शास्त्रीपंडितात बसून पोथ्यापुस्तकांची सारखी पारायणे केली तेव्हा कळू लागले इतके!

**कंकण** : हे झाले हे ठीकच झाले. बाकी मी तुला बायकोची परीक्षा करण्याचा अगदी सोपा आणि अचूक इलाज सांगितला असता! आमचा पडताळा अगदी उघडउघड आहे!

**सुदाम** : तो कोणता?

**कंकण** : हे बघ, माझ्याकडे पाहून मलासुद्धा जी बाई बघणार नाही ती पतिव्रता म्हणून खुशाल समजावे! कधी चूक व्हायची नाही! लाख आडाखे जमलेले आहेत असे!

**सुदाम** : असे म्हणतोस?

**कंकण** : थोराघरचे दाखले आहेत. अरे हो, बरे ओघासच आले; तुला मी एक कामगिरी सांगणार आहे. तेवढ्याकरिता तर मी तुझ्याकडे आलो आहे!

**सुदाम** : काय कामगिरी आहे बुवा?

**कंकण** : ती फार जोखमीची आणि गुप्त कामगिरी आहे; कान कर तुझा इकडे. (त्याच्या कानांत सांगतो.) कबूल आहे तुला ही पहाऱ्याची नोकरी? पाहा, दामिनी तळघरात आणि तू बाहेर पहाऱ्यावर! घरात जपणीला बसतोस तसे तिथे बसायचे!

**सुदाम** : कबूल आहे अशी कामगिरी! पण तळघरातसुद्धा माझी बायको बुरखा काढणार नाही!

**कंकण** : काही हरकत नाही. ठरले तर मग हे?

**सुदाम** : ठरले, पण कंकणा, दामिनीसाठी तर हा सारा चक्रव्यूह नाही ना रचीत वृंदावन?

**कंकण** : भलतेच, फारच संशयी तू! तू आहेस ना तिथेच पहाऱ्याला?

**सुदाम** : बरे; पाहू तर खरे! नोकरी आहे पाहिजे तशीच! हो, तुझे मघाचे ते कसोटीचे बोलणे तसेच राहिले! मला वाटते-आमच्या घरची करितोस का परीक्षा एकदा?

**कंकण** : काय हरकत आहे? तू घराबाहेर जा आणि मी काढतो बोलणे दामिनीबाईजवळ! तेव्हाच त्यांच्या मनाचा ठाव लागेल!

**सुदाम** : दोनचार दिवसांत ठरवून टाकू या हा घाट! मात्र माझा तुझ्यावर सख्ख्या भावाचा विश्वास-

**कंकण** : काय बोलणे आहे हे! तू माझा दोस्त, भाऊ, कलिजा ! तुझ्याशी दगलबाजी?

**सुदाम** : तसा तुझा मला पुरा भरवसा आहे! एकदा हे किल्मिष मनातून कायमचे जाण्याजोगे असले तर त्या शास्त्रीपांडितांशी उरस्फोड करायची टळेल.

**कंकण** : छान आठवण झाली. सुदामा, या शास्त्रीपंडितांकडून प्रेमाचे शास्त्र शिकण्याचा काही रस्ता आहे का रे? किंकिणीजवळ उद्या परवा मला कायशी प्रेमयाचना करायची आहे! तेव्हा काय बोलायचे ते कळेल का ह्या शास्त्रीपंडितांकडून?

**सुदाम** : वः सहज! असा एक विद्वान् पंडित गाठून देतो तुला, की बालक प्रेमशास्त्रांत अज्ञान आहेस तो सज्ञान होऊन तू बृहस्पतिवत् भाषणे करू लागशील!

**कंकण** : अस्से? मग चल आताच! काय असेल ते शिकून घेतो !

**सुदाम** : चल ! (दोघेही जातात.)

## प्रवेश दुसरा

(**स्थळ :** भूपालाची बाग. रात्रीचा दुसरा प्रहर. भूपाल व वसुंधरा. जवळच निजलेला दीनार)

**भूपाल** : पण आजपर्यंत कोणती गोष्ट मी तुला सांगितली नाही, तर ही मोहिमेचीच तेवढी मनात ठेवायची होती?

**वसुंधरा** : मोहिमेच्यासारख्या राजरहस्याचा बायकांजवळ खल करणे काही मुत्सद्दीगिरीला शोभत नाही!

**भूपाल** : पण स्वतःशी तरी त्याचा विचार करायला हवा ना? आणि माझ्याजवळ, तुला अज्ञात असा हृदयाचा अल्पांशसुद्धा राहिलेला नाही. एखाद्या नाटकात माझे चित्र जर कोणी रेखाटले तर नाटकी नियमांना झुगारून देऊन माझी स्वगत भाषणेसुद्धा तुला ऐकू येतील अशी त्या नाटककाराला तरतूद करावी लागेल! नुसत्या रहस्याचीच गोष्ट कशाला? मी युद्धाच्या गर्दीत प्राणांवरच्या संकटांतून अनेक वेळा सुरक्षित बाहेर पडल्यामुळे माझ्या शौर्याची आणि युद्धचातुर्याची स्तुती करणाऱ्या लोकांचेसुद्धा मला हसू येते; माझे प्राण तुझ्याजवळ असतात हे त्या बिचाऱ्यांना काय ठाऊक!

**वसुंधरा** : विश्रांतीचा हा शांत अवकाश तरी आपल्याला निश्चिंत घालविता यावा म्हणूनच मी आपल्या बोलण्याच्या आड आले! किती शांत-रमणीय वेळ आहे ही!

(डोलन मेडे.)

हालत बाते मृदु शांति । ही । भासे हांसे की चंद्रालाके
तनुलकांति ॥ध्रु.॥ दशदिशा पुष्पपरागे दरवळुनि हसत
जणुं असती ॥१॥

**भूपाल** : खरेच! हा शांत वायू, आपल्या बागेतले हे शांत पुष्पसौंदर्य, चतुर्थीच्या पूर्णकल्प

चंद्राची ही किंचित् शांत चंद्रिका, ही सारी एकाकाराने अनुभवीत असताना, विधात्याच्या विश्वकाव्यातला शांतरसाचा सर्ग दृग्गोचर होत आहे असे वाटते! अहाहा! काय ही शोभा!

(वारी निमिरासी.)

दावी निजकांति । वियतीं । शीतलमाया शांत निशापति ॥ध्रु.॥

शांतवैभवा कोमलकिरणा । वितरि तरलतर धवलावरणा ।

दाहि दिशाप्रांती ॥१॥ विविध विरोधी भावांवरतीं ।

पसरी जणुं हा मुनि एकांतीं । ज्ञानमया शांति ॥२॥

चंद्राच्या चांदण्याच्या नाजूक झोतानेच मघाची तारांची बरसात कितीतरी कमी झाली आहे पाहा !

**वसुंधरा** : या कृष्णपक्षातला हा तारकालोप पाहिला म्हणजे मला नेहमी एकच कल्पना आठवते!

(आनपरी दरबार.)

नाचत ना गगनात। नाथा । तारांची बरसात ॥ध्रु.॥

आणित होती। माणिक मोती। वरतुनि राजस रात ॥१॥

नाव उलटली। माव हरपली। चंदेरी दरियात ॥२॥

ती ही । वरची । देवाघरची दौलत लोक पहात ॥३॥

**भूपाल** : सृष्टिसौंदर्याकडे केव्हाही पाहिले तरी देवाघरच्या दौलतीची खैरात त्याच्या उदारपणाची ग्वाही देत असते! आजची आपली परिस्थिति म्हणजे संसारसुखाची सीमाच वाटते!

**वसुंधरा** : चतुर्थीच्या किंचित् अपुऱ्या चंद्राचे हे चांदणे चहूकडे पसरून, भर यौवनाचा पहिला प्रहर उलटल्यामुळे अंमळ मंदावलेल्या प्रेमाच्या प्रशांत प्रभेप्रमाणे शोभत आहे! पूर्णविकच पुष्पांची सुगंधवृष्टी त्यात एकजीवाने मिसळल्यामुळे अपत्यवत्सल हृदयाच्या प्रौढप्रेमात समाधानवृत्तीची भर पडत्याची साक्ष पटत आहे; चांदण्याच्या भराात झाडाझुडपांखाली दडून बसलेल्या या फिकट सावल्यासुद्धा, सुखकालच्या संभाषणातल्या गतदुःखांच्या आठवणींप्रमाणे आनंद देत आहेत; शांतस्वरूप वृक्षलतांवरून सृष्टीच्या वायुमय जीवनलहरी अगदी नाजूक जोराने वाहून नुसत्या कोवळ्या अंकुरांनाच नाचवीत असल्यामुळे, निजसऱ्या बाळाला झोप लागली की नाही हे पाहण्यासाठी आईने पावलाची चाहूल न होऊ देता त्याच्या जवळ जावे, ममतेच्या मोहाने खिळलेल्या नजरेने

त्याला निरखीत राहावे, उष्ण नि:श्वासाच्या स्पर्शाने त्याची झोपमोड होऊनये म्हणून जीवनक्रियाही जपून करावी, आणि त्या मंदनि:श्वासाच्या न कळण्याजोग्या लहरींनी, त्या चिमुकल्याच्या तोंडावर रुळणारा एखाददुसरा केसच भुरभुरत राहावा अशा मनोहर प्रसंगाचे चित्र डोळ्यांसमोर सारखे तरळत आहे!

**भूपाल** : या शोभेपेक्षा, तिने प्रसन्न झालेल्या तुझ्या मन:सौंदर्यानेच मला विशेष आल्हाद होत आहे! हृदयदेवी, या सुखोपभोगाच्या साक्षात्कारामुळे असे खात्रीने वाटते, की कविकल्पना स्वर्गाच्या निर्माणात चुकली नसली तरी अभिलाषात मात्र खास चकली आहे! अशा स्थितीत भूलोकाचा स्वर्गाशी विनिमय करायला कोण प्रवृत्त होईल? आपल्या प्रीतीचा साक्षीदार समोर खेळत आहे; तुझ्या मुखसौंदर्याचा अधरावर स्फुरणारा अमृतनिस्यंद संतुष्ट नेत्रांचा उन्माद वाढवीत आहे. या कारंज्याच्या शीतस्पर्श तुषारांनी गारठल्यामुळे या वयातली अंगांची शिथिल संधिवंधने संकोच पावून, आमच्या तृप्त आलिंगनातही पहिल्या आतुरतेची उत्कट दृढता उत्पन्न होत आहे; देहस्थितीच्या एकतानतेने मनही बालचपल वृत्तींत तरंगत आहे; पुन्हा लाभलेल्या या अल्लडपणाच्या आनंदी भरात, माझ्याकडून नकळत झालेल्या एखाद्या विभ्रमप्रमादाबद्दल तुझी परिचयप्रगल्भतेमुळेच सलज्ज झालेली स्मितदृष्टि अपराधी मनाच्या ओशाळलेल्या शोधक वृत्तीला मात्र दिसण्याइतक्या सूक्ष्म भ्रूभंगाने माझा निषेध करीत आहे; त्या त्या विलासांच्या प्रथम प्रसंगांची स्मृतिचित्रे पाहण्यासाठी दोघेही क्षणैक डोळे मिटून घेत आहो. लाडके, ते डोळे उघडून आता उद्याच्या स्वर्गचित्राकडे पाहा! नंदनवनात माझ्या एकाच अंजलीने अमृतपान करून, अमर कायेने आपण आजच्या प्रसंगाबद्दल आठवणीने बोलत असताना, या सुखासाठी स्वर्गातूनही खाली यावेसे वाटणार नाही का? दिव्य पारिजाताचे एखादे फूल अंगावर पडून आपला प्रणयसमाधी मोडताच आपल्याला या चिमुकल्या निशिगंधाची ताबडतोब आठवण होईल. ते पाहा, आपल्या दीनाराच्या जन्मदिवशी लावलेल्या निशिगंधाच्या रोपाचे ते पहिले फूल आता पुरतेपणी उमलले आहे! थांब, आजच्या भाग्यप्रसंगाची स्मृति स्वर्गात त्याशी संलग्न होण्यासाठी त्या फुलाने- (उठून जाऊ लागतो.)

**वसुंधरा** : (त्याचा हात धरून) नाथ, तिथूनच त्याची शोभा दिसत नाही का? कौतुक करण्यासाठीसुद्धा कोणी दीनाराला माझ्या मांडीवरून उचलून घेतला तरी मला मनापासून राग येतो ! वस्तुनाशावाचून तिच्या सौंदर्याचा उपभोग मनुष्यबुद्धीला का बरे घेता येऊ नये?

(निहाले मानहि.)

विनाश कां सहगामीच सदा भोगसुखाला ॥ध्रु.॥
सुवास वाहत राही । नाश तदा पुष्पाचा ।
विचार हा करि आनंदकालिं खिन्न मनाला ॥१॥

**भूपाल** : हे निशिगंध पुष्प, आपल्या जन्मकालाने दीनाराशी आणि आकारसादृश्याने तुझ्याशी संबंध असल्यामुळे मला द्विगुणित प्रिय झालेले आहे! स्त्रीजातीची पुष्पसृष्टीने गणना करावयाची झाली तर तुझी तुलना मी निशिगंधाने करीन. त्याचा पांढरा शुभ्र साधेपणा तुझ्या ज्ञानगंभीर गौर अंगाशी आणि दरवळणारा नाजूक सुगंध तुझ्या कोमल प्रेमपूराशी सदृश आहे! (त्या फुलाचा दोघेही वास घेतात.) याच्या मनमुराद वासाने हृदय उचंबळून आले आणि बुद्धी धुंदकारल्यासारखी झाली म्हणजे गोड भ्रमात मला वाटायला लागते, की तुझ्या जन्मदिवशी उमलावयाची निशिगंधाची फुले निर्माण करून नंतर त्याच हाताने विधात्याने तुझ्या धवलगंभीर मूर्तीची मूस ओतली असावी !

**वसुंधरा** : आपण फुलांचा वास घेत आहो आणि आपला चिमुकला आकाशातल्या तारांकडे टक लावून पाहत आहे!

**भूपाल** : नुकतेच देवाजवळून आलेल्या निष्पाप बालकाचे स्वभावत:च वरती पाहणारे डोळे आल्या घरच्या ओळखीने तारांकडे पाहतात. पुढे पृथ्वीवर रमलेल्या तरुणांची दृष्टी समांतर असलेल्या पुष्पांशी प्रणयालाप करिते, आणि वाकलेल्या वृद्धांची दृष्टी पातकाच्या परिचयाने ओशाळून खाली दगडाकडे वळते; याप्रमाणे मनुष्याच्या जन्म, जीवित, आणि मरण या तीन अवस्थांची तारा, पुष्प आणि पाषाण ही तीन जडस्वरूप निदर्शनेच आहेत!

**वसुंधरा** : या एवढ्याशा मुलाला तारांकडे पाहून काय वाटत असेल बरे?

**भूपाल** : तारांच्या अज्ञेय अंतरामुळे त्यांच्याकडे पाहताना मुलात आणि मोठ्या मनुष्यात विशेष भेद असत नाही; दोघेही सारख्याच प्रमाणाने भांबावून जातात! ही नक्षत्रे म्हणजे आकाशाच्या उघड्या माळावर तत्त्वज्ञानाची बीजेच परमेश्वराने पेरून ठेविली आहेत. मानवजातीच्या आदिपितरांना पहिल्या अमावास्येच्या रात्री, या चिमुकल्या टिकल्यांनी तेजस्वी आधार दिला असेल! यांच्याच प्रकाशामुळे पहिल्या विचारशील पुरुषाच्या कल्पनेला ऐहिकाला सोडून अपरोक्षाच्या अंधुक प्रदेशात पाऊल टाकण्याचा धीर आला असेल! काळ्या अंधाराच्या पोटी यांना चमकताना पाहिले म्हणजे माझ्या मनात भीतीच्या भावना उत्पन्न होतात आणि चंद्रिकेच्या रसात तारांमागून तारा विरघळताना पाहून मनाला खेद वाटतो; काय असेल ते असो, चांदण्याच्या फिकट तेजाने माझ्या मनात करुणखिन्न कल्पनांचे काहूर जमायला लागते!

**वसुंधरा** : वस्तुमात्राचा पहिल्यांदा हृदयावर दृढ संस्कार होतो त्या काही जी मनोवृत्ति प्रबळ असते तिचीच छाया पुढे त्या त्या वस्तूशी आजन्म संलग्न होऊन बसते ! आपल्या वडिलांच्या अंतकाळी आकाशात पसरलेल्या संध्यारागाशी त्यांच्या मरणनष्ट रक्ताची माझ्या कल्पनेने कायमची मिळणी करून ठेविली आहे. संध्यारागांतील सूर्याची शेवटची प्रभा आपल्या वडिलांच्या अंतिम आशीर्वादातील दयेप्रमाणे मला नेहमी करुणमिश्रित वाटते.

**भूपाल** : अंतरिक्षातील कोणतीही वस्तू मनुष्यबुद्धीला कुंठित केल्यावाचून राहात नाही.

(वैभवे नटल्या.)

गौरवा प्रसरी प्रभूच्या भव्य पट हा नभाचा । जीवकोटि प्रंचुर

भू करि कुंठिता तेविं वाचा ॥ध्रु. ॥ भ्रमति अवकाशांत अणु

हे अलक्ष्यस्वरूपे ॥ पवन त्यातुनि शीघ्र फिरतां नाद चाले

तयाचा ॥१॥ विस्मयाकुल मनुजमतिला तदा भास होई ॥

हुंकृतिध्वनि कोशवासी विश्व करि हाच साचा ॥२॥

प्रतिरात्री काळाच्या अजस्त्र कारखान्यात संध्या आणि उषा यांच्या जरिपदराने झळकणाऱ्या अंबरपटाच्या बुट्टेदार चंद्रकळा परमेश्वर विसाव्यावाचून कशाकरिता बरे काढीत असेल ?

**वसुंधरा** : ज्या महासाध्वींनी पतीच्या देहाबरोबर अग्निशय्येची अखेर शेज रचिली असेल त्यांच्याखेरीज ही निर्वाणीची लेणी दुसऱ्या कोणाला पचणार ?

**भूपाल** : पतिव्रतातील पतिव्रता, परमपुरुषाच्या इच्छेप्रमाणे वागणारी प्रकृतीदेवीच, या अनंत वस्त्रांची स्वामिनी आहे. आपल्या दोघांच्या कल्पनेत किती अंतर आहे पहा! मातृपदाला पोहोचल्याबरोबर स्त्री प्रौढगंभीर होते असे म्हणतात ते खोटे नाही ! माझ्या चंद्रकलेच्या कल्पनेने तुझ्या डोळ्यांसमोर सतीचे उदात्त कल्पनाचित्र दिसू लागले; आणि त्याच वेळी, वस्त्रांच्या उल्लेखावरून मला निराळाच विचार आठवत आहे. त्या पलीकडच्या डोंगरावर पांढऱ्या ढगाच्या पातळ पट्ट्याशी चंद्राची किरणे खेळताना पाहून आपल्या हलक्या हातांनी चंद्रमा भूदेवीच्या स्तनावरील हे सूक्ष्म धवल वस्त्र बाजूला सरकवीत आहे असे मला वाटले. या विशाल वस्तूच्या अनंत संसाराकडे लक्ष दिले म्हणजे त्यांच्या उदरात वावरणाऱ्या आम्हा क्षुद्र प्राण्यांचे जीवन, आमच्या हृदयात भावमात्राने तरंगणाऱ्या विचारांच्या हालचालींइतकेच अमूर्त आकाराचे भासू लागते. संसाराची ही क्षणभंगुरता समाधानकाळीसुद्धा कष्टदायिनी होते. सुखाच्या प्राप्तीने इच्छेची तृप्ती होते पण त्या सुखाच्या अक्षयतेसाठी पुन्हा नवी इच्छा भविष्यत्कालाकडे केविलवाण्या आशेने पाहू लागते. तृप्तीला इच्छेच्या

उत्तरक्रियेचे अमंगल रूप मिळते! एका इच्छेच्या मरणातून दुसरीचे जनन होऊन त्यांची परंपरा आजन्म चालू राहते! म्हणून, वंध्या तुप्तीच्या निराश सुखासाठी-नि:श्रेयसासाठी आमच्या अगाध ज्ञानसागरांची, जीवात्म्याच्या जाणिवेवाचून परमात्मस्वरूपात विलय करून टाकण्याची कल्पना साध्य नसली किंवा सत्यही नसली तरी कल्पना-शक्य मात्र वाटते!

**वसुंधरा** : प्रीतीने दोन भिन्न जीवांचा एकमय जीव झालेला पाहून, भक्तीच्याही उत्कर्षाची ही सीमा, सत्य-आणखी साध्य तरी का वाटू नये?

**भूपाल** : बुद्धीला प्रीतीचे प्रत्यंतर पटते, तशी ईश्वरप्रत्यक्षाची प्रचिती मिळत नाही म्हणून! वाढत्या विचाराच्या हातघाईत, निर्दय बुद्धिवादाच्या आघातांनी प्रेमळ श्रद्धेच्या हृदयाची शतशः शकले होतात! अज्ञेयाच्या भव्य महाद्वाराशी आथडणारी कल्पना, हताश वृत्तीने कपाळमोक्ष करून घ्यावयालाही तयार होते. एकएकदा जिज्ञासाबुद्धी इतक्या आतुर तीव्रतेने बळावते, की मला आत्महत्या करण्याची अनावर प्रवृत्ति होते! ज्ञानपूर्तीविरहित जीवन जड वाटून मरणाबद्दल अनिवार उत्कंठा वाटते!

**वसुंधरा** : अगंबाई, काय हे भलतेच बोलणे? सुखविचारातून काय अभद्र विचार निघाले हे?

**भूपाल** : चेतनापूर्ण जीवनाचे उदात्त मरणात पर्यवसान होते त्याप्रमाणे सुखविचारांचा शेवटही करुणनिराश विषादात झाल्यास ते सरळच आहे.

**वसुंधरा** : आपल्याला असे विचार मी मुळीच करू द्यायची नाही; आपल्या दीनाराची शपथ आहे, आपल्या जीवितावर आपल्यापेक्षा माझा हक्क अधिक आहे ना ?

**भूपाल** : ज्या नाजूक बंधाने तू मला बांधू पाहतेस त्यानेच मी उलट धर्मबंधनांतून मोकळा होत आहे! पुत्ररूपाने पुन्हा अवतरताच, पितरांप्रमाणे पत्नीच्याही ऋणांतून मनुष्याची मुक्तता होते! दीनाराच्या जीवावर माझ्या जीवनाचा नाश करायला मला पुरी मोकळीक नाही का? शिवाय, मरणाबद्दलच्या माझ्या आवडत्या कल्पनेत माझ्या अर्धांगीला मी वगळलेली नाही! गूढाशी झगडून थकलेल्या कल्पनेला वाऱ्यावर मोकळी सोडताच, मरणाच्या एका कल्पनाचित्राकडे मी नेहमी आशाळभूतपणाने पाहू लागतो! पाहा ते चित्र! संध्याकाळ नुक्ताच अतीत झालेला आहे; एखाद्या खाडीच्या काळ्याभोर पाणभुईत, चतुर्दशीच्या चंद्राच्या किरणांचा वावभर रुंदीचा पट्टा तरंगत आहे; अज्ञानजन्य विषादाची शेवटची साक्ष पटविण्यासाठी, चंद्राच्या जरा कलत्या बाजूस, एकच काळसर ढगाचा तुकडा हलत्या नजरेसमोर झुलत आहे! आशेपेक्षाही मनोहर चांदणे, मोडत्या लाटांवर नाचत आहे. आम्ही दोघे एकाच लहानशा होडीत जवळजवळ बसलो

आहो; मानवी प्रयत्नावाचून, नुसत्या वाऱ्याच्या स्वच्छंद हेलकाव्याने आमची होडी त्या चंद्रमार्गावरून जात आहे; दुतर्फा लहान टेकड्यांच्या ओळींवर पसरलेल्या हिरव्या रानवटी, आतल्या काळोखाने आणि भोवतालच्या चांदण्याने अस्पष्ट दिसताहेत; तुझ्या अधरामृताने पावन झालेल्या द्राक्षासवाच्या एकाच पेल्यातला अवशेष पिऊन-

**वसुंधरा** : द्राक्षासव? म्हणजे मद्य पिऊन? -

**भूपाल** : ऐहिक मोहकतेला भुलून मनाला जगाशी चिकटवणारी जाणीव विसरण्यासाठी द्राक्षासवाचा घोट घेतलाच पाहिजे! महाकवीच्या यक्षाच्या दिव्य हाताचा माझ्या मद्याच्या पेल्याला आधार आहे! असल्या उन्मादाखेरीज जगाचा जाणीवपणाने निरोप घ्यायला धीर होणार नाही! त्या निशेच्या गोड धुंदीत, हृदय उसळत्या रक्ताच्या खळखळाटात बुद्धीला बुडवीत असल्यामुळे, तिची बडबड होडीच्या दोहो बाजूस मोडत्या लाटांवर चाललेल्या जलतरंगांच्या मर्मरध्वनीप्रमाणे मधुर वाटत आहे; किंचित् बेसावधपणाने माझा हात गळ्यात पडताना तुझा पदर जरासा अस्ताव्यस्त झालेला आहे; पदर तेवढासा सरकल्याची सुद्धा तुला अंधुक जाणीव आहे, पण बादशाही कैफाच्या अंमली आळसामुळे तो सावरून घेण्याइतकी तत्परता नाही; डोळ्यांच्या पडद्यावर गारवा वाढत जाऊन नकळत पापणीला पाणी लागत आहे! अशा स्थितींत सागरसंगमाच्या सीमारेषेजवळ आपली नौका डळमळत आहे! आणि ही साधी गोष्ट सांगण्यासाठीसुद्धा मी नादाने तुझ्या कानाजवळ तोंड आणीत आहे; मुखस्पर्शाच्या उष्ण चेतनेने तुझ्या देहावर रोमांच थरारून तू आपला केशपाश माझे तोंड चुकविण्यासाठी आपल्या गालावर ठेविला आहे, त्याच्या भिरभिरत्या रुळतीने, माझ्या सर्वांगाला नखशिखान्त गोड झिणझिण्या महिरून टाकीत आहेत; अखेरच्या हालचालीने मी आपले ओठ तुझ्या ओठांशी आणिले आहेत; आपल्या शेवटच्या चुंबनाच्या मुहूर्तावर, सागर नदीमुखाचे पहिले चुंबन घेत आहे; आणि त्या प्रणयतंद्रीत आम्ही डोळे मिटून घेत असता, समुद्राच्या लाटेच्या ओठाची मोठी मुरड पडून आमची होडी तिच्या पोटी गडप होऊन जावी. थंड पाण्याच्या स्नानाने बुद्धीचे कण एकामागून एक सावध होत असताना, शरीराचे अणू भराभर विरत जावे! त्या वेळी होडी अथांग सागराच्या तळाशी जाण्यापूर्वीच्या आम्ही अज्ञेयाच्या मुळाशी जाऊन पोहोचू आणि मरणाच्या मोलाने मिळविलेल्या पूर्ण ज्ञानात रंगून जाऊ! वसुंधरे, यापेक्षा मोहक मरण दुसऱ्या कोणत्याही स्थितीत मिळेल का? निदान मला मरण यायचेच असेल- (पिंगळा ओरडतो.)

**वसुंधरा** : इडापिडा टळो. आणि अमंगल पळो ! मघापासून घाबरल्यासारखे होऊन माझ्या तोंडावर कृष्णनाम घोटाळत होते; या पलीकडच्या झाडावर पिंगळ्यांची

नेहमी किलबिल चाललेली असते! आपण आता असे काही वेडेवाकडे बोलू नये. माणसाने आपले कसे शुभ बोलत असावे! वेळेवेळेचा गुण वेगळाच असतो हो!

**भूपाल** : इतकावेळचे पांडित्य मावळले वाटते? तुझ्या स्त्रीस्वभावाने अखेर वेळ साधलीच!

**वसुंधरा** : असेच म्हणून कसे चालेल? काळवेळेचे आणि शकुनाचे पडताळे थोडे का पटतात?

**भूपाल** : नुसत्या शुभ बोलण्याने-नामोच्चाराने-इच्छित दैवघटना करिता येण्यासारखी असती तर कल्पवृक्षाच्या कल्पनेत अलौकिक असे काहीच राहिले नसते! पक्ष्यांच्या शब्दांनी सूचित संकटे तशाच पोपटपंचीने पळतात, याचे कारण त्या संकटांचा अभाव हेच होय ! देवाभोवती फेऱ्या घातल्याने दैवाच्या फेऱ्यातून सुटका कशी होणार? भविष्याचे अज्ञान हेच सृष्टीच्या संसाराचे सार्वत्रिक सूत्र आहे! मागे गेला तो भूतकाळ, अशी उरफाटी व्याख्या करून मागून येणाऱ्या भविष्यत्कालाला पाहण्यासाठी आपण पुढे दृष्टी लावून बसतो; पण भाविष्यत्काल पाहता येऊ नये म्हणून परमेश्वराने मनुष्याच्या पाठीला डोळे दिले नाहीत. भावी संसाररचना करण्याचे विधात्याचे हक्क आपल्याकडे घेऊन, आम्ही सदिच्छेने आणि भाबड्या आशेने जेव्हा शक्यतेच्या भुसभुशीत वाळूंवर मनाचे मनोरे उभारू लागतो तेव्हा काळपुरुष आमच्या पाठीमागे उभा राहून निर्दय विनोदाने हसत असतो! काळ मुदु हृदयाचा गालीचा तुडवीत येत नसता तर आम्हाला त्याच्या पावलांची चाहूल लागली असती! हृदयातले कल्पनागीत ऐकण्यासाठी कान अंतर्मुख झाल्यामुळे त्याच्या हसण्याचा भेसूर आवाज आम्हाला ऐकू येत नाही! काळाचे हे हजारो डोळे कोणत्या अर्थाने लुकलुकत असतात हे आम्हाला कळेल तर कितीतरी निराशा आधीच टळतील! आमच्या भावी संकटांच्या विचारानेच तर काळ असे डोळे मिचकावीत नसेल ना? ताऱ्यांच्या या चमकीचा अर्थ काय बरे असावा?

**वसुंधरा** : अनंत अंतरावरील तारकांची तरल दृष्टी तर दूरच राहिली, पण हाताशेजारी उभ्या राहिलेल्या वृंदावनांच्या नजरेची चमक काय अर्थाची आहे ती तरी आपल्या भोळ्या मनाला कुठे कळते आहे?

**भूपाल** : इतक्या वर्षांच्या सहवासानंतरसुद्धा वृंदावनाबद्दल तुला शंका यावी हे तारकांच्या दृष्टीपेक्षाही अधिक गूढ आहे. तुझ्या लहानपणापासून तू त्याला पाहत आहे, पण त्याचे वर्तन कधी वावगे दिसले आहे का? नावाजण्याजोग्या गोष्टींना नांवे ठेवल्याखेरीज त्याच्या निंदकांना गत्यंतर नाही!

**वसुंधरा** : मी त्यांची निंदा कशाला करू? त्यांचे गुण कुणालाही दिसण्यासारखे आहेत. पण काय असेल ते असो; जुनाट किल्ल्याच्या दारात उभं राहणाऱ्याला, वरच्या चौकटीतल्या एखाद्या निखळलेल्या दगडाची भीती डोक्यावर सारखी अधांतरी हेलकावत राहते; वृंदावनांकडे पाहताना माझी स्थिती अशीच होत असते! कधी कधी दीनाराला घेताना त्यांच्या तोंडावर इतकी व्यवहारदक्ष सावधगिरी दिसून येते, की त्यांच्या त्या खेळवण्यात कौतुकाची छायासुद्धा भासत नाही! अशा वेळी त्यांच्या डोळ्यांशी डोळा भिडविला म्हणजे ते इतक्या तीव्र दृष्टीने पाहू लागतात, की त्यांच्या डोळ्यांची किरणे खाली पाहिले तरी सर्वांगाला सुईसारखी टोचतात आणि वर पाहिल्यावाचून त्यांच्या चेहेऱ्यावरचा कपटी सावधपणा दिसू लागतो.

**भूपाल** : त्या बिचाऱ्या एकनिष्ठ सेवकाला-अकृत्रिम मित्राला-माझ्या निर्व्याज बंधूला तुझ्याकडून मोठे योग्यच बक्षीस मिळत आहे म्हणायचे! वसु, हा तुझा दुराग्रह दूर होऊन कधीतरी तुला आपल्या संशयवृत्तीमुळे ओशाळल्यासारखे होईल! अहाहा, तो पाहा केवढा मोठा तारा खाळकन् तुटून-

(वसुंधरा भूपालाचे डोळे झाकते व स्वत:चे डोळे मिटून घेते.)

**वसुंधरा** : तारा पडताना त्याकडे पाहू नये म्हणतात; पाहणाराचे आयुष्य कमी होते! माझ्या उरात, का कुणास ठाऊक, एकाएकीच धडकी भरली आहे!

(भूपाल व वसुंधरा डोळे उघडतात. वृंदावन येतो.)

**भूपाल** : वेडी आहेस झाले! कोण वृंदावन? व:! वेळेवर आलास! वसुंधरे, या उल्कापातातूनच हा माझा प्राण घेण्यासाठी खाली आला आहे असे सांगितले तर तेसुद्धा तुला खरे वाटेल!

**वृंदावन** : तूर्त प्रश्न तुझ्या प्राणांचा नसून युवराजांच्या प्राणांचा आहे ! एकांताची अमर्यादा केल्याबद्दल मला क्षमा कर! या घटकेला युवराज प्राणसंकटात आहेत !

**भूपाल** : काय म्हणतोस ?

**वृंदावन** : माझ्या शब्दांची पनुरुक्ति करण्यालाही अवकाश नाही. आपण एकदम गेलो नाही तर युवराज एका अकल्पित कारस्थानाला बळी पडतील!

**भूपाल** : हे कारस्थान बहुतकरून इंद्रनाथानेच आरंभिलेले असावे!

**वृंदावन** : त्या कारस्थानाच्या आरंभापेक्षा, शेवट करण्यासाठी मी घाई करीत आहे!

**भूपाल** : चल, चल मग लौकर! ( भूपाल व वृंदावन जाऊ लागतात.)

**वसुंधरा** : नाथ, मी या सर्व गोष्टींनी इतकी भ्याली आहे की-

**भूपाल** : आपला चिमुकला शिपाई तुझे संरक्षण करील. (जातात.)

## प्रवेश तिसरा

(स्थळ : राजमंदिर. कंकण प्रवेश करितो.)

**कंकण** : वेळात वेळ काढून त्या दोन्ही धड्यांची उजळणी केली पाहिजे. एक वृंदावनांनी सांगितलेले महाराजांजवळचे रडगाणे आणि दुसरा किंकिणीला ऐकविण्यासाठी त्या पंडिताने पढविलेला प्रेमपाठ! दोन्ही वेळी गुडघे मोडायचे आहेत; पवित्रे मात्र जरा निराळे आहेत! हं, हा महाराजांपुढे. दोन्ही गुडघे मोडून, हे प्राणेश्वरी का हे प्राणदात्या? या दोन्ही प्रकारातल्या सारखेपणामुळे थोडा घोटाळा होणारसे दिसते! हे प्राणेश्वरी, हा किंकिणीचा किताब दिसतो, आणि महाराज, हे प्राणदात्या! - पुन्हा म्हणावे एकदा! दोन्ही गुडघे मोडून आणि दोन्ही हात जोडून, हे प्राणेश्वरी किंवा हे प्राणदात्या, माझ्या घोर प्रेमामुळे माझ्या तोंडातून शब्दही निघत नाही! या अपराधाने मी रात्रंदिवस विरहव्याकुळ होऊन आपली करुणा भाकितो! पुन्हा असे अघोर प्रेम केले तर, राजाधिराज, मला आपल्या हृदयमंदिरात स्थळ दे! छे; काही इकडची मंडळी तिकडे घुसल्यासारखी दिसते! हृदयमंदिर वगैरे किंकिणीचे वऱ्हाडी! प्रेमपाठच म्हणून पाहावा बरे! एक गुडघा मोडून, एक हात छातीला लावून, दुसरा समोर नाचवून, हे प्राणेश्वरी किंवा हे प्राणदात्या, पैकी कोणी तरी! छट्! हे जमेलसे दिसत नाही! जिवाचा करावा धडा आणि वेळेवर सुचेल ते द्यावे दडपून! प्रसंग हिंमत देतोच आहे मर्दाला! (जातो.)

## प्रवेश चवथा

(स्थळ : युवराजांचे शयनमंदिर. युवराजाच्या पलंगामागे मच्छरदाणीच्या आड राजा उभा आहे; एका बाजूने भूपाल तलवार उपसून प्रवेश करतो.)

**भूपाल** : (स्वगत) वृंदावनाचा शोध तंतोतंत खरा आहे! मच्छरदाणीच्या आड अस्पष्ट मनुष्याकृती दिसत आहे ती मारेकऱ्याखेरीज कोणाची असणार? इतक्या दुरून पुढे होऊन भागणार नाही! हा मारेकरी कदाचित् स्वत: इंद्रनाथच असला तर जिवावर उदार होऊन तो आधी युवराजावर वार करील! पलीकडच्या बाजूने पलंगाखाली शिरून एकदम त्यावर वार करावा! (जातो व शेवटच्या पडद्यातून निघून सरपटत पलंगाखाली शिरतो; नंतर बाहेर येऊन एकदम युवराजाच्या अंगावरून तलवार पलंगामागील आकृतीवर उगारतो.)

**राजा** : थांब! चांडाळा! एकदम थांब! (युवराज जागा होतो.)

**युवराज** : कोण भूपाल? मंडलेश्वर! (उठून त्याला मुजरा करू लागतो.)

**भूपाल** : कोण प्रत्यक्ष महाराज? (राजा पुढे होतो व वृंदावन प्रवेश करितो.)

**वृंदावन** : कंकणाला मी बाहेरच थोपवून ठेविला आहे! आणि आज्ञा असेल तर त्याला समोर आणतो.

**राजा** : त्याची काही जरूर नाही! भूपालाची कृति इतकी उघड स्वरूपाची आहे, की त्याच्या अपराधासाठी कोणाच्या साक्षीची आवश्यकताच नाही!

**भूपाल** : माझा अपराध? वृंदावन! हा काय प्रकार आहे?

**वृंदावन** : मित्रप्रीतीपेक्षा, स्वार्थापेक्षाही राजभक्तीच अधिक प्रिय वाटल्यामुळे, मी महाराजांच्या पायांजवळ आपले सारे कारस्थान सांगून टाकिले आहे.

**भूपाल** : कसले कारस्थान? वृंदावन, हा काय अर्थाचा अनर्थ होत आहे.

**राजा** : अनर्थ होत नाही; व्हायचा मात्र टळला! तुझ्या भयंकर कारस्थानाची माहिती आम्हा सर्वांनाच झालेली आहे! तुझ्यासारख्या अघोर, विश्वासघातकी राक्षसापेक्षा, इंद्रनाथाचे उघडे वैर कितीतरी उदारपणाचे वाटते! माझ्या लाडक्या बाळाचा घात करून राजपद मिळविण्याची इच्छा! त्याच्या जन्माने झालेली हानी त्याच्या मरणाने भरून काढायची कल्पना! भूपाल, तुम्हा सामान्य लोकांची वस्त्रे अंगावर वेततात, पण राजवस्त्रे कधी कधी जिवावर बेततात हे तुझ्या एका क्षणात प्रत्ययाला येईल!

**वृंदावन** : (राजाचे पाय धरून) महाराजांच्या पायांजवळ माझ्या मित्रासाठी मी दयेची याचना करीत आहे!

**राजा** : त्याची गतसेवा या घोर अपराधामुळे कृत्रिम ठरून अधिकच भयंकर वाटली नसती तर तिच्याकडे पाहून तरी याच्यावर थोडी दया करिता आली असती- आणि याच्यावर दया तरी काय करायची? याचा अपराध इतका अमानुष आहे, की त्याच्या दृष्टीने केलेली दयासुद्धा अत्यंत भयंकर शिक्षेइतकी उग्रच असणार!

**वृंदावन** : रागाच्या भरात महाराजांनी मला दिलेले वचन विसरू नये अशी माझी प्रर्थाना आहे.

**भूपाल** : या अकल्पित प्रकाराने माझे मस्तक इतके सुन्न होऊन गेले आहे, की कोणत्या शब्दांनी सत्य आपल्यापुढे मांडावे हेच सुचत नाही.

**राजा** : अपरोक्ष घडलेली गोष्ट सांगण्यासाठी शब्दांची जरूर असते. प्रत्यक्ष कृती समोर असल्यावर बोलण्याचे कारणच पडत नाही.

**युवराज** : महाराज, माझा बोलण्याचा अधिकार नाही, पण मी खात्रीने सांगतो, की या प्रकारात काहीतरी दगलबाजी आहे. भूपालांच्या सरळ हृदयाची साक्ष मी देतो; माझ्या बोलण्यावर विश्वास ठेवा.

**राजा** : आणि वृंदावनाच्या बोलण्यावर का ठेवू नको? भूपालाच्या कृतीची साक्ष का घेऊ नको? हालचाल करण्यापूर्वी सापालासुद्धा सरळ राहता येते!

**युवराज** : वृंदावनांनीच हे विष आपल्या कानात ओतले असेल तर आपले म्हणणे त्यांनाच लागू करीन.

**राजा** : गळ्यात गळा घालून फिरणाऱ्या मित्राचा सुखासुखी गळा कापण्याचे वृंदावनांना काहीच कारण नव्हते. त्यांचा परस्परांशी निकट सहवास लक्षात घ्या.

**युवराज** : नुसत्या निकट सहवासाने शुद्धभावाची मित्रता सिद्ध होत नाही. चंदनाभोवती सर्पाचा कायमचा विळखा असतो हे त्यांच्या मैत्रीचेच लक्षण म्हणता येईल का? महाराज, विचार करा, माझी खात्री आहे, की हे सारे कारस्थान या वृंदावनाचेच आहे! याच्या बोलण्यावर विश्वास ठेवू नका!

(मन वरीतसे नृपराया.)

भूलुनियां खलजनालापा । जरि दिला ताप निष्पापा ॥
तरि निरयनिरति न दुरापा ॥ध्रु. ॥ या सदर्पा ।
बघुनि सर्पा । तनु सकंपा जातकोपा ॥ नय कुजनिं
उचित जरि घडत न तरि मलिन करि सत्प्रतापा ॥१ ॥

**राजा** : युवराज, आपल्या उपकाराची नसती निंदा आणि आपल्या वडिलांचा उपमर्द करून तुम्ही बालवृत्तीचे उल्लंघन करीत आहात!

**भूपाल** : युवराज, निष्कारण महाराजांच्या रोषाला पात्र होऊ नका! दु:खाचा कडेलोट झाला असताही तुमच्या या तरफदारीमुळे मला नेहमी समाधान वाटत जाईल. सर्वसाक्षी परमेश्वराच्या खालोखाल मी तुम्हालाच मान देत जाईन. मृत्युंजयमहाराज, आपण मात्र माझ्या जीविताचे चांगले सार्थक केले! देवा, आत्मश्लाघेच्या अपराधाची मला क्षमा कर! राजा मृत्युंजया, अरुंधतीच्या राजपदासाठी मला कपटाचा आश्रय करण्याचे काय कारण होते? बनशंकरीच्या शिकारीत, चवताळलेल्या वाघिणीने युवराजांवर अचानक झडप घातली, त्या वेळी त्यांच्यापुढे होऊन जंगलच्या राणीच्या तोंडात मस्तक द्यायला तयार झालो,

तो माझ्या मस्तकावर तुझा राजमुकुट बसण्यासारखा नव्हता म्हणून नाही? वीरवतीच्या रणकंदनात पहिली हौस पुरविण्यासाठी आलेल्या युवराजाच्या रोखाने जेव्हा इंद्रनाथाच्या लोकांनी चाल केली तेव्हा त्यांना पाठीशी घालून मी आपल्या देहाच्या चिंधड्या करून घेतल्या! तुझी जीवावर बेतणारी राजवस्त्रे या देहावर बेताची बसण्याजोगी नव्हती एवढ्यासाठी त्याची तशी दैना करून घेतली का? त्या वेळी तळपणारी ही तलवार आज युवराजाच्या रक्तासाठी हपापून का बाहेर पडली आहे?

**राजा** : नीचा, या वाचाळपणाने आपल्या कृतकर्मावर पांघरूण घालू पाहतोस! तुझी ती दगलबाज तलवार पायांखाली मोडून तिचे तुकडे-

**भूपाल** : हे शब्द उच्चारणाऱ्या दुसऱ्या जिभेचे-हे शब्द पुन्हा उच्चारशील तर राजा, तुझ्या जिभेचे सुद्धा तुकडे झाल्यावाचून रहायचे नाहीत! एखाद्या मूर्खाच्या जिभेप्रमाणे वाटेल त्या वेळी वळवळण्यासाठी ही तलवार कधीही म्यानाबाहेर आली नाही! युवराज, तुमच्या आमच्या पूर्वजांची ही रणदेवता आज मी तुम्हाला देतो. यापुढे मला तिची कधीच जरूर पडणार नाही! आजच्या माझ्या बदलौकिकामुळे मला कोणी विश्वासाने जवळ करणार नाही आणि कृतसेवेचे हे धिंडवडे झालेले पाहून मलाही पुढे कोणाजवळ सेवा करावीशी वाटणार नाही! हिचे नीट जतन करा. (तलवार देतो.)

**युवराज** : तुमचा हा शेवटचा कृपाप्रसाद मी मस्तकी धारण करितो.

(ना छेडो गारि.)

दुर्दैवे हेतु झाला तुम्हां द्याया ताप हा ॥ध्रु. ॥
उपकार आजवरि केला । तो अकालिं विलया गेला ।
अपकारमात्रे याला । स्मरावे आता पहा ॥१ ॥

**राजा** : इंद्रयुधा, हा अधिक प्रसंग होत आहे. या कृपाप्रसादानेच तुझे मस्तक धडावेगळे होणार होते. वृंदावन, या कृतघ्नाला इथून घेऊन चला; नाहीतर याच्या अमर्याद शब्दांनी खवळल्यामुळे माझ्या हातून तुम्हाला दिलेल्या वचनाचा भंग होईल! याला नीट बंदोबस्ताने ठेवा! भूपाल, तळघरात कोंडून ठेवण्यानेच तुझ्यावर मोठी दया केल्यासारखे होणार आहे. अशा निराधार स्थितीत तू जर बाहेर पडलास तर तुझ्या हाताखालच्या लोकांकडूनच तुझा अपमान होईल. पर्वताच्या माथ्यापासून ढकललेल्या कड्याचा मातीला मिळण्यापूर्वीच खालच्या कडेकपारीवर आदळून पार चुराडा होऊन जातो.

**भूपाल** : माझे वैभव मी दुसऱ्याला गैरवाजवी जाणविले नसल्यामुळे माझ्या आपत्तीची

दुसऱ्याकडून मला जाणीव होईल की भीती मला मुळीच वाटत नाही! पण एका अर्थी आपण म्हणता त्याप्रमाणे तळघरातला अंधार मला खरोखरीच उपकारी होणार आहे; जिथे स्वत:चे बोट डोळ्यात घातले तरी दिसावयाचे नाही तिथे दुसऱ्यांनी आपल्याकडे पाहून बोटे केल्याचे कुठून कळणार?

**राजा** : वृंदावन, याच्या घरादाराची तुम्हाला वाटेल ती व्यवस्था करा! इतक्या कपटी आणि कृतघ्न मनुष्याला फारच बंदोबस्ताने संभाळावयाल विसरू नका! युवराज, चला पुढे!

**युवराज** : मंडलेश्वर, मी कोणत्या तोंडाने आपला निरोप घेऊ !

(वरस्लालकि शाब.)

अंतरिं खेद भरे दीनवदन बोलेना । शून्य आलोक, शून्य जग,

शून्य हृदय डोलेना ।। शुभ दर्शन चरणाचे, नच आता म्हणुनि ।

देह हा जड जाहला शोकविकल हालेना ।।१ ।। व्यर्थ जीवित

यावरी, वज्र पडेना का शिरी । हे अपयश आजि या प्राक्तनिं

हत आलेना ।।२ ।।

(भूपालाला वंदन करतो. राजा व युवराज जातात.)

**वृंदावन** : भूपाल, राजाज्ञा ऐकलीस ना? चल आता माझ्याबरोबर!

**भूपाल** : हरहर, साऱ्या मानवी पातकात मी ज्या कृतघ्नतेला अत्यंत घोर समजत आलो, तिचाच आज माझ्यावर आरोप आला; आणि तोसुद्धा माझ्या मित्राच्या कृतघ्नतेमुळेच! परमेश्वरा, माझ्यावरचा नसता कलंक दूर करण्याची मन:स्फूर्ति होईपर्यंत या वृंदावनाला दीर्घायुष्य द्या आणि-

(पापी दादुरवा.)

करा करुणामया क्षमा । विषमा जरि गमे कृति हतकामा

तरि सुखधामा सुपरिणामा ।।ध्रु. ।। क्षणचि हृदय भरतां

विकारी मोदभरे तव कृति न स्वीकरिं । विसरुनि ते;

अघ हे सहाया दे या शमा ।।१ ।।

(जातात.)

## अंक दुसरा समाप्त

# अंक तिसरा
# प्रवेश पहिला

(स्थळ: तळघर. भूपाल प्रविष्ट.)

**भूपाल** : (स्वगत) काय भयंकर काळोख हा !

(मग जैयां हो.)

प्रलयाची जी हतदशा । आली ती का आता ॥ध्रु. ॥

रविकिरणां वाटे भय याया । बघुनियां ऐशा या एकान्ता ॥१ ॥

या तळघराच्या कैदखान्यात शरीराला त्यात मर्यादिलेल्या जीवात्म्याप्रमाणेच कोंडल्यासारखें वाटत आहे. किती भेसूर स्तब्धता ही! उबलेल्या पाकोळ्यांनी वाऱ्याच्या चुकून आलेल्या झुळकीचा गारवा लागताच पंख फडफडविले म्हणजे माझ्या स्वगत विचारांच्या हालचालीनेसुद्धा रागावलेली स्तब्धताच मला गप्प राहायला सांगत आहेशी वाटते. कोपऱ्याकोपऱ्यात कोंदटलेला काळोख जणू काय एवढ्याशा जागेत कसाबसा सामावण्याचा प्रयत्न करीत आहे. या झरोक्याच्या फटीतून दिसणारी एकच तारका काय ती तेजाची साक्ष देत आहे. खरे म्हटले तर, जीवकोटीच्या हिशेबात एक जीवाच्या वाट्याला एक तारा थोडी झाली का! पण तीसुद्धा डोळे चिमकावून माझ्या अगतिक स्थितीचा उपहास करीत आहे! तेजस्वी बाले, चार भिंतींच्या कोंडवाड्याबाहेर मला जाता येत नाही म्हणून का मला हसत आहेस ? वेडे, अवाढव्य आकाशाच्या मैदानातही तुला तरी आखलेल्या रेषामात्र मार्गापासून जरासे इकडे तिकडे सरकता येते आहे का! मग हसायचे कारण कुठे उरले! टीचभर जागेत कोंबलेला भूपाल काय आणि अनंत अंतराळात खिळलेली तारका काय-पूर्वसंचिताने दोघांनाही सारखेच जखडून ठेविलेले आहे !

(आज अंजन दियो.)

भारसंचय महा नियमि चंचलपदा ॥ जातमात्रास या
कर्मबंधापदा ॥ध्रु. ॥ शकटभर जड यथा महोक्षहि
वाहतां ॥ सुटत ना कष्टतां । चक्रपद्धति कदा ॥१ ॥ पुर्वकृत
संचिता । जीव हा ओढिता॥ नियंतिरेखांकिता । मात्र
गति तापदा ॥२ ॥

अरेरे, माझ्या कर्मगतीचा रोख कोणीकडे आहे हे मला कळेल का? डोळे फाडून या काळोखाकडे कल्पांतापर्यंत पहात बसले तरी भविष्यत्कालाची पुसटसुद्धा

पावले दिसण्याचा संभव नाही. बुद्धीचे बंध तोडून जीवापासून सोडविलेल्या नुसत्या विलग डोळ्यांनी असेच पाहात बसणे भाग आहे. (वृंदावन प्रवेश करतो.)

**वृंदावन** : (स्वगत) पापाबरोबर भित्रेपणाही वाढत जातो! तळघरातल्या अंधुक उजेडातसुद्धा भूपालाला तोंड दाखवायची शरम वाटल्यामुळे ही संध्याकाळची वेळ साधावी लागली! त्याच्या निर्दोष हृदयाचा तळतळाट कल्पनेने आठवला म्हणजे माझी राक्षसी इच्छा शब्दांनी त्याच्यापुढे उभी रहावयाला धजत नाही; आणि त्याला सांगितल्याखेरीज तर इलाज नाही! दीनारचा घात करण्याची भीती घातली तर वसुंधरा कदाचित् गांगरणार नाही! अखेरीस भूपालाचा प्राणनाश करण्याचे साधनच पुढे करावे लागेल! आजची ही गोष्ट याला कळली म्हणजे पहिल्या धक्क्याने उसळलेले रक्त विचाराने थंडावून; याचे तत्त्वज्ञानी हृदय प्राणांचे मोल ठरविण्याच्या नादाला लागेल! पण माझी ही इच्छा इतकी पापपूर्ण नसली तर चालणार नाही का? वसुंधरेने माझ्या गळ्यात नुसता हार घातला तर माझे समाधान का होऊ नये ? भूपालाची जागा एक क्षणभर मिळाली तर संकेताने माझी सूडाची कल्पना खात्रीने शांत होईल! पण खात्रीने होईल का? चाललो मी विचाराच्या पुरत्या पकडीत! बस्, आताचा हा संकल्प वावगा तर नाहीच, पण अवश्य आहे! त्याच्या मृदुपणामुळे मला भूपालाशी बोलण्याचा धीर येत आहे! (उघड) भूपाल!

**भूपाल** : कोण, वृंदावन? सांग, वृंदावन, सांग लौकर, कोणत्या लाभाच्या आशेने तू स्वत:चा असा सत्यानाश करून घेत आहे?

(उदतन दतन.)

अघटित कृतिसि करिसि कां ॥ध्रु.॥ या पापाते कवण
अशी महती आशा वद करवी जाळि अंतरंग जे तदुपरि
आत्मनाश चिरंतनचि करि सुकृतलव नुरवि ॥१॥

**वृंदावन** : (स्वगत) शब्दाला शब्द वाढवीत बसून उपयोगी नाही!

**भूपाल** : वृंदावन, बोलत का नाहीस? अशी कोणती वस्तु तूला दुर्मीळ वाटली, की जिच्यासाठी कपटाचा आश्रय करून, जिवलग मित्राशी विश्वासघात करावा लागला?

**वृंदावन** : अशी वस्तु एकही नसेल का? प्रथम तू आपल्या मित्रभावात स्वार्थवृत्तीने वागलास! भूपाल, माझ्या मित्रस्नेहात कुठे तरी अंतर पडले होते का? रात्रीचा दिवस करून तुझ्या सुखासाठी झटताना मी मागे पुढे पाहिले का ?

**भूपाल** : म्हणून आता माझ्याभोवती अशी दिवसाची रात्र करताना मागेपुढे पाहत नाहीस वाटते! तुझ्या निस्सीम स्नेहाशी मी कधी द्रोह केला? माझ्या सुखदु:खांचा वाटेकरी तू कोणत्या वेळी नव्हतास? माझ्या हृदयाच्या सिंहासनावर तुला बसविले नव्हते का?

**वृंदावन** : त्या हृदयात मला जागा मिळाल्यामुळेच मला कळले, की मला आपल्या सुखदु:खांचा खराखुरा वाटेकरी तू मुळीच समजत नाहीस. रणांगणात तुझ्या दु:खांचा वाटाच मला देऊन, आपल्या सुखाची वस्तु मात्र तू हृदयात दडवून ठेविलीस! त्या हृदयस्थ वस्तूच्या सुखापासून तू मला दूर ठेविलेस!

**भूपाल** : अशी कोणती वस्तू ती ? सांग. या क्षणी ती तुला देऊन टाकतो!

**वृंदावन** : तुझ्या हृदयातली वसुंधरेची मूर्ती! ती मला पाहिजे, समजलास?

**भूपाल** : वृंदावन, काय बोललास हे! त्या दिव्यमूर्तीसह माझ्या हृदयाचा पार चुराडा केलास! माझ्या शरीराचे सांधेही निखळून, मोडून टाकिलेस!

**वृंदावन** : तुझ्या हृदयाचा चुराडा झाला हे ठीक झाले! माझ्या पुढच्या सांगण्याने त्याला अधिक धक्का बसण्याची आता भीती नाही!

**भूपाल** : कोणत्या अघोर निर्लज्जपणाने हे बोलण्याचा तुला आता धीर होत आहे? कपटी राक्षसा, मित्रपत्नी म्हणजे साक्षात् मातेसारखी आणि-

**वृंदावन** : (एकदम खवळून) कोण कुणाचा मित्र! वसुंधरेच्या बापाचे ते शब्द ऐकूनही, माझे तिच्या नवऱ्याशी मित्रभावाने वागणे तिच्या लहानशा पोरालासुद्धा खरे वाटणार नाही! त्या उन्मत्त थेरड्याने प्रत्यक्ष माझ्या मातेबद्दल- त्या शब्दांचा मी आज उच्चार करीत नाही, अजून केला नाही-भ्रष्ट झालेल्या वसुंधरेच्या वर्णनाच्या वेळी ते मी वापरणार आहे. तेवढ्यासाठी मी तुझ्याशी स्नेह केला! माझे आताचे आचरण कपटाचे नसून मागची मित्रता मात्र कपटाची होती! सावजावर झडप घालण्यापूर्वी अचूक टिपण साधण्यासाठी संधी पाहणाऱ्या वाघाची ती क्रूर समाधी होती!

**भूपाल** : तुझ्या पातकाच्या काळ्याकुट्ट राशीमुळे, तुलनेने हा काळोख धवळून, तुझे भयंकर स्वरूप मला स्पष्टपणे दिसत आहे !

**वृंदावन** : थांब, त्यापेक्षाही भयंकर भविष्य तुझ्याकडे धावून येत आहे त्याकडे पाहा!

**भूपाल** : आता भविष्य नको आणि काही नको! वृंदावन, माझ्या मनोवृत्ति गहिरून, मरून गेल्या! पत्नी आणि मित्र हीच संसारातील मुख्य जीवबंधने! त्यांपैकी एक आपण तुटून दुसऱ्याला तोडीत आहे! वृंदावन, माझ्यावर एक अनुग्रह

कर.

(नेवर बाजोरे.)

घे प्राण हा क्षणी। या क्षणी । स्मरुनि स्नेहभावा उरत न तो जरि ।
क्षण गत एक तरी । स्मरणीं आणी ॥ध्रु.॥
मरण आजि मज प्राणदानसे । विश्व सकल हे फिरले भासे ।
ताप हृदयातरीचा शतविध पीडितसे ॥मानी॥१॥

यावेळी माझा प्राण घेशील तर मी तुझे उपकार आमरण विसरणार नाही!

**वृंदावन** : वः, उपकाराची पूर्णता होण्यापूर्वीच तुझी कृतज्ञता नाहीशी होणार! ठीक आहे; तुझ्या विनंतीचा मी अमानुषपणाने अनादर करीत नाही. उद्या वसुंधरेने माझ्या गळ्यात-माझ्या-माझ्या सांगण्याचा धिक्कार केला तर आधी दीनाराचा बळी घेईन! तेवढ्याने तिचे डोळे उघडले नाहीत तर तुला आपले डोळे मिटण्याचा प्रसंग येणार आहे! तिच्या पातिव्रत्याचा किंवा तुझ्या प्राणाचा तरी नाश केल्यावाचून मी राहणार नाही! तिने माझी विनंती अमान्य केली म्हणजे मी तुझी आताची विनंती मान्य करीन! आजची रात्र चांगली झोप घे. उद्या शांत मनाने या गोष्टीचा नीट विचार करून ठेव! चार दिवसांचा तुला विचारासाठी अवधी ठेवितो !

**भूपाल** : झोप घेऊन तरी आता काय विश्रांती मिळणार? झोपेत याच गोष्टीची, पण बेताल स्वप्ने पडून मन:स्थिती अधिकच व्याकुळ होईल! त्यापेक्षा सत्यसृष्टीच्या यातनाच काय वाईट? आणि चार दिवसांनी तरी काय होणार? क्रियाभेद नाहीसा झाल्यामुळे या काळोखाप्रमाणे काळाला अघोर एकरूपता आली आहे. तीच एकरूपता माझ्या विचारांचीही! जा! तुझ्या विचारशक्तीला तुझ्या शब्दांकडे कधीही पाहवणार नाही. हेच माझे एकरूप उत्तर !

(पडदा पडतो.)

## प्रवेश दुसरा

(नूपुर प्रवेश करितो.)

**नूपुर** : (स्वगत) हा तर्क चुकणे संभवतच नाही मुळी! सुदामाने सांगितलेली हकिकत किंकिणीला आपल्या तर्कासह जरा चढवून सांगावी, म्हणजे कंकणाचा त्या गोष्टीशी संबंध असल्यामुळे तिच्या मनात त्याच्याविषयी किल्मिष उत्पन्न झाल्याखेरीज राहणार नाही! सुदामाने सहजगत्या म्हणून सांगितलेली भानगड

माझ्या इतक्या जिव्हाळ्याची आहे हे त्याला मुळीच ठाऊक नाही! महाराजांचा एवढा राग झाला तरी वृंदावनांनी भूपालांचे प्राण वाचविण्यासाठी रदबदली केली; त्यांना आपल्या ताब्यात घेऊन तळघरात कोंडले; शिवाय, वसुंधरेलाही दुसऱ्या तळघरात कोंबले; सुदामाने सांगितलेले हे गुपित खरे असले-आहेच बहुतेक- तर या सर्व गोष्टींपासून एकच सिद्धांत निघतो, की वृंदावनाची वसुंधरेबद्दल खटपट चाललेली आहे. नाही तर, वृंदावनाने भूपालाचा जीव वाचवीत बसण्याचा कशाशीही नीट संदर्भ जुळत नाही मुळी! वसुंधरेवर छाप बसविण्याकरिताच वृंदावनाचा हा सारा खटाटोप असला पाहिजे. कंकण या कारस्थानात आहे हे ठीक झाले. असल्या बदमाषपणात कंकण वावरत असल्याचे किंकिणीला खुलवून सांगितले, की त्याच्याबद्दल तिच्या मनात खास नावड वाटायला लागेल. शिवाय, आता प्रेमयाचनेतही कंकणाची बरीच त्रेधा उडणार आहे? या शास्त्रोक्त प्रकारात रूपवर्णन करण्यासाठी पंडिताकडून त्याने काव्यसामग्री जमविली आहे, आणि निरनिराळ्या अंगांना देण्याच्या उपमा ओळीने आठवण्यासाठी चित्रांचे कपटे अनुक्रमाने जुळवून आणिले आहेत, ही खबरही सुदामाने दिली म्हणून बरे झाले! येता येता त्याला गाठून ती चित्रे पाहताना गफलतीने त्याच्या अनुक्रमात गडबड करून ठेवल्यामुळे तो नखापासून केसापर्यंत किंकिणीचे वर्णन करू लागताच खूप घोटाळा उडेल आणि त्याचा मूर्खपणा तिच्या ध्यानात येईल ! इथपर्यंत खासे यश येत चालले आहे! दामिनीची आणि त्या संन्याशी सत्पुरुषाची काय भानगड आहे हे अजून नीटसे कळत नाही ! तिने दोनचारदां त्याच्या गाठी घेतल्याचे समजले; पण त्या कशासाठी? तसेच, हा सुदाम तिचा कोणी नातलग आहे की काय? का नवराच आहे तिचा? थट्टेने मी त्याला सुदाम म्हणता म्हणता खराच सुदाम ठरायचा हा एखादे वळी! तूर्त तर्कवितर्क करायला वेळ नाही! कंकण किंकिणीकडे आधी जाऊन पोचावयाचा नाही तर! हा समारंभ एकदा उरकला म्हणजे तिला तेवढे वृंदावनाचे रहस्य एकटीला सांगितले पाहिजे!

(जातो.)

## प्रवेश तिसरा

(स्थळ : किंकिणीचे घर. वीणा घेऊन बसलेली किंकिणी प्रविष्ट)

**किंकिणी** : (स्वगत) अशी वीणा घेऊन सरस्वतीसारखी बसलेलीच बरी का चित्रातल्या कौसल्येसारखी मनगटावर पोपट घेऊन बसू? पण आयत्या वेळी पोपट कुठला

मिळायला? मग राजासारखी वीरासन घालून नुसते फूलच घेऊ असे हातात? ते मेले जरा आडदांडासारखे दिसेल! अशी पडून, पंख्याने वारा घेत राहिले तर? पण अशा थाटाला पंखा वारायला रिद्धिसिद्धीसारख्या दोन बाजूला दोन दासी हव्या! वृंदावन बघायला आले तेव्हा कालिंदीबाईसाहेब कशा बसल्या असतील कुणास ठाऊक! अलीकडे तर नेहमी मूल मांडीवर घेऊनच बसलेल्या असतात; आता लग्नाआधी मी कुठले आणू मूल? बरी आहे ही वीणाच झाले! साजसोगामध्ये काही तीळ उणा नाही; कालिंदीबाईसारखा हा गालावर तीळ नव्हता तो सुद्धा रेखाटला ! अगंबाई, हे दोघेही आले दोन्ही बाजूंनी! आता काय करू? वीणा वाजविताही येत नाही! तारा जमविण्याचे सोंग करावे झाले आता! (कंकण व नूपुर येतात.)

**कंकण** : (स्वगत) येताना लगबगीत हा एक कपटा खाली पडला; हा वरचा की तळचा? जुळणी थोडी मोडणारसे वाटते! फिकीर नाही, वरच ठेवावा झाले! आधी तिच्या रूपाचे वर्णन करायचे आणि मग त्या रूपाने आपण कसे बेदिल झालो आहो हे सांगावयाचे, झाले! रूपवर्णनाला सुरुवात नखापासून करायची!

**नूपुर** : त्या वीणापेक्षा गोड आवाजाचा एखादा शब्द ऐकायला मिळेल का?

**कंकण** : हा, असा लघळपणा करायचा नाही आता!

**नूपुर** : हे बेताल गाणे नको होते मला! असा आग लागल्यासारखा काय ओरडतोस?

**किंकिणी** : असे आरडूओरडू नका बाई! कालिंदीबाई म्हणतात प्रेमाच्या नुसत्या कानगोष्टी असाव्यात; अन् तुमच्या तर या डंकानौबती झडताहेत!

(तोसे लागी नजरिया.)

कधिं वदे प्रणय का । कठोर बिकटहि वचना ।
रुचतसे तया मृदुरचना ।। ध्वनि तिथे कलह तो माना ।।ध्रु. ।।
कळे न वळे न कुणासि जे । वच असेहि वदता लाजे ।
कुलीन त्याप्रति जग समजे । पतित इतर जन मनी गणाना ।।१ ।।

**नूपुर** : बरे, एकदम कार्याला सुरवात करू ! कंकणा, वडिलकीचा मान तुझा, हो पुढे आणि आपले प्रेम प्रकट कर.

**कंकण** : किंकिणी, ऐक आता! हे प्राणेश्वरी, तुझ्या रूपाचे वर्णन कोणाला करिता येईल? हजार जिभांचा ब्रह्मदेव, चार तोंडांचा शेष-(जरा आठवून) आणखी एक कोणसा, हे सारे थकून जातील !

**नूपुर** : लागली शिदोरी सुटायला!

**कंकण** : हे सुंदरी, तुझी नखे भुंग्यासारखी आहेत!

**किंकिणी** : म्हणजे काळी की काय?

**नूपुर** : पदकमलांभोवती ही भ्रमरांची गर्दी असावयाचीच!

**कंकण** : तुझे चरण पोवळ्याप्रमाणे आहेत; ऊरू कमलाप्रमाणे आहेत; तुझी गती कदलीस्तंभाप्रमाणे आहे!

**नूपुर** : म्हणजे एका जागी खिळलेली! पुढे?

**कंकण** : तुझी कंबर हत्तीसारखी आहे! तुझी छाती सिंहासारखी शोभते आहे!

**नूपुर** : आज सुंदर स्त्रीला शृंगाराऐवजी वीररसातच बुचकळून काढण्याची तुझी तयारी दिसते!

**किंकिणी** : तुम्ही मध्ये थांबवू नका त्यांना.

**कंकण** : तुझे हात घटासारखे आहेत!

**नूपुर** : हे अगदी रास्त आहे! हातांचा घागरीशी संबंध काव्यात मान्य नसला तरी व्यवहारात तंतोतंत पटलाच पाहिजे! (स्वगत) हा एकच अनुक्रम चुकल्यासारखा दिसतो; मी घोटाळा केला होता त्याचे काय झाले? (उघड)हं, हात घागरीसारखे-

**कंकण** : घटासारखे ! तुझा कंठ कमलनालाप्रमाणे-

**किंकिणी** : म्हणजे कमळाच्या देठाप्रमाणे?

**नूपुर** : हं; पुढे. मुखकमळाला या देठाचा आधार लागणारच! कंकणा, चालू दे; कंठानंतर आवाज! स्वर!

**कंकण** : तुझा आवाज शंखासारखा आहे; ओठांची शोभा कोकिळेप्रमाणे आहे!

**किंकिणी** : (हसून) अगदी काळेकुळकुळीत ना?

**नूपुर** : ओठांच्या कोकिळा झाल्या म्हणजे त्यांची या दाढीमिशांच्या जंगलात घरटी बांधायची मुबलक सोय झाली!

**कंकण** : दंतांची मजा धनुष्याप्रमाणे; नाक गुलाबासारखे; गाल कुंदकळ्यांसारखे; तुझे डोळे पिकलेल्या तोंडल्यासारख आहेत ! तुझं कपाळ हरिणासारखे आहे !

**नूपुर** : शिंगांसकट? ही शिंगे तुझ्या डोक्यावर जायची? (स्वगत) आणि कपाळाचा अर्धचंद्र आता केसांना मिळणार की काय? लग्न ठरण्याच्या गडबडीत या वैधव्याच्या अलंकाराचा हा शुभ्र आहेरच म्हणावयाचा! (उघड) कंकणा, आता

पुरे! तिच्या रूपाचे वर्णन झाले! आता पुढे काय म्हणणे आहे?

**कंकण** : मला हिणवू नकोस असा! किंकिणी, मी आहे आपला शिपाईगडी! बोलण्यात मी तितका वाकबगार नाही! माझे तुझ्यावर प्रेम आहे खरे! तुझ्या रूपाच्या शिकारखान्यातली जनावरे इकडची तिकडे झाली असतील किंवा बगीच्यातल्या वेलींची नीट मांडणी झाली नसेल तर त्याबद्दल मला माफ कर! जिभेचा पट्टा चालवून तुझे हृदय कसे जिंकावे हे मला माहीत नाही! तेच त्याच्यावर तलवारीचे पट्टे फिरवायला सांग, तू हूं म्हणण्यापूर्वी तुझ्या हृदयाचे राईराईएवढे तुकडे करून देतो!

**नूपुर** : किंकिणी, हो म्हण; प्रेमाच्या हृद्रोगावर हे राईचे रोगण ठीक आहे!

**किंकिणी** : नुपूर, त्यांच्याबद्दल नका बोलू तुम्ही! तुमच्याबद्दल काय सांगायचे असेल ते सांगा पाहू!

**नूपुर** : ठीक आहे! हे चारु गात्री, तुझ्या ललित-ललित-मधु-मधुर-रूप-सौंदर्याने या दासानुदासाचे मृदु-मृदुल-हृदयांदोलन होऊन कोमलसरसलीला-विलासांनी जगदरविंद सुगंधमकरंदरसनिमग्न झाले आहे ! हे कंबुकंठि, ललना-ललामभुतलतिकावलि-मृदुलदलदलितहृदये, मला प्रेमाने ब्रह्मांड आठवतो, ब्रह्मांड प्रेमसोल्लसितहसित-वृत्तिशून्य झाले, प्रेमाचे ब्रह्मांड विलसून ब्रह्मांडाचे प्रेम झाले!

**किंकिणी** : ब्रह्म-घोटाळा म्हणतात तो हाच वाटते ?

**कंकण** : आपल्याला एक अक्षर सुद्धा उमगले असेल तर शपथ!

**नूपुर** : दोस्त, मी सुद्धा आपल्यावर प्रेम करीत असेन तर शपथ

**किंकिणी** : मला तरी कुठे कळले काय बोलला ते?

**नूपुर** : हे चंद्रिकाधवलतनुकलतिके, हे काव्य आहे; काव्याचा अर्थ कळल्यावर कवीची काय मातब्बरी राहिली बरे? महाकवींनी वापरलेले कोवळे कोवळे संस्कृत शब्द, योजनयोजन लांबीचे समास एकमेकांत कालवले, की झाले काव्य! हा कविसांप्रदाय आहे! आणि काव्याच्या पोटीच प्रेम असते! तात्पर्य, असले संस्कृत, प्रौढ प्रेम आहे माझे!

**किंकिणी** : मला नको हा भारदस्त भडिमार! त्यापेक्षा कंकणांचे चुकलेमाकले प्रेमच पुरवले! कंकण, प्राणेश्वरा, माझे तुमच्यावर एका क्षणात अनिवार प्रेम बसू पाहत आहे; जीवितेश्वरा, या दासीला सांभाळून घ्या!

(छांडो छांडोजी.)

सदा हृदयीं या रंगे । तरंगे । प्रसन्नअंतरगे । कदा न भाव
भंगे ॥ध्रु.॥ मूर्तिसुंदरा । मदनमदहरा । गुणां । नटवि
नरवरा । कुणी । भुलवि न मधुरा । प्रणयरागे ॥१॥ प्रेम-
विव्हला । हतबल अबला । प्रिया । शरण पदतला । प्रिया ।
हृदयिं द्या स्थला । न तरि भागे ॥२॥
कंकण, तुमच्याशी लग्न करायचे-

**नूपुर** : हा किंकिणी, मला दूर कर वाटेल तर, पण त्याला इतक्यात वचन देऊन फसू नकोस! तुला निर्दोष नवरा पाहिजे ना? मला नुक्तीच त्याच्याबद्दल एक बातमी लागली आहे! तुझी खात्री करून देतो, की हा चांगला माणूस नाही म्हणून. याला जायला सांग, म्हणजे सांगतो एकटीजवळ. मग तुलाच वाटेल की, याच्याशी दोन हातांचे चार हात करण्यापेक्षा याच्यापासून दोन हात दूर राहिलेलेच बरे!

**किंकिणी** : असे का? मग कंकण, तुम्ही मला उद्या भेटा; हे काय सांगतात ते ऐकून घेते आणि मग तुम्हाला काय सांगायचे ते सांगेन! हं, आता थांबू नका! माझी प्रत्येक आज्ञा मान्य करणार ना तुम्ही?

**कंकण** : ठीक आहे, हा चाललो!

**किंकिणी** : चला नूपुर, आपण आत जाऊ. (सर्व जातात.)

## प्रवेश चवथा

(ईश्वर प्रवेश करतो.)

**ईश्वर** : (स्वगत) वृंदावनाच्या तीव्र मनोवृत्ती शेवटी अशा रीतीने उचंबळून बाहेर आल्या! याच वेळी मला इथे आणण्यात देवाचा काही तरी हेतू आहे असे आता म्हणावेसे वाटते! दामिनीने किमयेची भलतीच कल्पना चालवून माझ्यावर देवाइतका विश्वास टाकल्यामुळे माझ्या विचाराला एकदम खोटे म्हणता येण्यासारखे नाही. नाही तर दामिनीचा माझ्यावरचा विश्वास, सुदामाच्या तिच्यावरील अविश्वासापेक्षाही निष्कारण आहे! काही असो; चालू भानगडीचा शेवट होईपर्यंत मला दामिनीच्या सहाय्याची अपेक्षा लागेल. या निर्दोष असत्याचरणाच्या प्रायश्चित्तादाखल तिच्या मनाप्रमाणे तिला दागिन्यांचा एक साज दिला म्हणजे झाले!

(जातो.)

## प्रवेश पाचवा

(स्थळ : वृंदावनाचा दिवाणखाना. कालिंदी प्रविष्ट.)

**कालिंदी** : (स्वगत)

(सुखविति किती.)

अतिशय छळी दीन मनासि का। तापद असा हा विचार ॥ध्रु.॥

विषमय गमे का हृदयाहि या संतत सुखाचा विहार ॥१॥

किंकिणीने सांगितलेले खरे असेल का? छेः, असे भलतेच कसे होईल माणसाच्या बोलण्यात आणि वागण्यात इतके अंतर असेलसे वाटत नाही! त्यांच्याबद्दल सांगीवांगीवरून असा विकल्प बाळगणे सुद्धा पापच आहे! समक्षासमक्ष विचारून पाहू का तिकडे? इतका होईल माझा धीर? पण अशा वेळी धिटाईने वागायचे नाही, तर मग वागायचे तरी केव्हा? माझ्या विचारण्याने तिकडे राग आला तर? आणि काही असले तरी तिकडे माझे विचारणे खचित रुचणार नाही! खरे असले तरी-खोटे असले तरी-देवा, या वेळी मला कोण बुद्धी देणार? (वृंदावन येतो.)

**कालिंदी** : (उठून दूर जाऊन उभी राहते. स्वगत) या हसतमुखावर संशयाला मुळी सुद्धा जागा राहत नाही!

**वृंदावन** : त्या दिवशी मनमोकळेपणाने बोलण्याचे वचन दिल्यावरही आज अबोलाच पुन्हा? आज मी पहिल्या शब्दाची वाट पाहणार आहे! पुरुषांना बायकांसारखा हट्ट करणे काही कठीण नाही (काही वेळ थांबून) माझ्या इतक्या शब्दांचे एका शब्दाइतकेही मोल नाही वाटते? कालिंदी, चराचर सृष्टी स्त्रियांच्या कृपाप्रसादासाठी तपश्चर्या करीत असते; पण स्त्रिया मात्र कटाक्षाकटाक्षाची किंमत वसूल करून घेण्याइतक्या दुराराध्य असतात. पुरुषांची गोष्ट दूरच राहो, पण अचेतन जगावर सुद्धा स्त्रियांची सत्ता चालते; नंदनवनातल्या पारिजातावर स्त्रियांनी चूळ टाकिली म्हणजे ताबडतोब त्याची कळी उमलते; बिचारा अशोक तर नुसत्या लत्ताप्रहारानेही फुलून जातो; मग मला आपला हट्ट सोडून बोलावे लागते यात काय नवल? कारण-

**कालिंदी** : कारण नको ते. एखाद्याला बोलायला शिकायचे असेल तर आमच्या इथे येऊन बसावे त्याने! किती चांगले बोलायचे झाले आता!-

(रंग उडावतले.)

रंग अहा भरला । सुबक भला । नाचत चंचल हा वरवरला ॥ध्रु. ॥

भुलवुनि खुलवुनि हासत खेळत । भारुनि केले गुंग जिवाला ॥१ ॥

हसवी फसवी नटवी माया । शोभत बाई ज्याची त्याला ॥२ ॥

बांधुनि नजरा जादूगारा। दाखविता हा खेळ कुणाला ॥३ ॥

**वृंदावन** : तुम्हां हरिणाक्षींच्या सौंदर्यसिद्धीसाठी निर्दोष मृगबालकांना मारणाऱ्या विधात्याच्या हाताला लागलेल्या रक्तरंगाप्रमाणे, त्याच्या डोळ्यातली वधकर्माची क्रूरताही तुमच्या डोळ्यात उतरते असे मला वाटते!

**कालिंदी** : ते काहीही असेल मेले; पण डोळे मृगाचे असतात एवढे बरीक खरे; एरवी पुरुषांच्या गोड बोलण्याच्या मृगजळाने बायका फसल्या नसत्या! आता असल्या साखरबोलांनी मला आणखी भुरळ पाडू नये!

(जा पिया आयेना.)

चतुरा चातुरी । तुमची न्यारी । भुलावणी खरीखुरी ॥

परि मारी । जिव्हारी । दुधारी । सुरी॥ध्रु. ॥

भोळा भाव भुलाया टाकुनिया फांसा । केला डाव असा

अवचित का हो खासा । हा देव पावला आज कुणाच्या

नवसा । रुसला कान्हा काय जिवाच्या रासा ॥ तुटली

सारी । का दिलदारी । इतक्यावारी ॥१ ॥

**वृंदावन** : बरे, माझा गुन्हा काय झाला हे मला सांग तरी!

**कालिंदी** : बोलण्यात बोलणे नाही तिथे काय बोलायचे माणसाने! आपण आपल्या वचनाला उणे आणिलेत.

**वृंदावन** : व: ! वचन तू मोडलेस की मी? आपण होऊन मला अलिंगन देण्याचे, पहिला शब्द बोलण्याचे, वचन विसरलीस वाटते?

**कालिंदी** : माझे वचन मी पुरे करू लागले तर आपण माघार घेणार नाही ना?

**वृंदावन** : उलट मी आपण होऊन असा पुढे मात्र येईन.

**कालिंदी** : (त्याच्या गळ्यात हात घालून) नाथ, माझी मिठी आपण सोडवणार नाही ना? मी ठेवीन तितका वेळ ही कायम राहील का?

**वृंदावन** : दोघांच्या गळ्यात काळाची मगरमिठी पडेपर्यंत ही कायम राहील.

**कालिंदी** : माझ्या मनात बोलायचे आहे; पण माझ्या बोलण्याने राग आल्यामुळे माझा पहिला शब्दच शेवटचा होणार नाही ना?

**वृंदावन** : त्या क्षणीच मला मरण येणार असेल तरच तो शेवटचा शब्द होईल! काय बोलायचे असेल ते मोकळ्या मनाने बोल!

**कालिंदी** : आपण म्हणे एका पतिव्रतेचा छळ करण्यासाठी तिला-

**वृंदावन** : (तिला एकदम दूर लोटून देऊन) एवढ्यासाठीच हे लडिवाळ लघळपणाचे सोंग आणिले होते वाटते ? हात कलम करून टाकीन; जीभ मुळापासून उपटून काढीन!

(कालिंदी तशीच पडून राहते; शेवटी हुंदका देऊन एकदम रडते.)

**वृंदावन** : (स्वगत) रागाच्या झपाट्यात मी भलतेच बोलून गेलो! गोड शब्दांनी हिचे समाधान केले पाहिजे; नाहीतर रडक्या मुद्रेची ही ब्रह्महत्या डोळ्यांपुढून हलायची नाही! (तिचे हात धरून तिला उभी करितो व उघड) लाडके, तू अशी भलतीच शंका घेतल्यामुळे मला राग का येणार नाही बरे?

**कालिंदी** : पण माझी शंका अगदी खोटी आहे ना? तसे असेल तर आपल्या पवित्र रागाने या देहाची वाटेल ती दशा करून टाका; आपली पुण्याई अढळ असल्यावर माझ्या हत्येचे पाप आपल्याला कुठून लागणार? माझी शंका खोटी ना?

**वृंदावन** : जितकी दारुण तितकीच खोटी! तुला वाहिलेल्या या हृदयाची साक्ष घेऊन पाहा! (स्वगत) आता मला वाटेल तितकं खोटे बोलण्याची हिंमत येत चालली आहे! या अशा गोष्टी हिला कोण सांगते याची नीट चौकशी केली पाहिजे! बाकी मला एवढ्या सावधगिरीने हे रहस्य सांभाळण्याची काही जरूर नाही! दाही दिशाभर या गोष्टीची कोणी दवंडी पिटवीत बसले तरी काय हरकत आहे? महाराजांचा माझ्यावर आता इतका विश्वास बसला आहे, की अगदी त्यांच्या मानेवर मी तलवार ठेविली तर ते सुद्धा त्यांना आपल्या हिताचेच वाटेल. प्रसंग पडला तर सर्वांचेच मुडदे पाडायला किती वेळ लागणार? (उघड) लाडके, अजून तुझी खात्री होत नसेल तर प्रत्यक्ष परमेश्वराची, आपल्या प्रेमाची, प्रेम आणि परमेश्वर यांच्या एकरूप मूर्तीची-चल, आपल्या केतनची शपथ घेऊन तुझी खात्री करून देतो. (जातात.)

## प्रवेश सहावा

(स्थळ: सुदामाचे घर. नूपुर प्रवेश करितो. रात्रीची वेळ.)

**नूपुर** : काय गुलामाने बंदोबस्त करून ठेविला आहे ! त्या खंदकात पाय निसटून अंगभर चिखल झाला! रात्री अपरात्री भटकताना जरा पाय घसरला तर अंगावर शिंतोडे उडतात असे म्हणतात ते खोटे नाही अगदी! हा सुदाम वस्ताद खरा! इतके दिवस मला ताकास तूर लागू देईना! या दामिनीची त्या गोसावड्याशी काय काय खलबते चालतात ती शोधून काढून सुदामाच्या कानावर घातली पाहिजेत. आता दरवाज्याबाहेरून खुणामागुन खुणा करीत सुटावे; त्या कानफाट्याने दामिनीशी ठरविलेली एखादी खूण जमली तर ती अचूक बाहेर येईल!

(दरवाजावर खडे मारतो; नंतर खाकरतो; नंतर टिचक्या वाजवितो; टाळी वाजवितो. शेवटी शीळ घालीत उभा राहतो, छपरावरून सुदाम उतरून त्याच्याजवळ जाऊन त्याची मान धरितो.)

**नूपुर** : भूत ! भूत !

**सुदाम** : अरे चोरा ! चांगला सापडलास !

**नूपुर** : दूर हो, तू जसा भूत नाहीस तसा मी पण चोर नाही; चोर असतो तर निदान अंग चोरून तरी पळालो नसतो का?

**सुदाम** : मग कोण आहेस तू कशाला आलास या वेळी इथे?

**नूपुर** : माझे वासरू चुकले आहे ते हुडकायला आलो आहे!

**सुदाम** : वः, खंदक ओलांडून इकडे कशाला येईल तुझे वासरू?

**नूपुर** : आमच्या गावजोश्याने हरवलेली वस्तू उत्तर दिशेकडे आहे म्हणून सांगितले.

**सुदाम** : हा कोंडवाडा आहे वाटते हरवलेली जनावरे ठेवण्याचा?

**नूपुर** : एकाने मला सांगितले, की इथे एका गरीब गाईचा कोंडवाडा केला आहे म्हणून!

**सुदाम** : अस्से काय? बरे, दरवाज्यावर खडे मारिलेस ते कशाला?

**नूपुर** : आपला खडा टाकून पाहिला वासरू आहे का म्हणून!

**सुदाम** : आणि आधी खाकरलास, दारावर टिचक्या मारल्यास, शेवटी टाळी वाजविलीस, ते का?

**नूपुर** : माझ्या खाकरल्याचा आवाज ओळखून चुटकीसरसे वासरू येते की काय हे बघितले; आणि टाळी वाजविली तेव्हा आस्तिकाचा सर्पमंत्र म्हणत होतो!

**सुदाम** : मोठा बिलंदर आहेस! तुझे नाव काय रे?

**नूपुर** : माझे नाव चकोर!

**सुदाम** : हे नाव खोटे तर नाही ना?

**नूपुर** : खोटे? हे नाव खोटे ठरले तर नाव बदलून देईन?

**सुदाम** : ते आपोआपच होईल. तसे नको; मी घरातून दिवा आणून तुझी चेहरेपट्टी पाहून ठेवितो नीट; आणि उद्या चांगली शहानिशा करून घेतो; पण दरम्यान तू पोबारा केलास तर ? तसेही नको; तुझी एखादी उपजत खूण सांग पाहू अंगाची?

**नूपुर** : मी पायाळू आहे! उपजतच आहे खूण ही!

**सुदाम** : तिचा आता काय उपयोग? हल्ली अंगावर असलेली एखादी ठळकशी खूण सांग.

**नूपुर** : माझ्या हातापायाला मिळून एकवीस बोटे आहेत.

**सुदाम** : दम खा, मी मोजून पाहतो; पाच नी पाच दहा; आणि पायाची ही पाच, पंधरा, आणि या पायाला ही-अरे, पायाला ही हाताची करंगळी कशी रे? (नूपुर पायाला करंगळी जोडतो.)

**नूपुर** : देवाची करणी आणि नारळात पाणी म्हणतात ते असे; एकवीस बोटे असल्याचे नवल नाही; पण पायाला हाताची करंगळी उगवली हे विशेष आहे!

**सुदाम** : आता मात्र इतका काळोख असूनही लख्ख प्रकाश पडला! तू नूपुर नव्हेस का?

**नूपुर** : म्हणजे, तुम्ही अजून ओळखलेच नव्हते वाटते? अगदीच चकला म्हणायचे! बरे; मी मुद्दाम तुम्हाला एक जरूरीची सूचना देण्यासाठी आलो आहे. तुम्ही कोण काय सारे कळले आहे मला! तुमच्या कुटुंबाला तुम्ही या भलत्या भानगडीत कशाला गुंतविले आहे? पाहा बुवा, कनकाच्या लोभाने कांताच गमावून बसाल झाले !

**सुदाम** : (घाबरून) का, कशावरून हो ?

**नूपुर** : काही विशेष कारण नाही तसे; पण एकंदरीत थोरांचा आश्रय काही फारसा बरा नाही. थोरांच्या डोळ्यांवर संपत्तीचा धूर आला म्हणजे त्यांच्या आश्रितांच्या डोळ्यातून पाणी येते! आणि त्यातून या वृंदावनाचा आश्रय तर फारच वाईट; केवळ कळकाच्या झाडाची सावली! त्याची बायकांबद्दल नीट नजर नाही!

**सुदाम** : वसुंधराबाईंच्या दिमतीला ती आहे आज फार दिवस; म्हणून तिला मी नाही म्हणत नाही!

**नूपुर** : पण वृंदावन सध्या बायका बिघडविण्याच्या फंदात पडला आहे; तेव्हा असा ओळा पडलेला काही ठीक नाही.

**सुदाम** : त्या कंकणाला एकदा परीक्षा पाहावयाला सांगतोच लौकर; म्हणजे जीव जरा खाली पडेल. एकदा वाटते, परीक्षेने सोक्षमोक्ष करून टाकावा; पुन्हा मनात येते, की विषाची परीक्षा पाहणे काही चांगले नाही.

**नूपुर** : आज संध्याकाळी वृंदावनाने सगळ्या नोकरमाणासांवर जरा करडी नजर ठेवण्याचे ठरविले आहे अशी बोलवा आहे. पाहा बुवा !

**सुदाम** : चला, आता सकाळीच कंकणाला सांगतो, की करून टाक एकदा परीक्षा! मग होय तशी जाय! चला. (दोघेही जातात.)

## प्रवेश सातवा

(स्थळ : तळघर. वसुंधरा; दीनार निजलेला. जवळ बुरखा पांघरलेली दामिनी कामात)

**वसुंधरा** : (दीनाराला उद्देशून) बाळा दीनारा, इतक्यात तुला झोप लागली? तू असा निजू लागलास तर मला एकटेपणाने हुरहुरल्यासारखे वाटेल? नको गडे, असे डोळे मिटून घेऊ नकोस!

(कान्हा मुखसे.)

आता न करी हा चाळा । टाकि छंद बाळा ॥ध्रु.॥
शांतिसुखाची झोप कशाची । भीति मजसि ही जाची । घाली आळा ॥१॥
धीर मला दे मंजुळ नादे ।
हासे परतवी वीरा । निर्दय काळा ॥२॥

तिकडून तुला माझे रक्षण करायचे सांगणे झाले आहे ते विसरलास वाटते? बाळ, आपले नाते आता बदललेले आहे ! जागत्या डोळ्यांनी आता तू माझ्याभोवती पहारा करायचा! अस्से; असेच डोळे उघडे ठेव! आता कसा बरे मला धीर आला! त्यांचे नेहमी म्हणणे असायचे, की काळोख्या रात्री, चांदण्या देवाच्या तेजाची साक्ष पटवितात; तसेच या तळघराच्या काळोखात माझ्याभोवती तळपणारी त्यांच्या तेजाची जागती ज्योत या तुझ्या चिमुकल्या चांदण्यावाचून मला दुसरीकडे कुठे दिसणार सांग बरे! बाळ, वृंदावन आपल्या राक्षसी मनाने माझा आणि तुझा अंत पाहू-बाळ, मला बोलवत नाही रे कळले ना तुला सारे? देशील ना मला त्या वेळी धीर? राधेसाठी गोकुळीचा कान्हा लहानाचा मोठा आणि मोठ्याचा लहान झाला; द्रौपदीसाठी त्याने अदृश्यरूपाने उभे राहून तिची

लाज राखिली! बाळा, त्या भिन्न प्रेमाची आज एका मातृप्रेमात मिळवणी करून कृष्णासारखा माझ्या धावण्या धावशील ना? या वेळी तूच माझा कृष्ण!

(बोल मोरे राजो.)

बोल ब्रिजलालारे काही हसुनी बोल ॥ भ्याले जनाला ।

भ्याले मनाला । सुटला माझा तोल ॥बोल.॥

करि उरि धडधड रहा मनीच तू ।

हासुनी भिरभिर वद नयनांनी ।

नवलाखाचा बोल ॥ बोल. ॥१॥

अहाहा, अशी मूठ वळविलीस ! एकाएकी देवाने का तुझ्या मनात ही प्रेरणा केली? भरसभेत दु:शासनाने पदर ओढल्याबरोबर, भीमसेनांनी दशसहस्र नागांच्या बळाने वळविलेल्या वज्रमुष्टीकडे पाहून, द्रौपदीदेवीला वाटला नसेल, इतका धीर तुझ्या गोजिरवाण्या बाळमुठीने माझ्या हृदयात थरारला आहे! आता मात्र माझा दीनार मंडलेश्वर भूपालांचा वीरपुत्र- अगंबाई, हसायला काय झाले असे? चुकून तिकडचे नाव माझ्या तोंडून निघाले म्हणून हे हसे? या गोष्टी सुद्धा कळायला लागल्या वाटते? व:, मला तुझी चोरी आहे का त्यांचे नाव घ्यायला? मला नाही खपायचे असे हो! चांगले मोठ्याने नाव घेऊन हाक मारते, आणि बोलावून विचारते ! भूपालमहाराज !- (वृंदावन प्रवेश करतो.)

**वृंदावन** : वसुंधरे, तू कोणाला हाक मारलीस? (दामिनी जाते.)

**वसुंधरा** : मी माझ्या परमेश्वराला हाक मारली!

**वृंदावन** : तुझा परमेश्वर इतका दूर आहे, की कल्पान्तापर्यंत त्याच्या नावाने तुला सारख्या हाका माराव्या लागतील! या प्रलयसंकटाने हिंमत खचून तुझा परमेश्वर मेल्यापेक्षाही मेलेला झाला आहे!

**वसुंधरा** : प्रलयानंतरची ही पाहा त्यांची अंगष्ठमूर्ती! माझा बाळ मला त्यांची साक्ष देईल!

**वृंदावन** : त्याचीच व्यवस्था करण्यासाठी मी आता आलो आहे! वसुंधरे, आज तीन चार दिवस मी तुला सारखा विनवून सांगत आहे; माझ्या विनंतीचा विचार केलास का?

**वसुंधरा** : वृंदावन, आर्य पतिव्रतेला ज्या पातकी शब्दांचा कोणी उच्चार केलेला कानांनी ऐकूच येत नाही, त्यांचा विचार कसा करिता येईल? माझ्या पातिव्रत्याबद्दल भलती कल्पना! वृंदावन, तशी कल्पना मनात घोळवू लागला तर साक्षात् परमेश्वर सुद्धा उभा जळून जाईल!

**वृंदावन** : वसुंधरे, तुला भ्रष्ट केल्याशिवाय माझा सूड थांबणार नाही! नुसता माझ्या गळ्यात हार घालण्याने सुद्धा माझे समाधान होईल!

**वसुंधरा** : अभद्र कल्पनेने परपुरुषाकडे नुसते पाहिले तरी सुद्धा आर्यस्त्रीचे डोळे फुटून जातील! वृंदावन, तुम्हाला काय वाटेल ते करा; पण मला हे भलते शब्द ऐकवू नका !

**वृंदावन** : वसुंधरे, माझा कठोर निर्धार तुला कळवू का? ऐक, नीट लक्ष देऊन ऐक; मी उगीच काहीतरी सांगत नाही!

**वसुंधरा** : (स्वगत) आज चार दिवस पाहते आहे, वृंदावन बोलताना मधून मधून माझ्याकडे पाहण्याचे का बरे टाळतात? बोलताना मध्येच अडखळतात का? हे सारे उसने अवसान तर नाही? (उघड) तुम्हाला बोलायचा धीर होत नाही वाटते ?

**वृंदावन** : जे करायला तयार झालो आहे ते बोलून दाखवायला कसला धीर लागणार? वसुंधरे, उद्या रात्री याच वेळी मी पुन्हा तुझ्याकडे येईन. माझ्या म्हणण्याला रुकार दिला नाहीस तर तुझ्या दीनाराचा तुझ्या डोळ्यांदेखत प्राण घेईन. तुझ्या बापाने ज्या माझ्या मातेची नीच शब्दांनी अवहेलना केली, तिच्या चरणांना स्मरून शपथेवर पुन्हा सांगतो, की उद्या माझ्या विनंतीचा अपमान झाला तर मी दीनाराचा बळी घेतल्यावाचून राहणार नाही! काळाच्या डोळ्यांची एक उघडझाप होण्याच्या अवधीत तुझे डोळे उघडले तर ठीक आहे, नाहीतर दीनार मेलाच म्हणून समज !

**वसुंधरा** : प्रत्यक्ष काळ तुमच्या रूपाने डोळे फोडून पाहू लागला तरी मला काही वाटणार नाही! उद्याची मुदत कशाला हवी? वृंदावन, तुम्हाला आताच सांगून टाकते,

की दीनार तुमच्यापुढे पडला आहे! तुम्हाला काय वाटेल ते करा!

**वृंदावन** : माझे बोलणे तुला अजून विश्वासाचे वाटत नाही; पण उद्या या वेळी दीनार मेलेला दिसेल!

**वसुंधरा** : देवाची दया तशी असेल तर तसेही होईल! भूपालांच्या वीरपुत्रा, ऐकलेस हे नीट?

(दिलदार दिलारा.)

रणवीरकुमारा विकट निकट रण हो झणि सिद्ध तया ।
यदपि वय न तव उघडिं नयन निज हरुनि भया मज दे अभया ।।ध्रु. ।।
प्रसंग घोर पाहुनिया भीत माता ।
तुझाच एक धीर तिला आता ।
तात तुझे त्यजुनि मला दूर जाता ।
प्रभुस्वरूप तूच जगी, तूच त्राता ।।१ ।।
(वृंदावन जातो.)

## अंक तिसरा समाप्त

## अंक चवथा
# प्रवेश पहिला

(स्थळ : वृंदावनाचा महाल; वृंदावन निजला आहे. कालिंदी प्रवेश करिते.)

**कालिंदी** : (स्वगत) नाथांनी शपथेवर सांगितले, पण माझ्या मनातली कसकस अजून हटत नाही! त्यांच्या मनाची आज दोन दिवस अशी दारुण दशा झालेली दिसते, की त्यांनी कुठल्या तरी घोर विचाराचा निश्चय केलेला असावेसे वाटते! माझ्याशी घाईत एखाददुसरा शब्द बोलून ते माझ्यापासून दूर होतात! किंकिणीने पुन्हा आताच सांगितले, की दीनाराचा घात करण्याची नाथांनी शपथ घेतली आहे म्हणून! असे अघटित पातक त्यांच्या हातून झाले तर कल्पान्तापर्यंत तरी त्यांच्यावर देवाची कृपा होईल का? मनाचा धडा करून, साता जन्माची पुण्याई एकवटून, मी त्यांना या पातकापासून परत फिरविण्याचा पुरता संकल्प केला आहे! (पाहून) नाथांना झोप लागल्यासारखी दिसते; अगंबाई, पण ही कसली झोप? तोंड किती भेसूर दिसते आहे! या पापविचारांनी मनात खळबळ उडविल्यामुळे झोपेतही यांच्या निर्मल मनाला अशा यातना भोगाव्या लागत आहेत! देवाधिदेवा, पाचा बोटांनी तुला कधी मनोभावे पुजले असेल तर आज मला प्रसाद दे! मला आज बोलण्याचे बळ दे !

**वृंदावन** : (झोपेत मोठ्याने) वसुंधरे, अजून तरी हा हार माझ्या कंठात घाल; दीनाराचे प्राण आता कंठाशी आले आहेत! एकदा ही कट्यार दीनाराच्या पोटात शिरली म्हणजे तिला सुखाने बाहेर काढणे काळाच्याही हाती राहणार नाही! नाही ऐकत तू? डोळे फाडून नीट पाहा, ही कट्यार एकदम-(दचकून) कोण तू? कालिंदी? कालिंदी, दीनाराच्या आणि माझ्यामध्ये येऊ नकोस! दीनारला मारण्याबद्दल मी माझ्या मातेची शपथ घेतली आहे! दूर हो, दूर हो; काय म्हणतेस? हा दीनार नाही, आपला केतन आहे! या वेळी मला तुझ्या केतनची काय किंमत! लाथेने त्याला असा वाटेतून उडवून टाकीन. (कालिंदी त्याच्या जवळ येते.) आणि तुझा असा हात धरून (हात पुढे करितो व कालिंदीचा हात धरितो. एकदम दचकून जागा होतो.) काय? खरोखरीच कालिंदीचा हात माझ्या हातात?

**कालिंदी** : लग्नाच्या वेळेपासून, देवापितरांच्या शपथेने हा हात आपण जन्माचा हातात घेतला आहे! नाथ, नाथ, आपण हे काय मांडिले आहे? केवढे भयंकर पातक हे! झोपेतले आपले बोलणे ऐकून मला आपली अघोर इच्छा पुरती कळली आहे!

**वृंदावन** : जाग्रदवस्थेत जिंकलेल्या मनोवृत्तींनी स्वप्नसृष्टीत अखेर माझा पुरा, पुरा पाडाव केला!

**कालिंदी** : नाथ, असे खिन्न होऊ नका. माझ्यापासून आता काही एक लपवू नका.

**वृंदावन** : चल, दूर हो! आता कोणापासून काहीच लपवायचे नाही! माझा विचार कायमचा ठरलेला आहे.

**कालिंदी** : प्राणेश्वरा, हा कसला विचार? हा अविचारातला अविचार आहे! काल केतनच्या शपथेने आपण वचनाला गुंतला आहा, बोलला बोल खोटा करून ब्रीदाला बोल लावून घेऊ नका; परस्त्रीच्या पापी अभिलाषाने अघोर पापे करून नीतीला पायाखाली तुडवूं नका! नीतीचा नाश झाला तर जीवाचा सत्यानाश होईल!

**वृंदावन** : नीती! कसली नीती? देवाच्या कल्पनेने भकलेल्या भेकडांनी, शास्त्रे शिकलेल्या शिळपटांनी, थकलेल्या थेरड्यांनी निर्मिलेल्या नीतीच्या बंधनांनी माझ्या मनाच्या मर्दूमकीला बांधून ठेवू?

**कालिंदी** : ही कसली मर्दुमकी! हा दुष्टपणा- हा भेकडपणा आहे! अनाथ अबलेचा छळ करायचा, अजाण अर्भकावर कट्यार चालवायची, ही मर्दुमकी! हाच तुमचा पुरुषार्थ, हाच सारा पराक्रम! पतिराज, पुरुषाचा पराक्रम अबलांच्या रक्षणासाठी असतो!

(नेक नजर मोरा.)

धिक् जगतिं शतधा शुभयशा । त्या वीरकर्मा यापरि जरि
नरवर कृति करिति अधमाधमा ।।ध्रु.।। अनाथ अबला-
जनालागिं छळिते जे । शिशुवरि शस्त्रा धरुनि जे । हृदयिं
लवहि न लाजे । तरि त्या धिक् ।।१।।

**वृंदावन** : कालिंदी, या बडबडण्याने काय होणार! मला जे करायचे ते मी करणारच!

**कालिंदी** : मी नाही करू द्यायची! आपल्याप्रमाणे माझाही निश्चय झालेला आहे!

**वृंदावन** : संबंध काय तुझा माझा? तू कोण आणि मी कोण?

**कालिंदी** : मी आपली धर्मपत्नी! आपण माझ्या जिवाचे धनी! मी आपल्या सर्वस्वाची स्वामिनी! आपल्या भविष्याची भाग्यदेवी!

**वृंदावन** : मग त्या स्त्रीधर्माने वाग म्हणजे झाले! नसत्या उठाठेवी करीत बसू नकोस! नदीचे पाणी मूळचे गोडे असले तरी समुद्राला मिळताच तिचे-त्याचे एकजीवन होते हे लक्ष्यात ठेव! पतीच्या इच्छेशी विरोध करणे हा आर्यस्त्रीचा धर्म नव्हे!

**कालिंदी** : परस्त्रीचा छळ करण्यासाठी बायकोची बेअदबी करणे हेसुद्धा आर्यपुरुषाचे लक्षण नाही. आपली इच्छा चांगली असली तर मी आपली केवळ छाया! आपण पुण्यमार्गाने चालू लागला म्हणजे आपल्या कोमल चरणांपुढे मी आपल्या

हृदयाचा गालिचा पसरून ठेवीन, पण आपण आडमार्गाने निघाला म्हणजे लग्नाच्या नाजूक बंधनानी मी आपल्याला जखडून टाकीन! बायको म्हणजे नवऱ्याच्या पुण्यदृष्टीला मनोहर सुखदात्री चंद्रिका, पण परस्त्रीकडे पाहणाऱ्या पतीच्या पापदृष्टीला कडाडून दीपवून टाकणारी वीज आहे!

**वृंदावन** : बायकोची बडेजावी माझ्याजवळ मुळीच चालणार नाही! माझ्या मनाच्या मनातली इच्छा पुरी होण्याच्या रंगात आली असता मी या बोलक्या बाहुलीची बडबड ऐकत बसू? या चालत्या चित्राच्या चेहेऱ्याकडे पाहून भिऊन जाऊ? नाही! कालिंदी, बायको म्हणजे केवळ सुखाची एक वस्तू! विसाव्याच्या वेळी मनाची करमणूक करण्यासाठी घराच्या पिंजऱ्यात कोडलेली मंजुळ मैना! बायको नेहमी नवऱ्याच्या मुठीतच असली पाहिजे !

**कालिंदी** : नवऱ्याच्या मुठीत असणे हा तिचा बहुमान झाला! बायको म्हणजे पायांची दासी!

**वृंदावन** : मग तिने बाहेरच्या घडामोडी करण्याचे काही कारण नाही; पायांपुरते पाहिले म्हणजे झाले!

**कालिंदी** : आणि म्हणूनच हे पाऊल मी वाकडे कधीही पडू देणार नाही! अशी मिठी घालून बसेन! या पायांवर माझी सत्ता आहे ना ?

**वृंदावन** : लाथेच्या एका झपाट्याने त्या पायांपासून तुला कायमची अशी दूर झुगारून देईन! (तिला लाथेने दूर लोटतो.)

**कालिंदी** : इथून टाहो फोडून सारखी आपल्या जीवाची आळवणी करीन.

**वृंदावन** : मनाची मर्जी मोडणाऱ्या या मंजुळ मैनेची मान मुरगाळून तिचे तोंड बंद करायला मला किती वेळ लागणार? कालच बजाविले आहे, की जीभ मुळापासून उपटून टाकीन म्हणून, ते विसरूनकोस!

**कालिंदी** : अशाने भिऊन तोंड बंद ठेविले तर परमेश्वर मला शापून भस्म करील! आपणच माझ्या मुक्या मनाला तोंड दिले! माझ्या वाणीचा उपयोग आता करू नको तर केव्हा करू? बायको चुकत असली तर नवऱ्याने तिला सांभाळावी, नवऱ्याचा तोल चुकत असेल तर बायकोनं त्याला संभाळावे, म्हणून त्यांनी एकमेकांच्या हातात हात दिलेले असतात, एवढाच पतिपत्नीधर्म मला समजतो! माझा अपराध होण्याचा आपल्याला नुसता संशय आला असता तर आपण आकाशपाताळ एक करून सोडले असते; आणि आपण प्रत्यक्ष रौरवाचे अक्षय साधन करून घेत असतानाही मला ओरडायला नको का? स्त्रीजातीने असे कोणते पातक केले आहे, की नवऱ्याच्या हितासाठी-त्याच्या जिवाचा अध:पात टाळण्यासाठी

सुद्धा-तिने त्याच्यापुढे बोलू नये? पतीवर तिची इतकी सुद्धा सत्ता का नसावी? आपल्या हातून असे पातक घडले तर देवाला तरी आपला उद्धार करिता येईल का? धडधडीत आपला अध:पात होत असता, मी डोळे झाकून कशी बसू? नाथ, उघड्या डोळ्यांनी प्राण जात नाहीत हो! आपण माझे तोंड बंद केले तर पंचप्राण डोळ्यात एकवटून आपल्याशी बोलू लागतील.

**वृंदावन** : डोळ्यांच्या खाचा करून तुझ्या पंचप्राणांना त्यात गाडून टाकीन! तुझे माझे खऱ्या जिवाचे काहीएक नाते नाही! वसुंधरेला आधी संशय येऊ नये म्हणून तिला चकविण्यासाठी मी तुझ्याशी नुसते नावापुरते लग्न केले, समजलीस? माझ्या इच्छेच्या आड आलीस तर एका क्षणात तुझा प्राण घेऊन मोकळा होईन!

**कालिंदी** : माझे प्राण खुशाल घ्या! आपल्या इच्छेपुढे त्यांची काय किंमत? मी माझ्या सुखासाठी मुळीच बोलत नाही! कोणत्या आर्य पतिव्रतेने स्वत:च्या सुखाची कधी आशा ठेविली आहे? पतीच्या सुखासाठीच प्रत्येक आर्यस्त्रीचा अवतार असतो. मोठ्या आनंदाने माझे प्राण घ्या! आपल्या मनाजोगत्या स्त्रीशी विवाह करून पुण्यसुखाचा आजन्म उपभोग घ्या! पण नाथ, हा पापमार्ग सोडून द्या! एवढे अभयवचन मला द्या आणि त्याच हातांनी माझी मान मुरगळून टाका! पण पतिव्रतेचा छळ करून तिचा शाप जोडून घेऊ नका! आपल्या सुखासाठी, आपल्या पायांजवळ, आपल्या हातांनी, असे सौभाग्याचे मरण लाभले तर माझ्या भाग्याला पारावार नाही! साजऱ्या हातांनी कुंकू लुटीत मी वैकुंठाला जाईन; आपल्या नव्या संसाराचा पुण्यावतार संपवून पवित्र देहाने आपण स्वर्गात येईपर्यंत आपल्या सहस्रनामांची ओवणी जपत बसेन; स्वर्गप्रवेशाच्या वेळी अप्सरा आपल्यावर कल्पवृक्षाची फुले उधळतील, त्यावेळी चोरट्यासारखी बाजूला उभी राहून ही भाग्यशाली कालिंदी आपल्यावरून जिवाची फुले ओवाळून टाकील! पण नाथ, या अघोर पापाची कल्पना नका हो नका करू! पतिव्रतेला दुभागून जीवकुडीची तुटी घालू नका ! मी पापाच्या मार्गापासून परावृत्त होईन एवढे वचन मला द्या आणि मग खुशाल त्या वचनाच्या एकेक शब्दासाठी माझ्या प्राणाप्राणाचे मोल घ्या! एवढीच आपल्या दासीची विनंती आहे.

**वृंदावन** : एका दीडदमडीच्या रां- तुझ्या प्राणांशी माझ्या शब्दांचा मोबदला देऊन माझ्या एकाच इच्छेला तिलांजली देऊ काय? कालिंदी, तुला अखेरचे बजावून सांगतो, की माझा निश्चय अढळ आहे !

(तव मति चळली.)

अनुचित वचने ऐशीं । सतीते व्यर्थ वदुनि अवगणुनि तीस
जोडितसां कां यापरि पातकराशि ।। ध्रु. ।। पतिव्रतेच्या

मंगलधामा । पतिव्रतेच्या शुभनामा ।

अभद्रवचनी विषसम विषमा । विडंबिता का जोडुनिया पापासीं ॥१॥

पतिराज, मी पण आपलीच अर्धांगी आहे ! केतनाच्या रूपाने मी आपल्याला अवतार दिलेला आहे! मी पण आपणाला बजावून सांगते, की माझाही निश्चय आपल्याइतकाच अढळ आहे! आपल्या हातून हे पाप मी होऊ देणार नाही! कंठरवाने ओरडून ब्रह्मांडाला जागे करीन. अश्शी महाराजांजवळ जाऊन दाद मागेन. त्यांनी आपल्याला बंदिवासात घातले तरी चालेल! मोकळेपणाने अशी पातके करण्यापेक्षा आपण निर्दोष बंधात राहिला तर आपला अध:पात तरी होणार नाही!

**वृंदावन** : तुझ्या अमर्यादपणाची मजल इथपर्यंत आली आहे काय? अशा स्वच्छंद वृत्तीने मी तुला वागू देणार नाही! कंकणा, इकडे ये. (कंकण येतो.) संसारातली सुरेल सतार मांडीवर बसवली, छातीवर ठसविली, हृदयाशी हसविली तरी तिच्या जिवाच्या तारा पिळून काढल्यावाचून मनासारखे सूर निघत नाहीत ते नाहीतच! कंकणा, या बेमुर्वत बायकोला पकड आणि बागेतल्या बंगल्यात कोंडून ठेव आणि चहूकडे जाऊन सांग, की बायको बदचालीची दिसल्यामुळे वृंदावनाने तिला कोंडून ठेविली आहे!

**कंकण** : धनीसाहेब, अशाने-

**वृंदावन** : अधिक बोलू नकोस आता; माझ्यापुढून तिला घेऊन चल! लग्नाची बेडी तुटताना इतका खळखळाट हा व्हायचाच!

(सर्व जातात.)

## प्रवेश दुसरा

(स्थळ : सुदामाचे घर- सुदाम प्रविष्ट.)

**सुदाम** : काय नशिबाचा तारा आहे पहा. कंकणाला आज बोलावून परीक्षा पहायला सांगावे म्हणून विचार केला तर वृंदावनांनी त्याला कालिंदीबाईभोवती पहारा करण्यासाठी खुंटवून ठेविला! आणि तेवढ्यासाठी त्याच्या जागी मी जाईन तेव्हा तो निघणार, असा आडवा डाव झाला! माझ्या मनाने, परीक्षेच्या वेळी मी पण भुयारातून ऐकत बसलो असतो म्हणजे ठीक झाले असते. कंकणावर भरवसा ठेवायला तशी हरकत नाही म्हणा, दोस्तीच्या पोटी तो दगलबाजी करायचा नाही, पण मनाला तेवढी रुखरुख राहिली! बरे आहे; त्याला इथून परतायला जर विलंब लागला तर आपण त्याची जागा सोडून तडक इकडे

निघून यावे झाले; कालिंदीबाईंच्या कोठडीला कुलूप ठोकले तरी भागेल. (उघड) हे पाहा, मला जरा निकडीने जायचे आहे बाहेर, आणि त्या पंडिताकडून पोथ्या घेऊन त्याचा माणूस इतक्यात इथे येईल; तेव्हा तू जरा घरातच बसून राहा. बुरखा काढू नकोस आणि जागची हलू नकोस! समजलीस?

**दामिनी** : बरे! (सुदाम जातो.) (स्वगत) हा मेला बुरख्याचा नसता त्रास झाला आहे! उद्या त्या ईश्वरांनी दागिने दिले तर घालायचे तरी कसे अंगावर? मी तिकडे हट्ट घेऊन बसणार, की एक दिवस तरी बुरख्याशिवाय मी हिंडून येणार! हसेना कोणी! हसतील त्यांचे दात दिसतील! कोण? किंकिणी? (घाईघाईने किंकिणी येते.)

**किंकिणी** : दामिनी, मोठा घात झाला बाई! कालिंदीबाईंना काल रात्री धरून कोंडून ठेविले आहे धनीसाहेबांनी; आणि कंकणांना ठेविले आहे पहाऱ्यावर; एखाद्याशी लग्नाचे ठरले तर ते कसे सांगायचे म्हणून मघाशी त्यांना विचारायला गेले, तो कंकणांनी मला सुद्धा बंदी केली!

**दामिनी** : मग असेल त्यांचे तसेच काही कारण; त्यात तुझा कसला घात झाला एवढा?

**किंकिणी** : कारण कसले कपाळाचे? तुझ्या घरातलीच परवड!

**दामिनी** : काय गं, त्यांच्या अंगाखांद्यावरचे सारे उतरून ठेवले असेल नाही वृंदावनांनी? बापडीवर वेळ कठीण तर खरीच!

**किंकिणी** : तुम्हा गरिबांना दागिन्यांची भारी हाव! कालिंदीबाई कधी नाही अशा हपापल्यावाणी करीत! पुढे ऐक; आता त्यांच्या सोडवणुकीचा उपाय सांग एखादा! कोंडून ठेवले आहे त्यांना पण कोंडमारा झाला आहे माझा! कुण्या वेळी कसे वागायचे हे कुणाजवळ शिकूमी आता? म्हणून म्हणते, की कसेही कर आणि त्यांची सुटका करण्याचा रस्ता शोधून काढ!

**दामिनी** : अशा गोष्टीत मी तरी काय सांगणार बाई?

**किंकिणी** : असा माझा हिरमोड नको करू गडे! मी एवढ्या आशेने तुझ्याकडे आले; तू गरीब दासी, तुझ्या सुद्धा पाया पडते वाटेल तर, पण काही उपाय सांग!

**दामिनी** : माझे गुरू ते ईश्वर आहेत ना, ते बरीक सांगतील काही उपाय.

**किंकिणी** : मग ऊठ, याच पावली त्यांच्याकडे जा! इथेच कुठेसे राहतातना ते?

**दामिनी** : (जरा थांबून) पण मला इथेच बसून राहायला सांगून जाणे झाले आहे; तो कोणसा पोथ्या घेऊन येणार आहे. त्या वेळी मी नव्हते असे कळले तर लगेच काहीच्या काहीच व्हायचे मेले !

**किंकिणी** : मला आता रडे कोसळायच्या बेतात आले आहे!

**दामिनी** : दम खा, आता असे कर, तो दुसरा बुरखा पांघरून तू बैस माझ्या जागी; तो माणूस आला म्हणजे तेवढ्या पोथ्या घेऊन ठेव! मी अशीच येते. बसतेस का?

**किंकिणी** : बसते, पण तू जा कशी आधी! (दामिनी जाते; किंकिणी बुरखा पांघरून बसते.) देव करो आणि हिच्या गुरूला तरी काही इलाज सापडो म्हणजे झाले! माझा जीव कसा उडून गेला आहे अगदी! कालिंदीबाईशी बोलायला मिळाले म्हणजे त्यांच्या शिकवणीने कंकणांना सांगते लग्न ठरल्याचे! कंकण आपले सरळमार्गी आहेत एवढेच, नूपुर म्हणतात तसे वाईट काही नाहीत ते! अगंबाई, हे तर कंकण! हे का इथे आले आहेत या गरीब दासीच्या घरी? (उठून उभी राहते.)

**कंकण** : दामिनी, तुझा नवरा घरात नाही अशी संधी साधून मी मुद्दाम आलो आहे; मला आता वेळ नाही; पण थोडक्यात सांगतो; सुंदरी, तुझ्यामुळे मी बेहोष झालो आहे; माझे तुझ्यावर अलोट प्रेम आहे!

**किंकिणी** : पण तुमचे किंकिणीवर प्रेम आहे ना?

**कंकण** : भलतेच! मी तिच्याशी लग्न करणार आहे!

**किंकिणी** : आणि प्रेम मुळीच नाही तिच्यावर?

**कंकण** : लग्नाच्या बायकोवर पुरुषाचे कधी प्रेम ऐकले आहे कुणी? प्रेम असे चुलीपाशी बसायचे नाही; ते वारा खात, बाहेर तरंगत फिरते!

**किंकिणी** : आणि किंकिणीला हे कळले तर?

**कंकण** : तिला कोण कळवायला बसले आहे? ती थोडीच हे ऐकायला बसली आहे!

**किंकिणी** : (स्वगत) कालिंदीबाईंनी इतके ऐकून मुळीच धीर धरिला नसता! (बुरखा काढून, उघड) तीच ऐकते आहे बरे हे सारे! चांगला गळा कापणार होता माझा हो!

**कंकण** : तू कशी इथे? सुदामाने मात्र माझा गळा कापला खरा! किंकिणी, खरोखर मी हे खरे बोलत नव्हतो! दामिनीची परीक्षा पाहण्यासाठी म्हणून मी ते सोंग आणिले होते.

**किंकिणी** : तर तर! आता नाही मी फसायची! मी नाही तुमच्याशी लग्न करायची कधी! तुमचे माझ्यावर खरे प्रेमच नाही! मघाशी तुम्ही मला बाईसाहेबांनाच भेटू दिले नाही!

**कंकण** : हे काय भलतेच होऊन बसले? किंकिणी, खरे खरे सांगतो, माझे तुझ्यावर प्रेम आहे; पाया पडतो; माझी परीक्षा पाहा! कसलेही काम सांग, पाहा मी करितो

की नाही ते! वाटेल तसे अवघड काम सांग! पण मला झिडकारून टाकू नकोस! (दामिनी येते.)

**किंकिणी** : थांबा जरा आता! काय झाले, दामिनी?

**दामिनी** : (किंकिणीस एकीकडे) ईश्वर म्हणतात, मला कालिंदीबाईंची भेट घ्यायला मिळाली तर काही प्रयत्न करून पाहता येईल ! पण तसे कुठले जमायला?

**किंकिणी** : (कंकणास) कंकण, बोलाफुलालाच गाठ पडली अगदी! मी सांगितलेले वाटेल ते काम करणार ना तुम्ही?

**कंकण** : नुसते सांगून पाहा; उगीच विचारू नकोस आता!

**किंकिणी** : बरे तर, ते ईश्वर म्हणतात ते साधू आहेत ना, त्यांना एकदा कालिंदीबाईंची भेट घेऊ द्याल का? पाहा,नाहीतर माझे प्रेम-

**कंकण** : अगं, तुझ्यासाठी ईश्वरालाच काय, पण पिशाच्चाला सुद्धा सोडीन कालिंदीबाईंना भेटायला! पण एका अटीवर! हे कुणाला कळता कामा नये; आणि कालिंदीबाईंना बाहेर मात्र येऊ देणार नाही!

**किंकिणी** : काही हरकत नाही. दामिनी, चल, राहू दे ते तुझे काम! कंकण, तुम्ही व्हा पुढे! आम्ही त्यांना घेऊन येतो तिकडे. (कंकण जातो.) दामिनी, आता नाही म्हणू नकोस; मरू दे त्या पोथ्या! चल एकदम कशी! पण एकदम नको गडे! दुःखात नेहमी कालिंदीबाई अगदी हळू पावले टाकतात!

(वदवे न मला.)

जडताच गडे शोभते असा प्रसंग ये तदा ।
त्वरा रुचे न तापदा । कुलीनतेसि ती कदा ॥ध्रु.॥
मंद पडत पद तरी । ओढ जिवा फार जरी ।
जडपदांहि थोर पाहिं दाविती विषादा ॥१॥

(दोघी जातात. दुसऱ्या बाजूने नूपुर प्रवेश करतो.)

**नूपुर** : (स्वगत) हा सुदाम शुद्ध गाढव आहे ! एवढीं भुयारे खणतो; किल्ले रचितो, पण व्यर्थ! याच्या घरी वाटेल त्याने यावे! कंकण, किंकिणी आणि दामिनी यांची काय खलबते झाली कुणास कळे! आडून ऐकण्यात हाच तर मोठा तोटा आहे: कधी कधी मुळीच ऐकूयेत नाही काही! तसेच, त्या गोसावड्याचे कोडे काही अजून उकलत नाही! आता करावी गंमत; दामिनीचा हा बुरखा घऊन आपणच बसावे! तिचा एखादा चोरटा दोस्त एवढ्यात आला तर अशी बहार उडेल! (बुरखा पाघरतो. भुयारातून बुरख्यानिशी सुदाम बाहेर येतो.)

**नूपुर** : (स्वगत) अशात तो गोसावडाच आला तर नशीब उघडलेच म्हणायचे!

**सुदाम** : (स्वगत) पुन्हा नशिबाने गल्लत केलीच! किंकिणी मध्येच आल्यामुळे आपल्याला तसेच परतावे लागले म्हणून कंकणाने सांगितले! (पाहून) दामिनी इमानाने बसली आहे मात्र खरी! आता आपणच एक डाव खेळून पाहावा! (स्वर बदलून उघड) दामिनी, ए दामिनी!

**नूपुर** : (बायकी आवाजाने) कोण आले आहे ते बुरखा घेऊन?

**सुदाम** : मोठ्याने बोलू नकोस! मी ईश्वर आलो आहे ठरल्याप्रमाणे!

**नूपुर** : ईश्वर, तुम्ही असे नेहमी येता; पण कोणाला दिसत तर नाहीना?

**सुदाम** : (स्वगत) नेहमी येता! स्त्रीजात तेवढी निमकहराम! (उघड) कोणाच्याच कधी दृष्टीस पडलो नाही अजून! पण सुंदरी, मी अलिंगनाला अगदी उत्सुक झालो आहे!

**नूपुर** : मग माझी का ना आहे ?

(दोघेही जवळ येऊन एकमेकांचे बुरखे सरकवितात.)

**सुदाम** : अगं सटवे !

**नूपुर** : अरे गोसावड्या (दोघेही एकमेकांस पाहतात.)

**सुदाम** : तुमची माझ्याबद्दलची कळकळ पाहून मला आनंद वाटतो! पण हा घोटाळा झाला कसा? दामिनी आहे कुठे?

**नूपुर** : दामिनीबाई, कंकणाच्या मागे आणि किंकिणीबरोबर!

**सुदाम** : (स्वगत) मग काही हरकत नाही! कंकणाने सांगितले ते खरे तर मग! (उघड) चला आपण जाऊ आणि कंकणाला भेटून नीट खुलासा करून घेऊ.

**नूपुर** : मलाही तुम्हाला काही सांगायचे आहे, चला. (दोघेही जातात.)

## प्रवेश तिसरा

(स्थळ : बागेतील बंगला. कालिंदी व ईश्वर प्रविष्ट.)

**कालिंदी** : त्या वेळी माझ्या केतनसह तिथे जायला मिळेल तर मी खात्रीने दीनारला वाचवीन! जाता येईल का मला तिथे?

**ईश्वर** : रात्री वसुंधरेच्या दिमतीला दामिनी असते; तेव्हा तिच्या ऐवजी तुम्हाला जाऊन

बसता येण्यासारखे आहे.

**कालिंदी** : पण दामिनीच्याबद्दल मला आत कसे जाता येईल? केतनाला बरोबर कसे घेऊन जाता येईल? शिवाय, मला तिथे त्यांनी किंवा वसुंधराबाईंनी ओळखले-म्हणजे आधीच ओळखले तर कसे होईल?

**ईश्वर** : कालिंदीबाई, तुमचा माझ्यावर विश्वास आहे का?

**कालिंदी** : हं!

**ईश्वर** : मग दामिनीला दागिने मिळवून देण्याचे कबूल करून तुमच्या या खोलीत आणून ठेविता येईल; या खोलीत आज रात्री एक महापुरुष प्रकट होऊ न दागिन्यांचा सर्व संग्रह येथे टाकणार आहे असे तिला सांगितले म्हणजे झाले! सुदामाच्या आज्ञेवरून दामिनी अष्टौप्रहर बुरख्यातच वावरते, तेव्हा कोणी ओळखण्याची धास्ती नाही. तसेच केतनालाही बुरख्याखाली झाकून नेला म्हणजे झाले! तुम्ही या बेताला अनुकूल असाल तर संध्याकाळी दामिनीला इथे आणितो आणि तो बुरखा पांघरून तुम्ही माझ्याबरोबर चला म्हणजे झाले. किंकिणीने सांगितले म्हणजे मला आणि दामिनीला कंकण केव्हाही आत सोडील! इथून निघाल्यावर प्रहर रात्र पडेपर्यंत माझ्या आश्रमात राहता येईल !

**कालिंदी** : तुमची योजना मला मान्य आहे. हे पाहा, थोडीशी अफू मात्र आणून ठेवा!

**ईश्वर** : ती कशाला?

**कालिंदी** : तिथे गेल्यावर केतनने रडू नये म्हणून त्याला अफूची बाळगोळी दिली पाहिजे! थोडीशी गुंगी आली म्हणजे सोईचे होईल?

**ईश्वर** : बरे आहे. मग मी ठरल्याप्रमाणे व्यवस्था करू तर?

**कालिंदी** : देव तुम्हाला यश देईलच असे वाटते! (ईश्वर जातो.)

**कालिंदी** : (केतनला मांडीवर घेऊन, स्वगत) बाळा केतना, माझी अघोर इच्छा कळली ना तुला? लाडक्या, तुला माझा राग नाही ना आला? का हे तुलाच विचारते म्हणून रागावला आहेस? एकदा हसून मला धीर दे पाहू! तुझ्याखोरीज मनातले हितगुज मी कोणाशी बोलू बरे? या अफाट जगात एवढी दीड वितीची दौलतच काय ती माझी आहे ना? मग माझ्या जीवाच्या धन्यासाठी ही जिवाची जहागीर देवाला वहावयाला नको का? बाळ, सतीचे वाण घेऊन निघाल्यावर दुःखाच्या आगीत उडी टाकण्यासाठी तुझ्या कोवळ्या कायेची धर्मशिळा करायला मी तयार झाले म्हणून रागावू नकोस! हा सतीचा खडतर मार्ग आहे! तुझ्या पित्याच्या उद्धारासाठीच ना तुझा जन्म? वसुंधराबाई भूपालाच्या नावासाठी दीनाराच्या

जीवावर उदार झाल्या; मग तुझ्या वडिलांचा सर्वस्वी अध:पात होत असतानाही दीनाराच्या जागी तुला उभे राहायला नको का? तिकडच्या स्वप्नावरूनच मला ही कल्पना आठवली. शिवाय पतिहृदयाशी माझे हृदय एकरूप करण्याची त्यांनी मला आज्ञा केलेली आहे, म्हणूनच मी अशी पाषाणहृदयी झाले आहे. बाळा, क्षमा कर ! पण-

(कान्हा रहे अपने पास.)

मार्ग दुजा नच जगात । अतुल पातक ना तरि आता ।
घडवित पितरा निरयपात ।।ध्रु. ।।
थोर कुलीं जन्म ज्यास । सौख्यलेश नाही त्यास ।
कष्टदशा त्याला । अशीच नशिबाला ।
नातरी कुल ते विलया जात ।।१।।

(पडदा पडतो.)

## प्रवेश चवथा

(ईश्वर प्रवेश करतो.)

**ईश्वर** : (स्वगत) दामिनी अजून कशी येत नाही? परमेश्वरा, या सत्कार्याच्या सिद्धीसाठी असत्याचरण करीत आहे त्याची क्षमा कर! ज्या वैराग्यवृत्तीला परहित हाच आचारधर्म आहे तिच्या अवश्यकर्मासाठी परब्रह्मस्वरूप सत्याचाही क्षणभर संन्यास केल्यावाचून चालणार नाही! कालिंदी, तुझी कल्पना माझ्या पूर्णपणे लक्षात आली! ती जितकी पवित्र आहे तितकीच दु:खदायक आहे ! दीनाराच्या ऐवजी केतनचा तू बळी देणार? शाबास तुझ्या पतिभक्तीची! (दामिनी येते.) ये, दामिनी, जरासा वेळ केलास. दीनारला आणले आहेस ना ?

**दामिनी** : हो ! पण त्या खोलीत आज रात्री तुम्ही म्हणता तसा महापुरुष प्रगट झालाच नाही तर?

**ईश्वर** : असे कधीच व्हायचे नाही! तू मात्र रात्रभर जागी राहा ! तो महापुरुष तुला दिसणार नाही; तेवढे दागिन्यांचे गाठोडे मात्र तुझ्यापुढे पडेल! पण ही हकिकत कोणाला कळल्याबरोबर साऱ्या सोन्याची रक्षा होईल एकदम!

**दामिनी** : मग आज रात्री हा सोन्याचा दिवस खचित उगवणार म्हणता? पण गुरुमहाराज, पाटल्या तोडीच्या असतील का आपल्या पुरणाच्याच?

**ईश्वर** : ते आता सांगता येणार नाही! आता वेळ घालविण्यात अर्थ नाही; चल लौकर.

(जातात.)

## प्रवेश पाचवा

(स्थळ : तळघर. वसुंधरा व बुरखा घेतलेली कालिंदी)

**वसुंधरा** : (स्वगत) मघापासून दीनारला एकदा जवळ घेऊन डोळे भरून, निरखून पाहावा असे मनात येत आहे; पण नको हा मोह! नाही तर माझी पवित्र निर्दयता एखादे वेळी वितळून जाईल! (उघड) दामिनी, बाई, तू आज अशी अगदीच कोमेजल्यासारखी का झालीस?

**कालिंदी** : (रडत) बाईसाहेब, हाताखांद्यावर झेललेले हे लेणे आज असे उतरून ठेवायचे-

(रडू लागते.)

**वसुंधरा** : दामिनी, रडू नकोस अशी! त्यात मनाला इतके अवघड ते काय वाटते? होणारासारखे व्हायचे टळत नाही; रडणे कधीतरी नशिबी ठेवलेलेच असते! मी प्रत्यक्ष याची आई, मग माझं काय व्हायला पाहिजे आता? माझ्या गळ्याची शपथ आहे; तू रडू लागलीस म्हणजे माझ्या जिवात कालवाकालव होऊ लागते; तू मला धीर द्यायला नको का? धीराने डोळे पूस आणि मनाचा अगदी दगड कर! रोज दीनारला निजविण्यासाठी गाणे म्हणतेस तसे आजही एखादे चांगलेसे म्हण पाहू! आपला दीनार आज काळझोप घेणार आणि आपण चांगले मंगलगीत म्हणायचे सोडून असे मुळूमुळू रडत बसायचे? ते अभिमन्यूचे गाणे येते ना तुला? तेच म्हण !

**कालिंदी** : मला मधली मधली कडवी येतात; सगळे आता आठवत नाही!

**वसुंधरा** : म्हण चुकतमाकत जेवढे येईल तेवढे! अगदी हुंदका देऊ नकोस!

**कालिंदी** : (स्वगत) बाळा केतना, माझे हे अखेरचे गाणे कसेतरी गोड करून घे. (उघड)

'सकाळी उठूनी धर्मांनी काय केले । अभिमन्यूसी बोलाविले ।
संसप्तकी अर्जुनासी नेले । मग कौरवसैन्य सिद्ध झाले ।
मग द्रोणांनी काय पण केला । धरूनी देऊ धर्माला ।
चक्रव्यूहाची युक्ती आहे तुजला । जावे बाळा युद्धाला ।
गेला अभिमन्यू-मन्यू वीर रणी। चक्रव्यह केला द्रोणांनी ।

गेला अभिमन्यू ॥'

पुढे काय बरे आहे ?

**वसुंधरा** : पुढे धर्माला नमस्कार करून सारथ्याला रथ आणायला सांगितला. ते जाऊ देत; पुढे म्हण !

**कालिंदी :**

'रणीं मिसळला सुभद्रेचा सूत । सैन्य पाडिले असंख्यात ।
शरांनी शिरे किती उडवीत । राजे झाले भयभीत ।
सोळा वर्षांचे वय दिसे लहान । युद्ध केले निर्वाण ॥
गेला अभिमन्यू-मन्यू वीर रणीं । चक्रव्यह केला द्रोणांनी ॥'

पुढे मग द्रोणांनी येऊन- (वृंदावन येतो.)

**वसुंधरा** : थांब जरा आता. वृंदावन आले!

**वृंदावन** : वसुंधरे, तुझा काय विचार ठरला?

**वसुंधरा** : माझा विचार मी कालच तुम्हाला सांगितला! कालपासून मी पुन्हा दीनाराकडे पाहिले सुद्धा नाही! भूपालांच्या वज्रदेही नावावरून ओवाळून टाकिलेला हा उतारा काळासाठी काढून ठेविला आहे! भूपालांच्या नांवासाठी मी अपत्यस्नेहाचा संन्यास केला आहे!

**वृंदावन** : वसुंधरे, अजून ऐक! हा हार काय तो माझ्या गळ्यात घालायचा! एवढ्यासाठी प्रत्यक्ष पोटच्या पोराला काळाच्या तोंडात लोटतेस ?

**वसुंधरा** : माझ्या पातिव्रत्यासाठी साऱ्या जगावर, स्वर्गातल्या तेहतीस कोटी देवांवर सुद्धा मी उदक सोडीन! मग दीनाराची काय कथा! पितरांच्या उद्धारासाठीच पुत्राचा जन्म असतो! अशा वेळी या वीरपुत्राने उडी टाकायची नाही तर काय करायचे? वृंदावन, भूपालाच्या नावासाठी-वसुंधरेच्या पातिव्रत्यासाठी-आर्यपतिव्रतांच्या पुण्यपरंपरेसाठी-माझा दीनार अशा वीरमरणाला तयार आहे!

**वृंदावन** : अस्से काय? दामिनी, तो दिवा दूर नेऊन ठेव आणि दीनाराला इकडे आण! (कालिंदी दिवा नेऊन ठेविते.)

**वृंदावन** : वसुंधरे, अजून, अजून विचार कर ! सुटलेला तीर पुन्हा सापडणार नाही!

**वसुंधरा** : वृंदावन, तुम्हाला वीरगर्जनेने शेवटचे सांगते, पातिव्रत्याचे रक्षण करण्यासाठी दु:खाचे डोंगर पोटात गिळायला मी तयार आहे! माझ्या पातिव्रत्यापुढे मला कशाचीही किंमत नाही.

**वृंदावन** : दामिनी, आण दीनाराला इकडे! वसुंधरे, अजून तुला थोडा वेळ आहे!

**कालिंदी** : (स्वगत) देवा, या वेळी मला धीर द्या! बाळा केतना, आल्या प्रसंगाला तयार हो! (केतनाला घेऊन वृंदावनाजवळ जाते.)

**वृंदावन** : वसुंधरे, कसला विचार करिते आहे तू?

**वसुंधरा** : माझ्या बाबांच्या मरणकाळी आजोबा शिवलीलामृतांतल्या रुद्राध्यायाचा पाठ करीत होते; तो अकरावा अध्याय मी आठवते आहे!

**वृंदावन** : वसुंधरे, या राक्षसी हट्टाने दीनार फुकट मरत आहे! या कट्यारीने त्याच्या पोटात ठाव घेतल्याबरोबर चहूकडे रक्ताची कारंजी सुरू होतील--

**वसुंधरा** : भूपालांचे नांव त्या कारंजांखाली न्हाऊन पावन होऊन जाईल! वृंदावन, या शब्दांनी मला हिणविण्याचा का प्रयत्न करिता आहा? का तुमच्या पुरुषार्थाला थरकाप सुटला आहे? तुम्हाला माझे सत्त्वच पाहायचे असेल, तुमच्या कपटी कट्यारीला माझ्या दीनाराला मारण्याची लाज वाटत असेल तर मला सांगा- भूपालांची ही वीरपत्नी आपल्या हाताने दीनाराचा नाश करील!

**वृंदावन** : दामिनी, नीट उभी राहा! वसुंधरे, नीट पहा, माझी लाजलेली कट्यार दीनाराच्या पोटात तोंड खुपसून लपून बसत आहे! (कट्यार बाहेर काढतो.)

**वसुंधरा :**

‘अश्वशाळा गजशाळा संपूर्ण । सर्व संपत्तीसहित गृहदान ।

महानंदेनें स्नान करून । भस्म अंगी चर्चिले ॥ रुद्राक्ष अंगी लेवून ।

हृदयीं चिंतिले शिवध्यान । हर हर शिव म्हणोन । उडी निःशंक घातली ॥’

देवा, वृंदावनांना क्षमा कर!

(वृंदावन तोंड बाजूला करून उजव्या हाताने कट्यार खुपसतो व डाव्या हाताने डोळे पुसतो.)

**वसुंधरा** : (स्वगत) वृंदावन डोळे का पुसताहेत? अहाहा, देवा, असाच असाच मला धीर दे! (उघड) दामिनी, दीनाराला पाळण्यात नेऊन ठेव!

**वृंदावन** : (स्वगत) या अंधकाराने केवढा उपकार केला हा! निर्दोष दीनारच्या वधामुळे ही कट्यार रक्ताचे अश्रू ढाळीत आहे ते मला दिसत नाहीत आणि माझे अश्रू वसुंधरेला दिसत नाहीत!

**कालिंदी** : (केतनला पाळण्यात ठेवून, स्वगत) बाळा, नीज आता; कल्पन्तापर्यंत नीज! आकाशाची झालरमोत्यांची झूल घालून उद्या माझ्या हाती तुला झाकून ठेवीन!

**वृंदावन** : वसुंधरे, आता यापुढे दुसरा प्रश्न! उद्या या वेळी असाच प्रसंग भूपालावर येणार आहे! तुझे पातिव्रत्य किंवा तुझ्या पतीचा प्राण यांपैकी एकाचा तरी उद्या नाश होईल! ऐकलेस नीट? आता तरी तुझ्या हृदयाला पाझर फुटेल ना?

**वसुंधरा** : माझ्या हृदयाच्या रक्ताचा पाझर दीनाराच्या हृदयातून वाहत आहे! पाळण्यातल्या दीनाराला माझ्या हृदयाची साक्ष विचारा!

**वृंदावन** : ठीक आहे ! भूपालाची सुद्धा प्राणनाशाला तयारी आहे का म्हणून विचारतो! स्वत:चा प्रश्न असल्यामुळे त्याचे डोळे खास उघडतील!

**वसुंधरा** : माझ्या पतीचे धैर्य हिमालयासारखे अढळ आहे!

**वृंदावन** : उन्हाळ्याच्या तापाने हिमालयाच्या सुद्धा गंगायमुना वाहू लागतात. अचेतन सृष्टीला सुद्धा प्राणांचा मोह आवरत नाही! ऐन दुपारच्या उन्हाचे चटके बसू लागताच निर्जीव छाया सुद्धा माणसाच्या पायांचा आश्रय घेते! दामिनी, या गोष्टींपैकी एक अक्षर बाहेर आले तर तुझेही प्राण जातील हे लक्षात ठेव! (जातो.)

**कालिंदी** : बाईसाहेब, किती तुमचे उदार हृदय ! तुम्ही त्यांना शाप द्याल असे वाटले होते मला!

**वसुंधरा** : दुष्टांचे परिपत्य करण्यापेक्षा, सज्जनांना सुख देण्याबद्दलच नेहमी देवाजवळ भीक मागावी असे मला वाटते! पण दामिनी, तुझे गाणे म्हण पुन्हा! तुझ्या गोड गाण्याच्या गुंगीतच माझ्या बाळाचा जीव काळझोपेत विरून जाऊ देत!

**कालिंदी** : (पाळणा हलवीत) कुठवर बरे आले होते ? हं;-

मग द्रोणांनी तोडिले धनुष्य । फाडिले अंगींचे कवच ।

मोडिला रथ केला विरथ । धावुनि आले षड्रथ ।

दु:शासनपुत्रे गदाप्रहार केला । अभिमन्यू रणीं पडला ।

पडला अभिमन्यू-मन्यू वीर रणीं । शोक बहु केला पांडवांनी ॥

**वसुंधरा** : नको हे रडगाणे ! पांडवांनी शोक केला असेल, मला करायचा नाही ! दीनाराच्या वीरमरणाला शोभण्याजोगे गाणे म्हण एखादे.

**कालिंदी** : (पाळणा हलवीत)

(अजि अक्रूर हा नेतो.)

निज बाळारे गाणे गाते आई ! करि आता जोजो गाई ॥ध्रु.॥

तुज जन्म दिला बाळा त्यांची स्वारी । लाखांत शिपाई भारी ।

बघ गरदी ही बुरजांची तुजभवतीं । दगडाची त्यांची छाती ॥

कळिकाळाशी झगडणार खंबीर ॥ हे तुझेच हिरवे वीर ॥

॥चाल ॥ जीवांच्या जळत्या ज्योती ।
आकाशी तारा होती ।
मोलाची माणिकमोती।
त्या डोळ्यांनी देवराय तुज पाही। करि आता जो जो गाई ॥१॥
दो दिवसांची ही दुनियेची वसती । सारखीच असती नसती ॥
तुजऐसा हा बाळ नऊ नवसाचा । हातचा की रे जायाचा ॥
ऋणानुबंधाच्या तुटल्या आता गांठी ॥ मग कुठल्या भेटी गांठी ॥
॥चाल॥ हे देवाघरचे लेणे ।
नशिबाने देणे घेणे ।
कुणीतरी कुणास्तव रडणे ।
ती रडणारी रडतील धाईधाई ॥ करि आता जोजो गाई ॥२॥

(पडदा पडतो.)

## अंक चवथा समाप्त

## अंक पाचवा
# प्रवेश पहिला

(सुदाम व नूपुर प्रवेश करतात.)

**सुदाम** : स्नेहधर्माला जागून तुम्ही चांगलीच चूक माझ्या पदरात घातली म्हणायची! दामिनी रात्रभर बाहेर होती म्हणता?

**नूपुर** : सगळी रात्रभर! इतकंच नाही पण कंकणाचेही अंग आहे या कारस्थानात! माझी तर खात्री झालेली आहे, की कंकणाची तुमच्या घराकडे सोज्वळ दृष्टि काही नाही! तसाच तो गोसावी! अगदी खटपटीत असल्यासारखा दिसतो! मग गुलामाचे काय खलबत आहे नकळे! तुम्हाला ही येणीजाणी नीट कळत नाहीत. अहो, एरवी कंकण तुमच्या घरी वरच्यावर कशाला येत बसेल? हं बघा, नवऱ्याशी दोस्ती करणारांपैकी पुष्कळांची नजर निराळीकडेच लागलेली असते!

**सुदाम** : दामिनी रात्रभर बाहेर राहिली असेल तर मोठा अनर्थापातच म्हणायचा! आता जातो आणि बारकाईने चौकशी करितो! (स्वगत) हा म्हणतो हे खरे असेल तर आताच्या आता काही तरी युक्ति योजून दामिनी जगावेगळी केली पाहिजे. नाहीतर बिघडलेल्या बायकोच्या नवऱ्याइतका दुर्दैवी प्राणी जगात नसतो असे म्हणतात त्याचा मलाच अनुभव यायचा कदाचित्! (जातो.)

**नूपुर** : (स्वगत) आता किंकिणीला जाऊन सांगावे, की कंकण दामिनीच्या नादी लागला आहे आणि कंकणालाही देतो सांगून, की किंकिणीचे सुदामाशी सूत आहे म्हणून! आणि हे सुद्धा काही अगदीच खोटे नाही! काल किंकिणी जी सुदामाच्या घरी आली ती काही दामिनीला भेटण्याला नव्हे! एवढ्या कारणावरून त्या दोघांचे जमलेले लग्न पुन्हा मोडून काढिता येईल अजून! हो, असेच करावे झाले. (जातो.)

# प्रवेश दुसरा

(स्थळ : तळघर-भूपाल प्रविष्ट.)

**भूपाल** : (स्वगत) पत्नीचे पातिव्रत्य आणि स्वत:चे प्राण ! या दोहोंपैकी कोणाचा त्याग करू? रणांगणात वाद्यांच्या दणदणाटाने बुद्धीची चेतना बंद झाल्यामुळे विचारमूढ आवेशस्थितीत मी कैक वेळा प्राणांवर उदार होऊन लढलो; रक्ताच्या उसळत्या लहरीचे बुद्धीला हेलकावे बसल्यामुळे तशा स्थितीत तिला विचार करण्याइतकी स्थिरता मिळत नाही. पण शांत रक्ताने सुखासुखाचे हिशेबी आकडे

टाकून गणितबुद्धीने या प्राणांचा मोह सोडणे कोणाला तरी साध्य आहे का? पातिव्रत्य की प्राण? प्राणत्यागाला तयार होऊ का? पण प्राणहानीचे परिणाम बुद्धिगम्य आहेत! प्राणांच्या अभावी सचेतन देहाला प्रेतकळा येत असल्यामुळे प्राणांचे द्रव्यत्व तर्काच्या कसोटीला पटण्यासारखे आहे! तसे पातिव्रत्याचे आहे का? पवित्र आर्यसंस्कारांनी भरलेल्या वातावरणाला माझ्या विचारांचे श्वास विखारून टाकतील की काय, अशी भीती वाटते. पण पातिव्रत्याविरहित स्त्रीदेहाचे अस्तित्व असंभवनीयच आहे का? नाही, ही केवळ संस्कारहानि आहे ! जगाच्या विशाल पृष्ठभागावर अशा राष्ट्रसंस्कृती कितीतरी आहेत, की ज्यांच्या पातिव्रत्याविषयीच्या कल्पना आमच्याहून शिथिल आहेत! इतकंच नाही, पण पातिव्रत्याशी विपर्यस्त कल्पना ज्यांच्यात प्रचलित आहेत अशीही राष्ट्रे सापडतील! प्राणांच्याबद्दल कल्पनेची अशी अनेकविधता आहे का? संस्कारजन्य पातिव्रत्यासाठी प्रत्यक्षगम्य प्राणांचा विनिमय करणे विचारवादाला सोडून आहे? कोण या प्रश्नांचे उत्तर मला देईल? प्राण की पातिव्रत्य? बुद्धीला प्रमाण मानू, की हृदयाचे समाधान करूं? विचार आणि विकार यातून कोणाला प्रधानपदावर बसवूं? (वृंदावन येतो.)

**वृंदावन** : भूपाल, माझ्या प्रश्नाचे उत्तर मागावयाला मी आलो आहे!

**भूपाल** : थांब वृंदावन, वसुंधरेची आणि माझी भेट घालून दे! हा प्रश्न आम्हा दोघांचा आहे! तिची भेट मला घेता येईल का?

**वृंदावन** : वसुंधरेची व तुझी भेट व्हायला माझी मुळीच हरकत नाही; पण तुमचा निर्णय मात्र मला लौकर कळला पाहिजे! ही संधि मी कालक्षेपाकरिता देत नाही हे लक्षात ठेव! चल माझ्या बरोबर!

**भूपाल** : चल! हरहर, कोणत्याही मनुष्यावर असे चमत्कारिक संकट आलेले नसेल! (जातात.)

## प्रवेश तिसरा

(स्थळ : सुदामाच्या घरासमोरील आंगण. पात्रे : सुदाम व दामिनी. समोर अग्निकुंड पेटत आहे.)

**सुदाम** : हं, हो अशी पुढे! आता मागेपुढे करू नकोस! (तिचा हात धरून ओढतो.)

**दामिनी** : आणखी काय करू म्हणता?

**सुदाम** : मुकाट्याने या अग्निकुंडात उडी टाक!

**दामिनी** : अगंबाई, म्हणजे!

**सुदाम** : म्हणजे काय? आज गौरीसारखी सजून बसली आहेस आणि इतके दिवस लंकेची पार्वती होतीस; काल रात्रभर घराबाहेर राहून रामाविरहित लंकेतली सीता झालीस. तेव्हा लंकेहून परत आलेल्या सीतेप्रमाणे तुलाही दिव्य करावे लागेल!

**दामिनी** : आगीत उडी टाकून दिव्य? आणि का म्हणून?

**सुदाम** : त्याचे कारण काल रात्रभर तू परगृही राहिलीस; परगृही वास केलेल्या स्त्रीचा पुन्हा स्वीकार करण्यापूर्वी नवऱ्याने तिला अग्नीत दिव्य करायला लावावे असे शास्त्रवचन आहे! स्त्रीचे पातिव्रत्य जर कायम असेल तर ती तशा आगीतही कायम राहील! नष्ट झाले असेल तर तीहि नष्ट होईल! हं, चल, टाक उडी!

**दामिनी** : भलतेच काही तरी. हे काय असे वेड्यासारखे करायचे? लोक काय म्हणतील याचा काही विचार?

**सुदाम** : लोकांना काय कळते यात? हा साराच प्रकार अलौकिक आहे! श्रीरामचंद्रासारख्या लोकोत्तर पुरुषाने रावणाच्या घरी सहा महिने राहिल्याबद्दल संशय असल्यामुळे सीतादेवीसारख्या लोकोत्तर पतिव्रतेला याच लोकोत्तर मार्गाने पुन्हा घरात घेतले. श्रीरामचंद्राना वेड लागले होते का? सारी लंका त्यांची वाहवा करीत होती. लंकेत लोक नव्हते वाटते?

**दामिनी** : लंकेत सोन्याच्या विटा असतील; इथे काय त्याचे? रामाकाळच्या गोष्टी त्या! आता कशा खऱ्या होतील? तुम्ही राहाल बाजूला आणि माझ्या अंगाचा होईल भडका!

**सुदाम** : माझ्या अंगाचा भडका केलास तेव्हा नाही केलास हा विचार? अन् भडका झाला तर तुझे काय वाईट होणार आहे त्यात? माझ्या हातून जळून मेलीस तर सोने झाले! नवऱ्याच्या हातून मरण मिळावे म्हणून बायका जीव टाकीत असतात जीव! बरे, पुन्हा जिवंत निघालीस तर सोन्याहून पिवळे झाले! आपले चौदा चौकड्यांचे राज्य आहेच; मी राजा आणि तू राणी!

**दामिनी** : आग लागो तुमच्या चौदा चौकड्यांना अन् त्या राज्याला!

**सुदाम** : ही तर तुझी नवऱ्याबद्दल आस्था! म्हणूनच तुला एकदा आगीत लोटले पाहिजे! चल, आटप लवकर! रामचंद्रांनी उडी टाक म्हटल्यावर सीतामाई चघळपणाने चौकशी करीत बसल्या नाहीत. माझी आता खात्री होत चालली आहे की, तू काही सीतेसारखी साध्वी नाहीस !

**दामिनी** : अन् तुम्ही तरी कुठे आहा रामचंद्रासारखे? सीतामाईंनी मृगाच्या कांचोळीचा हट्ट घेण्याची खोटी; रामचंद्र लागलीच धनुष्यबाण घेऊन रानोरान फिरत सुटले!

आणि आज कपाळाला बाशिंग बांधल्या दिवसापासून मी कपाळी कटकट करते आहे सारखी; पण तुमच्या जीवाला दिक्क नाही त्याची!

**सुदाम** : चूक केली रामाने ती! राम गेले ऐट दाखवायला आणि इकडे रावणाने सीतेला दाखविली लंका! रामाने ही चूक केली म्हणून लोकांनी तिचा एवढा ग्रंथ केला. भलत्या गोष्टींत रामाप्रमाणे वागायला मला लागले नाही वेड!

**दामिनी** : हा! तेवढे वेड कसं लागेल तुम्हाला? हे असे घालवेड तेव्हाच पांघराल! बायकोला जिवंत जाळायला रामाच्या तीन हात पुढे, नि राम एकपत्नी होते म्हटले की रामाचे नांव! हे ताकापुरते रामायण पुरे करा! चांगली सोन्यासारखी बायको -

**सुदाम** : सोन्यासारखी बायको आहे म्हणूनच तिला अशी भट्टीत भाजून, तावूनसुलाखून घ्यावी लागते, म्हणजे ती चांगली कसोटीस उतरते.

**दामिनी** : बावनकशी सोन्याची पुतळीसुद्धा तुमच्यासारख्या फत्तराच्या कसोटीला उतरायची नाही!

**सुदाम** : हं, बरोबर ताडलेस! फत्तराच्या कसोटीला चांगलीशी उतरत नाही एवढ्यासाठी तर या शास्त्रोक्त शेगडीत शेकून घेतली पाहिजे. चल, तुझ्या अंगावरचे हे चोरटे सोने कशाला लाविलेच पाहिजे. चल, टाक लौकर उडी. तुझ्या या सुवर्णभस्माखेरीज माझा हा हृद्रोग बरा व्हायचा नाही! दामिनी, मी तुझा नवरा आहे. नवऱ्याची आज्ञा स्त्रीला मान्य असलीच पाहिजे! चल टाक उडी. एक अक्षरसुद्धा बोलू नकोस आता! (तिला ओढून अग्निकुंडाजवळ नेतो, कंकण येतो.)

**दामिनी** : धावा हो धावा ! आग-आग-

**कंकण** : ए पागल, सोड तिला ! त्या बापडीवर का उगीच अशी आग पाखडतोस ? मी मघापासून ऐकतो आहे, - मला वाटले ही थट्टा आहे सारी म्हणून! श्रीरामाच्या करणीची ही निव्वळ माकड-चेष्टा आहे! आणि ती मात्र इतक्या सफाईने करीत आहेस की, तशी सीतेचे दिव्य प्रत्यक्ष पाहणाऱ्या रामसेवेतल्या जातिवंत माकडांनासुद्धा साधली नसती !

**सुदाम** : (एकीकडे) हं, कंकणा, बायकांच्यादेखत बेअदबी होत आहे. तोंडातून बेजबाब काढू नकोस! नवऱ्याला शेरास सव्वाशेर भेटला म्हणजे बायकोजवळ त्याचे वजन चट्दिशी कमी होते ! सध्या हिच्यादेखत माझी माफी माग! मग मी तुझी भरपाई करून देईल! (पुन्हा दामिनीची मान धरतो.)

**कंकण** : बेवकूब, कसली रे तुझी माफी मागायची? निव्वळ गाढव आहेस तू. असली

हिरकणीसारखी बायको मिळाली आहे तिचे असे हाल करतोस? सोड तिची मान, नाही तर तुझी मान उतरून टाकीन!

**सुदाम** : बाबा, अशी हिरकणी पचविणे फार कठीण. ती खोटी असली तरीसुद्धा अशी फट्‌दिशी प्राणाशी गाठ पडायचा प्रसंग येतो! (एका बाजूने नूपुर व किंकिणी येतात.)

**नूपुर** : (एकीकडे किंकिणीस) काय सांगितले मी तुला? सापडला ना कंकण अचूक याच घरात? आता जरा इथेच थांब. सुदाम बहुतकरून याच बाबतीत त्याला बोलत आहेसे दिसते !

**कंकण** : असे आहे नाही का? मग किंकिणीसंबंधाने तुझी नजर साफ नाही अशी मला खरीखुरी खबर लागली आहे. चल, टाक उडी तू पण या कुंडात आणि दे करून माझी खात्री!

**सुदाम** : भलतेच! किंकिणी काही अजून तुझी लग्नाची बायको झाली नाही; तेव्हा तुला मुळी संशय घ्यायचाच हक्क नाही!

**दामिनी** : किंकिणी नसेल त्यांची लग्नाची बायको, पण मी आहे ना तुमची लग्नाची बायको? मला तर आहे ना अधिकार? माझा संशय दूर करा पाहू आता! हं, घ्या उडी माझ्याबरोबर!

**कंकण** : पण मला अधिकार का नाही? किंकिणीशी माझा धर्मविवाह झाला नसला तरी गांधर्वविवाह झालेला आहे! आम्ही दोघांनी मनांनी एकमेकांना वरिलेले आहे! तेव्हा मलाही अधिकार आहेच! चल, टाकतोस की नाही उडी? या आगीच्या सोनेरी कोंदणात या हिरकणीपेक्षा तुझ्यासारखा हिराच नीट बेताचा बसेल! चल, टाकतोस की नाही उडी? या गरीब गाईला छळणाऱ्या तुझ्यासारख्या कसाबाला ठिकाणावर आणण्यासाठी देवाने माझ्यासारखे हरीचे लाल तयार केलेले असतात, समजलास?

**सुदाम** : तिलाही अधिकार नाही, नी तुलाही अधिकार नाही. तुझा अधिकार तर अगदी ओढून ताणून आणलेला आहे !

**कंकण** : हरकत नाही. तुलाही तसाच अगदी ओढून ताणून आणतो या आगीच्या कोंदणात! त्या गरीब गाईला छळीत होतास नाही का? तुलाही आणण्यासाठी देवाने माझ्यासारखे हरीचे लाल निर्माण केले आहेत! हं, आता लटपट नाही उपयोगी! मी नाही आता माझा शब्द पडू देणार! मी सुद्धा रामासारखा एकवचनी आहे! (नूपुर, किंकिणी पुढे येतात.)

**नूपुर** : हं, किंकिणी, हो आता पुढे आणि पकड या एकवचनी रामाला! हा हरीचा

लाल त्या हिऱ्याच्या जोडीला ठीक शोभेल! लाग आता बोलायला! लाजू नकोस अगदी!

**किंकिणी** : मला बाई लाज वाटते असे बोलायला. कालिंदीबाई नेहमी वृंदावनांच्या समोर लाजतात.

**नूपुर** : लाज नाही वाटत असे बोलायला? लाजू नकोस आता. कर हिय्या एकदा!

**कंकण** : हे काय कुलंगडे आहे?

**किंकिणी** : हे आपले दोघांचे प्रेम! तुम्हाला या दामिनीचा आता नाद लागला आहे तो माझ्या कानी आला. या नूपुरांनी मला बऱ्याच गोष्टी सांगितल्या आहेत; मला तुमचा संशय आला आहे; तेव्हा तुम्हीसुद्धा टाका उडी या आगीत! मला नाही हे असे खपायचे!

**कंकण** : चल, हो दूर; खपायचे नाही तर दे माझा नाद सोडून! तुझ्यासाठी मी मरू की काय? संबंध काय तुझा माझा? अजून लग्नाला नाही ठिकाण आणि-

**सुदाम** : हं, कंकणा, एकवचनी रामाचा अवतार संपला वाटते?

**किंकिणी** : मी संपू देईन तेव्हा ना! त्यांचा माझा धर्मविवाह झाला नसला तरी गांधर्वविवाह झालेला आहे. आम्ही दोघांनी मनांनी एकमेकांना वरिले आहे, तेव्हा मलाही अधिकार आहेच.

**नूपुर** : अलबत; बायकापुरुषांना एकच न्याय! कंकण, व्हा पुढे आता; तुमच्या एकाही पूर्वजाने आगीत उडी टाकताना मागेपुढे पाहिले नाही हे आठवते ना?

**कंकण** : (स्वगत) मोठ्या बिडतीची वेळ आली आहे! आता मागे पाऊल टाकले तर चालण्यासारखे नाही! या वेळी आपणच अवसान धरून सर्वांनाच यात गुंतवावे झाले! यांच्यापैकी एकातसुद्धा आगीत उडी टाकण्याचे पाणी दिसत नाही! मीच ओढून चंद्रबळ आणले म्हणजे ताबडतोब यांची तारांबळ उडेल!

**नूपुर** : कंकण, आता कसला करिता विचार? किंकिणी, तू पुन्हा लाजलीस वाटते ? धर पदर तुझ्या भावी आणि चोरट्या नवऱ्याचा!

**कंकण** : माझा पदर धरतेस कशाला? तुझ्या पदराशी ह्याची गाठ दे म्हणजे झाले. या हिऱ्याच्या जोडीला हिरकणी आहे, आणि या लालाच्या जोडीला ही लाजाळू लालडी नको का? तुझी आणि या सुदामाची नजरानजर झाल्याचे माझ्याही नजरेस आले आहे!

**किंकिणी** : खोटे आहे हे! तुमची काही तरी नजरचूक झाली आहे! दुसरे कोणी असेल! कोणी सांगितले असे?

**कंकण** : या नुपुरानेच! आणि ते खोटे असले तरी काय झाले? खऱ्याखोट्याचा निकाल लावण्यासाठी तर ही आगटी पेटली आहे. मुकाट्याने हो पुढे!

**नूपुर** : वा:! छान चौकडा झाला आता! (कंकण किंकिणीस ओढतो.) (स्वगत) आता इथून अंग चोरावे; नाही तर हे जडावाचे काम आपल्याही अंगावर यायचे कदाचित्!

**कंकण** : ए बदमाश, चाललास कुठं चोरासारखा न विचारता? (त्याला धरून आणतो.)

**नूपुर** :अरे, असे काय करतोस? कोणी जायला निघाले तर त्याला विचारू नये. कुठे जातेस म्हणून! जाणाराचे काम होत नाही!

**कंकण** पण तू जातोसच कशाला? मीच करतो ना तुझे काम. या कोंदणाच्या चौकात तुझ्यासारखे झाकले माणिक तर जरूर पाहिजे! ज्याच्या त्याच्या कानाशी लागून तूच तर या भानगडी केल्यास! चल तू पण आमच्याबरोबर!

**नूपुर** : पण माझा काय संबंध?

**सुदाम** : मी सांगतो संबंध! दामिनीच्या मागे मागे हिंडताना तुला पाहिले आहे की नाही मी!

**कंकण** : आणि किंकिणीशी तर हजारदा बोलताना मी पकडले आहे याला; या दुहेरी पकडीतून कसा सुटणार तू?

**नूपुर** : हात्तिच्या! हेच ना? मला बायकांत बोलत बसण्याची मुळी लहानपणापासून सवय आहे ! पोरीबाळींत वाढलो मी. नाही मला कधी कधी करमत, तेव्हा बसतो बोलत कुणाशी तरी!

**सुदाम** : असे काय? घेतोस का शपथ, की दामिनी मला मातेसमान आहे म्हणून?

**नूपुर** : आता दामिनी मला मातेसमान आहे!

**कंकण** : आणि किंकिणी?

**नूपुर** :किंकिणी अजून कुमारिका आहे ! तिला मातेच्या पदवीला बसविणे म्हणजे तिची कुचेष्टा केल्यासारखी होईल.

**कंकण** : अरे चोरा, या चेष्टा चालायच्या नाहीत आता! हं, चला आता; कोण पहिल्याने उडी टाकणार?

**नूपुर** : क्रमाक्रमाने स्वारी काढावी! प्रथम दामिनीचा मेणा, मग सुदामाची शिबंदी, नंतर किंकिणीची पालखी, भरीला हा गलेलठ्ठ हत्ती, आणि साहेबी नौबतीला मी!

**दामिनी** : मी नाही यांच्या आधी जायची! माझ्या माहेरी सती जाण्याची चाल आहे! आधी हे, मागून मी ! मी का उगीच थोड्यासाठी सतीचे वाण हातचे घालवू?

**कंकण** : ठीक आहे! हे काही वावगे नाही.

**किंकिणी** : मलाही सतीच जायचे आहे!

**कंकण** : छट्, आपण शिपाई माणसे! आपले घराणे रजपूत घाटाचे! रजपूत जिवावर उदार झाला की त्याच्या बायकोने त्याच्या डोळ्यांदेखत जोहार करावा लागतो! मी झालोच आहे जीव द्यायला तयार, तेव्हा माझ्यादेखत तू जोहार कर! राहता राहिला नूपुर! तुझा काय बेत आहे ?

**नूपुर** : खरे म्हणाल तर मला सध्या मरतांच येत नाही! कारण मी केले आहे सोळा सोमवारांचे व्रत! आधी उद्यापन केल्याखेरीज मध्येच कसे मरता येईल? शंकराचे दैवत मोठे कडक! आधी व्रत करू नये, नी केले तर मध्ये सोडू नये!

**दामिनी** : नूपुरांनी ही आम्हा बायकांसारखी व्रते-उद्यापने कुठून आणली?

**नूपुर** : मी आधीच सांगितले आहे, माझे बायकांत बसणे-उठणे बरेच असते म्हणून !

**कंकण** : हे पाहा, या अडचणी बस करा आता! तुझ्या समाप्तीत या व्रताची समाप्ती आलीच !

**नूपुर** : तसे असले तरी तूर्त या दक्षिणायनात मरायला माझी काही तयारी नाही! संक्रान्त उलटेपर्यंत सारी भीष्माचार्याप्रमाणे शरपंजरी पडून राहू या!

**दामिनी** : ही संक्रान्त उलटते ती थोडी झाली का?

**नूपुर** : तुम्हाला थट्टा वाटते दामिनीबाई!

**कंकण** : कुठल्या जुन्यापुराण्या कहाण्या सांगत बसला आहेस! रामकाळच्या गोष्टी कुणास ठाऊक खऱ्या होत्या की खोट्या?

**सुदाम** : तसे म्हटले तर ही आपली दिव्य करण्याची गोष्ट तर अगदीच रामकाळची! कुणास ठाऊक खरी की खोटी?

**दामिनी** : (स्वगत) आमच्या स्वारीचा सेतु खचल्यासारखा दिसतो! (उघड) आता का कुणास ठाऊक? सगळ्यांना ठाऊक आहे की ही गोष्ट खरी आहे म्हणून!

**सुदाम** : तेव्हा खरी असली तरी चालू अवतारात तिचा खरेपणा कशावरून धरायचा? अवतार बदलल्यावर मग भलल्या गोष्टींबद्दल हाकाटी करीत बसायचे कारण नाही! अहो, प्रत्यक्ष रामाचीच गोष्ट घ्या ना! त्या अवतारी रामाचे नांव काढण्याची एखाद्या बाईची प्राज्ञा नव्हती, तेच रामनाम आज पोरीबाळींच्या हाती सापडले

आहे ना?

**कंकण** : आता पुराणे बंद! व्हा तयार सारीजणे! सर्व एकदमच जाऊ या! उगीच मागेपुढे नको! रहा एका दावणीत अशी! उडी टाकण्यापूर्वी म्हणण्यासाठी मी एखादे कवित आठवून ठेवतो. (पुढे होतो.)

**दामिनी** : कवित कशाला हवे? आपली रामरक्षा म्हणा झाले!

**किंकिणी** : रामामुळे तर सर्वांची रक्षा व्हायची पाळी आली आहे! आता निराळी रामरक्षा नको आहे!

**कंकण** : मी करतो त्याची व्यवस्था! तुम्ही आहात ना सर्वजण तयार?

**सर्वजण** : आम्ही आहोत तयार !

**नूपुर** :(स्वगत) ही स्वारी जरा मुळमुळ करायला लागली आहेसे दिसते!

**सुदाम** : (दामिनीस एकीकडे) माझा तुझ्याबद्दलचा संशय पार नाहीसा झाला आहे! तुला आहे का माझ्याबद्दल संशय? आपसांत तुटण्यासारखे आहे! पहा, उगीच वादंग नको! तडजोडीत गोडी असते!

**दामिनी** : (सुदामास एकीकडे) आता का? आता नाही मी तडजोडीला कबूल! मघाशी घर-

**सुदाम** : (दामिनीस एकीकडे) अगं, जरा हळू बोल! तो काळ ऐकेल ना!

**कंकण** : हं, आता कोणी कुजबूज करायची नाही! सुदाम, काय गडबड आहे तिकडे?

**सुदाम** : काही नाही; आमची घरगुती बाबत आहे थोडी! काही मागे निरवानिरव करण्याबद्दल तिला सांगत होतो! जरा पसारा मोठा आहे!

**कंकण** : अरे, पण तीही तुझ्याबरोबरच येणार ना वर?

**सुदाम** : मला भानच नाही राहिले त्याचे!

**कंकण** : आता कोणी बेभान होऊ नका! आणि खाजगी खटली पण काढू नका! अरे नूपुर, हे रे काय करतोस?

**नूपुर** : बरी वेळेवर आठवण झाली! तुम्हाला कवित पाहिजे ना? माझ्या वडिलांनी मरते वेळेस मला मरते वेळी म्हणण्यासाठी द्रौपदीचा धावा उतरून दिला आहे!

**सुदाम** : वडिलांनी द्रौपदीचा धावा दिला! त्यांचेहि बायकांत बसणे होते वाटते?

**नूपुर** : वर गेल्यावर त्यांनाच विचारतो बरे का हो! आपल्या हाताने त्यांनी धावा उतरून दिला आहे! अक्षर असे मोत्यासारखे आहे म्हणता! बघायचे आहे का

तुम्हाला? डोळ्याचे पाते लवते न लवते तोच घेऊन येतो घरून!

**कंकण** : हे तरवारीचे पाते दाखवू का? या ह्यिामाणकांच्या गर्दीत कशाला हवी तुझी वडिलोपार्जित मोत्यांची माळ?

**नूपुर** : बरे, थोडासा म्हणून दाखवितो. ऐका तर खरे! मला नुसते तोंडच येते आहे त्याचे; कडव्याला सुरुवात होण्यापूर्वी नुसते पालुपदच पाच सहा वेळा घोळून म्हणायचे आहे! बाकी मला गळ्यावर म्हणता येणार नाही! सुराइतक्या उंच आवाजात म्हणतो. प्रसंग आहे मोठा बहारीचा! पांडव लाक्षागृहात असताना द्रौपदीने आपले कंकण सोडले; तेव्हा भीमाच्या अंगाची आग होऊन त्याने लाक्षागृहाला आग लावून सर्वांची राखरांगोळी करण्याचे भय घातले आहे! तेव्हा खड्या सुरात द्रौपदीने टाहो फोडला आहे की, धावा हो धावा, या कंकणामुळे आज सर्वांची आगीत राखरांगोळी होते आहे! धावा हो धावा! (कंकण धावून येतो.)

**कंकण** : आलो हा धावून ! अरे चोरा, आता असा कांगावा करून गर्दी जमवितोस काय? भेकड, मरणाला इतका भितोस?

**नूपुर** : मरणाला काय भ्यायचे आहे! बोलून चालून ही धर्मशाळेची वस्ती! जन्माला आला तो मेलाच आहे! मरण हा मिथ्याभास आहे! लक्षचौऱ्याऐंशीचा फेरा मारून-

**कंकण** : वेळ मारून न्यायची ही कुसराई आहे वाटते? घाल पाहू तोंडाला एकदा कुलूप!

**सुदाम** : त्याची किल्ली आहेच तुझ्याजवळ. दाखीव एकदा तरवार त्याला!

**कंकण** : (पुढे होत होत) आता अखेरचे बजावून सांगतो की कोणी गडबड करू नका! मला अजून कवित आठवले नाही! (पुढे झाल्यावर स्वगत) हं मामला अगदी बिघडण्याच्या बेतात आला आहे. अजून यांच्यापैकी कोणीच निर्वाणीची धडपड करीत नाही; त्यामुळे मला माघार घेता येत नाही! हां- आता काही तरी आडमाप बोलून यांना भेदरून सोडावे म्हणजे कोणी तरी हाय खाईलच. (उघड) हं, आठवले मला एक कवित! तुम्ही सगळे ओळीने उभे रहा आणि डोळे घ्या झाकून! मी कवित मनात म्हणून मोठ्याने 'कालिकामाता की जय' म्हटल्याबरोबर एकदम उड्या टाका! डोळे बिलकुल उघडू नका ! आता तुम्हाला भीती वाटणे साहजिक आहे! कारण आगीत उडी टाकणे हे नवशिक्यांना अगदी प्राणसंकट आहे! आगीचा सर्वांगाला चटका बसताना कानाला दडे बसून धडड धडड असा हलकल्लोळाचा धूमधडाका आदळून भेरीदुंदुभिरवांनी चंडभैरव कडे कडड कडड कोसळून अखिल ब्रह्मांडकोटीत तागडधोम तागडधोम असा तांडव तडाका सुरू होतो. समजलास का सुदाम? भिऊ नका बाकी!

**सुदाम** : आले लक्षात! (स्वगत) स्वारी खात्रीने खचलेली दिसते.

**कंकण** : पुढे दुसऱ्या चटक्याला आग लावून धाडधाड ठिणग्या तडाडून आकाशपाताळ एकदम कडीकडाड धप्प! नूपुर, भ्यालात वाटते?

**नूपुर** : छट्, मेले कोंबडे आगीला भीत नाही! (स्वगत) अरे चोरा, थोबाडाच्या आखाड्यात हे आडदांड शब्द अशा पंजाबी पवित्र्यात उभे करून आम्हाला चीत करणार वाटते! मग कथ्थकाच्या नाचाचा एखादा तोडा का म्हणून दाखवीत नाहीस? धा तिरकिट धा-

**कंकण** : नंतर लागलीच चंडदंड उदंड कमंडलु खंडखंड खांडोळी भिंभड बंडाळी मंडुक पंडित श्रीखंडी तांडव शुंडादंड कंडु वितंडवाद-

**नूपुर** : कवित केले वाटते सुरू?

**कंकण** : छे:! हे नुसते आगीचे वर्णन आहे! इतक्यात भ्याला वाटते?

**नूपुर** : मुळीच नाही! आम्ही ठाण मांडून उभे आहोत!

**सुदाम** : बाकी तूसुद्धा आमच्यासाठी हे कष्ट घेऊ नकोस! आमच्या भीतीची कल्पना दे सोडून आणि चल लाग म्हणायला तुझे कवित!

**कंकण** : हं, म्हणतो! मला तुमच्याबद्दल फार वाईट वाटते!

**नूपुर** : हं, विवेकाने मन आवरले पाहिजे!

**कंकण** : बस्स ! बोलणे बंद, हालचाल बंद, डोळे बंद. आता डोळे मिटून घेतले की मग कायमची मिटण्याची वेळ आली तरी उघडायचे नाहीत. कोणी जरा उघडझाप केली तरी मी तिकडे डोळेझाक करायचा नाही! कोणी मागे पाय घेतला ऐन वेळी तर मुंडी छाटून टाकीन! मिटा डोळे! कवित म्हणायला सुरुवात करितो! (सर्व डोळे मिटून स्तब्ध उभी राहतात.) हं, कालिकामाता की जय! (सर्व पाय आपटतात.)

**सुदाम** : आई! आग! आई ग!

**कंकण** : सुदाम, ओरडतोस का असा?

**सुदाम** : अरे बाप रे, पायाला पहिला चटका बसून पेटायला लागलो आहे म्हणून ओरडलो! तू नाही कुठे ओरडलास?

**कंकण** : मी शिपाईगडी आहे! हूं का चूं केल्यावाचून मरणाला मी तयार असायचा! पण तो भेकड नूपुर कसा ओरडत नाही?

**नूपुर** : मी कसा ओरडणार? तोंडघशी पडून मी तोंडाकडून पेटत चाललो आहे; एव्हाना जीभ जळून खाक झाली आहे! मला कसे बोलता व ओरडता येणार?

**कंकण** : अरे चोरा, मग हे कसे बोलतो आहेस रे?

**नूपुर** : हे आतल्या आवाजात पडजिभेने बोलत आहे! (सर्व हळूहळू डोळे उघडतात.)

**कंकण** : फारच लांबल्यासारखी दिसते तुझी पडजीभ. डोळे उघडून बघून घेऊ द्या! अरे हरामखोरा, तू का डोळे उघडलेस?

**नूपुर** : आगीतून तुम्हाला माझी पडजीभ दिसते की नाही हे पाहण्यासाठी!

**कंकण** : अस्से काय! सुदामा, डोळे का उघडे?

**सुदाम** : माझे डोळे मघाशीच उघडले आहेत. पण तू आपले डोळे फाडून पाहू लागलास तेव्हा मी मुद्दाम डोळेझाक केली!

**कंकण** : (स्वगत) सारेच भ्याले आहेत; आता जरा नेट धरला पाहिजे. (उघड) मला वाटलेच होते, तुम्ही असा अवसानघात कराल म्हणून! पण माझ्याजवळ अशी लटपट चालायची नाही! मिटता की नाही डोळे पुन्हा, की काढू तरवार? आता फिरून डोळे उघडण्यापूर्वी आधी माझ्या तरवारीकडे पाहा आणि मग डोळे उघडा! हं मिटा डोळे!

(पुन्हा पहिल्यासारखे उभे राहतात; ईश्वर येतो.)

**ईश्वर** : मूखानो, उघडा पाहू डोळे! चांगले असून असे का आंधळ्यासारखे आडरानात शिरता? (सर्व डोळे उघडतात.)

**नूपुर** : (ईश्वराचे पाय धरून) मला पुरेपूर पश्चात्ताप झाला आहे!

**ईश्वर** : चला, दूर न्या हे आपले सोंग! सुदाम, काय म्हणावे तुम्हाला? आज पडत्या प्रहरी आपले या बाबतीत खातरजमेचे बोलणे झाल्यावरसुद्धा असा प्रकार करिताना तुम्हाला लाज वाटायला हवी होती! कंकण, इथेच तुमच्या मर्दुमकीच्या मिरवणुकीला मोकळे मैदान मिळावे ही मोठ्या नामुष्कीची गोष्ट आहे.

**कंकण** : अहो, या सुदामाने, आणले हे कड्याळ! आमचा दिल पहिल्यापासून पाक आहे.

**ईश्वर** : काय एकेक जमले पहा! एकाला आपल्या स्त्रीचा अष्टौप्रहर संशय, तर दुसऱ्याला सारी स्त्रीजात आपल्यावर फिदा असल्याची खात्री! आणि तिसरा साऱ्या स्त्री-पुरुषांना पाजी ठरवणार! तुमच्यासारख्या कच्च्या कानाच्या, मळक्या मनाच्या, आणि हिडीस हृदयाच्या लोकांना उपदेश तरी कसला करायचा! बायकांबद्दल

बाष्फळपणाने बडबडणाऱ्या बेशरम बेवकुबांना बाजाराच्या चव्हाट्यावर चाबकाने चोपून काढले तरच तुमची ठीक सरबराई केल्यासारखी होईल. संसाराच्या सिंहासनावर ज्या मंगलमय देवतेला बसवायची तिच्याबद्दल अमंगल अंतरंगाच्या किडक्या कल्पना बाळगून तिला एखाद्या नाठाळ जनावरासारखे वागवायचे हा केवढा अधर्म आहे! सुदाम, तुमची खातरजमा करून देण्याचे कबूल केल्यावर हा पोरखेळ करण्याचे कारण नव्हते!

**सुदाम** : अहो, हे नूपुरासारखे लोक त्याच्यावर क्षणभरसुद्धा विश्वास ठेवणार नाहीत!

**ईश्वर** : असल्या लोकांकडे मुळीच लक्ष देऊ नये. असल्या लोकांची वाटेल ती बोलणी ऐकायला आपली तयारी असावी हे उत्तम.

**नूपुर** : सुदाम, यांच्या बोलण्यातल्या बऱ्याच गोष्टी घेण्यासारख्या आहेत म्हणे!

**कंकण** : किंकिणी, पाहिलेस का एकेकाचे बोलणे किती भारदस्त असते ते!

**ईश्वर** : मित्रहो, जरा कडक बोललो याची माफी करा!

**कंकण** : भलतेच ! रास्त बोलायला कोणाची चोरी आहे काय? जर कोणी तुम्हाला दोष देऊ लागला तर मला सांगा, बोल बोल म्हणता त्याची जीभ उतरून ठेवतो!

**ईश्वर** : ठीक आहे. सुदाम, चला. तुमच्याशी मला पुष्कळ गोष्टी बोलायच्या आहेत

**सुदाम** : मित्रहो, आपण आता पुन्हा केव्हा तरी भेटू! चला. (ईश्वराशिवाय सर्व जातात.)

**ईश्वर** : (स्वगत) या सुदामाला दामिनीच्याबद्दल खरी हकिकत सांगून आपलासा करून घेतला तर फारच चांगले होईल; भूपालांच्या शृंगारमंदिरावर आणि तळघरावर याचा आणि कंकणाचा आळीपाळीने पहारा असतो! कंकण किंकिणीमुळे माझ्या म्हणण्याप्रमाणे वागतोच, आणि हाही साध्य झाला म्हणजे वाटेल त्या ठिकाणी वाटेल तिथे प्रवेश सुगम होईल!

## प्रवेश चवथा

(ईश्वर प्रवेश करितो)

**ईश्वर :** (स्वगत) दामिनी रात्रभर बाहेर राहिली आणि तिला दागिन्यांचा साज मिळाला, यामुळे संशयी सुदाम इतका खवळून जाऊन त्याने असे अनन्वित आकांडतांडव करावे हे त्याच्या स्वभावाला साजेसेच झाले! सर्व गोष्टींचा नीटपणे खुलासा करण्याचे अभिवचन देऊन त्याची समजूत घालताना मला पुरेसे झाले! किंकिणीमुळे कंकण आणि या गोष्टीमुळे सुदाम आता पूर्णपणे माझ्या कह्यात आलेले आहेत;

भूपालाच्या वाड्यावर त्या दोघांचाच आळीपाळीने पहारा असल्यामुळे आता प्रसंग पडलाच तर वाड्यात केव्हाही प्रवेश करणे अगदी सुगम झाले आहे! आता भूपालाला वृंदावनाने वसुंधरेच्या तळघराकडे का नेले त्याचा तपास करावा!

(जातो.)

## प्रवेश पाचवा

(स्थळ : तळघर; वसुंधरा दीनाराच्या रिकाम्या पाळण्याला झोके देत आहे.)

**वसुंधरा :** (नीज सुखे विश्रांतिसि.)

नीज गुणी बाळ झणी शांत यावरी ।
गाउं किती कुंठितं मति नीज झडकरी ॥१ ॥
हृदयाचा केला हा पाळणा नवा ।
बांधाया ममतेचा पाश मग हवा ।
हत्तरंग हलवि तया करुनि मुदुरवा ।
ब्रह्मसगुण बाळरूप रमत अंतरी ॥१ ॥

(स्वगत) दामिनीला ते गाणे म्हणू नकोस म्हणून मी सांगितले; पण माझ्या मनात ते सारखे नाचत आहे ! त्यातली शब्दांची शोभा नको; अर्थाकडे लक्ष लागत नाही; नुसते गाणे म्हणत राहावेसे मात्र वाटते ! एकेकदा वाटते, की हृदयातून उचंबळून निघणाऱ्या त्या गाण्याच्या सुरांबरोबर अश्रूंचा पूर ओतून हा रिता पाळणा वत्सलरसाने तुडुंब भरून काढावा ! देवा, मी काय करूं ?

(पियाके मिलनकी)

जिवास बसुनि हा घाय । दयाघना । घडिघडि छळित कसा
अजुनी रुजत ना । हृदय करिल हे काय ॥ध्रु. ॥ निकटिं
न तान्हा । फुटला स्तनिं पान्हा । आता होई निरुपाय ।
नावरे मना ॥१ ॥

पण अशाने स्वीकारिलेल्या कठोर व्रताचा भंग होईल ! त्या गाण्यात एवढी काय जादू आहे कुणाला ठाऊक! अभिमन्युकुमार रणांगणी पडले. 'कृष्ण अर्जुन आले शिबिरात !' त्यांना पाहताच सगळ्यांना ब्रह्मांड कोसळल्यासारखे

वाटले ! 'राजे बसले अधोमुख.' एवढे मोठे बळिवंत भीमसेन ! अर्जुनाने विचारल्याबरोबर बिचाऱ्याला मोठ्याने बोलवेना. 'पुसे भीमाला बाळ कुठे गेला ?'

(भूपाल मागे येऊन उभा राहतो.)

**भूपाल** : वसुंधरे, आपला बाळ कुठे गेला ?

**वसुंधरा** : 'हळूच सांगे बाळ रणीं पडला.' असा प्रसंग वैऱ्यावर सुद्धा येऊ नये !

**भूपाल** : (मोठ्याने) वसुंधरे, आपला दीनार कुठे आहे ?

**वसुंधरा** : (उठून; पाहून स्वगत) कोण? माझे अर्जुन! या एवढ्याच प्रसंगाला मी भीत होते! देवा, या वेळी मला यमाची निष्ठुरता दे! अश्रूंनो, आता माझा घात करू नका!

**भूपाल** : आर्ये, आपला दीनार कुठे आहे?

**वसुंधरा** : नाथ, कोणाचा दीनार? दीनार आपला नव्हता! दीनार माझा नव्हता! दीनार तुमचा नव्हता; दीनार देवाचा होता!

**भूपाल** : आपल्या पहिल्या प्रीतीचा साक्षीदार-

**वसुंधरा** : आपल्या प्रेमाची, माझ्या उज्ज्वल शीलाची साक्ष देण्यासाठी-तुमच्या नावाची द्वाही फिरविण्यासाठी देवाच्या दरबारी निघून गेला! आईच्या अब्रूसाठी आपला चिमणा शिपाई लढता लढता गारद झाला! संसाराच्या सारीपटातला प्रेमाचा पहिला डाव देवगजाननाला दिला! देवाचे देणे देवाघरी पावते झाले! देवाचा आत्मस्वरूप दीनार देवाशी एकजीव झाला! जड जगाचा देहमात्र दीनार मेला! आपला प्रेमस्वरूप दीनार या पाळण्यात खेळत आहे!

**भूपाल** : वसुंधरे, या रिकाम्या पाळण्यात मला दीनार कसा दिसणार?

**वसुंधरा** : मग या रिकाम्या जगात आपल्याला परमेश्वर तरी कसा दिसणार? नाथ, असे मायावश होऊ नका! इहलोकी क्षणमात्र संलग्न होणे एवढाच खरा संबंध असतो!

(सावरियाने जियरा.)

क्षणैकमात्र जरि हे संलग्न जीव झाले । तुटे परी प्रसंगी
संबंध अचिरकाले ।।ध्रु.।। वसतिस्थळ एक तरी असति
दशा विविध तया। भिन्नकार्य जीवजात भिन्नगतिहि
जगती या । खिन्नता न उचित विरही, दुर्जय जरि माया ।

फसवीत मोहजाले ॥१॥

पतिव्रतेची जबाबदारी जाहीर करण्यासाठी देवाने दीनाराला जन्माला घातले; त्याची वेळ आल्याबरोबर आपले कार्य आटोपून, देवाचा निरोप कळवून त्याला जावे लागले! जगाच्या जामदारखान्यात एक रत्न कायमचे जमा झाले! दीनाराच्या इथल्या वसतीपुरते ते जोखमीचे जवाहीर देवाने आपल्या विश्वासावर टाकिले हेच आपले महाभाग्य! देवांच्या कार्यासाठी स्वर्गातून पाताळाकडे अमृतकुंभ नेताना गरुडाने यमुनातटीच्या कदंबावर क्षणमात्र विसावा घेतला आणि त्या अमृतकुंभाच्या स्पर्शमात्राने कदंबवृक्ष अमर झाला; त्याचप्रमाणे दीनाराच्या नामस्पर्शाने आपण अजरामर होऊ! लोकांत मुलाला आशेने 'चिरंजीव' म्हणतात, पण आपल्या मुलाने आपल्याला खरोखरीच चिरंजीव केले! एवढ्यानेच आपण धन्य झालो! स्मरणमात्रापुरताच दीनार खराखुरा आपला! हे भाग्य सुंदर नाही का?

**भूपाल** : आर्ये, पुत्रशोकाच्या भ्रमाने का तू हे बोलत आहेस? साक्षात् कालकन्या रात्र सुद्धा दिवसाच्या उदयकाली आपली तेजस्वी बाळे पटापट मरताना पाहून ढळढळा दवाची आसवे ढाळते! आणि तुझ्या डोळ्यातून अश्रूचा एक बिंदू सुद्धा का पडत नाही!

**वसुंधरा** : एवढ्यामुळेच रात्रीला 'निशा' असे म्हणतात. नाथ, मी का रडू? दीनाराचे एखाद्या रोगराईने बरेवाईट झाले असते तर मात्र आपल्या मातेच्या यौवनाचा नाश करून पित्याच्या दृष्टिसुखाआड येणाऱ्या त्या क्षुद्र कीटकाचा माझ्या पोटी जन्म झाला म्हणून धाईधाई रडत बसले असते. पण आता मी का रडू? दीनार क्षात्रमरणाने वीरांच्या सद्‌गतीला गेला, ऐंशी वर्षे कुजत पडून राहणारालाही दुर्मीळ यश आठ महिन्यांच्या चिमण्या आयुष्यात मिळवून माझा बाळ हसत चालता झाला, आणि मी रडत बसू? नाथ, मला रडण्याचा अधिकार नाही! मी कोणत्या नात्याने रडू? एकदा एका अनाथ पतिव्रतेच्या लज्जारक्षणासाठी बाबांनी पन्नास आडदांड बेशरमांच्या हत्यारबंद टोळीत एकट्यांनी उडी टाकून कपाळावर जखम करून घेतली! पुढे वीरसभेत बसताना त्या जखमेचा वण झाकून जाऊ नये म्हणून मंदिलाचा मोत्यांचा शिरपेच बाबा नेहमी काढून टाकीत; नाथ, त्या वीरपुरुषाची मी वीरकन्या! एकदा आपण शक्तिसेनाबरोबर त्यांच्या दिवाणखान्यात बोलत असताना एक फाटक्या कपड्यांची भिकारीण तिथे आली. आपल्याला पाहून छातीवरचा फाटका पदर नीट सावरण्यासाठी तिने ओढला तोच दुसऱ्या फाटक्या भागामुळे तिची गरीब लाज बाहेर पडली आणि हे पाहून शक्तिसेन हसले! स्त्रीजातीच्या एवढ्याशा उपमर्दामुळे खवळून आपण शक्तिसेनासारख्या बलाढ्य सरदाराचा तिथल्या तिथे शिरच्छेद केला! नाथ,

आपणासारख्या स्त्रीजातीच्या अभिमानी वीरसिंहाची मी वीरपत्नी! आठ महिन्यांच्या अल्पावधीतच माझा दीनार आईची लाज राखण्यासाठी क्षात्रमरणाने देहाचे सार्थक करून, अलोट पुण्याई संपादून देवलोकी गेला! नाथ, दीनारासारख्या वीरबालाची मी वीरमाता! वीरकन्या, वीरपत्नी, वीरमाता,- सांगा, नाथ, सांगा-मी कोणत्या नात्याने रडू? माझे जिव्हाळ्याचे जग पुत्राच्या मंगल महोत्सवाने मला हसायला सांगत नाही का? शिवाय मी जर आसवे गाळली तर त्या उदकामुळे जे देवाचे देणे होते त्याला दानाचे रूप येईल! दीनाराला मारणारा देव आपला लागणेकरी होता, आपल्या दारचा भिक्षेकरी नव्हता! मग दीनारासाठी रडण्याचे काय कारण आहे बरे? नाथ, एका दीनाराची काय कथा, पण केसागणिक दीनारांचासुद्धा आपल्या नावासाठी बळी देताना मी रडले नसते!

**भूपाल** : देवी, आज तुझ्या जिभेवर ही कोणाची रसवंती नाचत आहे? तुझ्या मातृप्रेमपूर्ण कोमल हृदयात हा राक्षसी क्रूरपणा कुठून आला !

**वसुंधरा** : हा क्रूरपणा दीनाराच्या आईचा नाही, पण भूपालांच्या पतिव्रतेचा आहे! हा कर्तव्याचा पवित्र क्रूरपणा आहे! संसारधर्माच्या कर्तव्यासाठी-अवश्य कर्मासाठी प्रियतम सुखाचा हा संन्यास आहे! हा सर्वस्वाचा त्याग आहे! हा जर राक्षसी तर तुमच्या वीरधर्माच्या शौर्यालासुद्धा 'राक्षसी कसाबकरणी' म्हणावे लागेल! ज्या कर्तव्याच्या नावावर रणांगणात वीरांचे बळी घेता येतात त्याच कर्तव्यासाठी आपल्या जिवलग जिवावरही उदार व्हायला नको का ?

**भूपाल** : अहाहा! आर्ये, देवी,

(पूर्वी अधरोष्ठावरि.)

पुण्यमय तव मूर्ति पहाता खनि जी केवल तेजाची ।
इंद्रही झांकिल नेत्रिसहस्रा काय कथा मग इतरांची ।
देवी त्रिपुरेश्वरी प्रतिष्ठा करि का देही या साची ।
दर्शनमात्रे जाळुनि टाकी विश्वे सारी पापाची ॥१॥

धन्य माझे भाग्य, की या पवित्र देहाच्या अलिंगनाने मला माझ्या जन्मजन्मान्तरीची पातके जाळून टाकिता येत आहेत! दशार्णकलावतींच्या अलिंगनाचा चमत्कार आज मृत्युलोकाच्या पुन्हा दृष्टीस पडेल!

(तिला आलिंगन द्यावयास जातो.)

**वसुंधरा** : नाथ, क्षमा करा, मी व्रतस्थ आहे! दीनाराच्या देहाने या अघोर व्रताचे उद्यापन झाले की नाही ते अजून मला पहायचे आहे! देवाची अजून माझ्यावर पूर्ण कृपा झाली नाही!

**भूपाल** : ईश्वरी इच्छेच्या महामंत्राचा पुरुष नुसता जप करितात, पण त्याचा विधि करणे मात्र आमच्या या गृहदेवतांनाच शक्य आहे! वसुंधरे, असा कोणता परमेश्वर आहे, की जो तुझ्याकडे अजून कृपादृष्टीने पाहात नाही?

(वृंदावन पुढे येतो.)

**वृंदावन** : भूपाल, माझ्या प्रश्नाचे उत्तर मिळायला वेळ होत आहे! तुझे प्राण की वसुंधरेचे पातिव्रत्य? कशाचा बळी देणार? सांग!

**भूपाल** : वृंदावन, हे पाहा माझे प्राण तुझ्या स्वाधीन आहेत!

**वृंदावन** : (स्वगत) शाबास मंडलेश्वर! माझा हात धरून, मला धीर देऊन रणांगणात नेणारा माझा सेनापती-चुकून तुला मुजरा केला असता तर-वसुंधरेच्या बापाचा निर्णय बरोबर होता. हीच मान वसुंधरेच्या हाराला योग्य आहे. (उघड) कोण, मघाचा विचारी भूपालच बोलतो आहे का हे?

**भूपाल** : मघाचा पंचप्राणांचा लोभी धनी नाही, तर या पतिव्रतेच्या महापूजेचा अधिकारी परमेश्वर! या क्षुद्र जीवाचा लोभ धरला तर मी या महापूजेला अपात्र ठरेन! या देवीने आपल्या हृदयाच्या सिंहासनावर पंचप्राणांच्या प्रभावळीत बसविल्यामुळे मला आज परमेश्वराची योग्यता आली आहे.

**वृंदावन** : मघाच्या तुझ्या बोलण्याचा तुला विसर पडला वाटते? प्राणांचे महत्त्व इतके क्षुल्लक आहे का? प्रत्यक्ष प्राणनाशाला तयार होत आहेत?

**भूपाल** : त्या विचाराची आता आठवणसुद्धा नको !

(घोर घोर गरजत.)

प्राणनाश नच परि जन्म नवा ।

या मरणे मिळवी मिरवी तवि जन दिव्य पुण्यप्रभावा ॥ध्रु. ॥

हतलाभाहुनी त्याग सुखाचा शतपट बरवा ॥१ ॥

या योगिनीचा पुण्यप्रभाव काय करणार नाही? वृंदावन, पतिव्रताच्या प्रभावामुळे पुरुषार्थाचा परमेश्वर जागृत होतो ! आताच या देवतेने काय सांगितले? गृहस्थधर्माच्या अवश्य कार्यासाठी मला प्राणांचाही त्याग करायला नको का? शुष्क बुद्धिवादाने जग चालणार नाही! भावनांच्या रसरंगात बुद्धीचे तेज मिसळले तरच हृदयाचे समाधान होते! तेजाला रसाची जोड देण्यासाठी मानवी करामतीने कारंजाच्या जलधारातून दीपकिरणे खेळविली आहेत! बुद्धितेजाचा हृदयरसाशी

प्रीतिसंगम पाहण्याची हौस पुरविण्यासाठी मानवी कल्पनेने तेजोमय चंद्रकान्ताला शीतळ पाझर फोडिलेले आहेत! वृंदावन, आता उशीर करू नकोस! ही पाहा माझी मान! उपस आपली तरवार; मात्र अशा सफाईने हात फिरवशील की, माझे तुटलेले मस्तक नेमके वसुंधरेच्या पायाशी जाऊन पडेल! देवी, तू आपली पुण्यदृष्टी माझ्याकडे लाव; म्हणजे मरताना शेवटी डोळ्यात एकवटलेल्या जीवाच्या तेजस्वी तारा तुटता तुटता तुझ्या दृष्टीच्या किरणांशी एकरूप होतील!

**वृंदावन** : वसुंधरे, तुझ्या अविचारी नवऱ्याचा हा निश्चय तुला कबूल आहे का? तुझीसुद्धा या प्रकाराला संमती असेल तर मात्र परमेश्वराचे नाव घेण्याची नाटकी संधी दिल्यावाचून मी याचे मस्तक उडवून टाकीन!

**वसुंधरा** : (स्वगत) देवा, आता मी काय करू? पतीचे प्राण किंवा पतिभक्ति? बांधलेली पूजा मोडू की देवाची मूर्ती फोडू? काय करू? देवा, सर्वसाक्षी देवा, आता मात्र माझा धीर खचला!

**भूपाल** : नको, नको, पतिव्रते, या नश्वर रक्तामांसाच्या लोभाने आता भलता विचार मनातही आणू नकोस! माझी एक विनंती मात्र मान्य कर! आर्ये, देवी,-नाही, अपरिचित शब्दाने तुला संबोधल्याबद्दल मला पुरुषजातीने दोष दिला तरी चालेल; दश पुत्रांना जन्म देणाऱ्या पत्नीला पतीने मातृपदाने संबोधून तिचा सत्कार करावा अशी धर्माज्ञा आहे; पण एकाच पुत्राला योग्य मरण दिल्यामुळे मी तुला त्या पदी बसवीत आहे; अनसूयेने पातिव्रत्याच्या पुण्याईने ब्रह्माविष्णुमहेश्वरांना बाळरूपाने मांडीवर खेळविले. हा पाहा पुरुषार्थाचा भलता अभिमान सोडून दिला. आर्ये, माते, माते, माझ्या मस्तकावर हात ठेवून मला आनंदाने निरोप दे! (तिला वंदन करितो-वृंदावन तोंड फिरवितो.)

**वसुंधरा** : (स्वगत) काय पाहिले मी हे? डोळ्यात तरंगणारा अश्रुबिंदू लपविण्यासाठी वृंदावनांनी तोंड फिरविले! खास, वृंदावनांचे अंतःकरण अजून पुरते मेलेले नाही! त्यांची राक्षसवृत्ती वरवरची आहे! ते माझ्याकडे किंवा माझ्या पतीच्या तोंडाकडे पाहात नाहीत. क्रूर निश्चयाचे शब्द उच्चारताना ते घुटक्या गिळतात, त्यांच्या पापण्या जलदीने उघडझाप करितात; मघांशी नाथांच्या आवेशाकडे ते दचकून सादर दृष्टीने पाहत होते; आणि आता नाथांनी मला वंदन करिताच

त्यांच्या डोळ्यात पाणी आले! वृंदावन, या एकाच अश्रूंत तुमच्या अन्यायांच्या कोटी उजळून निघतील!

**वृंदावन** : वसुंधरे, तुला काय बोलायचे ते लौकर बोल !

**वसुंधरा** : वृंदावन, माझ्या पतीचे प्राण घेऊ नका! तुम्ही सांगाल त्या वेळी तुमची भेट घेण्याला मी तयार आहे!

**भूपाल** : आर्ये, काय बोलतेस हे?

(आइलो कालि घटा.)

हृदया कापितसे तापद वच व्यापि तसे विष जिवासि ।।ध्रु. ।।

देवी, उदार मने दे आज्ञा या जनासी ।।१ ।।

**वसुंधरा** : नाथ, तुम्हाला माझी शपथ आहे, तुम्ही अगदी निर्धास्त असा!

(कान्हा मुरली वाजे.)

नाथ भय न राही । तिळही काही ।।
दुरित हरिल तो हरि लवलाही ।।ध्रु. ।।
साक्ष तदीय पटुनि झणिं अंतरि।
जरि संकट घन धीर ये तरिहि ।।१ ।।

अंतरीच्या आणभाकेला गुंतलेला भगवान् मला अंतर देणार नाही! त्याची मनोमन साक्ष मला पटली ! ज्या जगदीश्वराने हे संकट आणिले त्यानेच ते दूर केले पाहिजे; नाहीतर आपल्यावर विश्वासून बसलेल्या पतिव्रतेची विटंबना पाहण्याचे पाप देवाच्या दुर्दैवी येईल! वृंदावन, तुमचा संकेत मला मान्य आहे!

**वृंदावन** : वसुंधरे, आज रात्री तुमच्या शृंगारमंदिरात तुला माझ्या गळ्यात हार घालावा लागेल!

**वसुंधरा** : नाथ, या दासीला एकदा आपला आशीर्वाद तेवढा द्या म्हणजे मी कळिकाळालाही भिणार नाही. (त्याच्या पायांवर मस्तक ठेविते.)

**भूपाल** : आपल्या कुलपूर्वजांची पुण्याई तुझे रक्षण करो.

**वृंदावन** : वृंदावन, तुमच्या रूपाने ईश्वर साक्षी आहे, की माझ्या पतींनी मला आशीर्वाद दिलेला आहे!

(पडदा पडतो.)

## अंक पांचवा समाप्त

## अंक सहावा
# प्रवेश पहिला

(नूपुर प्रवेश करतो.)

**नूपुर** : (स्वगत) जित्याची खोड मेल्याशिवाय जात नाही म्हणतात ते काही खोटे नाही! या बाईच्या बाबतीचा मोह काही सुटत नाही! एवढ्या रात्री ही बाई एकटी या स्मशानात का जात आहे? काहीतरी कुलंगडे आहे खास! बाईबरोबर बारदानही बरेच दिसले! मग का जडजोखीम आहे, की उताराधुतारा आहे, की मेलेले मूलबीलच आहे? मोठी चुटपुट लागली आहे मनाला! काळोख पण कसा मी म्हणतो आहे; म्हणून एकट्याला जायची छाती होत नाही! त्यातून आज अमावास्या म्हणजे भुताखेतांची पुरी चांदरात! आज सारी भुतावळ उजळमाथ्याने मिरवायला निघायची! (राजा येतो.) अरे बापरे, हे कोण? का नाव घेतल्याबरोबर भूत दत्त म्हणून पुढे उभे? बाकी मी दत्त म्हणून उभा राहिलो तर ते नाहीसेही होईल! तूर्त दबा धरून बसावे हेच उत्तम!

**राजा** : (स्वगत) भूपालासारख्या अगदी निकटच्या आप्तानेच दगलबाजी केल्या दिवसापासून मनाची जी चलबिचल उडाली आहे, तिच्यामुळे अशा रीतीने वेषांतर करून लोकांत रात्री अपरात्री वावरण्याचा हा नवीनच हृद्रोग मला जडू पहात आहे.

**नूपुर** : (स्वगत) हा, आता आठवली युक्ति! (उघड) अहो, रामराम!

**राजा** : (चपापून स्वगत) हा एवढ्या रात्री असा अनोळखी रामराम कुणाचा?

**नूपुर** : (स्वगत) बापरे, हा तर खांबासारखा निश्चल उभा आहे! आता मलाच राम म्हणावा लागतो की काय? (उघड) अहो, रामराम म्हटले ना?

**राजा** : (स्वगत) हा खरा जुलमाचा रामराम. (उघड) रामराम!

**नूपुर** : (स्वगत) भूत खास नाही. (उघड) कोण आहे ते?

**राजा** : तुम्ही कोण आहा तेच सांगा ना?

**नूपुर** : मी गस्तवाला आहे! हा प्रश्न माझ्या अधिकारातला आहे! कोण आहां तुम्ही?

**राजा** : रयत!

**नूपुर** : रयत! कोणाची रयत? कुठली रयत?

**राजा** : राजाची रयत! परगावचा आहे मी.

**नूपुर** : राजाची रयत! अस्से काय! राजाची रयत कशाला अशा रात्री निघाली आहे मसणात जायला! अरे चोरा, संकेत बोल पाहू?

**राजा** : रस्त्यावर कसला आला आहे संकेत? हा राजवाडा आहे का? मी खात्रीने सांगतो तू गस्तवाला नाहीस! गस्तवाला असतास तर आधी असा दडून बसला नसतास, मग मला रामराम केला नसतास आणि अखेरीस असे वेड्यासारखे विचारलेही नसतेस!

**नूपुर** : भल्या मनुष्य, बरोबर ओळखलेस तू! मी खरेच गस्तवाला नाही! मी या नगरचा राजा असून सध्या वेषांतर करून नगरसंचारार्थ फिरत आहे. मला नेहमी राजवाड्याची सवय म्हणून संकेत विचारला.

**राजा** : राजवाड्यात तरी राजा संकेत विचारतो वाटते? आणि मी परगावचा असलो तरी आपल्या महाराजांना चारसहा वेळा पाहिले आहे.

**नूपुर** : वेषांतर केले आहे ना मी?

**राजा** : वेषांतराने फार झाले तर तरुणाला वृद्धाचे सोंग आणिता येईल; पण वृद्धाला असे तरतरीत तरुण कसे होता येईल? तू राजाचे नाव चोरतो आहेस!

**नूपुर** : शाबास, तुला आपल्या महाराजांचा मोठा अभिमान आहे. तुला खरे सांगायला हरकत नाही! मी राजाच्या विश्वासातला राजवल्लभ आहे.

**राजा** : माझा नाही आता विश्वास बसत या बोलण्यावर!

**नूपुर** : तुझा कशावरच विश्वास बसत नाही तर ती बाबतच सोडून दे! तूर्त मी तुला निराळीच गोष्ट सांगतो. कान कर तुझा इकडे पाहू (कानात सांगतो.)

**राजा** : (स्वगत) हा म्हणतो ते खरे असेल तर जाऊन पाहिलेच पाहिजे. (उघड) हे तरी खरे आहे का?

**नूपुर** : चल प्रत्यक्षच पाहा! (दोघेही जातात.)

## प्रवेश दुसरा

(स्थळ-स्मशान; कालिंदी 'अभिमन्यु' हे गाणे पुटपुटत कुदळीने खळगा खणीत आहे; जवळच मुलाचे प्रेत. शेजारी अर्धवट जळत असलेली चिता.)

**कालिंदी** : (थांबून) पांडव चांगले पुरुषासारखे पुरुष असून त्यांनी अभिमन्युबाळासाठी

का बरे असे रडावे? अर्जुनासारख्या नामवंतानेसुद्धा त्या वेळी टाहो फोडला! ‘अरेरे भीमा मोठा घात झाला! हिरा पदरीचा सुटुनि पडला! पुत्रवियोगे देह विपरीत झाला! येउनी कृष्णांनीच धरिला.’ प्रत्यक्ष भगवंतांच्या तोंडून अठरा अध्याय गीता ऐकूनसुद्धा अर्जुनाची ही दशा झाली, मग स्त्रीजातीच्या सुभद्रामाईने फार आकांत केला यात काय नवल! ‘माझा सौभद्र मजवरि का रुसला। स्तनी माझ्या पान्हा आला! बाळ लहान रणी कुणी नेला। काय पाहू उत्तरेला!’ धन्य आमच्या वसुंधराबाईंची! देखताडोळा एवढा अनर्थ झाला पण माउलीने डोळ्याला पाणी येऊ दिले नाही! उलट मलाच तिने रडू नकोस म्हणून धीर दिला! बुरख्याबाहेरच्या दामिनीला ती आज्ञा ऐकावी लागली, पण बुरख्याच्या आतल्या कालिंदीच्या जिवाचे मात्र आतल्या आत पाणी झाले. पण त्या वेळी आतल्या आत गिळिलेले अश्रु-हे पाहा आलेच! देवी वसुंधरे, क्षमा कर! आता माझ्याने धीर धरवत नाही! नका, हे अनंतयुगसाक्षी तारांनो, या अभागिनीकडे अशा वसुंधरेच्या रागाने पाहू नका! तुम्ही तीनकाळच्या साक्षिणी आहा! सत्त्वधीर हरिश्चंद्राची ताराराणी, राजबिंड्या रोहिदासाचे अशाच रात्रीच्या वेळी सरण रचताना, ढळढळा रडलेली तुम्ही पाहिली आहे ना? चिमुकल्या चिलयाला चिरताना त्याच्या रक्ताच्या ओघात, यतिवेषी कैलासनाथाने आज्ञा करण्याच्या आधीतरी, चांगुणेने आपल्या अश्रूंचा ओघ मिळविल्याचे तुम्ही ऐकले आहे ना? झाले तर मग, मोठमोठ्या मायमाउलींना असे झाले; मग या अजाण पोरीचा अंतरंगीचा उमाळा असा उचंबळून अनावर झाला तर तिला का बरे दोष देता? हृदयाचेच पाणीपाणी झाल्यावर त्याचा उचंबळा कसा आवरणार!

(राजा व नूपुर येतो.)

**राजा** : (नूपुरास एकीकडे) असे एकीकडे उभे राहून या अर्धवट उजेडात आधी नीट पाहू या.

**कालिंदी** : उगीच रडून काय होणार? सुभद्रेची पुण्याई सबळ; तिची किंकाळी ऐकताच, नरनारायणांनी उठून, चंद्रज्योतीच्या उजेडात सारे रणांगण पायांखाली घातले आणि अभिमन्युबाळाला हुडकून काढिले! आणि इथे ही एवढी अर्धवट जळती चिता काय ती माझ्या बाळावर आपला उजेड पाडीत आहे; पण ही जीवज्योती असल्यावर त्या नुसत्या चंद्रज्योती घेऊन काय करायचे आहे? हे जळत्या जीवराजा, या असहाय अबलेवर या वेळी केवढा उपकार केलास; तिचा दुबळा आशीर्वाद तुला स्वर्गलोकापर्यंत सोबत करील.

**नूपुर** : (राजास एकीकडे) अहो, मला वाटते एकदम पुढे होऊन करावा सुरू चौकशीचा मारा!

**राजा** : (नूपुरास एकीकडे) थांबाहो, तुम्हाला काळवेळ काही कळते की नाही?

**नूपुर** : (राजास एकीकडे) तुमच्यासारखा जख्खड बरोबर असल्यावर तरुणांना काळवेळेचे काय भय ! अहो राजे, तुम्हाला स्मशानवैराग्य प्राप्त झाल्यासारखे दिसते!

**कालिंदी** : झाला हा खळगा तयार! आता चार धोंडे जमविले पाहिजेत! (इकडे तिकडे पाहून) अगंबाई, हा शेजारीच कोरडा पडलेला चिमणासा झरा आहे वाटते? सरित्पतीच्या हितासाठी धावताना, एखाद्या नदीने तर आपले हे अर्भक कडेवरून टाकले नसेल ना? अहाहा, या स्मशानातले हे बालनिर्झराचे प्रेत माझ्या बाळाला अक्षयीची खाशी सोबत करील! बाळा केतना, हा पाहिलास तुझा नवा खेळगडी! अगंबाई, माझ्या राजसाने असे तोंड का बरे वाईट केले? जिवंत झऱ्याची सोबत पाहिजे वाटते माझ्या लबाडाला? हो, हसला गुलाम! केतना, असे करायला अवघड का आहे? अंतरंगी तळमळणाऱ्या माझ्या अश्रूंच्या ओघाने या इवल्याशा झऱ्याला कायमचा अलोट पूर आणीन! पण या निर्झराला अक्षयजीवन देण्यासाठी, हृदय फोडून माझ्या अखंड अश्रूंचा झरा मी आटवू लागले तर माझ्या करुण किंकाळीने आकाश फाटून त्यातून अमृताची झरणी लागेल, तिच्या स्पर्शाने तुझी कोवळी काया पुन्हा थै थै नाचू लागेल आणि असे झाले म्हणजे पुत्रदेवा, माझी पतिदेवतेची पूजा मोडेल! देवाला वाहिलेले फूल पुन्हा वेलीच्या अंगी लागत नाही. या पाहा, या स्मशानलतिका तुझ्याभोवती उभ्या आहेत, यांनाच विचार. अनोळखी प्रेताच्या राखेवर केलेली फुलांची पाखरण त्या कधी परत घेतात का? अशाने हाती येत चाललेला पुण्यप्रभाव ढासळणार नाही का? (मोठ्याने) अहाहा, हे स्मशानातल्या वेलींनो, धन्य तुमच्या परोपकाराची! मागे राहिलेल्या आप्तांचे निराश विरहाचे कडू श्वास मृतांच्या रक्षेभोवती घुटमळू लागले म्हणजे तुमच्या फुलत्या सुगंधी श्वासांनी तुम्ही त्यांना मधुर करिता; विझलेल्या चितेतून तळमळणाऱ्या आगीची अखेरची धग पसरू लागली म्हणजे तुमच्या मकरंदाच्या जिवंत रसवंतीने तिला निवून, रक्षेतल्या रूक्ष जीवितांत तुम्ही जिव्हाळ्याचा ओलावा आणता! वनदेवीच्या मुलींनो, माझ्या हृदयीचे राजसरूप बालदैवत मी आता तुमच्याच ओटीत निरविले आहे! या अभागिनीची आठवण ठेवून या अनाथ देहाची मायममतेने जोपासना करा! इथून पुढे तुम्हीच त्याला माझ्या जागी व्हा एवढीच तुमच्याजवळ याचना आहे!

**राजा** : (स्वगत) अहाहा, हा करुणविलाप ऐकून या वेली खचित फुलांचे अश्रु ढाळीत असतील! हरहर, काय बापडीवर प्रसंग कोसळला आहे! माझ्या राजकर्तृत्वाला शतशः धिक्कार असो!

**नूपुर** : (एकीकडे राजास) कायहो, आता तरी व्हायचे का पुढे? बघा, हातचे सावज निसटते आहे. एकादा तिने मुद्देमाल जमिनीत गाडून नापत्ता केला म्हणजे शाबित करणे थोडे आटाआटीचे होईल! चला, मी होतो पुन्हा गस्तवाला आणि देऊ या धोशा उडवून झाले!

**राजा** : (एकीकडे नूपुरास) आपल्या महाराजांच्या अमदानीत असा अंधार चालायचा नाही! त्यांची कदर जरा ध्यानात घ्या !

**नूपुर** : (एकीकडे राजास) महाराज गेले मसणात! या स्मशानातल्या अंधारात आपला अंधार सहज झाकून जाईल. तुम्हाला वाटत असेल त्यांचा बाऊ. मला महाराजांची मुळीच दरकार वाटत नाही! एकदा तर बोलबोल म्हणत महाराजांना मी असे खड्डयात घातले होते म्हणता! उगीच महाराजांच्या ऐकीव गोष्टी नका सांगू मला!

**राजा** : (एकीकडे नूपुरास) जरा कृपा करून तुमचे तोंड बंद ठेवा आता!

**कालिंदी** : आता उगीच वेळ वाढवून काय उपयोग? बाळा केतना, चल, हो तयार आता! तुमचाआमचा ऋणानुबंध सरता झाला! कुठे आहेस तू? (प्रेत उचलते.) अहाहा, 'बाळ धरणीवरी लोळे। चाचरे केश रक्ताने भरले ॥' (त्याचे चुंबन घेते.) 'धरी पोटाशी चुंबन दे त्याला । वदनचंद्र धुळीने भरला । शिरि पाहे तो गदेचा टोला । (स्फुंदत) गहिवर देवाला आला।' देवा ! सुभद्रामाईंच्या अभिमन्यूला पाहून तुम्हाला गहिवर आला, आणि मज अभागिनीच्या अनाथ बाळाला पाहून मात्र तुम्हाला काहीच का वाटत नाही! देवा, असा पक्षपात तुमच्या ठायी का बरे असावा? रणांगणी पडलेल्या अभिमन्युबाळाने कृष्णनामाचा मंजुळ पाठ चालविला होता आणि माझे बाळ तुमचे नाव घेत नाही म्हणून का त्याच्यावर इतका राग? पण सर्वसाक्षी देवा, माझ्या राजसाला काकीतरी कळते आहे का? अभिमन्युकुमार सोळा वर्षांचे होते आणि माझे बाळ सोळा महिन्यांचे सुद्धा नाही! स्तनपान करायलासुद्धा त्याला अजून शिकवावे लागते! देवा, क्षमा करा, पण तुम्ही निष्ठुर आहा; निर्दय आहा; अगदी माझ्या पतिराजांसारखे निर्दय निष्ठुर- अगंबाई, काय हे बोलते मी? त्यांची निंदा आणि देवाची निंदा! देवानारायणा, क्षमा कर, क्षमा कर. दु:खाने भांबावलेल्या या वेड्या पोरीला क्षमा कर! तुझ्याकडे तरी काय दोष? माझे भोक्तृत्व असेल ते भोगल्याखेरीज सुटका नाही! पूर्वजन्मीची पापे या जन्मी दु:खांच्या रूपाने छळल्याखेरीज कशी राहतील? ऊठ कालिंदी, ऊठ! हे कठीण काम कसेतरी आटोपलेच पाहिजे!

(हमारे नभी आज.)

अभागी जिवा शोक आता पुरे हा ॥ध्रु.॥ नशिबी आले ।

त्यापरि झाले । मन कां वृथा हे मनाशी झुरे ॥१॥

रडणे हसणे । एकच जाणे । नाते न आता जगाशी उरे ॥२॥

बाळा केतना, यापुढे या मातीच्या पाळण्यातच तुला निजावे लागणार! नको, आता अखेरच्या वेळी असा रागावून पाहू नकोस! मी आनंदाने का तुला माझ्या हाताने या खाचेत लोटीत आहे? हे वनदेवींनो, हे गगनदेवतांनो, तुमच्या फुलांच्या आणि ताऱ्यांच्या डोळ्यांनी तुम्ही सर्वकाही पाहात आहां, -तुम्ही साक्षी आहात, की माझ्या पतिदेवतेच्या उद्धारासाठीच मी हे अघोर कर्म करीत आहे! आई, आकाशातून माझ्याकडे पाहून रागावू नकोस! तुझ्याकडून शिकलेला मायममतेचा धडा मी विसरले नाही; पण पतिव्रतेच्या निर्दयपणाने मातृप्रेमाला असे खाईत लोटावे लागत आहे त्याला मी तरी काय करू? बाळा केतना, माझ्या मातृप्रेमाबद्दल तुला संशय येत असेल, तर देवाच्या घरी जाऊन तुझ्या वडिलांना सद्बुद्धी देण्यासाठी त्याच्या पायाजवळ आळा घेऊन बैस आणि मग पुन्हा या अभागिनीच्या उदरी जन्म घे म्हणजे माझे प्रेम किती अखंड आहे याची तुला साक्ष पटवून देईन! पण हो, स्वर्गातल्या अमृतस्नानाने ही गालबोटाची खूण मात्र धुऊन टाकू नकोस हं! (त्याच्या गालावर डोळ्यातल्या काजळाचे गालबोट ओढते.) असा या खुणेसकट माझ्या पोटी ये म्हणजे तुझ्या पुढच्या अवताराची मला ओळख पटेल ! पण तुझ्या जन्मदात्यांची सेवा तुझ्या हातून होईपर्यंत मात्र या खाचेत असाच पडून राहा! (त्याला खाचेत ठेवते.) तुझे पुनर्दर्शन होईपर्यंत, माझ्या हृदयाच्या पायघड्या पसरून त्यांवर वठविलेल्या तुझ्या देवपावलांची मी अष्टौप्रहर मानसपूजा करीत राहीन! झाले, आता हा दगड घ्यावा आणखी- (खाचेत दगड टाकणार तोच मोठ्याने ओरडून दगड खाली टाकते.) अगंबाई, काय करिते हे मी? माझ्या केतनाच्या कोमल देहावर हा कठीण धोंडा टाकून- ! देवारे देवा ! काय हा प्रसंग आणिलास माझ्यावर? प्रत्यक्ष आईच्या हातांनी बाळाच्या देहावर दगड टाकायचा!

**नूपुर** : (एकीकडे राजास) अहो महाराज, आता तरी होणार का पुढे? मूल मेल्याबद्दलचा दाखला मागण्यापासून सुरुवात करू म्हणजे झाले!

**राजा** : (नूपुरास एकीकडे) आणि मेलेले मूल पुढे आहे ते?

**नूपुर** : (एकीकडे राजास) तुम्हाला चौकशीचे पाचपेच कळत नाहीत! अहो, दाखला नसला म्हणजे नुसत्या मुडद्यावरूनच मनुष्य मेल्याची खात्री करून घेऊन भागत नाही! दप्तरी दाखला हा पाहिजेच! चलता ना पुढे? नाहीतर मी होतो पुढे एकटाच!

**राजा** : (नूपुरास एकीकडे) माझ्या कमरेला तलवार आहे हे लक्षात आहेना?

**नूपुर** : (राजास एकीकडे) स्मशानवैराग्य मावळून आता तुमच्यात स्मशानातल्या

एखाद्या समंधाचा संचार झाल्यासारखा वाटतो! थांबा, हेही वारे जाऊ द्या जरा.

**कालिंदी** : रजनी, आपले चिमुकले डोळे झाकून घे; नाहीतर माझे हे अघोरकर्म पाहून हे तुझे तेजस्वी डोळे भीतीने काळवंडून काळेठिक्कर पडतील आणि मग या अमावास्येच्या काळोखात, स्वर्गाच्या मार्गावर माझ्या बाळाला वाट दाखविण्यासाठी एकही अक्षयदीप रहाणार नाही! सांग, माते रजनी, जगाच्या आरंभापासून तू आपल्या सर्वसाक्षी डोळ्यांनी भूलोकावरचे सारे खेळ पाहत आहे; पण आईने मुलाच्या अंगावर दगड टाकण्यासारख्या देखाव्याचा भयानक खेळ तू कधी पाहिला आहेस का? सांगा, स्मशानलतिकांनो, तुम्ही या स्मशानात लक्षावधी हृदयभेदक प्रकार पाहिले असतील, पण माझ्या पुण्यप्रभावासारखा देखावा पूर्वी कधी पाहिला होता का? पण हे मी तुम्हाला काय विचारिते? तुम्ही जितक्या नाजूक आहा तितक्याच धीराच्या आहा! प्रत्यही कोमेजून पडलेल्या फुलांच्या-मरून पडलेल्या तुमच्या मुलांच्या नाजूक निर्माल्यप्रेतावर पिवळ्या पानांची समाधी बांधून आणि आपल्या अंगाची सावली करून केवळ ईश्वरी इच्छेखातर तुम्ही समाधानाचे सुगंधी श्वास पसरीत सुखाने आयुष्य कंठिता! तुमच्या पुण्यप्रभावापुढे माझी काय कथा! द्या, वनदेवींनो, तुमचे ते फुलांचे नाजूक धैर्य घटकाभर मला द्या! बाळा केतना, अखेर वेळ आली बरे!

(सबसे रामभजन.)

निरोप द्यावा आता । बाळा । टाकुनि जाते माता ॥ध्रु.॥
माझे माझे म्हणुनि आजवर जे लेणे ल्याले ।
बाळ गुणाचे हाय कुणाचे आज परी ते झाले ॥१॥
हे तारांनो, उचंबळू द्या करुणारसरंगा ।
अखंड वाहो नवतेजाच्या पुण्याईची गंगा ॥२॥
घटकेचा संसार संपला, लटका ठावठिकाणा ।
वनदेवींनो, पदरी घ्या हा माझा राजसराणा ॥३॥
अनाथ दुबळा देह पडे हा, आई नाही त्याला ।
फुलत्या फुलवंतीची यावर मायापाखर घाला ॥४॥
भुते जागता उठता दचकुनि हृदयींचा हा ठेवा ।
काळ्या राती जित्या फुलांचा खडा पहारा ठेवा ॥५॥
कळते तुम्हा सारे काही, अहा फुलांच्या माता ।
लोभ असू द्या इथून पुढती, बोलत नाही आता ॥६॥

**राजा** : (एकीकडे नूपुरास) चला आता पुढे.

**कालिंदी** : आला आता मला पुरता धीर! बाळा केतना, या दगडाची भीति मुळीसुद्धा धरू नकोस! हा जरी दगड असला तरी स्मशानातला दगड आहे! आजवरच्या इथल्या करुणालापांनी याचे अंत:करण फुलापेक्षाही मृदू झाले असेल आणि अजूनही याच्यात कठीणपणा असलाच, तरी दररोज माझ्या अश्रूंच्या अभिषेकाचे सिंचन करून या फत्तरालाही फुले आणीन आणि त्या फुलांनी-माझ्या बाळाच्या जिवाभावाच्या फुलांनी-परमेश्वराची पूजा करून त्याच्याकडून तुझ्या वडिलांचा पापापासून उद्धार करीन! बाळा केतना, हो आता सावध! (दगड उचलून टाकणार तोच राजा मागे येऊन हात धरितो.)

**कालिंदी** : कोण माझा हात धरीत आहे? माझ्या पवित्र धाडसाच्या आड येऊ नका; कोण आहे ते-ईश्वर?

**राजा** : नाही. ईश्वराचा पृथ्वीवरचा प्रतिनिधि! बाई, माझ्याकडे नीट पाहा; मी या शहराचा राजा तुझ्या साहाय्यासाठी आलो आहे! ऊठ.

**कालिंदी** : (स्वगत) अगंबाई, खरेच, महाराजच हे !

**राजा** : बाई, भिऊ नकोस ! तुझे नाव काय ?

**कालिंदी** : माझे नाव कालिंदी; मी-

**राजा** : मुली, लाजू नकोस, प्रसंगाला तोंड हे दिलेच पाहिजे! काय तुझ्या नवऱ्याचे नाव?

**कालिंदी** : वृंदावन.

**राजा** : काय, वृंदावनाची कालिंदी तू? मग तुझ्यावर हे संकट कसे आले?

**कालिंदी** : ते सांगायला फार वेळ लागेल. पण महाराज,माझ्या या संकटात मला साहाय्य करण्यापेक्षा, माझ्यावरच्या दुसऱ्या मोठ्या संकटाचे निवारण करा!

**राजा** : दुसरे कोणते संकट?

**कालिंदी** : माझे पति एका पतिव्रतेचा-वसुंधरेचा, मंडलेश्वरांच्या वसुंधरेचा छळ करीत आहेत; म्हणून महाराजांनी आधी तिची सुटका, आणि माझ्या पतींची पापापासून सुटका केली तर माझ्यावर अगणित उपकार होतील.

**राजा** : चल, आताच्या आता माझ्याबरोबर चल. वाटेने मला आपली सर्व हकिकत सांग. अहो, तुमचे नाव काय?

**नूपुर** : माझे नाव नूपुर! महाराज, माझा अपराध इतका मोठा आहे, की मला या खड्ड्यांतच जिवंत गाडला तरी-

**राजा** : ते राहू द्या नूपुर, हे मूल घेऊन चौकीवर चला आणि पुढे मी सांगतो त्याप्रमाणे व्यवस्था करा! कालिंदी, चल! (सर्व जातात.)

## प्रवेश तिसरा

(कंकण प्रवेश करितो.)

**कंकण** : (स्वगत) त्या हरामखोर नूपुराला किंकिणीबरोबर हिंडताना एवढ्यात पाहिले तर खरे! आता इथेच दबा धरून बसावे आणि गनीम आला की घालावा छापा. तसेच किंकिणीच्या मर्जीची जिकीर करण्यात आता काही हशील नाही. आज तिला धरावे तलवारीच्या धारेवर! ही मनधरणी बस झाली. इतकी तकलीफ घेतली असती तर राजाची राणीसुद्धा घरी चालत आली असती. आलाच तो बदमाष !

(नूपुर व किंकिणी येतात.)

**नूपुर** : किंकिणी, काय सांगू, आज मला कळलेल्या गोष्टी तुला जर रसाळपणाने सांगत बसलो तर आपला सारा जन्म सुखात जाईल.

**कंकण** : (मागाहून येऊन) , एवढ्या रात्री तिला कोठे घेऊन चाललास रे ?

**नूपुर** : (तिरस्काराने) महाराजांनी हिला आपल्यापर्यंत घेऊन यायला मला सांगितलेले आहे. आता मला राजाज्ञेचा आधार आहे.

**कंकण** : आता राजाज्ञा राहील बाजूला आणि देवाज्ञा मात्र होईल तुला! राहू दे तिला इथे. मी घेऊन येईन तिला महाराजांकडे. किंकिणी, थांब तू. हं, नूपुर, आपल्या वाटेल लाग! पण थांब, हा हार कशाला आणला होतास? आणि इकडे तो हार! तुझ्या हाराने किंकिणीशी लग्न लावतो. शत्रूच्या लुटीवरच गुजारा करणे हा खरा लष्करी पेशा आहे.

**नूपुर** : असा आडदांडपणा प्रेमशास्त्राला संमत नाही.

**कंकण** : चल, जा ! तुझे प्रेमशास्त्र आता कत्तल झाले ! चल, निघ इथून आधी.

(नूपुर जातो.)

**किंकिणी** : कंकण, हे काय मांडिले आहे तुम्ही?

**कंकण** : हं, जो लष्करी कायदा नूपुराला, तोच तुला पण! आता युद्धकांडाला सुरुवात झाली आहे. हा बघ हार आणि ही बघ तरवार! हा माझ्या गळ्यात घाल, नाहीतर ही तरवार तुझ्या गळ्यात पडेल !

**किंकिणी** : माझे प्रेम जर तुमच्यावर नसेल तर?

**कंकण** : आता मला प्रेम नको आहे, तू पाहिजे आहेस! हे बघ प्रेम करायला लावतो. (तरवार उगारून)प्रेम करतेस की उडवूं गर्दन? आहे की नाही प्रेम?

**किंकिणी** : कंकण, किती सरळ स्वभाव तुमचा? तुम्हाला छळले त्याची क्षमा करा. माझे तुमच्यावर पहिल्यापासून प्रेम आहे! आणा तो हार. कालिंदीबाईंच्या वागण्याची शपथ घेऊन हा हार तुमच्या गळ्यात घालिते.

(त्याच्या गळ्यात हार घालते.)

**कंकण** : कालिमाताकी जय !

**किंकिणी** : (स्वगत) आता शेवटी गहिवरून क्षमा मागावी झाले. (उघड) कंकण, प्राणनाथ, मला क्षमा करा.

(भले आये कुंवर तोरे.)

घडे नाथा प्रमाद जरी आता क्षमाच तरी हो तया । झुरे देह म्हणुनिया।
नुरे धीरच हृदया । हा जीव शरण चरणिं या ।
भ्रमुनिया। दमुनिया। श्रमुनिया ॥ध्रु.॥
हा सतत असो प्रेमभर असा । शुभ आनंदलाभ तसा हा ।
दासी सदाची करी याचना । प्राण पहा वाही।
अचल करुनि मति पदी सदया । तरि दया । करुनिया ॥१॥

(जातात.)

## प्रवेश चवथा

(स्थळ: भूपालाचे शृंगारमंदिर. वसुंधरा उभी आहे. वृंदावन प्रवेश करितो.)

**वृंदावन** : (स्वगत) या वेळेला राक्षसवेळा असे म्हणतात! अजूनपर्यंत आली नसेल तर निदान आज तरी मी या रात्रीच्या नावाला सार्थकता आणणार !

**वसुंधरा** : (स्वगत) देवाधिदेवा, आता माझी लाज-माझी तरी कसची, देवा, तुझी लाज तुलाच! या वेळी माझ्या हाकेला जागला नाहीस, तर अनाथनाथा, तुझ्या ब्रीदाला बोल लागून तुझ्या कपाळी कायमचा कलंक राहील! नारायणा, द्रौपदीसाठी जसे धावत आला तसेच या वेळी माझ्यासाठी धावत या! तुझ्या

नावाच्या तारणावरच या वेळी माझ्या पतीचेप्राण राखण्यासाठी मी या संकटात येऊन पडले आहे.

**वृंदावन** : वसुंधरे, या राक्षसवेळी दिव्य तेजालासुद्धा राक्षसी रंग चढून बाहेर काळोखाचे ब्रह्मांड पसरले आहे! अंतरिक्षाच्या उदरात चहूकडे काळोखाच्या काळ्यानिळ्या राई माजून त्यांच्यावर धुरक्या ढगांची पालवी पसरल्यामुळे विश्वनाच्या माथ्यावरची तारापुष्पे, पृथ्वीतलावरच्या प्रवाश्याच्या नजरेच्या टापूबाहेर गेली आहेत! तुझ्या अघोर दिव्यव्रताचे हे उद्यापन उरकून घेण्याला अमावास्येच्या मध्यरात्रीसारखी पर्वणी पाहिजेच होती नाही?

**वसुंधरा** : वृंदावन, अजून तुमचा अघोर निश्चय कायम आहे का? मला मोठी आशा होती, की इतका वेळ तुम्ही आला नाही तेव्हा भर उलटून रात्र निवळत चालल्यामुळे तुमचे मनही निवळले असेल!

**वृंदावन** : वसु, बाहेर पडलेल्या अंधकाराची तुला कल्पना असती तर ही वेडगळ कल्पना तुला आठवलीच नसती. वरून मेघांच्या पावलाखाली दडपून गेल्यामुळे आज रात्रीच्या काळोखाचा गोठून काळा खडक होण्याइतकी त्याची अंतराळात दाटणी झाली आहे. अशा काळोखावर सारखी नजर ठरवून माझ्या शरीराच्या अणुरेणुंशी मी त्याची इतकी एकजीव मिळणी करून घेतली आहे, की इच्छेच्या एकाग्रतेने तुझ्याकडे सारखा पाहू लागलो तर माझ्या डोळ्यातून निघणाऱ्या काळ्या किरणांनी तुझे सुंदर शरीर काळवंडून तुझ्या पातिव्रत्याचा नाश होण्यापूर्वीच तू काळी ठिक्कर पडशील! काळोखाचा रस गिळून अशी तामसी तपश्चर्या करिताना तारांच्या तेजोदर्शनाने माझ्या कृष्णसमाधीचा भंग होऊनये म्हणून मी एकदासुद्धा वर पाहिले नाही! पूर्वरात्रीच्या या अपूर्व तपोबळाने माझ्या निश्चयाला एकवृत्तीची बळकटी मिळाली आहे! आता माझ्या मनात बदल होण्याचे नावही काढू नकोस! पण वसुंधरे, काल हेक्याने आपल्या पोटच्या पोराचा बळी देऊन आज अखेरीस अशा रीतीने इथे येणाऱ्या तुझ्या मनात मात्र बदल झाला आहे खरा. नवऱ्याचा बळी देताना तुझा हेका लटपटला वाटते ?

**वसुंधरा** : नाही, वृंदावन, आज मी माझ्या ईश्वराचा बळी देण्याकरिता आले आहे !

**वृंदावन** : मी नाही समजलो तुझ्या म्हणण्याचा अर्थ ?

**वसुंधरा** : वृंदावन, माझा परमेश्वरावर पूर्ण भरवसा आहे; त्याच्या सर्वसाक्षी शक्तीवर विश्वास ठेवूनच मी या घरात पाय टाकले आहे. आज माझ्या साह्याला ईश्वर धावून आला नाही तर माझ्या अंत:करणातल्या ईश्वराबद्दलच्या साऱ्या कल्पना जाळून पोळून टाकीन.

**वृंदावन** : एकूण आज तू ईश्वराचा अंत पाहणार तर ?

**वसुंधरा** : असेच का म्हणाना! वृंदावन, परमेश्वर पतिव्रतांचा पाठीराखा असतो हेच आजपर्यंत सारे पुण्यपुरुष सांगत आले आहेत ! गतकालच्या महापतिव्रतांना याच सत्याचा अनुभव येत गेला आहे ! पुण्यश्लोकांची वागीश्वरी खोटी व्हायला आणि पतिव्रतांची पुण्याई पोरखेळांत जमा व्हावयाला आजच पृथ्वीने काही पापाने पाय धुतले नाहीत ! पतिरूपाने पूजलेला परमेश्वर पतिव्रतांचा पाठीराखा असतो. माझ्या पतिपूजेत-परमेश्वरपूजेत या क्षणापर्यंत कायेने, वाचेने, मनाने, बेसावध स्वप्नातल्या तरळत्या हालचालीनेसुद्धा मी रेषामात्र अंतर पडू दिले नाही ! कृतकर्माचा उच्चार करू नये म्हणतात- पण वृंदावन, हविर्भाग अर्पण करिताना मोठमोठ्या संयमी महात्म्यांच्या डोळ्यातून, होमधुरामुळेतरी पाणी येते; पण माझ्या पूजायज्ञांत, माझ्या परमपुरुषाच्या नावाने, प्रत्यक्ष पोटच्या गोळ्याची आहुती देताना मी तेही येऊ दिले नाही ! मग या वेळी मला अंतर देण्याचा परमेश्वराला तरी काय अधिकार? परमेश्वर झाला म्हणून त्याला तरी बंधने आहेतच ना? कर्मसुत्राने आम्हा मनुष्यांना बांधणारा परमेश्वर स्वत:ही भावभक्तीच्या बंधनांनी जखडलेला असतो! अजस्रदेही हत्तीला रुतून बसायला कोवळ्या कमलनालांची तरी जरूर असते; पण विश्वरूप विराट्पुरुष भक्तांच्या आशातंतूच्या नुसत्या अदृश्य सूत्रांच्या जाळ्यातच सांपडलेला असतो. (भूपालाच्या तसबिरीकडे बोट दाखवून) वृंदावन, ही पहा माझ्या पतींची प्रतिमा! पतीला परमेश्वराची प्रतिमा समजून मी आजपर्यंत दररोज भक्तिभावाने या प्रतिमेला असा हार घालीत आहे; आज परमेश्वराने मला ऐन संकटात साहाय्य केले नाही तर पृथ्वीवरचे परमेश्वराचे प्रभुत्व संपून तिच्यावर कलिपुरुषाची सत्ता सुरू झाली असे समजेन. तुम्हाला कलिपुरुषाची प्रतिमा कल्पून या हाराने तुमची पूजा करीन, आणि साऱ्या स्त्रीसृष्टीत पापाची ग्वाही फिरवून अट्टाहासाने ओरडून सांगेन, की जगात ईश्वराचे अस्तित्व नाही आणि पातिव्रत्य ही चुकलेल्या मूर्खांची बाष्कळ बडबड आहे! वृंदावन, करा पाहू आपली मान पुढे!

**वृंदावन** : (स्वगत अटीला पेटलेल्या शत्रूने अगदी तलवारीवर ठेवण्यासाठी मान पुढे करायला इतक्या निकराने सांगितले असते तर मी खात्रीने माघार घेतली नसती! पण या एका अबलेने हार घालण्यासाठी मान पुढे करायला सांगितली असता माझ्याकडून अगदी नकळत, आणि क्षणमात्राचाच का होईना, पण विलंब का बरे व्हावा? हिच्या विस्तीर्ण ललाटप्रदेशाकडे, निश्चयाच्या करारी नजरेकडे, आत्मविश्वासाच्या बेमुरवत चेहऱ्याकडे आणि वैभवशाली वाणीकडे लक्ष जाताच हिच्या बोलण्यात तथ्य नसले तरी निदान ते ऐकावेसे वाटण्याची इच्छा व्हावी हा मोठा चमत्कार आहे! (उघड) वसुंधरे, तुझ्यासारख्या एका वाटेल त्या स्त्रीसाठी अमावास्येच्या अशा काळोखातून अंतराळ ओलांडून इथे यायला परमेश्वर खरोखरीच त्याच्या भोळ्या भाविक भक्तांपेक्षाही वेडा असला पाहिजे

! तुम्हा बायकांच्या किंमतीला काही मिती आहेच ना ?

**वसुंधरा** : वृंदावन, बायकांची किंमत तुम्ही काय समजता?

**वृंदावन** : पुरुषांच्या सुखासाठी पसरलेल्या जगाच्या बाजारातल्या, पैशापासरी विकत्या जिनसेपेक्षा मी स्त्रीचे महत्त्व जास्त समजत नाह !

**वसुंधरा** : नाही, वृंदावन, नाही; मातृरूपाने तुम्हाला जन्म देणाऱ्या, पत्नीरूपाने तुमची जन्माची सोबतीण होणाऱ्या, कन्यारूपाने तुमच्या उदरी जन्म घेणाऱ्या तुमच्या आयुष्यातल्या तिन्ही अवस्थांत तुम्हाला कोवळ्या प्रेमाची साक्ष पटवून पुत्र, पती आणि पिता या चढत्या पदवींना नेणाऱ्या स्त्रीजातीची किंमत इतकी कमी समजू नका! विश्वातल्या प्रेमाच्या, मांगल्याच्या, कोमलतेच्या, सौंदर्याच्या आणि पावित्र्याच्या सारभूत सर्वस्वाची स्त्री ही एकरूप विजयपताका आहे! स्त्रीच्या प्रभावाची साक्ष जगातली प्रत्येक गोष्ट देईल! स्त्रीच्या एका दृष्टिपाताबरोबर वैराण वाळवंटावर रमणीय उद्यानाची वसति झाली आहे. स्त्रीच्या नावाच्या आधाराने नद्यांच्या खळखळाटाला वेदघोषाची पवित्रता आली आहे! स्त्रीने तेजाला कोमलतेची जोड दिली आहे आणि स्त्रीनेच सत्यावर सौंदर्याचा साज चढविला आहे! स्त्रीहृदयात उचंबळणाऱ्या प्रीतीच्या पुराबरोबरच महाकवींच्या प्रतिभेचे प्रवाह वाहिले आहेत आणि स्त्रीसौंदर्याच्या रंगच्छटा नुसत्या छायारूपाने रेखाटण्यासाठी कुशल चित्रकारांची कलमे आपापल्या रंगांत गुंगून गेली आहेत! सुंदर इमारतींच्या गाभाऱ्यात स्त्रियांच्याच देवतामूर्ती बसल्या आहेत आणि तलवारीच्या धारेवर जीवांचा नाच करणाऱ्या महावीरांच्या शस्त्रांना स्त्रियांच्याच डोळ्यात खेळणारे पाणी दिलेले असते! स्त्रियांसाठी पर्वत समुद्राच्या पाठीवर नाचले आहेत, साक्षात् परमेश्वराने स्त्रियांसाठी स्त्रीरूप घेतले आहे! वृंदावन, पुरुषाच्या आणि परमेश्वराच्या-भक्तभगवंतांच्या उच्चतम भावनांचा स्त्रीच्या ठायी प्रीतिसंगम झालेला आहे! पुरुषाच्या परमपावित्र्याची सीमा साधुत्वाच्या भक्तीत होते! निष्कामबुद्धीने भगवंताची भक्ती करणाऱ्या सत्पुरुषांना पुरुषकोटीत परमोच्च पदवीवर बसवितात; आणि असे साधू तुम्हा पुरुषांत, लाखांत एकसुद्धा सापडत नाहीत. पण आत्मयज्ञांत आपल्या इच्छेच्या आहुती टाकून पतिमय परमेश्वराची केवळ त्याच्या इच्छेखातर निर्व्याज सेवा करणाऱ्या साध्वी आम्हा बायकांत घरोघरी आढळून येतील! त्याचप्रमाणे, प्राणिमात्रावर परमेश्वर जे सहज प्रेम करून त्याची जोपासना करितो त्या निष्काम अपत्यस्नेहाची-ईश्वरी प्रेमाची-मुलाचे संगोपन करणारी माता भूलोकावर साक्ष पटविते! याप्रमाणे एका स्त्रीदेहात पुरुष आणि परमेश्वर आपापल्या उत्कट गुणांच्या एकरूपाने वास करितात! आपल्या करामतीचा कळस म्हणून म्हटलेल्या पुरुषाच्या संगोपनाची विश्वासाची जबाबदारी संभाळण्यासाठी ईश्वराने

स्त्री निर्माण केली आहे! पुरुषाची परंपरा चालविण्यासाठी ईश्वराने हा स्त्रीमय प्रेमळ अवतार घेतला आहे! पुरुष परमेश्वराची कीर्ती आहे पण स्त्री परमेश्वराची मूर्ती आहे! आणि म्हणूनच, वृंदावन, मनुष्यापेक्षा अधिक कौतुकाची नवीन सृष्टी निर्माण करण्याच्या कल्पनेत समाधिस्थ झाला असला तरीही पतिव्रतेची हाक ऐकताच परमेश्वराला धावून यावे लागेल! वृंदावन, पाहा माझ्या म्हणण्याचा प्रत्यय! हा पहा माझ्या हातातला हार! करा पाहू आपली मान पुढे!

**वृंदावन** : (स्वगत) शाबास, वसुंधरे, तुझ्या वडिलांनी तुला पुरुषाप्रमाणे प्रगल्भ विद्या शिकविली तिचे तू सार्थक केलेस! या वेळी हिच्या मूर्तीत विरोधी गुणांचे अगदी एकजीव मिश्रण झालेले आहे! फुलांच्या नाजुकपणाभोवती हिमालयाची गंभीरता पहावयाची असेल, त्याने या वेळी हिच्या देहाकडे पहावे! हिच्या वाणींतून सतारीच्या सुरेल गोडीवर रणवाद्यांची भीषणता ऐकू येत आहे ! डोळ्यातल्या पाण्यावर तरंगणाऱ्या निश्चयी तेजामुळे, तलावांच्या पाणभुईवर अग्निरसाचा तवंग पसरल्यासारखा वाटत आहे! कालिंदी, अशी जिवंत वाग्देवी जर तुझ्या जिभेवर नाचत असती तर तू या वृंदावनालाही आपल्या भोवती नाचावयाला लावले असतेस! पण या विचाराने माझ्या निश्चयाला थरकाप सुटून तोही नाचावयाच्या बेतात येऊ पाहात आहे! वृंदावन, केवळ एका बोलभांड बायकोच्या बडबडण्याने जर तुझे हृदय खळबळू लागले तर- तर नकोच; (हसून) तर नकोच; अशक्य गोष्ट मला तरी कुठून समजणार? (प्रकट) वसुंधरे, स्त्रियांच्या पक्षपाती कानांना या तुझ्या शब्दांत श्रुतीचे सर्वस्व ऐकल्यांसारखे वाटले असते; पण वस्तुमात्राच्या केवळ स्वार्थतत्त्वाच्या कसोटीने विचार करणाऱ्या माझ्या मनाला एखादी जोरकस शब्दांची घोडदौड झाल्याचा मात्र भास झाला! बायकांबद्दलच्या या तुझ्या बेफाम बरळण्याने माझ्या मनावर छाप बसविण्याची तुझी कल्पना असेल तर ती मात्र या सर्व कल्पनांपेक्षा अद्‌भुतरम्य आहे खास! वेडे वसुंधरे, ईश्वर तुझ्या मदतीला यायचा असता तर काल तो तुझ्या दीनाराचा अंत असा आंधळ्या डोळ्यांनी का पाहात राहिला असता?

**वसुंधरा** : काल ईश्वर आंधळ्या डोळ्यांनी माझ्या दीनाराचा अंत पाहात नव्हता पण अगदी जागत्या डोळ्यांनी माझ्या श्रद्धेचा अंत पाहात असला पाहिजे! वृंदावन, श्रद्धेच्या कसोटीला उतरल्याखेरीज ईश्वर कधीच पावत नाही! पातिव्रत्य ही आम्हा बायकांजवळ ईश्वरी अंशाची ठेव आहे! काल दीनाराच्या लाभाने हे वैकुंठींचे ठेवणे लाथाडले असते तर मात्र आज मी देवाच्या दयेला अपात्र ठरले असते! पण या घटकेपर्यंत माझ्या जिवाभावाच्या सर्वस्वाने मी त्याचा विश्वास संभाळला! या वेळी माझा सर्वस्वी निरुपाय झाला आहे आणि तो त्याला स्पष्ट दिसतही आहे! आता आपली ठेव संभाळण्याची सारी लाज त्याची त्याला! अशा असहाय स्थितीत एका अनाथ अबलेचा निष्ठुरपणाने अंत पाहात बसला

तर देवाच्या उज्ज्वल ब्रीदाला कायमचा कलंक लागेल! आणि मग देवा, तुझ्या पायांचा भरवसा कोण धरील? सज्जन आपल्या पवित्र वाणीने तुझ्या नावाचा उच्चारही करणार नाहीत! तुझ्या पाषाणमूर्तीची दृष्ट लागू नये म्हणून देवळावरून जाताना बायका आपल्या तान्हुल्यांना पदराखाली झाकून घेतील! श्रद्धेच्या माहेराचे मूळ तुटून भक्तीची सोयरीक सुटेल आणि संतांचा संसार मोडेल!

**वृंदावन** : वसुंधरे, काय हा वेडेपणा! कोणता परमेश्वर ही तुझी दीन वाणी ऐकणार? भाविकांनी आपल्या हृदयातून हाकलून हद्दपार केलेला, देवळात दडविलेला, दगडाखाली दडपलेला, देव का हे ऐकणार? वेडे, अजून कोणी कधी पाहिला तरी आहे का तो देव कसा आणि कोठे आहे तो?

**वसुंधरा** : वृंदावन, परमेश्वर कोणत्या रीतीने आणि कोणत्या रूपाने माझी लाज राखील त्याची तुम्हाला कल्पनाही होणार नाही!

**वृंदावन** : असे काय? मला न समजण्याजोग्या मार्गांनी येणाऱ्या दैवी सहाय्याच्या नाटकी आशांना हृदयातून काढून टाक! वसुंधरे, आजच्या प्रसंगाची मी साऱ्या जन्मभर वाट पाहात होते आणि सारा जन्म या प्रसंगाशी भिडण्याची तयारी करण्यातच मी घालविला आहे! आकाशात भिरभिरणाऱ्या घारीला नुसत्या नजरेच्या जरबेने माझ्या मनगटावर मैनेप्रमाणे खिळून बसण्यात मी तरबेज झालो आहे! एका क्षणात आकाशपातळ एक करणारी बिजली कडकडून कोसळताना, तिच्याकडे डोळ्याचे पाते हलविल्यावाचून, अगदी बांधलेल्या नजरेने पाहण्याचा मी अभ्यास केला आहे! परस्परांच्या अंगांना विळखा घालून अधरामृतपानांत गढलेल्या जहरी जोडींतून, ओढून काढलेल्या नागाचे चाबकाप्रमाणे फटकारे मारून खवळल्यामुळे फोफावणारी नागीण मुठीत धरून, तुझ्या हातातल्या हाराप्रमाणे मनगटाभोवती खेळविण्याचा मी चांगला सराव केलेला आहे. छाव्याचा मुडदा अंगावर फेकल्यामुळे जागी होऊन चवताळलेली वाघीण, हाताने पालथी पाडून पायांनी जमीनदोस्त जखडून टाकण्यात मी अगदी तयार झालो आहे! माझा कर्मयोग-दुष्कर्मयोग इतका दांडगा आहे आणि त्याला आज रात्रीच्या काळ्या तप:सामर्थ्याची जाड करून दिली आहे आणि म्हणून कपटाच्या जाळ्यात पकडून या घरात कोंडलेली ही अरुंधतीची वाघीण- नवऱ्याच्या नाशाच्या मंत्राने, अशी उभी डांबून ठेवलेली ही इंद्रावतीची नागीण- कितीही ओरडली, कितीही फोफावली तरी तिच्यासमोर मी अगदी बेदरकार उभा राहीन! वसुंधरे, गगनात गिरक्या घेणाऱ्या तुझ्या कल्पनाशक्तीने किंवा डोळ्यात नाचणाऱ्या निश्चयाच्या निखाऱ्याने फार झाले तर लपवून आणलेल्या एखाद्या हत्याराने किंवा छपवून बसविलेल्या एखाद्या मारेकऱ्याने जर तुझ्या मदतीसाठी ईश्वराचे सोंग घेण्याचा प्रयत्न केला तर हा वृंदावन एका क्षणात त्या

नटव्या ईश्वराला नश्वर करून टाकील! सांग पाहू, यापैकी तुझ्या दगलबाज देवाचे रूप कोणते आहे ते?

**वसुंधरा** : तुमच्या या साऱ्या अघोर अभ्यासाचा या वेळी काहीच उपयोग होण्यासारखा नाही! माझ्यात नागिणीचे विषही नाही किंवा वाघिणीची क्रूरताही नाही. कोमलतेच्या चांदण्यासमोर क्रूरपणाचा काळोख क्षणमात्रात विरून जातो! वृंदावन, मी कल्पनेनेसुद्धा तुमचे अनिष्टचिंतन केले नाही! आणि केले तर अशा हिंसक हाकेला परमेश्वर जागणारही नाही! पवित्र, निर्मल आणि निर्दोष कल्पनांनाच परमेश्वराच्या पायांजवळ चिरंजीव सृष्टीचे स्वरूप मिळते! परहिताला न दुखविणाऱ्या आपल्या हितबुद्धीलाच ईश्वराच्या आशीर्वादाचे बळ मिळते! वृंदावन, तुमच्या जीवाला अपाय करून आपले रक्षण करण्याची कल्पना माझ्या मनाला कधीच शिवली नाही! माझी सारी शक्ति म्हणजे माझी निर्बलता! माझे खरे साहाय्य कारणारी माझी केवळ नि:सहाय स्थिती! स्त्रियांच्या दुबळेपणांतच त्यांचे खरेखुरे बळ असते! दुबळ्या, अनाथ, निस्सहाय स्त्रीला संकटात पडलेली पाहून, पुरुषाच्या अंगी दिव्य पुरुषार्थाची प्रेरणा होते आणि तिच्या साहाय्यासाठी साक्षात् ईश्वर अवतार घेतो!

**वृंदावन** : कोणत्या रूपाने ईश्वर इथे येणार? या वाड्याभोवती असा नेटाचा बंदोबस्त केला आहे, की तुझ्या ईश्वराला वाऱ्यावर वाहून येण्याचीसुद्धा सवड सापडणार नाही !

**वसुंधरा** : बाहेरचा ईश्वर कशाला यायला पाहिजे? ईश्वर सर्व ठिकाणी आहे.

**वृंदावन** : इथल्या प्रत्येक वस्तूवर मी माझ्या विचारांची इतकी एकजीवाची छाप बसविली आहे, की कुत्र्याच्या विषाने अंग भडभडले म्हणजे मनुष्य कुत्र्याप्रमाणे भुंकतो किंवा सर्पाच्या विषाच्या लहरी अंगात भिनल्यावर सर्पाप्रमाणे फुत्कार टाकितो त्याप्रमाणे इथल्या प्रत्येक वस्तूतून वृंदावनाचेच विचार बाहेर पडतील! रागाने या फरसबंदीच्या फत्तरावर पाय आपटून पाहा-तुला वृंदावनाच्या हृदयाची साक्ष पटेल! या धगधगणाऱ्या दीपज्योतीकडे नजर टाक-तुला वृंदावनाच्या नजरेतला अंगार दिसून येईल! हलवून पाहा हा लोखंडी जंजीर-तो वृंदावनाची भाषा बोलायला लागेल! चल, मार लाथ या खांबावर! नरसिंहाच्या रूपाने त्यातून ईश्वर बाहेर आला तर नजरेच्या एकाच फेकीने दबवून त्याला माझ्या पायांवर कुत्र्यासारखे लोळायला लावीन! वसुंधरे, माझ्या शक्तीची तुला कल्पनाही नाही! अशी बावरल्यासारखी इकडे तिकडे का पहातेस? वसुंधरे, सांग कोणत्या वस्तूतून ईश्वर तुझ्या साहाय्याला येणार आहे तो? ज्या वस्तूचे नाव घेशील ती वस्तु तुझ्यादेखत पायांखाली तुडवून टाकतो! सांग, कोणता ईश्वर इथे येणार?

**वसुंधरा** : कोणता ईश्वर? वृंदावन, तुमच्या हृदयातला ईश्वर!

**वृंदावन** : (दचकून स्वगत) हा, हृदया, वृंदावनाच्या हृदया, असे चरकू नकोस! भीतीने असे दचकून कापू नकोस! पण मला ही भीती तरी कसली वाटली? ईश्वराची-वसुंधरेच्या ईश्वराची-वृंदावनाच्या हृदयातल्या ईश्वराची-माझ्याही हृदयात ईश्वर आहेच का? हृदयात डोकावून पाहण्यासाठी आत वळण्याचा डोळ्याना धीरच होत नाही! पण न होऊ दे-वृंदावन नुसत्या शब्दांनी गांगरला असे कधीही होणार नाही! (उघड) माझ्या हृदयातला ईश्वर? वसुंधरे, वृंदावनाच्या हृदयात वृंदावनाखेरीज काहीच नाही! या देहाच्या प्रत्येक रोमात, रक्ताच्या प्रत्येक लहरीत, श्वासाच्या प्रत्येक कंपनात एक वृंदावन, वृंदावन आणि वृंदावनच भरून उरला आहे!

**वसुंधरा** : आणि त्या वृंदावनांनाच मी ईश्वर म्हणते. वृंदावन, तुमची सारी शक्ति, सारी निर्दयता, या दुबळ्या, अनाथ पण सात्विक वसुंधरेपुढे, या वेळी तिचा छळ करण्यासाठी एक क्षणभरही उभी राहणार नाही! उलट तिचे रक्षणच करील. ते पाहा, तुमचे हात जागच्या जागी चळवळत आहेत. काय करावे आणि काय नाही याचा ते जणू काय विचारच करीत आहेत. माझ्या अंगाला शिवण्याची त्यांना अग्निस्पर्शासारखी भीती वाटून त्यांच्यातून घामाच्या धारा वाहतील; पण माझ्या शीलरक्षणासाठी मात्र ते आपखुषीने काळाच्या दाढेतही उडी टाकतील !

**वृंदावन** : (स्वगत) पुरुषांचा पराक्रम अबलांच्या रक्षणासाठी असतो, हे कालिंदीचे शब्द माझ्या कानांभोवती नाचायला लागले आहेत; पतिव्रतांच्या प्रभावामुळे पुरुषार्थाचा परमेश्वर जागा होतो, या भूपालाच्या शब्दांनी भोवताली सारखा सारखा गोधळ मांडिला आहे! नाही, मी ते शब्द ऐकणार नाही- (कानावर हात ठेवितो.) अजून तेच शब्द! हृदयातसुद्धा त्या शब्दांनी सारखे थैमान मांडले आहे! त्यांच्या मिश्र कोलाहलांतून 'वृंदावन, वसुंधरेचे रक्षण कर; वृंदावन, वसुंधरेचे रक्षण कर' असा आक्रोश निघत आहे! हा आक्रोश कोणाचा? त्या त्या वेळी मनातल्या मनात मारून टाकिलेल्या त्या शब्दांची भुते आज जागी झाली आहेत, की वृंदावनाच्या हृदयातला ईश्वरच जागा-नाही! कानांवर हात ठेवून उपयोगी नाही! माझ्या मनाची चलबिचल माझ्या शरीराच्या अनिश्चित हालचालीमुळे वसुंधरेच्या लक्षात येईल. (उघड) नाही, वसुंधरे; या हातांचा भरवसा धरू नकोस ! हा पाहा वृंदावनाचा इमानी हात! त्याच्या जीविताची ही शीर तोडलीस तर आजच्या करणीसाठी उत्साहाने उकळणाऱ्या त्यातल्या रक्ताचा रंगसुद्धा माझ्या विचाराप्रमाणेच काळाकुट्ट आहे असे तुला दिसेल!

**वसुंधरा** : मुळीच नाही ! माझ्या निर्मल आणि करुण दृष्टीशी त्याची दृष्टि मिळताच आपल्या

अघोरपणामुळे ओशाळून त्या काळ्या रक्तावर ताबडतोब लज्जेची लाली चढेल! आता विलंब करू नका. वृंदावन, तुम्हाला दोनदा सांगितले-तुम्हाला लाजविण्यासाठी-तुमच्या दिव्य पुरुषार्थाला आपली ओळख पटवून देण्यासाठी-तुमच्या पराक्रमशक्तीला तिची खरी योग्यता कळविण्यासाठी-तुमच्या हृदयातल्या परमेश्वराला हाक मारण्यासाठी-पुन्हा तिसऱ्यांदा सांगते, माझ्या हातातला हार तुम्ही मान पुढे करण्याची वाट पाहात आहे. चला, वृंदावन, पतिव्रतेचा पावित्र्याचा हार स्वीकारण्यासाठी आपली मान पुढे वाकवा! पराक्रमी नरसिंहा, नि:सहाय, अनाथ निर्बल हरिणीच्या कोमल हृदयाच्या चिंधड्या करून आपल्या पुरुषार्थाला सार्थकी लावा! उठा, बंधुराज, पापवासनेने आपल्या भगिनीचा हात धरा! चला, वृंदावनस्वरूपी परमेश्वरा, आपल्या सैतानी पावलांखाली माझ्या सात्त्विक पुण्याईला तुडवून टाका.

**वृंदावन** : (स्वगत) वीरावतीच्या रणसंग्रामात, उभयपक्षांचे वीर वैराच्या भराने एकमेकांना आलिंगने देत असताना, हाताच्या अंतरावर नाचणाऱ्या तलवारीच्या आणि भाल्यांच्या टोकापुढे छाती करिताना मी मागेपुढे पाहिले नाही; पण वसुंधरेचा प्रत्येक शब्द आदळताच हे हृदय हबकून मागे हटत आहे! यापुढे एक शब्दसुद्धा बोलू नकोस म्हणून सांगण्याचा मी विचार करीत आहे; पण माझ्याच तोंडातून एक शब्दही निघेनासा झाला आहे! माझ्या मनाचा साऱ्या शरीरावरचाच ताबा पार उडून गेला आहे!

**वसुंधरा** : वृंदावन, इतका वेळ तुमच्या हातून क्रिया होत नव्हती; आता तुमची वाणीसुद्धा बंद झाली! या हारातली कळी न् कळी आता पुरी उमलली आहे! पाहा, तुमचे तोंड मिटलेले पाहून हे वनस्पतींचे तेजस्वी डोळेसुद्धा हसून तुमचा उपहास करू लागले आहेत! तुमच्या त्या बांधलेल्या नजरेने त्यांच्याकडे एकदा पाहा तरी!

**वृंदावन** : त्यांचा पूर्ण विकास झाला आहे ना? आता माझ्या स्पर्शाने त्यांना कोमेजून, करपवून टाकायला काही हरकत नाही! वसुंधरे, मी तर त्यांच्याकडे पाहीनच, पण तुझ्या नवऱ्यालासुद्धा या प्रसंगी येथे उभा करून हा देखावा दाखविण्याचा माझा विचार होता.

**वसुंधरा** : मग तो का नाही सिद्धीस नेलात?

**वृंदावन** : स्वत: भूपालाने मला कधीच दुखविले नसल्यामुळे त्याला असे दु:ख देताना मला त्याची दया आली.

**वसुंधरा** : त्यांची दया आली नाही पण तुमची तुम्हाला लाज वाटली! तुमच्या पापी डोळ्यांना त्यांच्या निर्दोष तेजाची भीती वाटली. वृंदावन, कबूल करा अगर नका करू, तुमच्या हृदयातला ईश्वर आता जागा झाला आहे.

**वृंदावन** : जागा झाला असला तरी त्याला पायांखाली तुडवून जमीनदोस्त करून टाकीन.

**वसुंधरा** : आपले हृदय आपल्या स्वत:च्याच पायांनी केव्हाही तुडविता येत नाही. भोवताली पसरलेल्या वस्तुमात्रांतला ईश्वर एखाद्या पतिताने पायाखाली तुडवून टाकला तरी निदान त्याच्या हृदयातला ईश्वर जिवंत रहावा म्हणून विधात्याने हृदयाची उभारणी पायांच्या वर केली आहे.

**वृंदावन** : माझ्या हृदयातल्या ईश्वराला पायांनी तुडवीत बसण्याचे कारणच उरले नाही. आजवर हृदयात पेटलेल्या सुडाच्या रखरखीत निखाऱ्याखाली ईश्वराची जळून राखरांगोळी झाली आहे.

**वसुंधरा** : तुमचे शब्दच इतके निर्जीव वाटतात, की तुमचा स्वत:चासुद्धा त्यांच्यावर विश्वास बसणार नाही. अगदी पातकी मनुष्याच्या आयुष्यातसुद्धा असा प्रसंग एकदा तरी येतोच येतो, की ज्या वेळी त्याच्या पापाची परमावधि होऊन अगदी क्षुल्लक कारणामुळे त्याची पुण्यमार्गाकडे प्रवृत्ती होते. वृंदावन, तुमच्या आयुष्यातला तो प्रसंग या वेळी, या घटकेला- असे कावरेबावरे होऊ नका- या क्षणाला, आताच चाललेला आहे. तुमच्या पापाची सीमा संपली. तुमच्या शरीराची हालचाल, तुमच्या मनाची चलबिचल-पलीकडच्या आरशात पाहा, तुमच्या पळून जाणाऱ्या पापाची ही भेदरलेली हालचाल पाहून तुमची तुम्हालासुद्धा भीती वाटेल-तुमची ही दशा अट्टाहासाने ओरडून सांगत आहे, की माझ्या पतींना इथे न आणण्याची तुम्हाला सल्ला देणारी तुमची विवेकशक्ती या वेळी तुमच्या शरीरातल्या प्रत्येक अणुरेणूंत स्फुरण करू लागली आहे.

**वृंदावन** : (स्वगत) माझ्या शब्दांत जोर नाही, हे वसुंधरेचे म्हणणे खरे आहेसे वाटू लागले आहे. माझी स्थिती खरोखरीच चमत्कारिक झाली आहे. एक विचार अर्धामुर्धा होतो न होतो तोच दुसऱ्याचा आरंभ होतो. डोळे फाडून पाहिले तरी समोर असलेली वस्तु दिसत नाही; मनातल्या मनात उच्चारलेले शब्द खोल विहिरीतून निघालेल्या आवाजाप्रमाणे भेसूर घुमत आहेत. स्मशानात अंधाऱ्या रात्री वावरणाऱ्या भेकड मनुष्याला तिथली झाडेसुद्धा वाऱ्याने किंचित् हालताच आपल्याकडे पाहून कुजबुजताहेत, जमिनीला खिळलेले फत्तर आपल्याकडे सभय मुद्रेने टवकारून पाहण्यासाठी उठून उभे रहात आहेत, प्रत्येक पाऊल पुढे टाकताच मागे मागे सरणारा दाट काळोखसुद्धा आपल्याला त्या भयाण जागी एकटे टाकण्यासाठीच पळून जात आहे असे वाटते, त्याप्रमाणेच माझ्या भोवतालच्या वस्तूकडे पाहताच मलाही नसते भास होऊ लागले आहेत. तुझ्या नजरेचा आमच्यावरचा अंमल पार उडून गेला आहे असे बजावून सांगण्यासाठी साऱ्या वस्तू माझ्याकडे स्वतंत्र दृष्टीने पहात आहेत. त्यांचा आकारसुद्धा उपहासाचा दिसत आहे. त्यांना कोणते प्रत्युत्तर देऊ? आणि वसुंधरेला तरी

काय प्रत्युत्तर देऊ? (उघड) वसुंधरे, माझ्या शरीरातल्या अणुरेणूंत परमेश्वराचा संचार झाला असेल तर त्याचे सारे अणुरेणु दाही दिशांत उधळून टाकून, नुसता मनोमय वृंदावन आपला हेतू तडीस नेईल.

**वसुंधरा** : मग माघार का घेता? शब्दांच्या रूपाने वाऱ्यावर वाहवणारी जीवनशक्ति कृतीच्या आकारात कशी येणार? माझ्या हातातला हार मघापासून तुमच्यासाठी तिष्ठत आहे. हा पुष्पस्वरूप परमेश्वर तुमच्या पापांची कसोटी पाहून कंटाळून गेला आहे. तुमच्या पापाची त्याच्यावर कृपादृष्टि होऊ द्या.

**वृंदावन** : (स्वगत) स्वप्नातल्या देखाव्यात नुसत्या आकृतीच आपल्याला नकळत बदलत असतात, पण माझ्या भोवतालच्या या पदार्थांचे तर गुणधर्मसुद्धा बदलू लागले आहेत. इंद्रियांचे विषयाशी नाते बदलून, प्रत्येक वस्तूची जाणीव अगदी निराळ्या रूपाने होऊ पाहात आहे. स्वत: वसुंधरेकडे पाहण्याची गोष्ट नकोच, पण तिच्या हातातल्या हाराकडेसुद्धा पाहण्याची हिंमत होत नाही; फुलांतले सुगंधी सौंदर्य डोळ्यांना दिसेनासे होऊन, मनाला त्यांच्यातली निष्ठुर क्षणभंगुरता मात्र जाणवत आहे. त्यांचा शुभ्रपणा काळवंडून या हाराला कृष्णसर्पाचे भयंकर रूप आले आहे. माझ्या डोळ्यातला काळेपणा या फुलांवर वठला, की या जादुगारणीनेच या हाराचा काळा सर्प करून टाकला आहे? या सर्पाने माझ्या गळ्यात मिठी मारली तर-छे; सुगंधी श्वासाच्या ऐवजी याच्यातून निघणाऱ्या विषारी वाफांनीच मी नखशिखांत करपून निघत आहे. हा दिवासुद्धा अगदी बदलून गेला आहे; या दिव्यातले तेज मावळून त्याची दाहकता उत्कट होत आहे; आपल्या तेजाने भोवतालचे पदार्थ नीट दाखविण्याऐवजी याची दाहकता माझ्या डोळ्यांना दुरूनसुद्धा जाळीत आहे. या दगलबाज दिव्याला फुंकून टाकले म्हणजे याचे हे दाहक तेज, आणि या कृष्णसर्पाचा हा विषारी काळेपणा या दोघांचाही लोप होऊन जाईल- (दिवा फुंकावयास जाऊ लागतो.)

**वसुंधरा** : नामर्द! हा दिवा मालवून काय होणार? हृदयात प्रदीप्त झालेली ईश्वरी तेजाची जिवंत ज्योती हा दिवा मालवून विझेल काय? वृंदावन, तुमच्या पापाची सीमा संपली; तुमच्या भेकड मनाच्याने पापाच्या क्रूरपणाकडे आता पाहवणार नाही. आज रात्री तुम्हाला तेजस्वी तारांकडे पाहवेना; माझ्या पतींना इथे आणण्याचा तुम्हाला धीर झाला नाही; तुम्हाला माझ्याकडे पाहवत नाही; या हाराकडे पाहवत नाही; या दिव्याने तुमची दृष्टी दीपून जात आहे; तुमचे पाप इतके भितरे आहे! तुमच्या उद्धाराची वेळ हीच आहे; आणि वृंदावन-तुमच्याशी आता अनाथ वसुंधरा बोलत नाही, दीनाराची दु:खी आई बोलत नाही, तुमच्या ताब्यात सापडलेली दुर्दैवी पतिव्रता बोलत नाही, पण माझ्या शरीरातल्या अणुरेणूंत संचारलेला, स्त्रीजातीचा पक्षपाती, पतिव्रतांचा पाठिराखा, स्त्रीस्वरूप परमात्मा,

आपल्या पावित्र्याच्या अभिमानाने, स्वयंस्फूर्तीच्या उत्साहाने तुम्हाला निर्वाणीचे शब्द सांगत आहे, की हाच वृंदावनाचा उद्धारकाल. आणि वसुंधरा ही वृंदावनाची उद्धार करणारी देवता! माझ्या हातूनच तुमचा उद्धार होणार आहे!

**वृंदावन** : वसुंधरे, या बोलण्याने माझ्यावर काही परिणाम होणार नाही. हा पाहा, माझ्या हाताने तुझा हात धरून या हाराचा स्वीकार करितो.

**वसुंधरा** : वृंदावन, या क्षणीच ते धाडस करा. व्हा पुढे. माझ्या कोवळ्या दीनाराला कापून काढण्यासाठी कट्यार उगारणारा तुमचा हात या वेळी भीतीने लटलटू देऊ नका. आणखी वृंदावन, मी आता अगदी अधीर झाले आहे; एक क्षणाचाही विलंब लावू नका. तुम्हाला परमेश्वराची-तुमच्या पातकांची शपथ आहे, करा पुढे आपला हात !

**वृंदावन** : (स्वगत) आता हिय्या केलाच पाहिजे. वृंदावन, हीच तुझ्या कर्तबगारीच्या कसोटीची वेळ आहे. (उघड) वसुंधरे, हा पाहा मी तुझा हात धरून तुझ्या पातिव्रत्याला पायाखाली तुडवून टाकतो.

**वसुंधरा** : दीनाराचा बळी घेणाऱ्या परमेश्वरा, आता तुझी लाज तुलाच! (डोळे झाकून घेते. वृंदावन आवेशाने जातो व एकदम तिचे पाय धरितो.)

**वृंदावन** : वसुंधरे, तुझा दीनार मेला नाही, तो अजून जिवंत आहे.

**वसुंधरा** : (डोळे उघडून) कुठे आहे माझा दीनार?

**वृंदावन** : (उठून उभा राहतो.) हा पाहा-अशी दृष्टि तरळू देऊ नकोस. नाही तर वयाने वाढल्यामुळे तुझ्या दीनाराची तुला ओळख पटणार नाही! मेला तो वृंदावन, आणि हाच तुझा दीनार! नको, अशी संशयाच्या, रागाच्या, तिरस्काराच्या किंवा अनोळखीच्या दृष्टीने आता माझ्याकडे पाहू नकोस! मी तुझा हात धरिला असता तर दोघांचा अध:पात झाला असता आणि तुझे पाय धरिले तर दोघांचाही उद्धार होईल!

(तिचे पाय धरावयास जातो; ती हाताने त्याला थांबवू लागते.)

**वसुंधरा** : वृंदावन-

**वृंदावन** : वसुंधरे, वृंदावनाचा अवतार मघाशीच संपला! देवी, माझ्या उद्धाराच्या आड येऊ नकोस. (तिचे पाय धरितो.) माते, त्या दीनारावर तू दुग्धामृताची वृष्टी केलीस, आता या दीनारावर आपल्या मंगल अश्रूंचा अभिषेक कर! त्या भाग्यशाली बालकाला हातावर झेललेस; माते, या तुझ्या पातकी बाळाला तुझ्या पवित्र पायांचीच जोड दे! माते, मला दूर लोटू नकोस!

(तिच्या पायांवर डोके ठेवतो.)

**वसुंधरा** : उठा वृंदावन, काय हे?

**वृंदावन** : काय हे? पतिव्रते, हा तुझा पुण्यप्रभाव! पतिव्रतांची पुण्याई पातकी पुरुषालाही परमेश्वराच्या पदवीला पोचविते आणि नरपशूला नारायणस्वरूप करिते! पतिव्रतेच्या पुण्याईपुढे पाप पांगळे पडून तिच्या पायांशी अशी लोळण घेते!

**वसुंधरा** : वृंदावन, तुमच्या उद्धाराबद्दल तुम्ही त्या पतितपावन परमेश्वराचे पाय धरा!

**वृंदावन** : नाही, माझा परमेश्वर तुझ्या पायांशीच आहे! माझा उद्धार व्हावयाला कारण तुझा पुण्यप्रभाव!

(राजा, भूपाल, कालिंदी, व मागाहून युवराज, सुदाम, दामिनी, कंकण, नूपुर व किंकिणी प्रवेश करितात. एकीकडून ईश्वर बाहेर येतो.)

**राजा** : आणि तुमच्या कालिंदीचाही पुण्यप्रभाव! वृंदावन, कालिंदीच्या तोंडून आणि आता इथे राहून ऐकिलेल्या गोष्टींवरून तुमच्या अपराधाची तीव्रता बरीच कमी झाली नसती तर तुमचे तोंडसुद्धा पाहण्याचा मी तिरस्कार केला असता.

**वृंदावन** : आणि, महाराज, या दिव्यपदांचा आधार मिळाला नसता तर मलासुद्धा आपल्याला तोंड दाखविण्याचा धीर झाला नसता. आज ईश्वरानेच मला ही सद्बुद्धि दिली.

**राजा** : कालिंदी, तुझी हकिकत ऐकण्याच्या भरात, तुला साहाय्य करणाऱ्या त्या ईश्वरांना बोलाविण्याचे तसेच विसरून राहिले. कोण आहे-

**ईश्वर** : महाराज, आपण नामोच्चार केल्यामुळे धन्य झालेला हा ईश्वर प्रणाम करीत आहे.

**राजा** : उठा, ईश्वर, तुम्ही या पतिव्रतेला खरोखरीच मोठे साहाय्य केले आहे. आता सर्वांना साद्यंत वृत्तांत ऐकण्याची जिज्ञासा झाली आहे ती तृप्त करणे तुमच्याकडे आहे.

**ईश्वर** : वृंदावन, एका कठोर कार्यात तुमच्या मनाविरुद्ध कालिंदीबाईंना साहाय्य केल्याबद्दल मला क्षमा करा. महाराज, यांनी दीनाराला मारण्याची शपथ घेतल्यामुळे आम्हाला कपटमार्गाने जाण्याखेरीज गत्यंतर नव्हते; म्हणून ऐनवेळी दामिनीचा बुरखा पांघरून कालिंदीबाई तळघरात हजर राहिल्या; आणि वसू, आता वृंदावनांनी म्हटल्याप्रमाणे तुझा दीनार खरोखरीच जिवंत आहे. दामिनी, इकडे ये पाहू. (दामिनीजवळून दीनाराला घेऊन वसुंधरेजवळ देतो.) वसुंधरे, हा घे तुझा दीनार!

**वसुंधरा** : देवा, तुझ्या करणीला कठोर मानिले त्याची क्षमा कर! नाथ, हा आपला दीनार!

**वृंदावन** : मग त्या वेळी माझ्या हातून-(एकदम) कालिंदी, आपला केतन कुठे आहे ?

**कालिंदी** : नाथ, क्षमा करा. या सूर्यदर्शनाने इतर तारका नाहीशा होत असतील; पण तारकापदाला पोचलेला आपला बाळ हा भाग्यशाली प्रसंग पाहण्यासाठी अजून आकाशात घुटमळत असेल. नाथ, आपण ज्याचा वध केला तो दीनार नव्हता-आपला केतन होता; आणि त्या क्रूर कृत्यात दामिनीने आपणाला साहाय्य केलेले नसून आपल्या या अपराधी सहधर्मचारिणीनेच ते केले. नाथ, आपण बोलत का नाही? या अपराधाची मला क्षमा होईल ना?

**ईश्वर** : कालिंदीबाई, हा शोक आवरून धरा. आणखी एक गोड कपट मला करावे लागले. तुम्ही बाळगोळी मागितल्यामुळे तुमच्या बेताची खरी कल्पना मला झाली. पुढे केतनला घेऊन संध्याकाळी तुम्ही माझ्या आश्रमात आला त्या वेळी तुमची नजर चुकवून तुमच्या केतनाच्या जागी त्याच दिवशी मेलेले एक मूल आणून ठेविले. त्या मुलाला घेऊन नंतर आपण तळघरात गेलो. वृंदावनांनी निर्जीव हत्या केली आणि कालिंदीबाई-(दामिनीजवळून केतनला घेऊन) हा घ्या तुमचा केतन!

**कालिंदी** : बाळ, माझ्याशीसुद्धा असे कपट केलेस? नाथ, या लबाडाला काही शिक्षा करायची होती. अगंबाई, आपले तोंड असे गोरेमोरे का? आपल्या कृपादृष्टीने माझ्याकडे एकदा पहायचे होते!

**वृंदावन** : पापाला वर पाहण्याचा धीर होत नाही आणि पश्चात्तापाची नजर खाली वळलेली असते. देवी, दिव्यदर्शनानही न दिपून जाणारे डोळे मी कुठून आणू?

**कालिंदी** : नाथ, दयेचे डोळे पाण्याने डबडबलेले असतात आणि क्षमा तर आंधळीच असते.

**वृंदावन** : महाराज, मी आपल्याजवळ कोणत्या तोडाने क्षमा मागू?

**राजा** : आणि मी तरी तुम्हाला कोणत्या तोंडाने क्षमा करणार? मी स्वत:च क्षमेची याचना करणारा आहे. आपण दोघांनीही आधी भूपालांची क्षमा मागितली पाहिजे. भूपाल, वृंदावनांचा जाणता आणि माझा नेणता अपराध अगदी अक्षम्य असले तरी-

**भूपाल** : महाराज, अक्षम्य असा अपराध कोणताच नाही. दुसऱ्याला क्षमा न करता येणे हाच एक क्षमा न करता येण्याजोगा अपराध आहे. महाराज, माझी क्षमा मागण्याऐवजी आपण सर्वांनी या परोपकारी पाहुण्यांना आधी धन्यवाद दिले पाहिजेत.

**ईश्वर** : मंडलेश्वर, माझ्या जागी दुसरा कोणताही मनुष्य असता तरी त्याने असेच केले असते; यात माझे धन्यवाद कसचे?